# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. ०१/ २०१४** **दिनांक ०८.०१.२०१४**
**स्थळ- शिर्डी कार्यालय** **वेळ- दुपारी ०३.०० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा बुधवार दि.०८.०१.२०१४ रोजी दुपारी ०३.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात (साईनिवास अतिथीगृहात) आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं. एसएसएस/ वशी-०४/४६२१/ २०१४, दिनांक ०८ जानेवारी, २०१४ रोजीचे पत्राने सर्व सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा बुधवार दि.०८.०१.२०१४ रोजी दुपारी ०३.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहात सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१. मा.डॉ.संजीवकुमार, जिल्हाधिकारी, अहमदनगर, तथा सदस्य
०२. श्री.अजय मोरे, कार्यकारी अधिकारी, सदस्य

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत व आजची सभा मा.डॉ.संजीवकुमार, जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा सदस्य यांचे अध्यक्षतेखाली सुरु करणेबाबत, मा.श्री.जयंत दत्तात्रय कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष यांनी दूरध्वनीवरुन कळविले. त्याची नोंद घेण्यात येऊन, समितीने त्यांना अनुपस्थित राहणेची अनुमती दिली.

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा.डॉ.संजीवकुमार, जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा सदस्य यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

यानंतर विषय पत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरू करणेत आली.

**विषय नं.०१** **दिनांक १३.१२.२०१३ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.**

**निर्णय क्र.०१** दिनांक १३.१२.२०१३ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधरण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्यांची नोंद घेण्यात येऊन सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

---

**विषय नं.०२** **दिनांक ०६.०१.२०१४ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र.०२** दि.०६.०१.२०१४ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

**०१** **<u>श्री साईबाबा मंदिर परिसराचे महाद्वारालगत सुरक्षा मोर्चे उभारणेकामी प्राप्त निविदा उघडून त्यावर चर्चा/ वाटाघाटीद्वारे निर्णय होणेबाबत.</u>**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधील तरतूद:-** अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट-कलम (१) च्या खंड (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधींचा विनियोग करण्याची तरतूद आहे.

**व्यवस्थापन समिती निर्णय:-** दि.१२/१२/२०१२ रोजी झालेल्या मा. त्रिसदस्य समितीचे सभेत समाधी मंदिर परिसरातील महाव्दारालगत सुरक्षिततेच्या दृष्टीने सुरक्षा मोर्चे उभारणेबाबत खालीलप्रमाणे निर्णय क्र. ११०५ संमत करणेत आलेला आहे.

"प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे मंदिर परिसराचे चारही महाव्दारांचे ठिकाणी सुरक्षिततेच्या दृष्टीने सुरक्षा मोर्चे उभारणीकरिता पोलिस उपअधिक्षक यांचेकडून सुरक्षा मोर्च्यांचे डिझाईन देण्यात येईल. त्यानुसार संस्थानमार्फत सुरक्षा मोर्चांची उभारणी करण्यात यावी. उपरोक्त कामी येणाऱ्या सर्व समावेशक खर्चास मान्यता देण्यात आली."

**प्रस्ताव:-** मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, शिर्डी विभाग, शिर्डी यांचेकडील दि. १४/०२/२०१३ रोजीचे पत्राव्दारे सी. आय. एस. एफ. मुंबई यांचेकडून प्राप्त करुन घेणेत आलेल्या सुरक्षा मोर्चाचे डिझाईन व स्पेशिफीकेशन प्रमाणे मंदिर परिसराचे चारही महाव्दारांवर सुरक्षा मोर्चाची उभारणी करणे प्रस्तावीत आहे. याकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून त्यावर निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा. त्रीसदस्य समितीचे दि. १८/१०/२०१३ रोजीच्या सभेपुढे सादर करण्यात आला. सदरहु सभेतील निर्णय क्र.८०८ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"श्री साईबाबा मंदिर परिसराचे महाव्दारालगत सुरक्षा मोर्चे उभारणेकामी विहित मुदतीत दोनच निविदा प्राप्त झालेल्या असल्यामुळे, सदरकामी प्रस्तावात नमुद केलेल्या पाचही ठेकेदारांकडून फेर निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले."

त्यानुसार इकडील विभागाचे दि.२१/११/२०१३ रोजीच्या पत्रान्वये खालील पाच ठेकेदारांना सिलबंद निविदा सादर करणेस कळविणेत आले.

०१. मे. रविंद्र रबर प्रॉडक्टस् ॲण्ड फॅब्रीकेशन, श्रीरामपूर

०२. गायत्री एन्टरप्राईज, नाशिक

०३. पुजा आर्क्रिट्रेक्चरल सिस्टीम प्रा. लि. सांताक्रुझ, मुंबई

०४. बोरकर पॉलीमर्स, कांदिवली (पूर्व) मुंबई.

०५. साई इंडस्ट्रीज, कोपरगांव

उपरोक्तपैकी विहित मुदतीत खालील ठेकेदार यांनी सिलबंद निविदा सादर केलेल्या आहेत.

| **अ.नं.** | **ठेकेदार यांचे नांव व पत्ता** | **आवक नंबर व दिनांक** |
|---|---|---|
| **०१.** | मे. रविंद्र रबर प्रॉडक्टस् ॲण्ड फॅब्रीकेशन, श्रीरामपूर | १३२७९ / दि.१८/११/२०१३ |
| **०२.** | साई इंडस्ट्रीज, कोपरगांव | ३५२७ / दि.२२/११/२०१३ |
| **०३.** | बोरकर पॉलीमर्स, कांदिवली (पूर्व) मुंबई | ३३२६ / दि.२९/०५/२०१३ |

उपरोक्तपैकी अ.नं. ०३ चे ठेकेदार बोरकर पॉलीमर्स, कांदिवली (पूर्व) मुंबई. यांनी त्यांचे दि.१६/११/२०१३ रोजीचे पत्राने त्यांनी दि. २९/०५/२०१३ रोजी जमा केलेली सिलबंद निविदा ग्राहय धरण्यात यावी अशी विनंती केलेली आहे.

सुरक्षा मोर्चे तयार करणेसाठी येणारा खर्च हा रु. १० लक्ष मात्रचे आत येईल असा अंदाज आहे. त्यामुळे सदर कामासाठी मा.त्रीसदस्य समितीचे दि.२६/०७/२०१३ रोजीचे सभेतील नि.क्र. ५८४ अन्वये झालेल्या निर्णयानुंसार याकामी निविदा मागविणेची आवश्यकता नाही.

साईबाबा मंदिर सुरक्षेचे दृष्टीने सदरहू विषय तातडीचा असल्याने महाव्दारालगत सुरक्षा मोर्चे उभारणेकामी प्राप्त झालेल्या ०३ सिलबंद फेरनिविदा आजचे सभेपुढे उघडणेत येऊन त्यांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | निविदेमधील दर रु. | चर्चा/ वाटाघाटीअंती देऊ केलेला दर रु. |
|---|---|---|---|
| १ | मे. रविंद्र रबर प्रॉडक्टस् ॲण्ड फॅब्रीकेशन, श्रीरामपूर | ११,४०,०००/- | १०,४९,०००/- |
| २ | साई इंडस्ट्रीज, कोपरगांव | १०,५०,०००/- | अनुपस्थित |
| ३ | बोरकर पॉलीमर्स, कांदिवली (पूर्व) मुंबई | अपात्र | --- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा मंदिर परिसराचे महाद्वारालगत सुरक्षा मोर्चे उभारणेकामी अंदाजे रु.१०,००,०००/- मात्र खर्च अपेक्षित होता. परंतु निविदा उघडलेनंतर त्यामध्ये रु. १०,४९,०००/- मात्र निम्नतम दर आलेला आहे, त्यामुळे या खर्चास मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घ्यावी लागणार आहे.**

**तसेच, उपसमितीला रु.दहा लाख मात्र खर्चापर्यंतची मर्यादा आहे व प्रस्तावित कामासाठी फक्त एकच निविदाधारक चर्चा/ वाटाघाटीसाठी उपस्थित होते, त्यामुळे सदरहूकामी फेर जाहिरात देण्यात यावी, अशी शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

०२ **<u>श्री साईबाबा भक्तनिवास, द्वारावती भक्तनिवास व साईआश्रम परिसरातील रस्त्यावर स्पीडब्रेकर बसविणेकामी प्राप्त निविदा उघडून त्यावर चर्चा/ वाटाघाटीद्वारे निर्णय होणेबाबत.</u>**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील तरतुदः अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

मा. व्यवस्थापन समितीचा ठरावः १. मा. त्रिसदस्य समितीचे दिनांक १७/०९/२०१३ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ६२७ अन्वये श्री साई आश्रम-०१ परिसरातील रोडवर स्पीड ब्रेकर व कॅट आय बसविणेकामी येणारे अंदाजे रुपये ४,५४,०००/- मात्रचे खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने कोटेशन मागवून करुन घेणेस मान्यता देण्यात आली आहे. २.मा. त्रिसदस्य समितीचे दिनांक १७/०९/२०१३ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ६२४ अन्वये श्री साईबाबा भक्तनिवासस्थान व व्दारावती भक्तनिवास परिसरातील रोडवर स्पीड ब्रेकर बसविणेकामी येणारे अंदाजे रुपये २,०१,६००/- मात्रचे खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने कोटेशन मागवून करुन घेणेस मान्यता देण्यात आली आहे.

प्रस्ताविक: श्री साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीचे दक्षिण बाजूकडील शैक्षणिक संकुल समोरील रस्त्यावर, श्री साईनाथ रुग्णालय व व्दारावती भक्तनिवास इमारतीकडे जाणाऱ्या रस्त्यावर तसेच श्री साई आश्रम-०१ परिसरातील रोडवर स्पीड ब्रेकर व कॅट आय बसविणेकामी याकामी उपरोक्त निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

प्रस्ताव: उपरोक्त तिनही ठिकाणी स्पीड ब्रेकर बसवून घेणेकामी इकडील जा. नं. २८२३/२०१३ दि. २६ नोव्हेंबर, २०१३ व जा. नं. २८२३/२०१३ दि. ०२ डिसेंबर, २०१३ रोजीचे कोटेशन मागणी पत्र देऊन दिनांक १० डिसेंबर, २०१३ अखेर कोटेशन मागविण्यात आलेले आहेत. उपरोक्त विहीत मुदतीत खालील ठेकेदारांनी कोटेशन सादर केले आहे.

१. व्हर्टेक्स ग्रुप, पुणे- ई-मेलद्वारे व आवक विभागाद्वारे उघडून प्राप्त
२. संजय बी.सुनात, पुणे-०२ सिलबंद कोटेशन
३. डी.बी.एम.कन्स्ट्रक्शन, पुणे - ०१ सिलबंद कोटेशन
४. महिमा कन्स्ट्रक्शन, पुणे -०२ सिलबंद कोटेशन
५. परफेक्ट वेल्डींग सोल्युशन, मुंबई -ई-मेलद्वारे प्राप्त
६. रियल्टेक, ठाणे -ई-मेलद्वारे प्राप्त

तरी वरील प्रमाणे ई-मेलद्वारे प्राप्त झालेले कोटेशन्स तसेच अ. नं. २ ते ४ ठेकेदारांचे प्राप्त झालेले सिलबंद कोटेशन्स आजचे उपसमिती सभेत उघडणेत येऊन, कोटेशन्सधारकांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविणेत आले असता, एकच कोटेशनधारक चर्चा/ वाटाघाटीसाठी उपस्थित होते, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

**साईआश्रम परिसरातील रस्त्यावर स्पीडब्रेकर बसविणेकामीचा तुलनात्मक तक्ता-**

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव | तपशील | कोटेशनमधील मुळ दर रु. | चर्चा/ वाटाघाटीअंती देऊ केलेले दर |
|---|---|---|---|---|
| ०१. | व्हर्टेक्स ग्रुप, पुणे | **1)** Providing & Fixing Rubberised Speed Breaker 125 Rmt (Size-500x400x48 mm) **2)** Cat eye 300 Nos | ४,३३,३५०/- | ४,११,६८२/- |
| ०२. | संजय बी.सुनात, पुणे | | **२,९४,०००/-** | अनुपस्थित |
| ०३. | डी.बी.एम.कन्स्ट्रक्शन, पुणे | | ५,१७,५००/- | अनुपस्थित |
| ०४. | महिमा कन्स्ट्रक्शन, पुणे | | ९,०६,५००/- | अनुपस्थित |
| ०५. | परफेक्ट वेल्डींग सोल्युशन, मुंबई | | २,७४,२१८.७५ (Only Speed Breaker) | अनुपस्थित |
| ०६. | रियल्टेक, ठाणे | | २,५३,१२५/- (Only Speed Breaker) | अनुपस्थित |

**श्री साईबाबा भक्तनिवास, द्वारावती भक्तनिवास परिसरातील रस्त्यावर स्पीडब्रेकर बसविणेकामीचा तुलनात्मक तक्ता-**

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव | तपशील | कोटेशनमधील मुळ दर रु. | चर्चा/ वाटाघाटीअंती देऊ केलेले दर |
|---|---|---|---|---|
| ०१. | व्हर्टेक्स ग्रुप, पुणे | Providing & Fixing Fubberised Speed Breaker 63 Rmt (Size-500x400x48 mm) | १,८२,१४२/- | १,७३,०३५/- |
| ०२. | संजय बी.सुनात, पुणे | | **१,२४,७४०/-** | अनुपस्थित |
| ०३. | डी.बी.एम.कन्स्ट्रक्शन, पुणे | | १,७०,१००/- | अनुपस्थित |
| ०४. | महिमा कन्स्ट्रक्शन, पुणे | | १,५७,५००/- | अनुपस्थित |
| ०५. | परफेक्ट वेल्डींग सोल्युशन, मुंबई | | १,३८,२०६.२५ | अनुपस्थित |
| ०६. | रियल्टेक, ठाणे | | १,२७,५७५/- | अनुपस्थित |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा भक्तनिवास, द्वारावती भक्तनिवास व साईआश्रम परिसरातील रस्त्यावर स्पीडब्रेकर बसविणेकामी मे. संजय बी.सुनात, पुणे यांचे कोटेशनमधील दर निम्नतम आहेत. परंतु मे. संजय बी.सुनात, पुणे व इतर कोटेशनधारकांनी दिलेले दर यामध्ये जास्त तफावत दिसून येते. त्यामुळे वरील कोटेशन्स रद्द करुन प्रस्तावित कामी सविस्तर स्पेसिफीकेशन्स नमुद करुन त्यानुसार वर्तमानपत्रातील जाहिरातीद्वारे निविदा मागविणेत याव्यात, अशी शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**०३ श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालय विभागाकरीता M/s. B.Braun Medical (I) Pvt.Ltd., Mumbai कंपनीचे Syring Pump खरेदी करुन जुने Infusion Pump Buyback करणेबाबत.**

दि.२७/०४/२०१३ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेत निर्णय क्र.३५० अन्वये श्री साईबाबा रुग्णालयाकरिता लागणारे २५ नग L & T कंपनीचे Syringe Pump मे. एक्सेल कार्पोरेशन, नाशिक यांचेकडून प्रति नग रु. ३६०००/- या दराने खरेदी करण्यास व याकामी येणाऱ्या रु.९,००,०००/- (अक्षरी रुपये नऊ लाख मात्र) (सर्व करांसह) इतक्या रक्कमेत खरेदीस व जुने 05 Infusion Pump त्यानांच प्रति नग रु. ८०००/- या दराने रु.२८०००/- इतक्या किंमतीत परत बायबॅक करण्यास मान्यता मिळालेली होती, सदरचे पंप प्रथमच घेत असल्यामुळे त्यांचेकडुन Demo घेऊन खरेदी करावी अशी चर्चा झाली होती त्यानुसार सदर Syringe Pump चे L & T यांनी रुग्णालयात Demo दिला असता सदर Syringe Pump वजनाने जड असून वापरण्यासाठी अवघड आहे, असे L & T कंपनीच्या Service Report मध्ये कार्डीयाक व कॅथलॅब विभागाचे डॉक्टरांनी नमुद केलेले आहे.

तुलनात्मक तक्त्यामध्ये द्वितीय क्रमांकाचे कोटेशनधारक M/s. Emco Meditek Pvt. Ltd., Mumbai यांचे Model Infusor ९५० Syringe Pump हे टॉप लोडेड असून आपणास डाऊनलोडेड पंपची आवश्यकता आहे. सन २००५ पासुन आपले रुग्णालयात आतापर्यंत M/s. B. Braun Medical (I) Pvt. Ltd., Mumbai या कंपनीचे १२० Syringe Pump खरेदी करणेत आलेले असून ते व्यवस्थित काम देत आहेत, त्यामुळे M/s. B. Braun Medical (I) Pvt. Ltd., Mumbai यांचेकडुन दरपत्रक मागवुन त्यांचेकडुन खरेदी करावे लागणार आहे, तसेच M/s. B. Braun Medical (I) Pvt. Ltd., Mumbai यांना कोटेशन मागणीपत्र पाठविण्यात आले होते, त्यावेळेस पोस्टातुन कोटशनपत्र परत आलेले होते. तेव्हा M/s. B. Braun Medical (I) Pvt. Ltd., Mumbai यांना दरात सुट मिळणेकामी मा. त्रिसदस्य समिती सभेपुढे चर्चा / वाटाघाटीसाठी बोलविता येईल, असे मत आहे.

उपरोक्त खरेदीकामी M/s. B. Braun Medical (I) Pvt. Ltd., Mumbai यांचेकडुन मागविणेत आलेले दरपत्रक आजचे उपसमिती सभेसमोर उघडण्यात येऊन, त्यांना चर्चा/ वाटाघाटीसाठी समक्ष बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| S. N. | Description | Qty. | M/s. B. Braun Medical (I) Pvt. Ltd., Mumbai | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | Make / Model | Rate Per in Rs. | Rate After Negotiation |
| 1 | **Syringe Pump** | 15 | PERFUSER COMPACT | 57067.50 | 50000.00 |
| | **Syringe type-** 10ml,20ml,30ml,50ml,setting.for all type syringes brands | | | | |
| | **Flow Rate Range-**0.1to200ml/hr with 10 ml syringe | | | | |
| | 0.1 to 300ml/hr with 20 ml or 50ml syringe in 0.1/hr increments. | | | | |
| | **Accuracy-** Driver accuracy +/-1% | | | | |
| | Rapid Mode for Purge or Bolus- | | | | |
| | Approx.200ml/hr (10mlsyringe) | | | | |
| | Approx.350ml/hr (20ml syringe) | | | | |
| | Approx.450ml/hr (30ml syringe) | | | | |
| | Approx.800ml/hr (50ml syringe) | | | | |
| | **Volume infused display-** | | | | |
| | 0.1 to 999.9ml in 0.1 ml increments. | | | | |
| | **Occlusion Detection-** | | | | |
| | L (Low pressure) | | | | |
| | 0.2 to 0.6kgf/cm2(150-440mmhg) | | | | |
| | M (Medium pressure) | | | | |
| | 0.5 to 0.9 kgf/cm2(370 to 660 mmhg) | | | | |
| | H ( High pressure) | | | | |
| | 8.0 to 1.4 kgf/cm2(590to1000mmhg) | | | | |
| | **Alarms -** | | | | |
| | (Audiable & visible alarms ) | | | | |
| | Near empty (small remains or 5min.before completion) | | | | |
| | END | | | | |
| | Low battery , Occlusion, syringe disengaged, internal malfunction | | | | |
| | Classification | | | | |
| | Class 1 type of Drip proof | | | | |
| | Syringe of all brands/type can be used | | | | |
| | **Battery -** Battery backup at least 60 min. | | | | |
| | **Cost of Old Buyback Machine** | | | | Each 10000 |
| | **Warranty** | | 1 Year | | |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त तक्त्याचा विचार करता, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालय विभागाकरीता M/s. B.Braun Medical (I) Pvt.Ltd., Mumbai या कंपनीचे २५ नग Syring Pump खरेदी करावयाचे होते, परंतु १० नग Syring Pump देणगीदाखल मिळालेले आहेत. त्यामुळे उर्वरित १५ नग M/s. B.Braun Medical (I)**

**Pvt.Ltd., Mumbai या कंपनीचे Syring Pump खरेदी करणेसाठी प्रती नग रु.५०,०००/- मात्र व जुने Infusion Pump Buyback करणेसाठी प्रती नग रु.१०,०००/- मात्र हे दर स्विकारणेत यावेत, अशी शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

०४ **श्री साईबाबा रुग्णालयातील विविध वॉर्ड/ विभागामध्ये (Cupboard) कपाट खरेदीकामी प्राप्त कोटेशन उघडून चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयातील विविध वॉर्ड/ विभागात कार्यालयीन साहित्य लिनन साठा कन्झमशन रजिष्टर इ. ठेवण्याकरिता (Cupboard) कपाटाची आवश्यकता असते. त्यामुळे सर्व वॉर्ड/ विभागाने दि.२२/०६/२०१३ (औषध भांडार प्राप्त दि.०५/०७/२०१३) रोजीचे मागणी पत्रान्वये मागणी केलेली आहे. सध्या त्यांचेकडे असलेले कपाट त्यांना साहित्य ठेवणेकामी अपुरे पडत आहे, त्यामुळे त्यांनी नविन २० नग कपाटांची मागणी केलेली आहे.

| Sr. No. | Name of Items | Qty. | Rate Per in Rs. Incl. of all Taxes | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| **1.** | **S S Cupboard 6 Feet**- Cupboard Stainless Steel Storewel Plain with 4 shelves (Welded) Size:916W x 485D x 1981 H (mm) Gauge of Steel 18. | 20 | 16299.00 | **325980.00** |

उपरोक्त २० नग कपाट खरेदीकामी अंदाजे रु.३,२५,९८०/- इतका खर्च अपेक्षित आहे. दि.१७/०९/२०१३ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेत वरील मागणीप्रमाणे कपाटे (Cupboard) २० नग विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदीस व याकामी येणाऱ्या रक्कम रु.३,२५,९८०/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार इकडील पत्र क्र. ३६३४ दि.०९/१०/२०१३ अन्वये एकुण १४ अधिकृत विक्रेते/ पुरवठाधारक यांचेकडुन दि.२५/१०/२०१३ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यास अनुसरुन खालील प्रमाणे कोटेशन प्राप्त झालेले आहेत-

१. M/s. Godrej & Boyce Mfg. Co. Ltd., Pune (प्रशासन शाखेकडून टपालातून उघडून प्राप्त झालेले कोटेशन दि.१७/१०/२०१३)
२. M/s. Radhakrishna Traders, Shrirampur (कोटेशन प्राप्त दि.२८/१०/२०१३)
३. M/s. Sai Enterprises, Shrirampur (कोटेशन प्राप्त दि.२८/१०/२०१३)
४. M/s.Jalaram Steel Furniture Pvt. Ltd., Surat(कोटेशन प्राप्त दि.२३/११/२०१३)

उपरोक्त पैकी अ.नं. ०१ यांचे कोटेशन मुदतीत परंतु प्रशासन शाखेकडून टपालातून उघडून प्राप्त झालेले आहे, तर अ.नं. २ ते ४ यांचे कोटेशन मुदतीनंतर प्राप्त झालेले आहे. परंतू तुलनात्मक दर मिळवण्याच्या दृष्टीने याचा फायदा होऊ शकेल त्यामुळे ते कोटेशनदेखील विचारात घ्यावे असे नम्र मत आहे.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले ०३ सिलबंद कोटेशन आजचे उपसमिती सभेपुढे उघडणेत येऊन, कोटेशनधारकांना चर्चा / वाटाघाटीसाठी समक्ष बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| S. N. | Description | M/s. Godrej & Boyce Mfg. Co. Ltd., Pune | | | M/s. Radhakrishna Traders, Shrirampur | | | M/s. Sai Enterprises, Shrirampur | | | M/s.Jalaram Steel Furniture Pvt. Ltd., Surat | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Make / Model | Rate Per in Rs. | Rate After Negotiation | Make / Model | Rate Per in Rs. | Rate After Negotiation | Make / Model | Rate Per in Rs. | Rate After Negotiation | Make / Model | Rate Per in Rs. | Rate After Negotiation |
| 1 | S S Cupboard 6 Feet | STOREWEL | 17168.60 | ABSENT | Godrej | 18000.00 | ABSENT | Godrej STOREWEL | 17299.00 | **16750.00** | JSF 101 SS 202 | 35170.00 | 35170.00 |
| | Cupboard Stainless Steel Storewel Plain with 4 shelves (Welded) Size:916W x 485D x 1981 H (mm) Gauge of Steel 18 | | | | | | | DELEUXE STOREWEL | 8999.00 | 8999.00 | JSF 101 (A) SS 304 | 54881.00 | 54881.00 |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील विविध वॉर्ड/ विभागासाठी आवश्यक असलेले गोदरेज कंपनीचे २० नग (Cupboard) कपाटांसाठी मे.साई एन्टरप्राईजेस, श्रीरामपूर यांचे प्रती नग रु.१६,७५०/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा.**

**तसेच, दि.२१.१०.२०१३ चे मंजुर टिपणीन्वये ई.एन.टी. ऑपरेशन विभागाने ०१ नग व दि.०३.०१.२०१४ चे पत्रान्वये सी.आर.यू.-II विभागाने ०२ नग कपाटांची मागणी केलेली आहे. या दोन्ही विभागांसाठी आवश्यक असलेले ०३ नग कपाटे उपरोक्त पुरवठाधारकाकडून निम्नतम मंजुर दराने खरेदी करणेत यावे, यासाठी येणाऱ्या वाढीव खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

०५ **श्री साईबाबा हॉस्पिटलमधील प्रयोगशाळा विभागातील Fully Automatic Biochemisty Analyser मशिनकरीता केमीकल्स खरेदीकामी प्राप्त कोटेशन उघडून चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत.**

दि.०८/१२/२०१२ रोजीचे मा. त्रीसदस्य समिती सभेत श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाकरीता Fully Automated Clinical Bio-Chemistry Analyzer Machine- ०१ नग M/s. Trivitron Healthcare Pvt.Ltd., Mumbai यांचेकडून खरेदी करण्यास व याकामी येणाऱ्या रु.१०,३५,५००/- चे खर्चास मान्यता मिळालेली होती, त्यानुसार त्यांना इकडील पत्र क्र. ८६३० दि.०२/०२/२०१३ अन्वये पुरवठा आदेश देण्यात आला होता. त्यानुसार M/s. Trivitron Healthcare Pvt.Ltd., Mumbai यांनी मशिनचा पुरवठा केलेला असून मशिन कार्यान्वित करुन दिलेले आहे. सदर मशिनसोबत सदर मशिनसाठी लागणारी केमीकल्स मशिनसोबत मोफत प्राप्त झालेली होती. सदरचे केमीकल्स संपल्यामुळे प्रयोगशाळा विभागाने डी.पी.क्र.१०३६ दि.२९/०६/२०१३ अन्वये खालीलप्रमाणे केमीकल्सची मागणी केलेली आहे.

| Sr. No. | Name of Chemicals | Qty. |
|---|---|---|
| 1 | CS-Anti bacterial Phosphor free detergent 500ml/Bot | 25 |
| 2 | CS-Alkaline detergent 2Ltr/Bot | 25 |
| 3 | Reagent Pack + Septum | 30 |
| 4 | Cleaning Solution (50ml) | 6 |
| 5 | Conditioning Solution (100ml) | 6 |

वरीलप्रमाणे केमीकल्स खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी M/s. Trivitron Healthcare Pvt.Ltd., Mumbai यांचेकडून दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यांचे दरपत्रकानुसार तुर्तास खालीलप्रमाणे केमीकल्स खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.४,३३,२००/- इतका खर्च अपेक्षित आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Name of Chemicals | Qty. | App.Rate per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | CS-Anti bacterial Phosphor free detergent 500ml/Bot | 12 | 7750.00 | 93000.00 |
| 2 | CS-Alkaline detergent 2Ltr/Bot | 12 | 7750.00 | 93000.00 |
| 3 | Reagent Pack + Septum | 14 | 15300.00 | 214200.00 |
| 4 | Cleaning Solution (50ml) | 3 | 5500.00 | 16500.00 |
| 5 | Conditioning Solution (100ml) | 3 | 5500.00 | 16500.00 |
| | | **Total Amt. in Rs.** | | **4,33,200.00** |

दि.१७/०९/२०१३ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेत निर्णय क्र.६३७ अन्वये, वरीलप्रमाणे केमीकल्स विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या रक्कम रु.४,३३,२००/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार इकडील पत्र क्र. ३६३२ दि.०९/१०/२०१३ अन्वये एकुण २१ अधिकृत विक्रेते / पुरवठाधारक यांचेकडुन दि.१९/१०/२०१३ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यास अनुसरुन खालील प्रमाणे कोटेशन प्राप्त झालेले आहेत-

१. M/s. Siddhi Medical Distributors, Aurangabad (बंद कोटेशन प्राप्त दि.२२/१०/२०१३)
२. M/s. JK Sales & Services, Aurangabad (बंद कोटेशन प्राप्त दि.१५/११/२०१३)
३. M/s. Trivitron Healthcare Pvt. Ltd., New Delhi (ई-मेल कोटेशन प्राप्त दि.२२/१०/२०१३)

उपरोक्त पैकी अ.नं. ३ यांचे कोटेशन ई-मेल व्दारे प्राप्त झालेले आहे, परंतु तुलनात्मक दर मिळवण्याच्या दृष्टीने त्याचा फायदा होऊ शकेल तेंव्हा ते कोटेशनदेखील विचारात घ्यावे असे नम्र मत आहे.

वरीलप्रमाणे प्राप्त झालेले ०३ कोटेशन आजचे सभेपुढे उघडणेत येऊन, कोटेशनधारकांना चर्चा/ वाटाघाटी करणेकामी समक्ष बोलविण्यात आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| S. N. | Description | Qty. Make / Model | M/s. Siddhi Medical Distributors, Aurangabad | M/s. JK Sales & Services, Aurangabad | M/s. Trivitron Healthcare Pvt. Ltd., New Delhi |
|---|---|---|---|---|---|

| | | | Rate Per in Rs. | Rate After Negotiation | Rate Per in Rs. | Rate After Negotiation | Rate Per in Rs. | Rate After Negotiation |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | CS-Anti bacterial Phosphor free detergent 500ml/Bot | 12 Trivitron | 7695.00 | 7695.00 | 7795.00 | 7795.00 | 7695.00 | **7541.10** |
| 2 | CS-Alkaline detergent 2Ltr/Bot | 12 Trivitron | 7695.00 | 7625.00 | 7795.00 | 7795.00 | 7695.00 | **7541.10** |
| 3 | Reagent Pack + Septum | 14 Trivitron | 19285.00 | 19285.00 | 19485.00 | 19485.00 | 19285.00 | **18899.30** |
| 4 | Cleaning Solution (50ml) | 3 Trivitron | 4385.00 | 4385.00 | 4485.00 | 4485.00 | 4385.00 | **4297.30** |
| 5 | Conditioning Solution (100ml) | 3 Trivitron | 4385.00 | 4385.00 | 4485.00 | 4485.00 | 4385.00 | **4297.30** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील प्रयोगशाळा विभागातील Fully Automatic Biochemisty Analyser मशिनकरीता प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे केमीकल्स खरेदीकामी मे.ट्रिव्हीट्रॉन हेल्थकेअर प्रा.लि., नवी दिल्ली यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देणेत यावा, अशी शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

०६ **श्री साईबाबा रुग्णालयातील न्युरो शस्त्रक्रिया विभागाकरिता सर्जिकल साहित्य खरेदीकामी प्राप्त कोटेशन उघडून चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयातील न्युरो शस्त्रक्रिया विभागात डॉ. म्हात्रे हे नवीन न्युरो सर्जन म्हणून हजर झालेले आहेत. त्यांनी दि.१५/०७/२०१३ (औषध भांडार प्राप्त दि.२४/०७/२०१३) रोजीचे मागणी पत्रकान्वये सर्जिकल साहित्याची मागणी केलेली आहे. सदर सर्जिकल साहित्य खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी M/s. Sumiran Enterprises, Pune यांचेकडुन दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यांचे दरानुसार सर्जिकल साहित्य खरेदीकामी रु.१४०१००/- इतका खर्च अपेक्षित आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

| Sr. No. | Description | Qty. | Rate Per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1. | Ommaya Reserwier | 02 Nos. | 5625.00 | 11250.00 |
| 2. | EVD Drain | 02 Nos. | 5625.00 | 11250.00 |
| 3. | Raney Clip | 02 Nos. | 1050.00 | 2100.00 |
| 4. | Dura Foam | | | |
| | Tissue Patch Dural 25*50 | 2 Nos. | 8400.00 | 16800.00 |
| | Tissue Patch Dural 50*50 | 2 Nos. | 10500.00 | 21000.00 |
| | Tissue Patch Dural 50*100 | 2 Nos. | 15750.00 | 31500.00 |
| | Tissue Patch Dural 100*100 | 2 Nos. | 23100.00 | 46200.00 |
| | **Total Amt. in Rs.** | | | **140100.00** |

न्युरो ओ.टी शस्त्रक्रिया विभागात दैनंदिन शस्त्रक्रिया करणेसाठी सदर सर्जिकल साहित्याची आवश्यकता आहे. तसेच डॉक्टर नवीन हजर झाल्यामुळे वार्षीक मागणीमध्ये मागणी नाही, त्यामुळे वरीलप्रमाणे सर्जिकल साहित्य खरेदीकामी अंदाजे रु. १४०१००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

दि.०८/१०/२०१३ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेत निर्णय क्र.७३० अन्वये वरील सर्जिकल साहित्य विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदीस व याकामी येणाऱ्या रक्कम रु.१४०१००/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार इकडील पत्र क्र. ३७२४ दि.१७/१०/२०१३ अन्वये एकुण ०७ अधिकृत विक्रेते / पुरवठाधारक यांचेकडुन दि.०९/११/२०१३ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते.

त्यास अनुसरुन खालील प्रमाणे कोटेशन प्राप्त झालेले आहेत-

१. M/s. Sumiran Enterprises, Pune (कोटेशन प्राप्त दि.२८/१०/२०१३)
२. M/s. Balaji Surgicals, Pune (प्रशासन शाखेकडून टपालातून उघडून प्राप्त झालेले कोटेशन दि.२८/११/२०१३)
३. M/s. Cure Surgicals, Pune (कोटेशन प्राप्त दि.२९/११/२०१३)

४. M/s. Parag Enterprises, Mumbai (प्रशासन शाखेकडून टपालातून उघडून प्राप्त झालेले कोटेशन दि.२९/११/२०१३)

उपरोक्त पैकी अ.नं. ०१ यांचे कोटेशन मुदतीत झालेले आहे, तर अ.नं. २ ते ४ यांना कोटेशन मागणी पत्र दिलेले नसतांना त्यांनी स्वत:हून कोटेशन दिलेले आहे तसेच त्यांचे कोटेशन मुदतीनंतर प्राप्त झालेले आहे. परंतू तुलनात्मक दर मिळवण्याच्या दृष्टीने याचा फायदा होऊ शकेल त्यामुळे ते कोटेशनदेखील विचारात घ्यावे असे नम्र मत आहे.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले ०४ कोटेशन आजचे उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, कोटेशनधारकांना चर्चा / वाटाघाटी करणेकामी बोलविण्यात आलेले असून चर्चा / वाटाघाटी करुन निर्णय होणेस मान्यता असावी.

| S. N. | Description | M/s. Sumiran Enterprises, Pune | | | M/s. Balaji Surgicals, Pune | | | M/s. Cure Surgicals, Pune | | | M/s. Parag Enterprises, Mumbai | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Make / Model | Rate Per in Rs. | Rate After Negotiation | Make / Model | Rate Per in Rs. | Rate After Negotiation | Make / Model | Rate Per in Rs. | Rate After Negotiation | Make / Model | Rate Per in Rs. | Rate After Negotiation |
| 1 | Ommaya Reserwier | G Surgiwear | **3375/-** | **3206.25** | G Surgiwear | 5625.00 | ABSENT | G Surgiwear | 9000.00 | ABSENT | G Surgiwear | 11250.00 | ABSENT |
| 2 | EVD Drain | Medtronic | **5625/-** | **5343.75** | Medtronic | 9562.00 | | Medtronic | 11812.00 | | Medtronic | 16875.00 | |
| 3 | Raney Clip | Medtronic/ Sumiran | **1125/-** | **1068.75** | Medtronic/ Sumiran | 2812.00 | | Medtronic / Sumiran | 3937.00 | | Medtronic/ Sumiran | 7312.00 | |
| 4 | Dura Foam | | | | | | | | | | | | |
| | Tissue Patch Dural 25*50 | Tissue Med | **8400/-** | **7980/-** | Tissue Med | 15750.00 | | Tissue Med | 19125.00 | | Tissue Med | 19950.00 | |
| | Tissue Patch Dural 50*50 | Tissue Med | **10500/-** | **9975/-** | Tissue Med | 15750.00 | | Tissue Med | 20250.00 | | Tissue Med | 23100.00 | |
| | Tissue Patch Dural 50*100 | Tissue Med | **15750/-** | **14962.50** | Tissue Med | 23100.00 | | Tissue Med | 27000.00 | | Tissue Med | 29400.00 | |
| | Tissue Patch Dural 100*100 | Tissue Med | **23100/-** | **21945/-** | Tissue Med | 29400.00 | | Tissue Med | 36000.00 | | Tissue Med | 39900.00 | |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील न्युरो शस्त्रक्रिया विभागाकरिता आवश्यक प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे सर्जिकल साहित्य खरेदी करणेकामी मे.सुमिरण एन्टरप्रायझेस, पुणे यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देणेत यावा, अशी शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**०७ श्री साईबाबा रुग्णालयाकरीता नवीन झेरॉक्स मशिन खरेदी व जुने मशिन परत (Buyback) करणेकामी प्राप्त कोटेशन उघडून चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत.**

श्री साईबाबा रुग्णालयातील अधिक्षक कार्यालयात श्री साईनाथ रुग्णालय, कन्या शाळा, वाहन विभागातील कार्यालयीन झेरॉक्स काढण्याकरीता एक झेरॉक्स मशिन सध्या कार्यरत आहे. सदर मशिन हे सन २००६ साली रु.१,५,००००/- इतक्या रक्कमेत खरेदी केलेले असून त्याचा वॉरंटी कालावधी संपलेला आहे सदर मशिन हे वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रक्टमध्ये आहे. परंतु दरवर्षी वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रक्टसाठी १६८५४/- इतका खर्च येतो. सदर मशिनचे आयुष्य हे साधारणत: ६ ते ७ वर्षे इतके असते.

उपरोक्त विभागातील झेरॉक्स काढण्याचे काम सदर मशिनवर चालते. परंतु सदर मशिन वारंवार बंद पडत आहे. त्यामुळे झेरॉक्स काढण्यासाठी मेनऑफिसमध्ये जावे लागते. त्यामुळे वेळ जास्त लागुन कामास विलंब होतो. त्यामुळे नविन ३० p.p.m मशिन खरेदी करणेबाबत व जुने मशिन परत (Buyback) करणेबाबत त्याच मागणीपत्रावर बायोमेडीकल विभागाने शिफारस केलेली आहे. जुने मशिनची घसारा वजा जाता येणारी किंमत रक्कम रु.२०,४४१.७२ इतकी आहे.

सदरचे ३० p.p.m झेरॉक्स मशिन खरेदीकामी M/s. Sai Automation, Ahmednagar यांचेकडुन दुरध्वनीद्वारे अंदाजे खर्चासाठी दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यानुसार त्यांनी त्यांचे

दि.०५/०७/२०१३ पत्रान्वये दर कळविलेले आहे, त्याचे दरानुसार सदर झेरॉक्स मशिन खरेदीकामी रु.२,४३,३९०/- इतका खर्च अपेक्षित आहे.

दि.१७/०९/२०१३ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेत निर्णय क्र.६३४ अन्वये, श्री साईबाबा रुग्णालयातील नविन झेरॉक्स मशिन खरेदीकामी व जुने मशिन परत (Buyback) करणे, अशा दोन्हीही साठी दरांची विहीत पध्दतीने कोटेशन मागविण्यास व याकामी येणाऱ्या रक्कम रु.२,४३,३९०/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार इकडील पत्र क्र. ३६३३ दि.०९/१०/२०१३ अन्वये एकुण २५ अधिकृत विक्रेते / पुरवठाधारक यांचेकडुन दि.२५/१०/२०१३ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यास अनुसरुन खालील प्रमाणे कोटेशन प्राप्त झालेले आहेत -

१. M/s. Sai Automation, Ahmednagar (बंद कोटेशन प्राप्त दि.२४/१०/२०१३)
२. M/s. Digital Office Solutions, Nashik (बंद कोटेशन प्राप्त दि.२४/१०/२०१३)
३. M/s. Accent Automation, Nashik (बंद कोटेशन प्राप्त दि.२४/१०/२०१३)
४. M/s. Om Sai Marketing, Aurangabad (बंद कोटेशन प्राप्त दि.१८/११/२०१३)

उपरोक्त पैकी अ.नं. १ ते ३ यांना कोटेशन मागणी पत्र नसताना त्यांनी स्वत:हून कोटेशन दिलेले आहे, तसेच सदरहू कोटेशन मुदतीत व बंद स्थितीत प्राप्त झालेले आहे, त्यामळे तुलनात्मक दर मिळवण्याच्या दृष्टीने याचा फायदा होऊ शकेल तेंव्हा ते कोटेशनदेखील विचारात घ्यावे, असे नम्र मत आहे.

वरीलप्रमाणे प्राप्त झालेले ०४ सिलबंद कोटेशन आजचे उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, कोटेशनधारकांना चर्चा/ वाटाघाटीसाठी समक्ष बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| S. N. | Description | | Qty | M/s. Sai Automation, Ahmednagar | | | M/s. Digital Office Solutions, Nashik | | | M/s. Om Sai Marketing, Aurangabad | | | M/s. Accent Automation, Nashik | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Make / Model | Rate Per in Rs. | Rate After Negotiation | Make / Model | Rate Per in Rs. | Rate After Negotiation | Make / Model | Rate Per in Rs. | Rate After Negotiation | Make / Model | Rate Per in Rs. | Rate After Negotiation |
| 1 | **Photo Copier Machine** | | 2 | MAKE - RICHO / MODEL - 3053SP | 209055.00 | 168000.00 | MAKE - RICHO / MODEL - 3053SP | 208700.00 | Absent | MAKE - XEROX / MODEL - 5330 | 313357.00 | **168000.00** | MAKE - RICHO / MODEL - AFICIO SP3053 | 235700.00 | Absent |
| | **Speed** | 30 ppm. | | | | | | | | XEROX WOEK CENTER | | | with accessories | | |
| | **Resolution** | 600 dpi x 600 dpi (min) | | | | | | | | | | | ARDF | | |
| | **Duty Cycle** | min. 25000 pages per Month | | | | | | | | | | | | | |
| | **Memory** | 80 MB upgradable to 500 MB | | | | | | | | | | | | | |
| | **Paper Handling** | | | | | | | | | | | | | | |
| | Paper input-Standard | **Duplex Automatic Document Feeder:** 50 sheets; Standard sizes : 5.5X8.5in. To 11X17in./A5to A3: Custom sizes: 3.3X4.9in.to 11.7X17in./85X125mm to 297X432mm | | | | | | | | | | | | | |
| | | **Trays 1 , 2 with Stand :** 250 sheets each; custom Sizes: 5.5X7.2in,to11.7X17in/140x180mm to 297X432mm **By pass tray** : 100 sheets | | | | | | | | Trays 1 , 2 : 110 sheets By pass : 50 sheets | | | | | |
| | Integrated Stappler & Hole Punch | Standard | | optional | | | optional | | | | | | optional | | |
| | Paper Output Standard | **Dual Tray:** 250 Sheets Each ; Lower output offset | | | | | | | | | | | | | |
| | Automatic two-sided Printing | Standard | | | | | | | | | | | | | |
| | **Copy** | | | | | | | | | | | | | | |

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **Resolution** | **600 dpi x 600 dpi (min)** | | | | | | | | | | | | | |
| | **Copy Speed** | **30 Coppies per minute** | | | | | | | | | | | | | |
| | **First - page-out-time** | **Maximum 8 Seconds** | | | | | | | | | | | | | |
| | Copy features | Automatic two-sided, Electronic pre-collation, Automatic tray selection, Build job, Negative/ Mirror Image, Automatic booklet creation, multi-up, Mixed-size originals. Covers insetion, Sample set book copying, Annotation, Delete outside/ Delete Inside poster Mode, Watermarks. ID Card copy, Page Layout Form Overlay, Background Suppression, Reduce / Enlarge, Lighten / Darken, Auto fit. | | | | | | | | | | | | | |
| | **Print** | | | | | | | | | | | | | | |
| | First-Page-out time | Max. 15.0 seconds | | | | | | | | | | | | | |
| | Resolution (max) | 600 dpi | | | | | | | | | | | | | |
| | Memory | 64 MB | | | | | | | | | | | | | |
| | Connectivity | 10/100/1000Base-TX Ethernet, High Speed USB 2.0 direct Print, Bluetooth. | | | | | | | | No Bluetooth | | | | | |
| | Page description languages | PCL 5e,PCL 6 HP-GL-HP-GL2, TIFF/PDF,XPS,Optional Adobe Post Script3TM | | | | | | | | | | | | | |
| | Print Features | Automatic two-sided, Secure Print , Delay Print Sample Set, Bokklet Creation, Cover selection , Paper selection by attribute, N-up, Watermarks, Banner Sheets fit to new paper size Output tray selection, Print from USB | | | | | | | | | | | | | |
| | **Scan** | | | | | | | | | | | | | | |
| | Standard | PDF, Linearized PDF,PDF/A TIFF, JFIF,JPEG,XPS, Color Scan,Scan to Email, Scan to Folder, Scan to TWAIN application. | | | | | | | | | | | | | |
| | Resolution | 600 dpi | | | | | | | | | | | | | |
| | Speed | min 45 original per minute | | | | | | | | | | | | | |
| | Original size | A5-A3 | | | | | | | | | | | | | |
| | **Fax** | | | optional | | | optional | | | optional | | | optional | | |
| | Circuit | PSTN, PBX | | | | | | | | | | | | | |
| | Compatibility | ITU-T(CCITT) G3, ITU-T(T.37) Internet Fax, ITU-T(T-38) IP Fax, Walkup PSTN fax (one line and three line options), LAN Fax via driver | | | | | | | | | | | | | |
| | Modem speed | 34 KBPS | | | | | | | | | | | | | |
| | Scanning Speed | 1 second (A4/SEF) | | | | | | | | | | | | | |

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Memory Capacity | 5 MB | | | | | | | | | | | | | |
| | Memory Back up | yes | | | | | | | | | | | | | |
| | Fax Features | Fax forward, two sided send & receive, print On, Fax upto A3 (11x17 in) | | | | | | | | | | | | | |
| | **Other** | | | | | | | | | | | | | | |
| | Training | Operating training to User & Maintenance training to BM Engineer | | Not Given | | | Not Given | | | Yes | | | Not Given | | |
| | Warranty | 3 Years | | 1 Year | | | 1 Year | | | life time | | | 1 Year | | |
| | AMC/CMC cost | To be fixed for next 5 years after warranty | | Not Given | | | Not Given | | | Yes | | | Not Given | | |
| | Consumables | Cost to be given for next five years | | Drum | | 4210.00 (60000 Copies) Rs. 0.070 | | | | Drum | Cost to be Fixed for next Three years | 5800.00 (35000 Copies) Rs. 0.25 | | | |
| | | | | Toner | | 2810.00 (15000 Copies) Rs. 0.18 | | | | Toner | | 22800.00 (90000 Copies) Rs - 0.16 | | | |
| | | | | Developer | | 3510.00 (60000 Copies) Rs. 0.05 | | | | Developer | | Not Required | | | |
| | | **Total Amt. in Rs.** | | | 209055.00 | 168000.00 | | 208700.00 | | | 313357.00 | 168000.00 | | 235700.00 | |
| | | **Cost of Old Buyback Machine** | | Not Given | | | Not Given | | | | | | Not Given | | |
| | | **Warranty** | | 1 Year | | | 1 Year | | | 3 Year | | 15 Year life time | 1 Year | | |
| | | **AMC** | | | | | | | | | | | | | |
| | | **CMC** | | | 10% | | | | | | | | | | |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयाकरीता ०२ नग नवीन झेरॉक्स मशिन खरेदी करणेकामी मे.साई ऑटोमेशन, अहमदनगर व मे.ओम साई मार्केटींग, औरंगाबाद या दोन्ही कोटेशनधारकांचे प्रती नग दर सारखेच आहे. परंतु मे.ओम साई मार्केटींग, औरंगाबाद यांनी त्यांचे मशिनकरीता Life Time (१५ वर्ष) वॉरंटी दिलेली आहे. तसेच त्यांच्या मशिनला Drum/ Tonner हे कन्झुमेबल साहित्य लागते व त्या Drum/ Tonner मध्ये जास्त प्रती झेरॉक्स होतात, शिवाय सदर साहित्याचे दर देखील त्यांनी पुढील ३ वर्षाकरीता निश्चित केलेले आहेत. यामुळे सदरचे ०२ नग झेरॉक्स मशिन मे.ओम साई मार्केटींग, औरंगाबाद यांचेकडून उपरोक्त मंजुर दराने खरेदी करणेत यावे व खरेदीनंतर सुरळीत सेवा मिळणेकामी त्यांचेकडून करारनामा करुन घेण्यात यावा, अशी शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

०८ **श्री साईनाथ रुग्णालयातील ऑपरेशन थिएटर करीता Fogger Machine खरेदीकामी प्राप्त कोटेशन उघडून चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत.**

श्री साईनाथ रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर नं. १ या विभागाने दि. ०१/१२/२०१२ रोजीच्या मागणी पत्रकान्वये दोन नग Fogger Machine ची मागणी केलेली आहे. सदर ओ.टी. मध्ये एकच मशिन आहे तेथे असलेल्या तीन ऑपरेशन थिएटर मिळून एकच मशिन आहे. त्यामुळे दोन शस्त्रक्रियेमध्ये निर्जंतुकीकरण करावयाचे झाल्यास अडचणी येतात. सदरचे मशिन ऑपरेशन थिएटरमध्ये शस्त्रक्रिया झाल्यानंतर निर्जंतुकीकरणासाठी आवश्यक असते.

सदर Fogger Machine खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी M/s. Patel Agrochem, Mumbai यांचेकडुन ई - मेल द्वारे दरपत्रक मागविण्यात आलेले आहे. त्यांचे दरानुसार सदर ०२ नग Fogger Machine खरेदीकामी रक्कम रु.२८०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

| Sr.No. | Description | Qty. | Rate Per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | Fogger Machine | 2 | 14000.00 | 28000.00 |
| | | | **Total Amt. in Rs.** | **28000.00** |

दि.०८/१०/२०१३ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेत निर्णय क्र.७२३ अन्वये ०२ नग Fogger Machine विहीत पध्दतीने कोटेशन मागवुन खरेदीस व याकामी येणाऱ्या रक्कम रु.२८०००/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार इकडील पत्र क्र. ४६४१ दि.२२/११/२०१३ अन्वये एकुण ४९ अधिकृत विक्रेते/ पुरवठाधारक यांचेकडुन दि.१४/१२/२०१३ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते.

त्यास अनुसरुन खालील प्रमाणे कोटेशन प्राप्त झालेले आहेत -

१. M/s. Skan Inc., Mumbai (बंद कोटेशन प्राप्त दि.०९/१२/२०१३)
२. M/s. Agro Care Products, Mumbai. (बंद कोटेशन प्राप्त दि.१०/१२/२०१३)
३. M/s. Gouri Engineering Pvt. Ltd., New Panvel. (बंद कोटेशन प्राप्त दि.१०/१२/२०१३)
४. M/s. Fly-Ban Industries, Pune (बंद कोटेशन प्राप्त दि.१२/१२/२०१३)
५. M/s. Patel Agrochem. Mumbai. (बंद कोटेशन प्राप्त दि.१४/१२/२०१३)
६. M/s. Rank Engineering, Chennai (बंद कोटेशन प्राप्त दि.१४/१२/२०१३)
७. M/s. Arbuda Agrochemicals Pvt. Ltd., Mumbai (बंद कोटेशन प्राप्त दि.१६/१२/२०१३)

उपरोक्त पैकी अ.नं. १ ते ६ यांचे कोटेशन मुदतीत प्राप्त झालेले आहे, तसेच अ.नं. ७ यांचे कोटेशन मुदतीनंतर प्राप्त झालेले आहे तर अ.नं. २ यांना कोटेशन मागणी पत्र दिलेले नसतांना त्यांनी स्वतःहून कोटेशन दिलेले आहे. सर्व कोटेशन सिलबंद असून तुलनात्मक दर मिळवण्याच्या दृष्टीने त्याचा फायदा होऊ शकेल त्यामुळे ते कोटेशनदेखील विचारात घ्यावे असे नम्र मत आहे.

वरीलप्रमाणे प्राप्त झालेले ०७ सिलबंद कोटेशन आजचे उपसमिती सभेपुढे उघडणेत येऊन, कोटेशनधारकांना चर्चा/ वाटाघाटीसाठी समक्ष बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| Sr. No. | Description | Qty. | Make / Model | Rate Per in Rs. | Rate After Negotiation |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **Fogger Machine**<br>Specification-<br>• Electrically powered on 240 Volts, 50Hz<br>• Supply cable 2 meters long. Earth- link provided.<br>• UL approved drive motor.<br>• Complete assembly mounted on 5 liter capacity disinfectant tank<br>• Fitted with best make UL Approved.<br>• Timer switch CE & UL approved.<br>• Complete hardware in stainless steel.<br>MOC<br>• Disinfectant tank & all internal wetted parts in best grade stainless steel.<br>• Rest other parts compatible to acidic & alkaline liquids.<br>• Blower head body of aluminum.<br>Droplet size in sub – microns ensures :<br>• Maximum volumetric coverage in shortest span of time.<br>• Surface disinfection along with aerial disinfection.<br>• Avoids floor wetting.<br>Globally reputed UL & CE Approved drive motor.<br>• Lightweight & handy, just plug in and start. | 2 | | | |
| | M/s. Skan Inc., Mumbai | | ULV with (SS Tank) Skan Fog | 38250.00 | 27000.00 Absent but Discount given by Email Letter |
| | M/s. Agro Care Products, Mumbai. | | CYCLONE ULTRA USA 2736 (PLASTIC TANK) | 42750.00 | ABSENT |
| | M/s. Gouri Engineering Pvt. Ltd., New Panvel | | MICRO MIST (SS TANK) | 38025.00 | ABSENT |
| | M/s. Fly-Ban Industries, Pune | | FLY BAN (PLASTIC TANK) | 36337.50 | 34520.60 (SS TANK) |
| | M/s. Patel Agrochem. Mumbai. | | SS TANK | 28125.00 | ABSENT |
| | M/s. Patel Agrochem. Mumbai. | | PLASTIC TANK | 25000.00 | ABSENT |
| - | **M/s. Rank Engineering, Chennai** | - | **MICRO MIST (SS** | **20000.0** | **ABSENT** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | **TANK)** | **0** | |
| | M/s. Arbuda Agrochemicals Pvt. Ltd., Mumbai | | ULV COLD FOGGER U240 AIRFOG MACHINERY SHANGHAI (PLASTIC BODY) | 12075.00 | ABSENT |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील ऑपरेशन थिएटर करीता Fogger Machine खरेदीकामीच्या कोटेशनमध्ये एस.एस.टँक मॉडेलची मागणी केलेली होती. त्यानुसार सदरहू खरेदीसाठी मे.रँक इंजिनिअरींग, चेन्नई यांचे प्रती नग रु.२०,०००/- मात्र सर्व करांसह हे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देणेत यावा. तसेच याकामी रु.१२,०००/- मात्र येणाऱ्या वाढीव खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

०९ **सामान्य प्रशासन विभागाकरीता काट्रेज व इंक टँक खरेदी करणेकामी आलेले दरपत्रके उघडणेबाबत.**

सन २०१३-१४ करिता आवश्यक असणारी कार्यालयीन व संगणकीय स्टेशनरी (वार्षिक साहित्य) खरेदीकामी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करुन निविदा मागविणेस तसेच सदरचे खरेदीसाठी येणाऱ्या रक्कम रु.२४,५०,०००/- मात्रचे खर्चास मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७.०२.२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७१ नुसार मान्यता मिळालेली आहे. तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.०५.०४.२०१३ रोजी उपरोक्त कार्यवाहीस मान्यता दिलेली आहे. त्यानुसार महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर निविदा दि.२६.०६.२०१३ ते दि.०८.०७.२०१३ अखेर प्रसिद्ध करण्यात आलेली होती. त्यानंतर मुदतीअंती प्राप्त निविदांचे तांत्रिक लिफाफे दि.१२.०७.२०१३ रोजी उघडण्यात आले, त्यामध्ये पात्र झालेल्या निविदाधारकांच्या मुळ निविदा (Financial Bid) दि.२६.०७.२०१३ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत उघडण्यात आल्या. मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.६०६ नुसार न्युनतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेत आलेले आहेत. मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६.०७.२०१३ चे सभेतील निर्णय क्र.६०६ अन्वये "ज्या साहित्याचे दर आलेले नाहीत, अशा साहित्याकरिता फेरनिविदा/ कोटेशन मागविण्यात यावीत, असे ठरले. "

त्यानुसार संस्थानचे नियमित (दहा) पुरवठाधारकांना इकडील जा.नं.एस.एस.एस/ खरेदी/ ३५३० दि.०५.११.२०१३ अन्वये कोटेशन मागणी फॉर्म पाठवून त्यांचेकडून काट्रेज व इंक टँक खरेदीकामी दिनांक १८.११.२०१३ अखेर दरपत्रके मागणी करणेत आलेली होती. त्यानुसार मुदती अंती तीन व मुदतीनंतर एक अशी एकुण चार पुरवठाधारकांनी कोटेशन पाठविलेले आहेत. कोटेशन मागणी पाठविलेल्या यादीतील दोन व इतर दोन पुरवठाधारकाचे कोटेशन प्राप्त झालेले आहेत. लेखापरीक्षणाचे दृष्टीने तुलनात्मक तक्त्याचा विचार करता चारही कोटेशनचा विचार करता येईल. प्राप्त कोटेशनचा तपशिल खालीलप्रमाणे -

| अ.नं. | पुरवठाधारकाचे नाव | आवक क्रमांक / दिनांक |
|---|---|---|
| ०१ | कोरस इंडीया लि.,पुणे | १३२६७/१८.११.२०१३ |
| ०२ | सुलभ एंटरप्रायझेस,पुणे | १३२६८/१८.११.२०१३ |
| ०३ | यश एंटरप्रायझेस, नाशिक | १३२६९/१८.११.२०१३ |
| ०४ | कॉम्प्युलिंक कॉम्प्युटर कंन्सुमेबल्स, मुंबई | १३३३८/१९.११.२०१३ मुदतीनंतर |

तरी काट्रेज व इंक टँक खरेदी करणेकामी प्राप्त चार कोटेशन मा.त्रीसदस्य समितीचे सभेत उघडून तुलनात्मक तक्ता तयार करुन न्युनत्तम दरधारकास पुरवठा आदेश देणेस व त्याकामी येणारे अंदाजे रु.३,६०,०००/- (अक्षरी रुपये तीन लाख साठ हजार) मात्रचा खर्च सन २०१३-१४ चे वार्षिक कार्यालयीन व संगणक स्टेशनरी खरेदीचे अंदाजपत्रकातून करणेस सदरचा विषय मा.त्रीसदस्य समितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले ०४ कोटेशन्स आजचे सभेत उघडणेत येऊन, त्यांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | CARTAGE FOR DIGITAL FRANKING MACHINE IJ-90 (KORES MAKE) १२ नग (दर प्रती नग व्हॅटसह) | INK TANK FOR DIGITAL FRANKING MACHINE IJ-90 (KORES MAKE) ०६ नग (दर प्रती नग व्हॅटसह) |
|---|---|---|---|
| १ | कोरस इंडीया लि.,पुणे | रु.१७,३८८/- | रु.१८,९००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | सुलभ एंटरप्रायझेस,पुणे | रु.१८,०००/- | रु.१९,०००/- |
| ३ | यश एंटरप्रायझेस, नाशिक | रु.१९,५००/- | रु.१८,२००/- |
| ४ | कॉम्प्युलिंक कॉम्प्युटर कंन्सुमेबल्स, मुंबई | **रु.११,८५०/-** | **रु.१७,७५०/-** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित खरेदीकामी मे. कॉम्प्युलिंक कॉम्प्युटर कंन्सुमेबल्स, मुंबई यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- अधिक्षक, खरेदी विभाग)

---

१० **श्री साईप्रसादालय विभागासाठी ॲप्रन व टोपी खरेदी करणेकामी आलेले दरपत्रके उघडून न्युनतम दर धारकास पुरवठा आदेश देणेबाबत.**

मा.त्रिसदस्य समितीचे दि. २६.०७.२०१३ चे सभेतील निर्णय क्र.५३९ नुसार श्री साईप्रसादालयातील कायम/ कंत्राटी कर्मचाऱ्यांना २२५० नग ॲप्रन व टोपी खरेदी करणेस व याकामी येणारे रक्कम रु.४,३८,७५०/- (अक्षरी रुपये चार लाख अडोतीस हजार सातशे पन्नास) मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार संस्थानचे नियमित (बारा) पुरवठाधारकांना इकडील जा.नं.एसएसएस/खरेदी ३२५० दि.१८.१०.२०१३ अन्वये कोटेशन मागणी फॉर्म पाठवून त्यांचेकडून ॲप्रन व टोपी खरेदीकामी दिनांक २८.१०.२०१३ अखेर दरपत्रके मागणी करणेत आलेली होती. त्यानुसार मुदती अंती एक व मुदतीनंतर एक असे दोन पुरवठाधारकांचे कोटेशन व नमुने प्राप्त झालेले आहेत.त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे :-

| अ.नं. | पुरवठाधारकाचे नाव | आवक क्रमांक / दिनांक |
|---|---|---|
| ०१ | आर के कलेक्शन, नाशिक | १२०४६/२८.१०.२०१३ |
| ०२ | बांठीया एंटरप्रायझेस, पुणे | १२१४९/२८.१०.२०१३ मुदतीनंतर |

त्यानुसार मुदती अंती एक व मुदतीनंतर एक असे दोन पुरवठाधारकांचे कोटेशन व नमुने प्राप्त झालेले आहेत. तुलनात्मक तक्ता तयार करणेसाठी किमान दोन कोटेशन आवश्यक असल्याने मुदतीनंतर आलेल्या कोटेशनचाही विचार केलेला आहे.उपरोक्त दरपत्रके उघडून न्युनतम दरधारकास पुरवठा आदेश देता येईल व प्राप्त नमुने प्रसादालय विभागाकडे सुपुर्त करण्यास मान्यता असावी.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालय विभागातील कर्मचाऱ्यांसाठी ॲप्रन व टोपी खरेदी करणेकामी फक्त दोनच कोटेशन आलेले असल्यामुळे सदरहूकामी फेरकोटेशन मागविणेत यावे, अशी शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- अधिक्षक, खरेदी विभाग)

---

११ **साई प्रसादालय विभागाकरिता लिक्वीड सोप खरेदी करणेकामी आलेले दरपत्रके उघडणेबाबत.**

मा.त्रिसदस्य समितीचे दि. ०३.१०.२०१३ चे सभेतील निर्णय क्र.७४९ नुसार साई प्रसादालय विभागासाठी तेलकट भांडी धुणेकामी आवश्यक असलेले ८१०० लिटर लिक्वीड सोप खरेदी करणेस व याकामी येणारे रक्कम रु.२,०२,५००/- (अक्षरी रुपये दोन लाख दोन हजार पाचशे) मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.सदरचा प्रस्ताव दि.२६.११.२०१३ रोजी खरेदी विभागास प्राप्त झालेला होता.

त्यानुसार संस्थानचे नियमित (चौदा) पुरवठाधारकांना इकडील जा.नं.एस.एस.एस/ खरेदी/ ३९८१/१३ दि.०३.१२.२०१३ अन्वये कोटेशन मागणी फॉर्म पाठवून त्यांचेकडून लिक्वीड सोप खरेदीकामी दिनांक १६.१२.२०१३ अखेर दरपत्रके मागणी करणेत आलेली होती. त्यानुसार मुदतीअंती चार पुरवठाधारकांनी कोटेशन पाठविलेले आहेत. त्यापैकी कोटेशन मागणी केलेल्या यादीतील तीन व इतर एका पुरवठाधारकाने कोटेशन पाठविलेले आहेत. लेखापरीक्षणाच्या दृष्टीने तुलनात्मक तक्ता तयार करतांना तीन कोटेशन आवश्यक आहेत.त्यामुळे इतर पुरवठाधारकाकडून आलेल्या कोटेशनचा सामावेश करता येईल. तरी प्राप्त चार कोटेशनचा तपशिल खालीलप्रमाणे-

| **अ.नं.** | **पुरवठाधारकाचे नाव** | **आवक क्रमांक / दिनांक** |
|---|---|---|
| ०१ | श्री स्वामी समर्थ एजन्सीज, कोपरगाव | १५२९८/१६.१२.२०१३ |
| ०२ | आर के एंटरप्रायझेस, सिन्नर | १५३००/१६.१२.२०१३ |
| ०३ | गांधी केमिकल्स् अहमदनगर | १४९५९/१६.१२.२०१३ |
| ०४ | साई प्रॉडक्टस्, कोपरगाव | १५२९७/१६.१२.२०१३ |

उपरोक्तप्रमाणे ८१०० लिटर लिक्वीड सोप खरेदी करणेकामी प्राप्त झालेले ०४ कोटेशन आजचे उपसमिती सभेत समक्ष उघडणेत येऊन, त्याचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| **अ.नं.** | **पुरवठाधारकाचे नाव** | **कोटेशनमधील दर** |
|---|---|---|

| | | प्रती लिटर (व्हॅटसह) |
|---|---|---|
| ०१ | श्री स्वामी समर्थ एजन्सीज, कोपरगाव | **रु.१६.००** (लिक्वीड सोपचे रिकामे कॅन परत देणेच अटीवर) |
| ०२ | आर के एंटरप्रायझेस, सिन्नर | रु.२८.०० |
| ०३ | गांधी केमिकल्स् अहमदनगर | रु.२६.४३ |
| ०४ | साई प्रॉडक्टस्, कोपरगाव | रु.३०.०० |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालय विभागाकरिता लिक्वीड सोप आवश्यक असलेले ८१०० लिटर लिक्वीड सोप खरेदीकामी श्री स्वामी समर्थ एजन्सीज, कोपरगाव यांचे प्रती लिटर (व्हॅटसह) रु.१६.०० (लिक्वीड सोपचे रिकामे कॅन परत देणेच अटीवर) मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, खरेदी विभाग)

---

१२ **आरोग्य विभागाकरिता रबरी मॅटीन खरेदी करणेकामी आलेले दरपत्रके उघडणेबाबत.**

मा.त्रिसदस्य समितीचे दि.०३.१०.२०१३ चे सभेतील निर्णय क्र.७५५ नुसार आरोग्य विभागासाठी आवश्यक असलेल्या १०० नग रबरी मॅटीन खरेदी करणेस व याकामी येणारे रक्कम रु.८५,०००/- (अक्षरी रुपये पंचाऐंशी हजार) मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.सदरचा प्रस्ताव दि.२३.११.२०१३ रोजी खरेदी विभागास प्राप्त झालेला होता.

त्यानुसार संस्थानचे नियमित (नऊ) पुरवठाधारकांना इकडील जा.नं.एस.एस.एस/खरेदी/ ३९८२/ १३ दि.०३.१२.२०१३ अन्वये कोटेशन मागणी फॉर्म पाठवून त्यांचेकडून रबरी मॅटीन खरेदीकामी दिनांक १६.१२.२०१३ अखेर दरपत्रके मागणी करणेत आलेली होती. त्यानुसार मुदतीअंती तीन पुरवठाधारकांनी कोटेशन पाठविलेले आहेत. त्यापैकी कोटेशन मागणी केलेल्या यादीतील दोन व इतर एका पुरवठाधारकाने कोटेशन पाठविलेले आहेत. लेखापरीक्षणाच्या दृष्टीने तुलणात्मक तक्ता तयार करतांना तीन कोटेशन आवश्यक आहेत. त्यामुळे इतर एका पुरवठाधारकाकडून आलेल्या कोटेशनचाही सामावेश करता येईल. तरी प्राप्त तीन कोटेशनचा तपशिल खालीलप्रमाणे -

| अ.नं. | पुरवठाधारकाचे नाव | आवक क्रमांक / दिनांक |
|---|---|---|
| ०१ | श्री स्वामी समर्थ एजन्सीज, कोपरगाव | १५२९९/१६.१२.२०१३ |
| ०२ | आर के एंटरप्रायझेस, सिन्नर | १५३०१/१६.१२.२०१३ |
| ०३ | साई प्रॉडक्टस्, कोपरगाव | १५३०२/१६.१२.२०१३ |

उपरोक्त रबरी मॅटीन खरेदी करणेकामी प्राप्त झालेले ०३ कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडणेत आले असता, अ.नं.०२ व ०३ या पुरवठाधारकांनी त्यांच्या कोटेशन्समध्ये दर नमुद केले नसल्याचे आढळून आले. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| अ.नं. | पुरवठाधारकाचे नाव | कोटेशनमधील दर प्रती नग (व्हॅटसह) |
|---|---|---|
| ०१ | श्री स्वामी समर्थ एजन्सीज, कोपरगाव | रु.८७१०/- |
| ०२ | आर के एंटरप्रायझेस, सिन्नर | दर नमूद नाही. |
| ०३ | साई प्रॉडक्टस्, कोपरगाव | दर नमूद नाही. |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, आरोग्य विभागाकरिता रबरी मॅटीन खरेदी करणेकामी एकाच पुरवठाधारकाचे दर प्राप्त झालेले असल्यामुळे, सदरकामी फेर कोटेशन मागविणेत यावे, अशी शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- अधिक्षक, खरेदी विभाग)

---

१३ **द्वारावती भक्तनिवास विभागाकडील ए.सी. खोल्यांसाठी ब्लँकेट खरेदी करणेकामी मागविलेली फेर दरपत्रके उघडणेबाबत.**

मा.त्रिसदस्य समितीचे दि. १७.०९.२०१३ चे सभेतील निर्णय क्र.६८१ नुसार व्दारावती भक्तनिवास इमारतीमध्ये राहणाऱ्या साईभक्तांना आवश्यक असलेले ४०० नग वुलन ब्लॅकेट खरेदी करणेस व याकामी येणारे रक्कम रु.२,००,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख ) मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार संस्थानचे नियमित (अकरा) पुरवठाधारकांना इकडील जा.नं.एसएसएस/खरेदी ३१३७ दि.१५.१०.२०१३ अन्वये कोटेशन मागणी फॉर्म पाठवून त्यांचेकडून वुलन ब्लॅकेट खरेदीकामी दिनांक २४.१०.२०१३ अखेर दरपत्रके मागणी करणेत आलेली होती. त्यानुसार मुदती अखेर एकही कोटेशन प्राप्त न झाल्याने यादीतील पुरवठाधारकांना व इतर पुरवठाधारकांना दूरध्वनीव्दारे दरपत्रके देंणे बाबत वारंवार संपर्क साधला असता चार पुरवठाधारकांनी मुदतीनंतर कोटेशन व नमुने पाठविलेले होते. त्यानंतर प्राप्त नमुन्यातून व्दारावती विभागाकडून योग्य नमुन्याची निवड केलेनंतर निवडलेल्या नमुन्याचे फेर

कोटेशनची मागणी संस्थानचे नियमित (अकरा) पुरवठाधारकांना इकडील जा.नं.एसएसएस/खरेदी-३७२२ दि.१८.११.२०१३ अन्वये फेर कोटेशन मागणी फॉर्म पाठवून त्यांचेकडून वुलन ब्लॅकेट खरेदीकामी दिनांक २३.११.२०१३ अखेर दरपत्रके मागणी करणेत आलेली होती. त्यानुसार मुदतीअंती तीन कोटेशन प्राप्त झालेले होते.

परंतू दि.२८.११.२०१३ रोजी मा.कार्यकारी आधिकारीसाो यांनी Bombay Dying all season fleece Blankets (B३) १००% Polyestor वुलन ब्लँकेट खरेदी करणेबाबत सुचना केलेल्या आहेत.

त्यामुळे संस्थानचे नियमीत पुरवठा धारक यांचे पत्यावर Bombay Dying all season fleece Blankets (B३) १००% Polyestor वुलन ब्लँकेट खरेदीकामी फेर कोटेशन मागणी फॉर्म पाठवून त्यांचेकडून फेर दरपत्रके मागणी करण्यात आलेली होती. मुदतीअंती पाच पुरवठाधारकांची दरपत्रके प्राप्त झालेली आहेत, त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे :-

| **अ.नं.** | **पुरवठाधारकाचे नाव** | **आवक क्रमांक / दिनांक** |
|---|---|---|
| ०१ | सारडा इंटेरीयर, अहमदनगर | १५३५३/१७.१२.२०१३ |
| ०२ | गणेश टेक्सटाईल्स,अहमदनगर | १५५२५/१९.१२.२०१३ |
| ०३ | तुलसी एम्पोरीयम,सोनई | १५५२६/१९.१२.२०१३ |
| ०४ | राजेंद्र क्लॉथ स्टोअर्स,राहूरी | १५५२७/१९.१२.२०१३ |
| ०५ | आर के कलेक्शन, नाशिक | १५५४३/१९.१२.२०१३ |

उपरोक्त ४०० नग वुलन ब्लॅकेट (Bombay Dying all season fleece Blankets B३ १००% Polyeste) खरेदी करणेकामी प्राप्त झालेले ०५ फेरकोटेशन आजचे उपसमिती सभेत उघडणेत येऊन त्यांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| **अ.नं.** | **पुरवठाधारकाचे नाव** | **कोटेशनमधील दर प्रती नग (व्हॅटसह)** |
|---|---|---|
| ०१ | आर के कलेक्शन, नाशिक | रु.७८६/- (दि.३१.१२.२०१३ पर्यंत) |
| ०२ | राजेंद्र क्लॉथ स्टोअर्स, राहूरी | **रु.८२५/-** |
| ०३ | तुलसी एम्पोरीयम, सोनई | रु.८४०/- |
| ०४ | गणेश टेक्सटाईल्स, अहमदनगर | रु.८४९/- |
| ०५ | सारडा इंटेरीयर, अहमदनगर | रु.१२५०/- |

**उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता मे.आर के कलेक्शन, नाशिक यांचे दर निम्नतम आहेत. परंतु त्यांनी ते दर दि.३१.१२.२०१३ पर्यंतच्या खरेदीसाठी दिलेले होते. त्यामुळे त्यांना त्यांच्या दराबाबत दुरध्वनीवरुन विचारणा केली असता, त्यांनी कोटेशनमधील दरावर ५% वाढ मागीतली, म्हणजे त्यांचे दर प्रती नग रु.८२५.३० मात्र होतात.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, द्वारावती भक्तनिवास विभागाकडील ए.सी. खोल्यांसाठी आवश्यक असलेले ४०० नग वुलन ब्लँकेट खरेदीसाठी तुलनात्मक तक्त्यामधील द्वितीय निम्नतम दरधारक मे. राजेंद्र क्लॉथ स्टोअर्स, राहूरी यांचे प्रती नग रु.८२५/- मात्र हे दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा. तसेच, सदर खरेदीकामी जादा येणारी रक्कम रु.१,३०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, खरेदी विभाग)

---

१४ **साईप्रसाद निवासस्थान विभागाकडील खोल्यांसाठी पडदे कापड खरेदीकामी आलेले दरपत्रके उघडुन निर्णय घेणेबाबत.**

मा.त्रिसदस्य समितीचे दि. १७.०९.२०१३ चे सभेतील निर्णय क्र.६७० नुसार साईप्रसाद निवासस्थान विभागाकडील साईनिवास अतिथीगृहाचे खोल्यांमधील खिडक्यांकरीता पडदे शिवणेकामी कापड खरेदी करणेस व याकामी येणारे रक्कम रु.४,८०,०००/- (अक्षरी रुपये चार लाख ऐंशी हजार) मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार संस्थानचे नियमित (अकरा) पुरवठाधारकांना इकडील जा.नं.एसएसएस/खरेदी ३२५५ दि.१८.१०.२०१३ अन्वये कोटेशन मागणी फॉर्म पाठवून त्यांचेकडून पडदे कापड खरेदीकामी दिनांक २८.१०.२०१३ अखेर दरपत्रके मागणी करणेत आलेली होती. त्यानुसार मुदती अखेर चार पुरवठाधारकांचे कोटेशन व नमुने प्राप्त झालेले आहेत.त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे :-

| **अ.नं.** | **पुरवठाधारकाचे नाव** | **आवक क्रमांक / दिनांक** | **नमुना** |
|---|---|---|---|
| ०१. | गणेश टेक्सस्टाईल्स,अहमदनगर | १२०३९/२८.१०.२०१३ | नाही |
| ०२. | राजेंद्र क्लॉथ स्टोअर्स,राहूरी | १२०४१/२८.१०.२०१३ | आहे |

| | | | |
|---|---|---|---|
| ०३. | तुलसी एम्पोरीयम,सोनई | १२०४२/२८.१०.२०१३ | आहे |
| ०४. | आर के कलेक्शन,नाशिक | १२०४७/२८.१०.२०१३ | आहे |

श्री साईप्रसाद निवासस्थान विभागाकडील खोल्यांसाठी D-Decor, Stanza, Sr.no.१५ (९५० मीटर) पडदयाचे कापड खरेदी करणेकामी उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले ०४ कोटेशन आजचे उपसमिती सभेत उघडणेत येऊन, त्याचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | पुरवठाधारकाचे नाव | कोटेशनमधील दर प्रती मीटर (व्हॅटसह) |
|---|---|---|
| ०१. | गणेश टेक्सस्टाईल्स,अहमदनगर | रु.३८८.०० |
| ०२. | राजेंद्र क्लॉथ स्टोअर्स,राहूरी | रु.३७५.०० |
| ०३. | तुलसी एम्पोरीयम,सोनई | रु.३६५.०० |
| ०४. | आर के कलेक्शन,नाशिक | **रु.२८३.५०** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसाद निवासस्थान विभागाकडील खोल्यांसाठी पडदयाचे कापड D-Decor, Stanza, Sr.no.१५ (९५० मीटर) खरेदीकामी मे. आर के कलेक्शन, नाशिक यांचे रु.२८३.५० मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- अधिक्षक, खरेदी विभाग)

---

१५ **श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयासाठी बेंचेस खरेदीकामी प्राप्त दरपत्रके उघडून चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत.**

मा.त्रीसदस्य समितीचे दि.२६.०७.२०१३ चे सभेतील निर्णय क्र. ५९७ नुसार श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयासाठी खालील तपशीलाप्रमाणे बेंचेस खरेदी कामी १६,७०,०००/- (अक्षरी रुपये सोळा लाख सत्तर हजार ) मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

| अ.नं | बेंच तपशील | साईज | मागणी | अंदाजे दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| **०१** | Godrej Make Achiever Two Seater Bench Model-3 | Hd-744 mm<br>W-1100 mm<br>D-915 mm<br>Hs-440 mm | १२० नग | ८५००/- | १०,२०,०००/- |
| **०२** | Godrej Make Merit Sigle Seater Bench | H-725.5 mm<br>W-600 mm<br>D-1051 mm | १०० नग | ६५००/- | ६,५०,०००/- |
| | | | | **एकुण रक्कम रुपये-** | **१६,७०,०००/-** |

मात्र मा.व्य.समितीचे दि.२७.१०.२०१३ चे सभेतील निर्णय क्र.८७३ नुसार बेंचेस खरेदी तातडीची असल्याने उपरोक्त बेंचेस दोन टप्यात खरेदी करणेस मान्यता मिळालेली आहे. सदरचा प्रस्ताव खरेदी विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी दि.२२.११.२०१३ रोजी प्राप्त झालेला आहे.

त्यानुसार पहील्या टप्यात अ.नं ०१ मंधील Godrej Make Achiever Two Seater Bench Model-३ चे १०० नग बँचेस खरेदीकामी दि.१०.१२.२०१३ चे वर्तमानपत्रात (देशदुत, नाशिक, पुढारी अहमदनगर, सार्वमत, अहमदनगर) जाहिरात प्रसिद्ध करुन दरपत्रके मागणी करण्यात आलेली होती. दरपत्रके स्विकारण्याची अंतिम दि.२१.१२.२०१३ अशी होती. मुदतअंती तीन दरपत्रके प्राप्त झालेली आहेत, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे :-

| अ.नं. | दरपत्रकधारकाचे नांव | आवक नंबर व दिनांक |
|---|---|---|
| ०१. | मे.साई एंटरप्रायझेस, श्रीरामपुर | १५५३२/१९.१२.२०१३ |
| ०२. | मे.स्वॉन इलेक्ट्रो.मेक सिस्टीम, नाशिक | १५५३३/१९.१२.२०१३ |
| ०३. | मे.रोहन एंटरप्रायझेस, अहमदनगर | १५६८०/२१.१२.२०१३ |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेली ०३ तीन दरपत्रके आजचे सभेत उघडणेत येऊन, दरपत्रक-धारकांना चर्चा/ वाटाघाटीसाठी समक्ष बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ. नं. | दरपत्रकधारकाचे नांव | दरपत्रकामधील दर प्रती नग (व्हॅटसह) | चर्चा/ वाटाघाटीअंती देऊ केलेले दर प्रती नग (व्हॅटसह) |
|---|---|---|---|
| ०१. | मे.साई एंटरप्रायझेस, श्रीरामपुर | रु.८,९९९.०० | अधिकृत वितरक नाही. **(अपात्र)** |
| ०२. | मे.स्वॉन इलेक्ट्रो.मेक सिस्टीम, नाशिक | रु.८,७८६.९३ | रु.८,७८०.०० |
| ०३. | मे.रोहन एंटरप्रायझेस, अहमदनगर | रु.९,१७५.०० | **रु.८,७५०.००** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयासाठी Godrej Make Achiever Two Seater Bench Model-3 या बेंचेस खरेदीकामी मे.रोहन एंटरप्रायझेस,**

**अहमदनगर यांचे रु.८,७५०/- प्रती नग (व्हॅटसह) मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- अधिक्षक, खरेदी विभाग)

---

१६ **भक्तनिवासस्थान (५०० रुम) कडील चौकशी कार्यालय तसेच रुम बुकींग काऊंटर वायरिंगचे नुतनीकरण करणेकामी प्राप्त झालेली कोटेशन उघडून कोटेशनधारकांशी चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत.**

मा.त्रीसदस्य समितीचे दि.२१-०६-२०१३ चे सभेतील विषय क्र.५४ निर्णय क्र.४८७ अन्वये भक्तनिवासस्थान (५०० रुम ) कडील चौकशी कार्यालय तसेच रुम बुकींग काऊंटर वायरिंगचे नुतनीकरणाचे काम बाहेरील विद्युत ठेकेदारांकडून करुन घेणेसाठी कोटेशन मागविणेस व संस्थानच्या वेबसाईटवर पुर्ण कोटेशन फॉर्म प्रसिध्द करणेस तसेच याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये २,३२,३९३/- मात्रचे खर्चास मान्यता खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार सदर कामाची कोटेशन नोटीस संस्थानचे आय.टी. विभागामार्फत वेबसाईटवर दि.२०-११-२०१३ रोजी अपलोड करुन ही जाहिरात दि.३०-११-२०१३ पर्यंत ठेवण्यात आली होती. कोटेशनची विक्री दिनांक २०-११-२०१३ ते दि. २९-११-२०१३ अशी होती.व कोटेशन दाखल करणेची तारीख दि.३०-११-२०१३ अशी होती तसेच जा.नं.एसएसएस/ विद्युत /३७८९ /२०१३ दि.२२-११-२०१३ अन्वये विद्युत दुकानदार / ठेकेदारांकडून कोटेशन्स मागविण्यात आलेली आहेत.त्यानुसार खालीलप्रमाणे कोटेशन्स प्राप्त झाली आहेत. कोटेशनचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | कोटेशनधारकाचे नांव |
|---|---|
| ०१) | मे.जाधव इलेक्ट्रीकल्स, कोपरगांव |
| ०२) | मे.श्री साईश्रध्दा इलेक्ट्रीकल्स, नाशिक |
| ०३) | मे.गुरु इंजिनिअरिंग ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, नाशिक |

उपरोक्तप्रमाणे भक्तनिवासस्थान (५०० रुम) कडील चौकशी कार्यालय तसेच रुम बुकींग काऊंटर वायरिंगचे नुतनीकरणाचे काम बाहेरील विद्युत ठेकेदारांकडून करुन घेणेकामी प्राप्त झालेले ०३ कोटेशन्स आजचे सभेत उघडणेत येऊन, कोटेशनधारकांना चर्चा/ वाटाघाटीसाठी समक्ष बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव | कोटेशनमधील मुळ दर रु. | चर्चा/ वाटाघाटीअंती देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| ०१. | मे.जाधव इलेक्ट्रीकल्स, कोपरगांव | २,५५,९६५/- | **२,१४,९६५/-** |
| ०२. | मे.गुरु इंजिनिअरिंग ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, नाशिक | सोबत EMD जोडलेला नसल्यामुळे **अपात्र** | |
| ०३. | मे.श्री साईश्रध्दा इलेक्ट्रीकल्स, नाशिक | २,४७,९४६/- | २,३७,९४६/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, भक्तनिवासस्थान (५०० रुम) कडील चौकशी कार्यालय व रुम बुकींग काऊंटर वायरिंगचे नुतनीकरण करणेकामी मे.जाधव इलेक्ट्रीकल्स, कोपरगांव यांचे रु.२,१४,९६५/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

१७ **Ultrabook खरेदीकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडणेबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतुद :** क्र.२१-(क), (ग) व क्र.२१-२ (ग) नुसार.

**मा.व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :** १) दिनांक ०७/०२/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ८२.
२) दिनांक २१/०६/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५११.

**प्रस्ताविक:-** मा.व्यवस्थापन समितीचे सभा दिनांक ०७/०२/२०१३ निर्णय क्र.८२ नुसार पाच लाख व त्या पुढील रक्कमेचे सर्व टेंडर हे महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटव्दारे करणेस तसेच ई-टेंडर कार्यप्रणाली सुरु करणेसाठी एक स्वतंत्र Tender Cell (निविदा कक्ष) ची स्थापना करणेस मान्यता मिळालेली आहे. ई-टेंडर तयार करणे, टेंडर अपलोड करणे, निविदाधारकांनी भरलेल्या टेंडरची पडताळणी करणे, तुलनात्मक तक्ता तयार करणे याकरीता पाच Ultrabook खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे ४,२०,०००/- + टॅक्स इतक्या खर्चास मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २१/०६/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ५११ ने मान्यता देण्यात आलेली आहे.

ई-टेंडर सुविधेसाठी पाच Ultrabook खरेदी करणेसाठीची जाहिरात संस्थानचे www.sai.org.in या अधिकृत वेबसाईटवर दिनांक २८/०८/२०१३ अखेर प्रकाशीत करुन सिलबंद निविदा सादर करण्याची मुदत दिनांक ३१/०८/२०१३ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत ठेवण्यात आलेली होती. त्यानुसार प्राप्त झालेल्या निविदेंचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | आवक क्र. व दिनांक | पुरवठादाराचे नांव | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | ८९२३ दि.३०/०८/२०१३ | Gadgets Laptops (Division of Sujata Computer P. Ltd.), Pune. | सदरची निविदा आवक विभागाकडून उघडलेल्या स्थितीत प्राप्त झाली असून त्यांचे Specification जाहिरातीप्रमाणे नाही. |
| ०२ | ९०१८ दि.३१/०८/२०१३ | Minitek Systems (I) Pvt. Ltd., Nashik. | - |

उपरोक्त प्राप्त झालेल्या निविदाग्राह्य धरुन त्या मा. कार्यकारी अधिकारी सो. यांचे समक्ष उघडणेच्या मान्यतेसाठी संदर्भ क्र. ०३ नुसार मान्यतेसाठी टिपणी सादर केली असता वर्तमान पत्रामध्ये जाहिरात देऊन फेर निविदा मागविणेबाबत निर्देशीत केलेले आहे.

**मागणी:** त्यानुसार पाच Ultrabook खरेदी करणेसाठी Mid Day, Mumbai व Life ३६५ Day, Pune या वर्तमान पत्रात संस्थानचे जनसंपर्क कार्यालयामार्फत जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. तसेच संस्थानचे www.sai.org.in या अधिकृत वेबसाईटवर ही जाहिरात प्रसिध्द करण्यात येवून, सिलबंद निविदा संस्थानला सादर करण्याची अंतिम मुदत दिनांक १५ नोव्हेंबर, २०१३ अखेर ठेवण्यात आलेली होती. परंतू एकही निविदा इकडील विभागास प्राप्त झालेली नाही. त्यामुळे दि. २४/०९/२०१३ रोजीचे टिपणी नुसार प्राप्त झालेल्या पात्र निविदेबाबत निर्णय होऊन Ultrabook खरेदी करण्याची कार्यवाही करण्यात यावी, असे नम्र मत आहे.

ई-टेंडर सुविधेसाठी माहिती तंत्रज्ञान विभागास आवश्यक असलेले ०५ Ultrabook खरेदी करणेकामी उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या ०२ निविदा आजचे उपसमिती सभेत उघडणेत येऊन, त्याचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | पुरवठादाराचे नांव | निविदेमधील दर रु. | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | Gadgets Laptops (Division of Sujata Computer P. Ltd.), Pune. | 3,02,500/- | D.D. व E.M.D. सोबत जोडलेले नाही. **अपात्र** |
| ०२ | Minitek Systems (I) Pvt. Ltd., Nashik. | 4,26,500/- | |

**उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता Gadgets Laptops (Division of Sujata Computer P. Ltd.), Pune यांचे दर निम्नतम आहेत. परंतु त्यांचे Specification जाहिरातीप्रमाणे नाही व निविदेसोबत डी.डी./ ई.एम.डी. जोडलेला नाही, त्यामुळे त्यांच्या निविदेमधील दरांचा विचार करणेत आला नाही.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, ई-टेंडर सुविधेसाठी माहिती तंत्रज्ञान विभागास आवश्यक असलेले ०५ Ultrabook खरेदी करणेकामी Minitek Systems (I) Pvt. Ltd., Nashik यांचे दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

१८ **रुग्णालये विभागातील CCTV Camera System करीता सल्लागार नेमणूकीसाठी प्राप्त झालेल्या निविदा उघडणेबाबत.**

श्री साईबाबा संस्थान रूग्णालयातील अत्यावश्यक सेवेचा विचार करता, अदयावत CCTV Camera System बाबत Audio-Video या क्षेत्रातील अनुभवी व तज्ञ सल्लागाराची नेमणुक करणेकामी संस्थानचे www.sai.org.in या अधिकृत संकेतस्थळावर माहिती तंत्रज्ञान विभागाची दि.३०/०९/२०१३ रोजीची मंजुर टिपणीनुसार दिनांक ०५/११/२०१३ ते दिनांक २४/११/२०१३ अखेर जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्यानुसार दिनांक ०४/१२/२०१३ अखेर Audio-Video या क्षेत्रातील अनुभवी व तज्ञ सल्लागारांचे अर्ज/निवीदा खालील तपशिलाप्रमाणे इकडील विभागास प्राप्त झाले आहे.

| अ.नं. | निवीदा धारंकाचे नाव व पत्ता | आवक क्रं. व निवीदा प्राप्त दिनांक |
|---|---|---|
| **01.** | KUSUMAGAJ ENTERPRISES,NANDED | 14298/04.12.2013 |
| **02.** | SAMRAT SECURITY SYSTEMS,MUMBAI | 14289/04.12.2013 |
| **03.** | VISHAL SECURITIES,PUNE | 14287/04.12.2013 |
| **04.** | MAHA INFOTECH PVT.LTD.,MUMBAI | 14288/04.12.2013 |
| **05.** | AUJAS NETWORK PVT.LTD,MUMBAI | 14324/05.12.2013 |
| **06.** | OPTIMISTIC,AHMEDNAGAR | 14244/03.12.2013 |
| **07.** | TRANSIT ELECTRONICS PVT.LTD,SURAT | 14247/04.12.2013 |
| **08.** | OPTIMISTIC, AHMEDNAGAR | 14116/30.11.2013 |

| | | |
|---|---|---|
| | | (निवीदा उघडलेल्या स्थितीत प्राप्त) |
| **09.** | INDIAN INDUSTRIAL SECURITY SERVICES (P) LTD., DELHI | 14167/02.12.2013 |
| **10.** | MAHINDRA SPECIAL SERVICS GROUP, MUMBAI | 14200/03.12.2013 |

माहिती तंत्रज्ञान विभागाची दि.३०/०९/२०१३ रोजीची मंजुर टिपणीनुसार Audio-Video या क्षेत्रातील अनुभवी व तज्ञ सल्लागारांची नेमणुक करणेकामी उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले अर्ज/निवीदा मा.व्यवस्थापन समितीचे सभेत उघडुन त्यातील पात्र व न्युन्नतम निवीदा धारकांस श्री साईबाबा संस्थान रुग्णालयातील CCTV Camera System चे प्रकल्पावर सल्लागार म्हणुन नेमणुक आदेश सामान्य प्रशासन विभाग,यांचे मार्फत पाच वर्षाकरीता देण्यात यावा ,असे नम्र मत आहे.

तरी, श्री साईबाबा संस्थान रूग्णालये विभागाकरीता अदयावत CCTV Camera System बाबत Audio-Video या क्षेत्रातील अनुभवी व तज्ञ सल्लागाराची नेमणुक करणेकामी सल्लागारांचे प्राप्त झालेले अर्ज/ निवीदा मा.व्यवस्थापन समितीचे सभेत उघडुन त्यातील पात्र निवीदाधारकांस श्री साईबाबा संस्थान रुग्णालयातील CCTV Camera System चे प्रकल्पावर सल्लागार म्हणुन नेमणुक आदेश देणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे समोर सविनय सादर.

| अ.नं. | निवीदाधारकाचे नाव व पत्ता | निविदेतील रक्कम रु. |
|---|---|---|
| **01.** | KUSUMAGAJ ENTERPRISES,NANDED | 8,32,000/- |
| **02.** | SAMRAT SECURITY SYSTEMS,MUMBAI | 10,35,000/- |
| **03.** | VISHAL SECURITIES,PUNE | 6,75,000/- |
| **04.** | MAHA INFOTECH PVT.LTD., MUMBAI | 6,30,000/- |
| **05.** | AUJAS NETWORK PVT.LTD, MUMBAI | 78,00,000/- |
| **06.** | OPTIMISTIC, AHMEDNAGAR | Double (free of cost for 1 year) |
| **07.** | TRANSIT ELECTRONICS PVT.LTD, SURAT | 11,15,000/- |
| **08.** | OPTIMISTIC, AHMEDNAGAR | Nil |
| **09.** | INDIAN INDUSTRIAL SECURITY SERVICES (P) LTD., DELHI | 5,15,000/- |
| **10.** | MAHINDRA SPECIAL SERVICS GROUP, MUMBAI | 19,15,000/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, रुग्णालये विभागातील CCTV Camera System करीता सल्लागार नेमणूकीसाठी प्राप्त झालेल्या निविदा अंतर्गत लेखापरिक्षण विभागाकडून तपासून घ्याव्यात व लेखापरिक्षण विभागाच्या अहवालासह सदरहू विषय पुढील सभेपुढे सादर करणेत यावा, अशी शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

१९ **श्री साईप्रसादालयातील प्रसाद भोजन ताटे बफींग करणेकामी प्राप्त दरपत्रक उघडणेस मान्यता मिळणेबाबत.**

**सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं. १४ (भाग ४)** मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील १४(२-घ) नुसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते दुरुस्तीचे काम.

**प्रास्ताविक:-** श्रीसाईप्रसादालयातील साईभक्तांना प्रसाद भोजन घेणेकामी आवश्यक कप्पेचे सेलम स्टेनलेस स्टीलचे भक्कम ३२ गेजचे २५००० नग ताटे तयार करुन घेण्यात आलेली आहे. सततच्या वापरामुळे ताटाच्या कप्पेच्या कडेला पिवळसर रंग आलेला आहे. त्यामुळे सदरचे ताटांबाबत भक्तांच्या तक्रारी येतात. त्यासाठी सदर ताटांना चकाकी येणेकरीता बफींग करणे आवश्यक आहे. साईभक्तांना प्रसाद भोजन देणेकामी चार वर्षापासुन सततच्या वापरामुळे अंदाजे ५००० नग ताटे खराब झालेली आहे. सदरचे ताट बफींग केलेनंतर ताटावर असलेला पिवळसर पणा नाहीसा होऊन चकाकी येणेकरीता ५००० ताटे बफींग करणे करीता व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु. १,७५,०००/- पर्यंतच्या खर्चास मा. व्यवस्थापन समिती दिनांक ८.१०.२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ७४७ नुसार मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार ताटे बफिंग करणाऱ्या ६ एजन्सीकडुन दरपत्रक मागविणेत आलेले होते. त्यापैकी खालील तीन एजन्सीनी दरपत्रक सादर केलेले आहे.

१. श्री मुंकुद पुरंदरे , पुणे
२. पवन इंडस्ट्रीज, कोपरगाव
३. मे. राजलक्ष्मी इंडस्ट्रीज, कोल्हापूर

**मागणी**:- ताटे बफींग करणाऱ्या उपरोक्त तीन एजन्सीकडून दरपत्रक प्राप्त झालेले आहे. प्राप्त दरपत्रक उघडून निम्नत्तम पुरवठादार यांचे कडून प्रसाद भोजनाची ताटे बफींग करुन घेता येईल. मा. त्रिसदस्यीय समिती सभा दिनांक ८.१०.२०१३ मधील निर्णय क्रं. ८०५ व जा.नं.एसएसएस/वशि-आस्था/३०२२/२०१३ दिनांक १३.१२.२०१३ रोजीचे आदेशान्वये रक्कम रु. २५००१/- ते रु.

१०,००,०००/- पर्यंतचे दरपत्रकांवर निर्णय घेणेकामी संस्थान अधिकारी यांची उपसमिती नेमणेत आलेली आहे. सदर दरपत्रक उपसमिती सदस्यांच्या सभेत उघडून निर्णय घेता येईल.

श्री साईप्रसादालयातील जेवनाची ताटे बर्फिंग करणेकामी उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले ०३ दरपत्रक आजचे उपसमिती सभेत उघडणेत येऊन, त्यांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | दरपत्रकधारकाचे नांव | दरपत्रकामधील मुळ दर प्रती ताट रु. | एकूण रक्कम रु. |
|---|---|---|---|
| ०१. | श्री मुंकुद पुरंदरे, पुणे | ४२/- | २,१०,०००/- |
| ०२. | पवन इंडस्ट्रीज, कोपरगाव | **२५/-** | **१,२५,०००/-** |
| ०३. | मे. राजलक्ष्मी इंडस्ट्रीज, कोल्हापूर | ५३/- | २,६५,०००/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयातील प्रसाद भोजन ताटे बफींग करणेकामी पवन इंडस्ट्रीज, कोपरगाव यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देणेत यावा, अशी शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- अधिक्षक, श्री साईप्रसादालय)

---

२० **पिठाचे गिरणीचे जाते वार्षीक आऊटसोर्स पध्दतीने टाकणेकामी प्राप्त दरपत्रक उघडणेस मान्यता मिळणेबाबत.**

**सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं. १४ (भाग ४)** मध्ये महाराष्ट्र विधान मंडाळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील १४(२-घ) नुसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते दुरुस्तीचे काम.

**प्रास्ताविक:-** श्री साईप्रसादालयात १६ इंच साईज जातेच्या तीन व १८ इंच साईज जातेच्या तीन असे एकुण सहा गिरणी कार्यरत आहेत. पिठाची गुणवत्ता व आऊटपूट मिळणेकरीता गिरणीचे ५-६ दिवसांनी जातेला टाके मारावे लागतात. प्रसादालयातील गिरणीचे आऊटपुट व पिठाची गुणवत्ता मिळणेकरीता गिरणीचे जाते टाकणेकामी बाहेरील तज्ञ व्यक्ती किवा एजन्सीची नियुक्ती करणेस व त्याकामी रक्कम रु.१,००,८००/- पर्यंतच्या खर्चास मा. व्यवस्थापन समिती दिनांक ८.१०.२०१३ रोजीचे सभेत मान्यता घेणेत आलेली आहे.

**मागणी:-** मा. व्यवस्थापन समीचे निर्णयानुसार श्री साईप्रसादालयातील पिठाचे गिरणीचे जाते टाकणेकामी खालीलप्रमाणे जाते टाकणेचे काम करत असलेल्या व्यक्तीकडून दरपत्रक मागविणेत आलेले होते. त्यानुसार विहीत मुदतीत त्यांनी दरपत्रक सादर केलेले आहेत.

१) श्री बाळासाहेब बाबुराव ढगे, मु. पो. कोऱ्हाळे ता. राहाता.
२) श्री जनार्दन जबाजी वाकचौरे, मु. नांदुखी बु. पो. कोऱ्हाळे ता. राहाता.
३) श्री रामनाथ कुंडलिक सुपेकर, मु. डोऱ्हाळे पो. कोऱ्हाळे ता. राहाता.

मा. त्रिसदस्यीय समिती सभा दिनांक ८.१०.२०१३ मधील निर्णय क्रं. ८०५ व जा.नं.एसएसएस/ वशि-आस्था/ ३०२२/२०१३ दिनांक १३.१२.२०१३ रोजीचे आदेशान्वये रक्कम रु. २५००१/- ते रु. १०,००,०००/- पर्यंतचे दरपत्रकांवर निर्णय घेणेकामी संस्थान अधिकारी यांची उपसमिती नेमणेत आलेली आहे. सदर दरपत्रक उपसमिती सदस्यांच्या सभेत उघडून निर्णय घेता येईल.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार अनुमान** :- तांत्रिक

श्री साईप्रसादालयातील पिठाच्या गिरणीचे जाते टाकणेकामी प्राप्त झालेली ०३ दरपत्रके आजचे उपसमिती सभेपुढे उघडणेत येऊन, त्यांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | दरपत्रकधारकाचे नांव | दरपत्रकामधील दर प्रती नग रु. | |
|---|---|---|---|
| | | १६ इंच जाते टाकणेकामी | १८ इंच जाते टाकणेकामी |
| ०१. | श्री बाळासाहेब बाबुराव ढगे, मु. पो. कोऱ्हाळे ता. राहाता | **रु.३००/-** | **रु.४००/-** |
| ०२. | श्री जनार्दन जबाजी वाकचौरे, मु. नांदुखी बु. पो. कोऱ्हाळे ता. राहाता | रु.३९०/- | रु.४५०/- |
| ०३. | श्री रामनाथ कुंडलिक सुपेकर, मु. डोऱ्हाळे पो. कोऱ्हाळे ता. राहाता | रु.३३०/- | रु.४५०/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयातील पिठाच्या गिरणीचे जाते वार्षीक आऊटसोर्स पध्दतीने टाकणेकामी प्रती नगासाठी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामध्ये गडद व अधारेखीत केलेले श्री बाळासाहेब बाबुराव ढगे, मु. पो. कोऱ्हाळे ता. राहाता यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना दि.०१.०२.२०१४ ते दि.३१.०१.२०१५ या कालावधीकरीता कार्यादेश देणेत यावा, अशी शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- अधिक्षक, श्री साई प्रसादालय)

---

२१ **नवीन ट्रेलर खरेदी करणेकामी प्राप्त कोटेशन्स उघडून चर्चा/ वाटाघाटीअंती निर्णय होणेबाबत.**

दि.१४/११/२०१३ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रं.९१३ अन्वये, वाहन विभागासाठी आवश्यक असलेला नवीन ट्रेलर खरेदी कामी परिसरातील नामांकित ट्रेलर बनविणारे पुरवठाधारक यांचेकडून कोटेशन बोलाविणेस व याकामी येणाऱ्या रु.१,४०,०००/- (अक्षरी रक्कम रु. एक लाख चाळीस हजार) मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

वरील निर्णयानुसार, एक नवीन ट्रेलर करीता परिसरातील नामांकित ट्रेलर बनविणारे पुरवठाधारक यांचेकडून जा.नं.एसएसएस/वाहन/४००८/२०१३ दि.०७/१२/२०१३ ने कोटेशन बोलाविण्यात आली होती. सदर कोटेशन दि.१४/१२/२०१३ अखेर पोहोचतील अशा प्रकारे पाठविणे बाबत कळविण्यात आले होते. परंतु, तीनही कोटेशन उशीरा प्राप्त झालेली आहेत. प्राप्त झालेली कोटेशन्स खालील प्रमाणे.

१. अनिल फॅब्रीकेटर्स, साकुरी आवक नं.१५४६३, दि.१९/१२/२०१३ - बंद कोटेशन

२. साईशक्ती इंडस्ट्रीज लि., साकुरी आवक नं.१५४६४, दि.१९/१२/२०१३ - बंद कोटेशन

३. भनसाळी ट्रॅक्टर्स प्रा. लि., कोपगांव आवक नं.१५९३८, दि.२६/१२/२०१३ - बंद कोटेशन

वरीलप्रमाणे प्राप्त झालेली ०३ बंद कोटेशन्स आजचे उपसमिती सभेपुढे उघडणेत येऊन, कोटेशनधारकांना चर्चा/ वाटाघाटीसाठी समक्ष बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव | कोटेशनमधील मुळ दर रु. | चर्चा/ वाटाघाटीअंती देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| ०१. | अनिल फॅब्रीकेटर्स, साकुरी | १,१०,२५०/- | **१,०५,०००/-** |
| ०२. | साईशक्ती इंडस्ट्रीज लि., साकुरी | १,१५,५००/- | १,१३,०००/- |
| ०३. | भनसाळी ट्रॅक्टर्स प्रा. लि., कोपगांव | १,३२,०००/- | अनुपस्थित |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, वाहन विभागासाठी आवश्यक असलेला दोन चाकी नवीन ट्रेलर खरेदीकामी मे.अनिल फॅब्रीकेटर्स, साकुरी यांचे रु.१,०५,०००/- (सर्व करांसह) मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देणेत यावा, अशी शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वाहन विभागप्रमुख)

---

२२ **नवीन टाटा ४०७ वाहन खरेदी करणेकामी प्राप्त कोटेशन्स उघडून चर्चा/ वाटाघाटीअंती निर्णय होणेबाबत.**

दि.१४/११/२०१३ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार, शिरडी पोलीस स्टेशन, शिरडी यांचे मागणीनुसार, नो पार्किंग झोन मधील मोटारसायकली उचलणेसाठी एक नवीन टाटा४०७ वाहन खरेदी कामी टाटा कंपनीचे अधिकृत डिलर यांचेकडून कोटेशन बोलावुन खरेदी करणेस व या कामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

वरील निर्णयानुसार, खालील प्रमाणे टाटा-४०७ वाहनाकरीता टाटा कंपनीचे अधिकृत डिलर यांचेकडून जा.नं.एसएसएस/वाहन/४००९/२०१३ दि.०७/१२/२०१३ ने कोटेशन बोलाविण्यात आली होती. सदर कोटेशन दि.१४/१२/२०१३ अखेर पोहोचतील अशा प्रकारे पाठविणे बाबत कळविण्यात आले होते. परंतु, अ.नं.०१ व ०२ चे कोटेशन्स मुदतीत प्राप्त झालेली असुन अ.नं.०३ चे कोटेशन उशीरा प्राप्त झालेली आहेत. प्राप्त झालेली कोटेशन्स खालील प्रमाणे-

| अ.नं. | पार्टीचे नांव | आवक नंबर / दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | मे. शुभयान मोटर्स प्रा.लि., अहमदनगर | १५१९०-१४/१२/२०१३ | बंद कोटेशन |
| ०२ | स्टर्लिंग मोटर्स, बाभळेश्वर | १५१९१-१४/१२/२०१३ | बंद कोटेशन |
| ०३ | स्टर्लिंग मोटर्स, नाशिक | १५६०२-२०/१२/२०१३ | बंद कोटेशन |

वरीलप्रमाणे प्राप्त झालेली ०३ बंद कोटेशन्स आजचे उपसमिती सभेपुढे उघडणेत येऊन, कोटेशनधारकांना चर्चा/ वाटाघाटीसाठी समक्ष बोलविणेत आले असता, कोटेशनमध्ये नमुद केलेले दर हे दि.३१.१२.२०१३ अखेर पर्यंत दिलेले असल्याचे कोटेशनधारकांनी सभेस सांगितले. त्यामुळे उपसमिती सभेने कोटेशनधारकांना नवीन दर बंद पाकिटामध्ये देण्यास कळविले, त्यांनी दिलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे-

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव | कोटेशनमधील मुळ दर रु. | नवीन दिलेले दर रु. | चर्चा/ वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रु. |
|---|---|---|---|---|
| ०१. | मे. शुभयान मोटर्स प्रा.लि., अहमदनगर | ७,६४,२७६/- | ८,०७,५१५/- | ७,६१,०००/- |
| ०२. | स्टर्लिंग मोटर्स, बाभळेश्वर | ७,७६,४३५/- | ७,९३,०१०/- | **७,५७,०००/-** |
| ०३. | स्टर्लिंग मोटर्स, नाशिक | ७,९२,२७६/- | अनुपस्थित | अनुपस्थित |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, नवीन टाटा ४०७ वाहन खरेदीकामी मे. स्टर्लिंग मोटर्स, बाभळेश्वर यांचे रु. ७,५७,०००/- (सर्व करांसह) मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देणेत यावा, अशी शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वाहन विभागप्रमुख)

---

**विषय नं.०३** **(अ) नोंद घेण्याचे विषय-**

**०१. श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये माहे सप्टेंबर व ऑक्टोबर- २०१३ मध्ये वैद्यकिय बीलात दिलेल्या सवलतीची नोंद घेणे.**

श्री साईबाबा रुग्णालयात माहे सप्टेंबर व ऑक्टोबर- २०१३ मध्ये वैद्यकीय बीलांमध्ये रु.७२,६५,७७६/- व रु.६३,२४,८२३/- याप्रमाणे देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.०३** **(A) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**०२. श्री साईनाथ रुग्णालयात माहे नोव्हेंबर- २०१३ मध्ये वैद्यकिय बीलात दिलेल्या सवलतीची नोंद घेणे.**

साईनाथ रुग्णालयात माहे नोव्हेंबर- २०१३ मधील अंतररुग्ण व बाह्यरुग्ण तसेच थॅलसेमिया व हिमोफेलिया रुग्णांसाठी रुपये १,९०,७३१/- मात्र रकमेची वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.०३** **(B) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**०३. श्री साईनाथ रुग्णालयात माहे नोव्हेंबर- २०१३ या महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदान मागणी अर्जाबाबत.**

श्रीसाईनाथ रुग्णालयामध्ये माहे नोव्हेंबर- २०१३ मधील रु.४२,१९,८२५/- मात्र देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदान तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.०३** **(C) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**०४. श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये अपोलो फार्मसी यांना चालविण्यास दिलेल्या मेडिकल स्टोअर्सचे व्यवहारात माहे सप्टेबर व ऑक्टोबर- २०१३ मध्ये झालेल्या उत्पन्नाची नोंद घेणे.**

श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये मे.अपोलो फार्मसी, एंटरप्राईजेस लि.,चेन्नई यांना ना नफा ना तोटा तत्वावर चालविण्यास दिलेल्या मेडिकल स्टोअर्स पोटी अनुक्रमे माहे सप्टेबर व ऑक्टोबर- २०१३ मध्ये रुपये ६,११,६९५/- व रु.५,३६,६५४/- मात्र याप्रमाणे देणगीचे चेक प्राप्त झाले आहेत.

**निर्णय क्र.०३** **(D) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**०५. श्री साईनाथ रुग्णालयात अपोलो फार्मसी यांना चालविण्यास दिलेल्या मेडिकल स्टोअर्सचे व्यवहारात माहे सप्टेबर व ऑक्टोबर- २०१३ मध्ये झालेल्या उत्पन्नाची नोंद घेणे.**

श्री साईनाथ हॉस्पिटलमध्ये मे.अपोलो फार्मसी, एंटरप्राईजेस लि.,चेन्नई यांना ना नफा ना तोटा तत्वावर चालविण्यास दिलेल्या मेडिकल स्टोअर्स पोटी अनुक्रमे माहे सप्टेबर व ऑक्टोबर- २०१३ मध्ये रु.५५,००४/- व रु.७८,४१७/- मात्र याप्रमाणे देणगीचे चेक प्राप्त झाले आहेत.

**निर्णय क्र.०३** **(E) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**०६. माहे नोव्हेंबर- २०१३ मध्ये दर्शन रांगेतील साईभक्तांना मोफत लाडू प्रसादाचे वाटपाची नोंद घेणे.**

माहे नोव्हेंबर- २०१३ मध्ये दर्शन रांगेतील साईभक्तांना १६,६०,९५० पाकिटे व त्यासाठी रु.२,१३,७१,२८३/- आलेल्या खर्चाची माहिती दर्शविणारे तक्ते, ज्यांच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.०३** **(F) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- अधिक्षक, कॅन्टीन विभाग)

---

**०७. पाणी तपासणी अहवाल नोव्हेंबर-२०१३**

माहे नोव्हेंबर- २०१३ मध्ये संस्थान पाणीपुरवठा योजने अंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या संस्थानचे परिसरातील पिण्याच्या पाण्याचे नमूने (सॅम्पल्स) मे.एनव्हायरो लॅब, नाशिक यांचेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यांचेकडून आलेले तपासणी अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.०३** **(G) नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं.०४** **संस्थान कर्मचाऱ्यांना गणवेश शिलाईकामी कापड व साड्या खरेदीकामी पात्र निविदाधारकांच्या मुळ निविदा Financial Bid उघडून निविदाधारकांशी दरांबाबत चर्चा वाटाघाटी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६.०२.२०१३ चे सभेतील निर्णय क्र.१८३ अन्वये संस्थान कर्मचाऱ्यांना गणवेश देणेसाठी प्रथमतः ड्रेस डिझाईनरच्या सल्ल्याने कापडाची कंपनी, रंग व कोड नंबर यांची निवड करुन कापड उत्पादक कंपनीकडून/अधिकृत विक्रेत्याकडून विहित पद्धतीने कापड खरेदी करणेत यावे व तद्नंतर फक्त गणवेश शिलाईसाठी कोटेशन मागविणेत येऊन, कर्मचाऱ्यांची मापे घेऊन, गणवेश तयार करणेत यावे, असे ठरले. तसेच उपरोक्तकामी येणाऱ्या रु.२१,३२,३००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

त्यानुसार कापड व साड्या खरेदीकामी दि.२९.१०.२०१३ रोजी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. तसेच दि.३०.१०.१३ पासून www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर निविदा Downloading करिता प्रसिद्ध करण्यात आलेली होती. सदर खरेदीकामी दि.०७.११.१३ रोजी सकाळी ११.०० वा. साईनिवास अतिथीगृह येथील मिटींग कक्षात प्रि-बीड मिटींग आयोजित केलेली होती. सदर मिटींग मा.कार्यकारी अधिकारी सो., मा.प्रशासकीय अधिकारी व खालीलप्रमाणे पुरवठाधारक व त्यांचे प्रतिनिधी यांचे उपस्थित पार पडली.

१. मे.एम.बी.ट्रेडींग कंपनी, नाशिक २. मे.सारडा इंटेरिअर, अहमदनगर

सदर मिटींगचे वेळी प्रशासकीय अधिकारी यांचे गणेवषाचे कापड व स्त्री कर्मचाऱ्यांसाठी आवश्यक साड्या व्यतिरिक्त इतर सर्व कर्मचाऱ्यांचे गणवेषाचे कापड निश्चित करण्यात आले होते. त्याचा तक्ता सोबत जोडलेला आहे. तसेच प्रशासकीय अधिकारी यांचे गणवेशाचे कापड व स्त्री कर्मचारी यांचे साड्यांचे नमुने घेऊन सबंधीत पुरवठाधारकांना दि.१२.११.२०१३ रोजी पुन्हा बोलविण्यात आले होते. त्यानुसार दि.१२.११.२०१३ रोजी मा.कार्यकारी अधिकारी सो., मा.प्रशासकीय अधिकारी, खालीलप्रमाणे पुरवठाधारक व त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

१. मे.सारडा इंटेरिअर, अहमदनगर
२. मे.एम.बी.ट्रेडींग कंपनी, नाशिक
३. मे.राजेंद्र क्लॉथ स्टोअर्स, राहुरी
४. मे.तुलसी एम्पोरिअम, सोनाई

सदर मिटींगमध्ये प्रशासकीय अधिकारी व स्त्री कर्मचारी यांचे गणवेशासाठी आवश्यक कापड व साड्या निश्चित करण्यात आलेले आहेत. दि.०७.११.२०१३ व दि.१२.११.२०१३ रोजी निश्चित केलेल्या कापडांचा तपशिलवार माहिती सोबत जोडलेली आहे. सोबत जोडलेली माहिती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर आय.टी.विभागामार्फत दि.२०.११.२०१३ रोजी प्रसिद्ध करुन सदर खरेदीकामी Download व Uploading करिता दि.२०.११.२०१३ रोजी सायं.०४.०० वा. पासून दि.३०.११.२०१३ रोजी सायं.०५.०० वा. पावेतो ठेवण्यात आली होती. तसेच तांत्रिक लिफाफे प्रत्यक्ष स्विकारण्याची अंतिम दि.३०.११.२०१३ अशी ठेवण्यात आलेली होती.

मात्र दरम्यानचे काळात www.mahatenders.gov.in या संकेतस्थळास काही तांत्रिक अडचणी असल्याने दोन दिवस सदरचे संकेतस्थळावरील सर्व कामकाज बंद होते, त्यामुळे निविदाधारकांना त्यांचे निविदा Download व Uploading करिता पुरेसा कालावधी न मिळाल्यामुळे निविदा Uploading चा कालावधी दि.३०.११.२०१३ ऐवजी दि.०७.१२.२०१३ पर्यंत माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत वाढविण्यात आला. तसेच तांत्रिक लिफाफे प्रत्यक्ष स्विकारण्याची अंतिम दि.०७.१२.२०१३ अशी ठेवण्यात आलेली होती. सदर निविदाधारकांच्या प्रत्यक्ष प्राप्त तांत्रिक निविदा व www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्राप्त तांत्रिक निविदा उघडण्याची दि.११.१२.२०१३ अशी ठेवण्यात आलेली होती.

मुदतीअंती खालील पाच निविदाधारकांचे तांत्रिक लिफाफे व नमुने प्रत्यक्षात प्राप्त झालेले होते.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | आवक नंबर व दिनांक | नमुने |
|---|---|---|---|
| ०१. | मे.सारडा इंटेरिअर, अहमदनगर | १३९९०/२९.११.२०१३ | आहे. |
| ०२. | मे.राजेंद्र क्लॉथ स्टोअर्स, राहुरी | १४०६७/३०.११.२०१३ | आहे. |
| ०३. | मे.एम.बी.ट्रेडींग कंपनी, नाशिक | १४०६८/३०.११.२०१३ | आहे. |
| ०४. | मे.द रमेन्ड शॉप, अहमदनगर | १४०६९/३०.११.२०१३ | आहे. |
| ०५. | मे.तुलसी एम्पोरियम, सोनाई | १४१५४/०२.१२.२०१३ | आहे. |
| ०६. | मे.रामवतार टेक्स कापड दुकान, श्रीरामपुर | १४५५३/०७.१२.२०१३ | आहे. |

उपरोक्त निविदाधारकांच्या प्रत्यक्ष प्राप्त तांत्रिक निविदा व www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्राप्त तांत्रिक निविदा दि.१३.१२.२०१३ रोजी मा.प्रशासकीय अधिकारी/प्र.प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष उघडून त्यातील कागदपत्रांची तपासणी लेखाशाखेमार्फत केलेली आहे. त्याचा तुलनात्मक तक्ता सोबत जोडलेला आहे. त्यातील तपशील सोबतच्या परिशिष्ठामध्ये दर्शविलेला आहे.

१. अ.क्र.४ मे.द रमेन्ड शॉप, अहमदनगर यांनी तांत्रिक लिफाफा सादर केलेला होते. मात्र त्यांची निविदा www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Upload झालेली नव्हती, त्यामुळे त्यांचे निविदाचा विचार केलेला नाही. त्यांचे प्राप्त तांत्रिक लिफाफा उघडलेला नाही.

२. अ.क्र.६ मे.रामवतार टेक्स कापड दुकान, श्रीरामपुर यांनी त्यांचे तांत्रिक लिफाफ्यामध्ये सेल्स टॅक्स/ व्हॅट टिन नंबर, व्हॅट टिन नंबर, कंपनीचे अधिकृत वितरक असलेबाबतचे प्रमाणपत्र जोडलेले नव्हते, तसेच त्यांचे पॅनकार्डही वैयक्तिक आहे, त्यामुळे कागदपत्रांची पुर्तता न केल्यामुळे त्यांची निविदा अपात्र ठरविण्यात आलेली आहे.

३. अ.क्र.५ मे.तुलसी एम्पोरिअम, सोनाई यांनी दुकान नोंदणी दाखला जोडलेला नव्हता, कारण त्यांचे दुकान हे ग्रामपंचायत हद्दीमध्ये असल्याने त्यांना शॉप ॲक्ट लागू नाही, असे त्यांनी कळविलेले आहे, मात्र त्यांना दि.१३.१२.२०१३ रोजी दुरध्वनीद्वारे ग्रामपंचायतीचा दुकान असलेबाबतचा दाखल देण्यास कळविले असता. त्यांनी दि.१३.१२.२०१३ रोजीचा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत सोनई यांचा दुकान असलेबाबतचा दाखला सादर केलेला आहे त्यामुळे त्यांचे निविदाचा विचार करण्यास हरकत नाही.

उर्वरीत ४ निविदाधारकांनी निविदेतील मागणीप्रमाणे कागदपत्रांची पुर्तता केलेली आहे. सदरच्या पात्र निविदाधारकांना दरांबाबत चर्चा वाटाघाटी करणेस मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर आमंत्रित करता येईल.

दि.०७.१२.२०१३ रोजी सायं.०५.०० वा. पावेतो कर्मचारी गणवेश खरेदीकामी प्रत्यक्ष प्राप्त तांत्रिक निविदा व www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्राप्त तांत्रिक निविदा मा.प्रशासकीय अधिकारी/ प्र.प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष दि.१३.१२.२०१३ उघडून त्यातील कागदपत्रांची तपासणी लेखाशाखेमार्फत करण्यात आलेली आहे, एकुण प्राप्त ५ निविदाधारकांपैकी मे.रामवतार टेक्स कापड दुकान, श्रीरामपुर यांची निविदा अपात्र (Reject) करण्यात आलेली आहे.

उपरोक्तप्रमाणे केलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात आली. तसेच उर्वरीत पात्र ४ निविदाधारकांच्या मुळ निविदा Financial Bid आजचे सभेसमोर उघडणेत येऊन, निविदाधारकांना चर्चा/ वाटाघाटीसाठी समक्ष बोलविणेत आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| **Sr. No.** | **Dress/Saree Discripation/ (Company/Brand) Demand (Appro.)** | **M/s Rajendra Cloth Stores, Rahuri** | | **M/s M.B.Trading Co., Nashik** | | **M/s Tulsi Emporium, Sonai** | | **M/s Sarda Interior, Ahmednagar** | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Rate per Meter/Nos.in Tender | Rate per Meter/Nos.in Negotiation | Rate per Meter/Nos.in Tender | Rate per Meter/Nos.in Negotiation | Rate per Meter/Nos.in Tender | Rate per Meter/Nos.in Negotiation | Rate per Meter/Nos.in Tender | Rate per Meter/Nos.in Negotiation |
| **1** | **Dress Discripation** | | | | | | | | |
| **1.1** | Safari Cloth (for AO) (Raymond - Premium Suit lengeths Q.No.3894/017734) 30 Meter | 425.00 | **415.00** | 1350.00 | 1350.00 | 1193.00 | 1193.00 | 1080.00 | 1080.00 |
| **1.2** | Safari Cloth (for HOD & Others) (Raymond - Sapphire Q.No.3041/005884 Shed No.183, Light Steel Gray) 335 Meter | 584.00 | **538.00** | 549.00 | 549.00 | 594.00 | 594.00 | 570.00 | 570.00 |
| **1.3** | Safari Cloth (for Class II & III Employee) (Raymond - Bonanza Q.No.4030/011894 Shed No.99,Light Pista) 1250 Meter | 269.00 | 245.00 | 252.00 | 252.00 | 273.00 | **240.00** | 270.00 | 244.00 |
| **1.4** | Safari Cloth (for Technical Employee) (Raymond - Bonanza Q.No.4030/011894 Shed No.46,Steel Gray) 650 Meter | 269.00 | 245.00 | 252.00 | 252.00 | 273.00 | **240.00** | 270.00 | 244.00 |
| **1.5** | Safari Cloth (for Drivers Employee) (Raymond - Bonanza Q.No.4030/011894 Shed No.45, Light Gray) 200 Meter | 269.00 | 245.00 | 252.00 | 252.00 | 273.00 | **240.00** | 270.00 | 244.00 |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **1.6** | Safari Cloth (for Class IV Employee) (Raymond - Bonanza Q.No.4030/011894 Shed No.69, Light Green) 5700 Meter | 269.00 | 245.00 | 252.00 | 252.00 | 273.00 | **240.00** | 270.00 | 244.00 |
| **1.7** | Safari Cloth (for Ward Boy Employee) (Raymond - Bonanza Q.No.4030/011894 Shed No.1, White Milkey) 180 Meter | 269.00 | 245.00 | 252.00 | 252.00 | 273.00 | **240.00** | 270.00 | 244.00 |
| **1.8** | Safari Cloth (for Security Employee) (Raymond - Bonanza Q.No.4030/011894 Shed No.174, Brown) 900 Meter | 269.00 | 245.00 | 252.00 | 252.00 | 273.00 | **240.00** | 270.00 | 244.00 |
| **1.9** | Safari Cloth (for Sanitation Employee) (Raymond - Trovine Q.No.5030/002824 Shed No.250, Steel Gray) 920 Meter | 212.00 | **190.00** | 198.00 | 198.00 | 217.00 | 217.00 | 220.00 | 220.00 |
| **2** | **Class III & IV Ladies Employee** | | | | | | | | |
| **2.1** | 6 Meter Printed Saree With Blouse Peice (Riddhi Saree, Ketty Chiffon, Dark Navy Blue Colour) 160 Nos. | 450.00 | 450.00 | 468.00 | 468.00 | 465.00 | 465.00 | 520.00 | **440.00** |
| **2.2** | Petticoat (Parkar) Cotton (Riddhi Saree, Ketty Chiffon, Dark Navy Blue Colour) 160 Nos. | 98.00 | **98.00** | 99.00 | 99.00 | 102.00 | 102.00 | 170.00 | 170.00 |
| **2.3** | 8 Meter Printed Saree With Maching Blouse Peice (Vimlon Saree, Suchitra Slub, D.No.2557) 54 Nos. | 490.00 | **490.00** | 621.00 | 621.00 | 505.00 | 505.00 | NA | NA |
| **3** | **Hospital Aaya (White Colour Saree, Blue Border)** | | | | | | | | |
| **3.1** | 6 Meter Printed Saree With Blouse Peice (Vimlon Silk Mills, French Crape White Colour, Blue Border) 152 Nos. | 450.00 | **450.00** | 468.00 | 468.00 | 450.00 | **450.00** | NA | NA |
| **3.2** | Petticoat (Parkar) Cotton (Vimlon Silk Mills, French Crape White Colour, Blue Border) 152 Nos. | 98.00 | **98.00** | 99.00 | 99.00 | 102.00 | 102.00 | NA | NA |
| **3.3** | 8 Meter Saree With Maching Blouse Peice (Vimlon Silk Mills, French Crape White Colour, Blue Border) 30 Nos. | 435.00 | **435.00** | 621.00 | 621.00 | 580.00 | 580.00 | NA | NA |
| **4** | **Ladies Security Employee (Khaki Colour Saree)** | | | | | | | | |
| **4.1** | 6 Meter Khaki Saree With Blouse Peice (Leon Mezor 36, Khaki Colour) 18 Nos. | 340.00 | 340.00 | NA | NA | 360.00 | 360.00 | 290.00 | **290.00** |
| **4.2** | Petticoat (Parkar) Cotton (Leon Mezor 36, Khaki Colour) 18 Nos. | 98.00 | **98.00** | NA | NA | 102.00 | 102.00 | 170.00 | 170.00 |
| **4.3** | 8 Meter Saree With Maching Blouse Peice (Leon Mezor 36, Khaki Colour) 02 Nos. | 510.00 | 510.00 | NA | NA | 460.00 | **460.00** | NA | NA |

**निर्णय क्र.०४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान कर्मचाऱ्यांना गणवेश शिलाईकामी कापड व साड्या खरेदीकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यातील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना कार्यादेश देण्यात यावा. त्याचप्रमाणे उपरोक्त तक्त्यातील अ.नं.३.१ चे खरेदीसाठी मे.राजेंद्र क्लोथस्, राहुरी व मे.तुलसी एम्पोरियम, सोनई यांचे समान निम्नतम दर आहेत, त्यामुळे सदर खरेदीसाठी दोन्ही पुरवठाधारकांना समप्रमाणात पुरवठा आदेश देणेत यावा, असे ठरले व संस्थान कर्मचाऱ्यांना गणवेश शिलाईसाठी कापड/ साड्या खरेदीकामी, तसेच गणवेश शिलाईकामी वाढीव येणाऱ्या रु.२४,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच, याकामी संस्थान वकीलामार्फत अर्ज करणेत येऊन मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक, खरेदी विभाग/ विधी अधिकारी/ सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

**विषय नं.०५** **रबर मोड डोअर मॅट खरेदी करणेकामी आलेले दरपत्रक उघडून न्युनतम दरधारकास पुरवठा आदेश देणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईआश्रम भक्तनिवास विभागातील १५३६ रुमसाठी रबर मोड या प्रतीचे २००० नग खरेदी करणेकामी रु.३,६०,०००/- (अक्षरी रुपये तीन लाख साठ हजार मात्र) चे अपेक्षित खर्चास दिनांक ०८/१०/२०१३ रोजीचे मा. त्रीसदस्य समितीचे सभेत प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

जा.नं. एसएसएस/ वशी- साईआश्रम भक्तनिवास/ ३९८९ /२०१३ दि.०३/१२/२०१३ रोजीचे दरपत्रके मागणीनुसार स्थानिक परिसरातील ०९ डोअर मॅट विक्रेत्यांना दि.१७/१२/२०१३ अखेर पर्यंत दरपत्रके पाठविणेबाबत कळविण्यात आलेले होते. मुदती अखेर खालील तक्त्यात दर्शविले प्रमाणे फक्त ०३ दरपत्रके प्राप्त झालेले आहेत. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| अ.नं. | फर्मचे नाव | प्राप्त दरपत्रक स्थिती | आवक नंबर / दिनांक |
|---|---|---|---|
| ०१ | मे. राहुल रेगझीन हाऊस, श्रीरामपुर | बंद पाकीट | १५३४४ / दि.१७/१२/२०१३ |
| ०२ | मे.आर.के. ट्रेडर्स, श्रीरामपुर | बंद पाकीट | १५३४५ / दि.१७/१२/२०१३ |
| ०३ | मे. श्री साई जनरल्स ॲंड दिपिका लेडीज कॉर्नर, राहाता | बंद पाकीट | १५३४८ / दि.१७/१२/२०१३ |

उपरोक्तप्रमाणे साईआश्रम भक्तनिवास विभागातील १५३६ रुमसाठी २००० नग रबर मोड डोअर मॅट खरेदीकामी विहीत मुदतीत प्राप्त झालेली ०३ दरपत्रके आजचे सभेसमोर उघडणेत आले. त्यामध्ये अ.नं.०३ चे मे. श्री साई जनरल्स ॲंड दिपिका लेडीज कॉर्नर, राहाता यांनी नमुना दिलेला नाही. त्याच्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे-

| अ.नं. | फर्मचे नाव | साईज | दरपत्रकातील दर प्रती नग रु. |
|---|---|---|---|
| ०१ | मे. राहुल रेगझीन हाऊस, श्रीरामपुर | २४"x१६" | **<u>११८/-</u>** |
| ०२ | मे.आर.के. ट्रेडर्स, श्रीरामपुर | २४"x१६" | १३२/- |
| | | १८"x३०" | १८७/- |
| ०३ | मे. श्री साई जनरल्स ॲंड दिपिका लेडीज कॉर्नर, राहाता | २४"x१८"<br>२४"x१८"<br>२४"x१८" | (१) सॉफ्ट टफ कंपनी १६०.५०<br>(२) डयुरो टफ कंपनी १५१.५०<br>(३) डयुरो टफ कंपनी २१७.५० (प्रिमियम) |

**निर्णय क्र.०५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवास विभागातील १५३६ रुमसाठी २००० नग रबर मोड डोअर मॅट खरेदीकामी मे. राहुल रेगझीन हाऊस, श्रीरामपुर यांचे प्रती नग रु.११८/- मात्र हे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास)

---

**विषय नं.०६** **प्लॅस्टिक ट्रे खरेदी करणेकामी आलेले दरपत्रक उघडून न्युनतम दरधारकास पुरवठा आदेश देणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईआश्रम भक्तनिवास विभागातील १५३६ रुमसाठी Cello कंपनीचे Exotica Tray Deluxe Small प्लॅस्टिक ट्रे २००० नग खरेदी करणे कामी रु. ४,००,०००/- (अक्षरी रुपये चार लाख मात्र.) चे अपेक्षित खर्चास दिनांक ०८/१०/२०१३ रोजीचे मा. त्रीसदस्य समितीचे सभेतील निर्णय क्र.७५८ ने प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

जा.नं. एसएसएस/ वशी- साईआश्रम भक्तनिवास/ ३९७९ /२०१३ दि.०५/१२/२०१३ तसेच जा.नं. एसएसएस/ वशी- साईआश्रम भक्तनिवास/ ४०९२ /२०१३ दि.११/१२/२०१३ रोजीचे दरपत्रके मागणी नुसार १० प्लॅस्टिक ट्रे विक्रेत्यांना दि.२०/१२/२०१३ अखेर पर्यंत दरपत्रके पाठविणेबाबत कळविण्यात आलेले होते. मुदती अखेर खालील तक्त्यात दर्शविले प्रमाणे फक्त ०४ दरपत्रके प्राप्त झालेले आहेत. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| अ.नं. | फर्मचे नाव | प्राप्त कोटेशन स्थिती | आवक नंबर / दिनांक |
|---|---|---|---|
| ०१ | Cello Plastotech, मुंबई | बंद पाकीट | १५२९६ / दि.१६/१२/२०१३ |
| ०२ | मे. वासन एजन्सी, नाशिक | बंद पाकीट | १५३४६ / दि.१७/१२/२०१३ |
| ०३ | मे. दिपक एजन्सी, नाशिक | बंद पाकीट | १५३४७ / दि.१७/१२/२०१३ |

| | | | |
|---|---|---|---|
| ०४ | मे. श्री साई जनरल्स ॲंड दिपिका लेडीज कॉर्नर , राहाता | बंद पाकीट | १५३४९ / दि.१७/१२/२०१३ |

उपरोक्तप्रमाणे साईआश्रम भक्तनिवास विभागातील १५३६ रुमसाठी २००० नग Cello कंपनीचे Exotica Tray Deluxe Small प्लॅस्टिक ट्रे खरेदीकामी विहीत मुदतीत प्राप्त झालेली ०४ दरपत्रके आजचे सभेसमोर उघडणेत आली. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे-

| अ.नं. | फर्मचे नाव | दरपत्रकातील दर प्रती नग रु. |
|---|---|---|
| ०१ | Cello Plastotech, मुंबई | **१२९/-** |
| ०२ | मे. वासन एजन्सी, नाशिक | १४५/- |
| ०३ | मे. दिपक एजन्सी, नाशिक | १४० |
| ०४ | मे. श्री साई जनरल्स ॲंड दिपिका लेडीज कॉर्नर , राहाता | १४५/- |

**निर्णय क्र.०६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवास विभागातील १५३६ रुमसाठी २००० नग Cello कंपनीचे Exotica Tray Deluxe Small प्लॅस्टिक ट्रे खरेदी करणेकामी मे. Cello Plastotech, मुंबई यांचे प्रती नग रु.१२९/- मात्र हे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास)

---

**विषय नं.०७** **संस्थानचे नियोजित साईगार्डन प्रकल्पाअंतर्गत लेजर शो उभारणी कामाचे ठेकेदार मे.लेजर व्हिजन लि., हॉंगकॉंग यांचे बीलांबाबत.**

**विषय नं.०८** **संस्थानचे नियोजित साईगार्डन प्रकल्पाअंतर्गत लेजन शो उभारणी कामाचे ठेकेदार मे.लेजर व्हिजन., हॉंगकॉंग यांचे संदर्भात ऑस्ट्रेलियन ट्रेड कमिशन यांनी पाठविलेल्या पत्राबाबत.**

**निर्णय क्र.०७** **विषय नं.०७ व ०८ वरील चर्चा पुढे ढकलणेत आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०९** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या निधीतून शिर्डी शहर एकात्मिका रस्ते विकास योजना प्रकल्प- शिर्डी शहरातील व्दितीय प्राधान्य गटातील रस्ते विकसित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)अधिनियम २००४ चे कलम २१ (२) खालीलप्रमाणे तरतुद आहे.

पोट कलम (१) आणि (१ क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास, अशा शिल्लक रकमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यापेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईल :-

(दोन) स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयींमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगर पंचायतीला सहाय्य करण्यासाठी

**व्यवस्थापन समितीचा ठराव:**

०१. मा. व्यवस्थापन समिती निर्णय क्रमांक ५३८ दिनांक २४ जूलै, २०११

०२. मा. व्यवस्थापन समिती निर्णय क्रमांक ७०६ दिनांक २४ सप्टेंबर, २०११

**प्रस्ताविक:** शिर्डी येथे साईबाबांचे दर्शनासाठी येणारे साईभक्तांची गर्दी दिवसेंदिवस व झपाट्याने वाढत आहे. तसेच शहराचा विस्तारही मोठ्या प्रमाणात झालेला आहे. त्यामुळे शिर्डी शहरातील सध्याच्या सार्वजनिक सोयी सुविधा कमी पडत असल्यामुळे त्यात वाढ करणेची मागणीही साईभक्तांकडून होत आहे. अशा प्रकारच्या सुविधा निर्माण करणेची जबाबदारी स्थानिक प्राधिकरण म्हणून मुख्यत्वे शिर्डी नगरपंचायत व सर्वसाधारणत: जिल्हा प्रशासनाची आहे. तथापि, शिर्डी नगरपंचायत या मोठ्या पायाभूत विकास कामांसाठी आवश्यक असणारी मोठ्या प्रमाणातील अर्थिक गुंतवणूक करणेस सक्षम नाही. करीता सदरच्या सार्वजनिक सोयी सुविधा उपलब्ध करुन देणेची जबाबदारी निदान बहुसंख्येने येत असलेले साईभक्तांचे सुविधेसाठी संस्थानने करावी अशी साईभक्तांची अपेक्षा आहे. यासर्व बाबी व वस्तूस्थितीचा साकल्याने विचार करता शिर्डी नगरातील सार्वजनिक सोयी सुविधामध्ये साईभक्त हा केंद्रबिंदु माणून त्यांच्या उपयोगासाठी आवश्यक ती विकास कामे संस्थानमार्फत नगरपंचायतीशी समन्वय साधून करणेत येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून प्रथम प्राधान्य गटातील व साईभक्तांचे दैनंदिन वाहतूकीचे दृष्टीने महत्वाच्या असणाऱ्या ११ रस्त्यांची अंदाजे रुपये ८८ कोटी इतक्या रकमेचे रस्ते संस्थान निधीतून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ व संस्थानमार्फत विकसीत करणेत येत आहेत.

शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडील दिनांक १० जुन, २०११ व दि. १६ जूलै, २०११ रोजीचे विनंती पत्रावरुन मा. व्यवस्थापन समितीने शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्पांतर्गत द्वितीय प्राधान्यगटातील २४ रस्त्यांचे विकसन करणेकामी बांधकाम आराखडे व अंदाजपत्रक तयार

करणेसाठी याप्रकल्पाकरीता सल्लागार यांची नेमणूक करणे, सदरचे २४ रस्ते संस्थान निधीतून हाती घेणेकामी अंदाजे रुपये भूसंपादनासाठी रु.४३.७३ व रस्ते विकसीत करणेसाठी अंदाजे रु. ८२.७३ असा एकूण १२६.०१ कोटी मात्र इतका निधी उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २४ जुलै, २०११ चे सभेत सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्रमांक ५३८ अन्वये खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

".. यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावास मान्यता देणेत आली. तसेच नगर-मनमाड रस्त्याचे पश्चिम बाजूने जाणाऱ्या ४५ मीटर बायपास रस्त्याचा (४ कि.मी. लांबीचा) व पिंपळवाडी रस्ता ५६५ मी. ऐवजी १ कि.मी. पर्यंत समावेश करुन, प्रस्ताव शासन मान्यतेसाठी पाठविणेस मान्यता देणेत आली. "

तद्नंतर, मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २४ सप्टेंबर, २०११ सभेतील निर्णय क्रमांक ७०६ खालील प्रमाणे झालेला आहे.

".. भू-संपादनाची आवश्यकता नसलेल्या १७ रस्त्यांचे नकाशे व अंदाजपत्रके युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट सर्व्हिसेस प्रा.लि., पुणे यांचेमार्फत तयार करुन शासनाचे विधी व न्याय विभागाचे मान्यतेसाठी सादर करणेत यावेत. दरम्यान निविदा मागविण्याची कार्यवाही सत्वर करणेत यावी. युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट सर्व्हिसेस प्रा.लि., पुणे यांची याकामी २.५०% अधिक सर्व्हिस टॅक्स इतक्या फि वर सल्लागार म्हणून नेमणूक करणेत यावी. तसेच भू-संपादनासाठी आवश्यक असलेल्या रस्त्याचे मोजणीकामी शिर्डी नगरपंचायतीस मोजणी फी संस्थानतर्फे अदा करणेत यावी. याकामी अधिनियमातील तरतूदीनुसार शासनाचे विधी व न्याय विभागाची मान्यता घेण्यता यावी, असे ठरले."

उपरोक्त प्रमाणेचे मान्यतेनुसार इकडील जा.नं. एसएसएसटी-बांधकाम /३५५९/२०११ दि.०७ ऑक्टोबर, २०११ रोजीचे प्रस्तावान्वये २४ रस्त्यांपैकी भूसंपादनाची आवश्यकता नसलेले १७ रस्त्याचे विकसनासाठी अंदाजे रु. ३५ कोटी निधी उपलब्ध करून देणेस व सदर रस्ते संस्थानच्या माध्यमातून थेट विकसित करणेस मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचेकडे सादर करणेत आला आहे. तसेच उर्वरीत ७ रस्त्यांपैकी सहा रस्त्यांचे भूसंपादन व विकसन खर्चासाठी रुपये १०१.०१ कोटी रकमेचे खर्चास मान्यता मिळणेकामी प्राथमिक प्रस्ताव विधी व न्याय विभागाचे मान्यतेसाठी इकडील जा.क्र. १००/२०१२ दि. ०७/०४/२०१२ अन्वये सादर करणेत आलेला आहे.

दरम्यानचे कालावधील व्दितीय प्राधान्य गटातील भूसंपादन नसलेले १७ रस्ते विकसीत करणेकामी नोव्हेंबर,२०११ मध्ये विहीत पध्दतीने निविदा मागविणेत आल्या होत्या. प्राप्त झालेल्या निविदा उघडणेबाबत मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १९ फेब्रुवारी, २०१२ रोजीचे सभेत सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्र. १७३ (५) अन्वये ठरलेनुसार सदरची निविदा प्रक्रीया रद्द करणेत आली आहे.

सदर प्रस्तावाचे अनुषंगाने इकडील दि.१६/०४/२०१३ व दि.१२/०८/२०१३ रोजीचे पत्रान्वये भूसंपादन व इतर अनुषंगिक खर्चासाठी रुपये १०१.०१ कोटी रक्कम संस्थान निधीतुन नगरपंचायतीचे मागणीनुसार टप्प्याटप्प्याने अदा करणेस मान्यता मिळणेकामी शासनाचे विधी व न्याय विभागास विनंती करण्यात आली आहे.

याबाबत मा. शासनाने जा.क्र. सासंवि-२०११/५१४/प्र.क्र.७४ का. सोळा दिनांक २१ ऑगस्ट, २०१३ रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविले आहे.

| शासन पत्रातील मुद्दे | कार्यालयीन टिपणी वजा माहिती |
|---|---|
| शिर्डी नगरपंचायतीने प्रस्तावित केलेल्या २४ रस्त्यांचे कामाचा व्दितीय प्राधान्य गटात समावेश करण्यात येवून सदर रस्त्याच्या कामावरील सर्व खर्च संस्थान निधितून करावयाचे प्रस्तावित केले आहे. | अ) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील २१ (दोन) खालील प्रमाणे आहे.<br>पोट कलम (१) आणि (१ ) मध्ये निर्दिष्ट प्रयोजनासाठी पुरेशी तरतुद केल्यानंतर विश्वस्तव्यवस्थेच्या वितरण योग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्या पेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही पुढील प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईल.<br>" (दोन) स्थानिक नागरी सेवा व सुविधा रस्त्यांमध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयीमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीला सहाय्य करण्यासाठी. " |
| | ब) शिर्डी विकास आराखडा दिनांक १५ डिसेंबर, १९९२ रोजी मंजूर झालेला आहे. व्दितीय प्राधान्य गटातील २४ रस्ते हे शिर्डी विकास आराखड्यात समाविष्ट आहेत.<br>क) या विकास आराखड्यातील सहा रस्त्यांचे भूसंपादनाचा प्रस्ताव मा. मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस सादर केलेले आहेत. सदर रस्त्याची मोजणी देखील झालेली आहे. मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचेकडे भूसंपादनाची प्रकरण चालू आहेत. |

| | |
|---|---|
| | भूसंपादन कायदा १८९४ चे कलम ६ ची अधिसूचना निघावयाची आहे. सदर अधिसूचना काढणेपूर्वी भूसंपादन संस्थेकडे (शिर्डी नगरपंचायत, शिर्डी) मा. उपविभागीय अधिकारी यांनी रक्कम मागणी केलेली आहे.<br>मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १९ ऑगस्ट, २००६ रोजीच्या सभेत निर्णय क्रमांक ६७८ अन्वये प्रथम, व्दितीय व तृतीय गटातील रस्ते करणेबाबत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, पुणे यांचेशी करार करणेस मान्यता देणेत आली. |
| सन २०१८ मध्ये श्री साईंचे शतक महोत्सवी पुण्यतिथी वर्ष असल्याने, मोठ्या प्रमाणावर साईभक्त शिर्डी येथे येण्याची शक्यता असल्याने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी नगरपंचायत तसेच शासनाचे नगर विभाग, सार्वजनिक व इतर संबंधित विभाग मिळून एकत्रितरित्या कृती आराखडा तयार करुन त्याची प्रभावी अमंलबजावणी होणे आवश्यक आहे. संस्थानने प्राथमिक आराखडा शासनास सादर केला असून, त्यातील बाबी व अन्य आवश्यक बाबी विचारात घेवून शिर्डी येथील संभाव्य गर्दी व त्यासाठी पायाभूत सुविधा निर्माण करण्याची गरज तपासून अंतिम कृती आराखडा तयार करणे आवश्यक आहे. अंतिम कृती आराखडा तयार करण्यासाठी व यासाठी केंद्र शासन व राज्य शासनाला निधी उपलब्ध करुन घेण्यासाठी वित्त, महसुल, नगर विकास, सार्वजनिक बांधकाम, उर्जा, पाणी पुरवठा, स्वच्छता व परिवहन विभाग इत्यादी विभागांचा संबंधितांचा समावेश असलेली समिती नियुक्त करण्याचे प्रस्तावित आहे. | श्री साईंचे शतक महोत्सवी पुण्यतिथी वर्ष सन २०१८ साठी फक्त ५ वर्षाचा अवधी आहे.<br>महाराष्ट्र राज्याच्या नगर विकास खात्याने शिर्डी विकास खात्याने शिर्डी विकास आराखडा तयार केला आहे. तो करतांना श्री साईभक्तांच्या वाढीव गर्दीचा त्यांनी विचार केलेला आहे. त्याप्रमाणे विकास आराखड्यात रस्ते प्रस्तावित केलेले आहे. सदर रस्त्याची भूसंपादनाची प्रकरणे चालू आहेत. भूसंपादनाची प्रक्रीया पूर्ण होण्यास कमीत कमी तीन वर्षाचा कालावधी लागणार आहे. शासन याबाबत समिती स्थापन करणार आहे. नगर पंचायतीला रस्त्याच्या जागा भूसंपादीत होऊन मिळाल्या नाही तर रस्त्याची कामे ५ वर्षाच्या अल्पावधीत होणे शक्य होणार नाही.<br>शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांच्या ताब्यात रस्त्यांची जागा प्रत्यक्ष ताब्यात आल्यावर ते तयार करणेसाठी अर्थिक मदत महाराष्ट्र शासन अथवा केंद्र शासनाकडे मागणे व ती मिळवणे उचित राहील.<br>शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडील दि. १६ जूलै, २०११ रोजीचे विनंती पत्रावरुन मा. व्यवस्थापन समितीने शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्पांतर्गत द्वितीय प्राधान्यगटातील २३ रस्त्यांचे विकसन करणेकामी अंदाजे रुपये भूसंपादनासाठी रु.४३.७२५ व रस्ते विकसीत करणेसाठी अंदाजे रु. ८२.३७५ असा एकूण १२६.१० कोटी मात्र इतका निधी उपलब्ध करुन देणेबाबतचे प्रस्तावावर मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २४ जुलै, २०११ चे सभेत निर्णय क्रमांक ५३८ अन्वये खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.<br>".. यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावास मान्यता देणेत आली. तसेच नगर-मनमाड रस्त्याचे पश्चिम बाजूने जाणाऱ्या ४५ मीटर बायपास रस्त्याचा (४ कि.मी. लांबीचा) व पिंपळवाडी रस्ता ५६५ मी. ऐवजी १ कि.मी. पर्यंत समावेश करुन, प्रस्ताव शासन मान्यतेसाठी पाठविणेस मान्यता देणेत आली. "<br>उपरोक्त प्रमाणेचे मान्यतेनुसार इकडील जा.नं. एसएसएसटी-बांधकाम/३५५९/२०११ दि.०७ ऑक्टोबर, २०११ रोजीचे प्रस्तावान्वये २४ रस्त्यांपैकी भूसंपादनाची आवश्यकता नसलेले १७ रस्त्याचे विकसनासाठी अंदाजे रु. ३५ कोटी निधी उपलब्ध करून देणेस व सदर रस्ते संस्थानच्या माध्यमातून थेट विकसित करणेस मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचेकडे सादर करणेत आला आहे.<br>तसेच उर्वरीत ७ रस्त्यांपैकी सहा रस्त्यांचे भूसंपादन व विकसन खर्चासाठी रुपये १०१.०१ कोटी रकमेचे खर्चास मान्यता मिळणेकामी प्राथमिक प्रस्ताव विधी व न्याय विभागाचे मान्यतेसाठी इकडील जा.क्र. १००/२०१२ दि. ०७/०४/२०१२ अन्वये सादर करणेत आलेला आहे. उपरोक्तप्रमाणे २३ रस्त्यांचे विकसन, भूसंपादन व इतर अनुषंगिक खर्चासाठी रुपये १३६.०१ कोटी रक्कम संस्थान निधीतुन टप्प्याटप्प्याने अदा करणेस मान्यता मिळणेकामी शासनाचे विधी व न्याय विभागास विनंती करण्यात आली आहे. त्यापैकी भूसंपादनाने मिळणाऱ्या सहा रस्त्यांसाठी रक्कम रुपये ३७,२५,५२,४९५/- देणेबाबत शासनाला विनंती करणे उचित राहील. |

| | |
|---|---|
| शिर्डी येथे भविष्यातील होणारी गर्दी, तसेच सन २०१८ मध्ये श्री साईंचे शतकमहोत्सवी पुण्यतिथी वर्ष असल्याने शिर्डी येथे पायाभूत सुविधा/ विकास कामे हाती घेण्यासाठी संबंधित सर्व विभागांचा एकत्रित कृती आराखडा तयार करतानां संस्थानने भविष्यातील भक्तांची होणारी गर्दी रस्ता तयार करतांना रस्त्याच्या कडेला पादचारी मार्ग, सांडपाणी व्यवस्था, विद्यूतवाहिन्या जमिनीखालून घेणे व इतर दीर्घकालीन बाबी विचारात घेवून रस्ते कोणत्या दर्जाचे आवश्यक आहे, याबाबतचा सखोल विचार करून प्रस्तावीत करण्यात आलेल्या रस्त्यांच्या कामांचा समावेश त्यामध्ये करावा व अंतिम कृती आराखडा शासनास सादर करावा असे कळविले आहे. | शासनास अंतिम विकास आराखडा लवकरच पाठविण्यात येत आहे. सदर आराखड्यात सदर रस्त्यांचा समावेश करणेत येत आहे. शासन संस्थानचे मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांनी सदर रस्त्यांसाठी रक्कम रुपये ३७,२५,५२,४९५/- भूसंपादन पोटी द्यावयाच्या रकमेची मागणी केलेली आहे. सदरची रक्कम अदा केल्याशिवाय भूसंपादन न झाल्याने रस्त्यांच्या जागेचा ताबा मिळणार नाही. तसेच उर्वरीत रस्त्यांसाठी भूसंपादन हाऊन जागेचा ताबा मिळणेसाठी मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांना द्यावयाची रक्कम व सदर रस्ते विकसनासाठी रक्कम रुपये ९८,७५,४७,५०५/- देणेसाठी शासनाकडे मंजूरी मागणी उचित राहील. |

**विभागाचा अभिप्राय :** उपरोक्त रस्त्यांबाबत संस्थानच्या व्यवस्थापन समितीच्या सभेने यापूर्वीच मान्यता दिलेली आहे. त्याप्रमाणे भुसंपादन कार्यवाही चालू आहे. करीता नव्याने सदर रस्त्यांचा समावेश कृती आराखड्यात करण्याचे कारण नाही असे नम्र मत आहे. त्यानुसार शासनाकडून सदर रस्त्यांचे कामांना मंजूरी मिळाल्यास भक्तांचे व स्थानिक नागरीकांचे सोयीसाठी सत्वर रस्त्यांचे कामे हाती घेता येईल. तरी सदरचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.०८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्षानिमित्त कृती आराखडा तयार करणेस व त्याचे अंमलबजावणीस अजून कालावधी लागणार आहे. उपरोक्त रस्ते हे साईभक्त व स्थानिक नागरीक यांचे सोयीसाठी लवकरात लवकर विकसित करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर रस्त्यांचा समावेश कृती आराखड्यात न करता यापुर्वी शासनास सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता मिळणेसाठी शासनास कळविणेत यावे.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१०** **मौजे निमगांव को-हाळे गट नं.१७२ मधील संस्थानचे साई धर्मशाळा परिसरात साईभक्तांना श्रींची पालखी ठेवणेसाठी शेड तयार करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम, २००४ मधील तरतूदः-** अधिनियमाचे कलम २१ (२) मधील पोटकलम १ च्या खंड (क) अन्वये भक्तांना राहण्याकरीता व वापर करण्याकरीता विश्रामगृहे बांधणे व त्यांची देखभाल करण्याचे प्रयोजनासाठी समितीकडून निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

ग) भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा करणे, अशी तरतूद आहे.

**प्रस्तावना :-** श्री साई धर्मशाळा क्र.२ इमारती दि.१८/०७/२०१३ रोजी पासून साईभक्तांचे वापरासाठी खुली करण्यात आलेली आहे. सदरहू इमारतीचे बांधकाम शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांनी देणगी दाखल केलेले आहे. यामध्ये मुख्य सहा इमारती आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने १९२ मोठे हॉल्स् संडास व बाथरुम, रुम बुकींगसाठी आणि उपूार गृहासाठी स्वतंत्र इमारती इ. व्यवस्था करण्यात आलेली आहे. या व्यतिरिक्त External Services चे काम संस्थानमार्फत करण्यात आलेले आहे. यामध्ये प्रामुख्याने अंतर्गत कॉक्रिट रस्ते, पार्किंग व्यवस्था, साई भक्तांचे विरंगुळ्यासाठी गार्डन, ( Landscape) पिण्याच्या पाण्यासाठी ESR, GSR बाथरुमच्या पाण्यासाठी रिसायकलींग (STP) प्लॅन्ट, जनरेटर रुम इलेक्ट्रीकल सबस्टेशन, गरम पाण्यासाठी सोलर हिटर सिस्टीम आदी सुविधा साईभक्तांना नित्याने पुरविण्यात येतात.

अधिक्षक, श्री साई धर्मशाळा यांनी त्यांचे दि.०७/१०/२०१३ रोजीचे टिपणी अन्वये मा. अध्यक्ष साहेब यांनी खालील प्रमाणे सुचना दिलेल्या असल्याचे इकडील विभागास कळविले आहे.

१.भक्तांनी आणलेल्या श्रींच्या पालख्या ठेवणेसाठी जागा निश्चित करुन शेड तयार करणे.

२. भक्तांना स्वयंपाक तयार करणेसाठी जागा निश्चित करुन शेड तयार करणे.

**प्रस्तावः-** साई आश्रम भाग २ चे A व F या दोन इमारतीचे मधिल मोकळ्या जागेत स्टेज कार्यक्रमाकरीता ओटा तयार करणेत आलेला आहे. सदर स्टेजच्या समोरील मोकळ्या जागेत फ्लोअरींगकरीता रफ शहाबाद फरशी बसविण्यात आलेली आहे. तसेच सदरहू जागेच्या कडेने लॅण्डस्केपींगच्या कामात झाडे लावण्यात आलेली असून भक्तांना बसणेकरीता वीट बांधकामात कठडे बांधण्यात आलेले आहेत. सदरहू जागेवर शेड उभारल्यास भक्तांची बसण्याची, झोपण्याची व पालखी ठेवण्याची व्यवस्था होवू शकते. त्यासाठी सदर ठिकाणी २१ मी.x ३१ मी आकाराचे कलर कोटेड शिट रुफचे शेड केल्यास त्यासाठी प्राथमिक ढोबळ अंदाजानुसार रु.३२ लक्ष मात्र इतका खर्च येईल. याकामी प्रथम साई आश्रम प्रकल्पाचे स्ट्रक्चरल कन्सल्टंट श्री.आर.आर. कुलकर्णी पुणे यांचेकडून प्लॅन व एस्टीमेट तयार करुन घेऊन त्यानुसार वर्तमानपत्रातील जाहिरातीव्दारे निविदा मागविता येतील.

**विभागाचा अभिप्राय/ मतः-** श्री साईधर्मशाळा येथे साईभक्तांना श्रींची पालखी ठेवणेसाठी तसेच साईभक्तांना विश्रांतीसाठी कायमस्वरुपी शेड टाकून व्यवस्था करता येईल. उपरोक्तकामी येणारा खर्च हा रक्कम रु.१० लक्ष मात्र पेक्षा जास्त असल्याने याकामी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाकडे मान्यतेस्तव विधी विभागामार्फत सिव्हील अॅप्लीकेशन दाखल करावे लागेल.

तरी श्री साईधर्मशाळा येथे शेड उभारणेकामी येणारे अंदाजे रु.३२ लक्ष मात्रचे खर्चास व याकामी स्ट्रक्चरल कन्सल्टंट श्री.आर.आर.कुलकर्णी पुणे यांचेकडून सल्ला सेवा घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.०९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच याकामी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांची परवानगी घेऊन पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.११** **श्री साईनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, शिर्डी यांना शाळेत स्वंयपाकगृह बांधणेकामी नाहरकत प्रमाणपत्र देणेबाबत.**

**निर्णय क्र.१०** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१२** **मौजे निमगांव कोऱ्हाळे हद्दीतील चर रस्ता नगर-मनमाड रोड ते गोदावरी उजवा कालवा गट नं.२२१ व २४५ पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधील तरतूदः-**

" १७. (१) राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान प्रथेनुसार धार्मिक विधी पुजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमांन्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे. ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

(२) विशेषकरुन आणि पोट-कलम (१) मधील तरतुदींच्या सर्वसाधारणतेला बाध न आणता समिती-

(झ) सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील."

**मा. व्यवस्थापन समिती निर्णयः-** दि. २७/०४/२०१३ रोजी झालेल्या मा. त्रिसदस्य समितीचे सभेतील निर्णय क्रमांक ३६० अन्वये विषयांकित रस्त्याचे मजबुतीकरणासह डांबरीकरण करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु. ३६,२९,०८०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच सदरहु रस्ता ज्यांच्या आखत्यारित आहे. त्यांची परवानगी घेऊन प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात यावा असे ठरले.

**प्रस्तावनाः-** वर नमूद निर्णयानुसार विषयांकित रस्त्याचे काम संस्थान निधीतुन करणेसाठी मा. कार्यकारी अभियंता, नाशिक पाटबंधारे, विभाग नाशिक यांना जा.नं. १३७३/२०१३ दि. २४/०७/२०१३ चे पत्रान्वये परवानगीची मागणी करण्यात आलेली होती. त्यास अनुसरुन कार्यकारी अभियंता नाशिक पाटबंधारे नाशिक यांनी जा.क्र./ना.पा.वि/प्र.शा-२/७३१०/२०१३ दि. २४/०९/२०१३ चे पत्रान्वये विषयांकित रस्त्याचे कामास एकूण सहा अटिंचे अधिन राहून ना हरकत दाखला दिलेला आहे. सदर दाखल्याची प्रत सोबत आपल्या अवलोकनार्थ जोडली आहे.

मा. कार्यकारी अभियंता नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक यांच्याकडील वर नमूद ना हरकत दाखल्यातील अट क्र. ०५ खालीलप्रमाणे आहे.

" सदर काम जलसंपदा विभागामार्फत या विभागाकडून संस्थान निधीतून डिपॉझीट ठेव तत्वावर करण्यात येईल. यासाठीचा निधी संस्थानने या विभागाकडे वर्ग करावा."

सदर अट क्र. ०५ अन्वये नियोजित कामाचे प्लॅन व एस्टिमेट विभागीय कार्यालयास सादर करावे असे उप विभागीय अधिकारी, गोदावरी उजवा तट कालवा राहाता यांनी जा. क्र. ३०६७/ २०१३ दि. २८/१०/२०१३ रोजीचे पत्रान्वये संस्थानला कळविले आहे.

**विभागाचा अभिप्राय/ मत :-** वरील विषयांकित काम जलसंपदा विभागामार्फत नाशिक पाटबंधारे विभागाकडून डिपॉझीट ठेव तत्वावर करावयाचे झाल्यास त्यासाठीचा निधी संस्थानतर्फे सदर विभागाकडे वर्ग करावा लागेल. तथापी यापुर्वी सन २००९ मध्ये सदर रस्त्याचे डांबरीकरणाचे काम संस्थान निधीतून सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांचेमार्फत करणेत आलेले आहे. रस्ते बांधकामासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग हा शासनाचा तज्ञ व सक्षम विभाग आहे. त्यामुळे सदर रस्त्याचे डांबरीकरणाचे नियोजीत काम हे सार्वजनिक बांधकाम विभाग अथवा जलसंपदा विभाग यांचेमार्फत करावयाचे किंवा थेट संस्थानमार्फत करावयाचे याबाबत मा. त्रीसदस्य समितीचे सभेत धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे. म्हणजे त्यानुसार महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग यांची मान्यता व मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांच्या परवानगीने पुढील कार्यवाही करता येईल.

तरी उपरोक्त प्रस्ताव मा. त्रीसदस्य समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर होणेस विनंती.

निर्णय क्र.११ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगांव कोऱ्हाळे हद्दीतील चर रस्ता नगर-मनमाड रोड ते गोदावरी उजवा कालवा गट नं.२२१ व २४५ पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण कोणामार्फत करुन घ्यायचे, याबाबत संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे मार्गदर्शन घेण्यात यावे व त्यानंतर फेरप्रस्ताव सभेपुढे सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

विषय नं.१३ **साईआश्रम भक्तनिवास येथे साईभक्तांकरीता बस वेटींग शेडचे बांधकाम करणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदः-** अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (त्र) अन्वये, "भक्तांच्या निवासासाठी व त्यांच्या उपयोगासाठी विश्रामगृहे बांधणे व त्यांची देखभाल करणे;" अशी तरतूद आहे.

**प्रस्तावनाः-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचे संयुक्त विद्यमाने साई आश्रम भक्तनिवास या प्रकल्पाचे काम पूर्ण झाले आहे. दि.११/०४/२०१३ पासून साई आश्रम भक्तनिवास प्रकल्प साई भक्तांसाठी खुला करणेत आला आहे. सदर ठिकाणी साई भक्तांना मंदिरात दर्शनाकरीता जाणेसाठी मोफत बसव्यवस्था उपलब्ध करण्यात आलेली आहे. सदरहू ठिकाणी भक्तांना बस वेटींगची सोय नसल्याने भक्तांची गैरसोय होत आहे. दि. ३१/१०/२०१३ रोजी शिर्डी येथे आयोजीत मंदिर सुरक्षा आढावा बैठकीमध्ये साई आश्रम भक्तनिवास येथे साई भक्तांचे सोयीसाठी सदर ठिकाणी बस वेटींग शेडची व्यवस्था करणेकामी सूचना करण्यात आलेल्या आहेत.

**प्रस्तावः-** साईआश्रम भक्तनिवास प्रकल्पाचे डी.जी. रुमचे दक्षिणेस असलेल्या व ओ.ए.टीचे उत्तरेकडील असलेले मोकळ्या जागेत सदर बस शेडचे बांधकाम करता येईल असे मत आहे. याकामी प्लिंथ पर्यंत आर.सी.सी. स्ट्रक्चर त्यावर लोखंडी स्ट्रक्चर व छतास मेटा कलर शिट, गृहीत धरण्यात आले आहे. सदरचे ठिकाणी ६०'x२०' या मापाचे एकूण १२०० चौ.फुट क्षेत्रफळ असलेले सुसज्ज शेडचे बांधकाम करता येईल.याकामी चालू दरसुची नुसार अंदाजे रु.०९.७२ लक्ष मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे.

**विभागाचा अभिप्राय/ मतः-** साई आश्रम भक्तनिवास येथे बस वेटींग शेडचे कामासाठी वरीलप्रमाणे एकूण अंदाजे रु.०९.७२ लक्ष मात्र इतका खर्च अपेक्षित आहे, तसेच सदर शेडचे स्ट्रक्चरल डिझाईन साई आश्रम प्रकल्पाचे आर.सी.सी. कन्सल्टंट श्री.आर.आर. कुलकर्णी यांचेकडून करुन घेता येईल असे मत आहे.

तरी वरील विषयांकीत कामासाठी येणारे अंदाजे रु.०९.७२ लक्ष मात्रचे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेस विनंती. तसेच सदर शेडचे डिझाईन साई आश्रम प्रकल्पाचे आर.सी.सी. कन्सल्टंट श्री.आर.आर.कुलकर्णी, पुणे यांचेकडून करुन घेण्यास व वर्तमानपत्रातील जाहिरातीव्दारे निविदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.१२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

विषय नं.१४ **साईआश्रम भक्तनिवास येथे साईभक्तांकरीता उपहारगृहाचे बांधकाम करणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदः-** अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (घ) अन्वये, "भक्तांना जेवण देणे आणि अन्नछत्र चालविणे," अशी तरतूद आहे.

**प्रस्तावनाः-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचे संयुक्त

विद्यमाने साई आश्रम भक्तनिवास या प्रकल्पाचे काम पूर्ण झाले आहे. दि.११/०४/२०१३ पासून साई आश्रम भाग-०१ हा प्रकल्प साई भक्तांसाठी खुला करणेत आलेला आहे. सदर ठिकाणी आर ब्लॉक इमारतीचे पहिल्या माळ्यावर प्रसाद भोजन व्यवस्था करण्यात आलेली आहे. तथापी सदरहू ठिकाणी साईभक्तांना सकाळी व सांयकाळी चहा/नाष्ट्याची व्यवस्था नसल्याने साईभक्तांची गैरसोय होत आहे. मा. अध्यक्ष सो़ा, मा. कार्यकारी अधिकारी सो़ा., मा. प्रशासकीय अधिकारी सो़ा., मा. उपकार्यकारी अभियंता सो़ा., यांनी दि.२०/११/२०१३ रोजी साईआश्रम भक्तनिवास परिसराची पहाणी केली त्यावेळी सदरहू ठिकाणी कॅन्टीनची व्यवस्था करणेकामी मा. अध्यक्ष सो़ा यांनी सूचना केल्या आहेत.

**प्रस्तावः-** साईआश्रम भक्तनिवास परिसर हा विस्तिर्ण स्वरुपाचा आहे. तसेच निवास क्षमता मोठ्या स्वरुपाची आहे. त्यामुळे साहजिकच नियोजीत उपहारगृहाची आसनक्षमता ही त्या प्रमाणात ठेवणे आवश्यक आहे. तथापी एकाच ठिकाणी मोठे उपहारगृह बांधणेऐवजी दोन ठिकाणी तुलनेने छोट्या आकाराची उपहागृहे केल्यास परिसरातील दोन्ही भागातील साईभक्तांना जवळचे अंतरावर उपहारगृहाची सोय उपलब्ध करता येईल. यामुळे एकाच ठिकाणी मोठी जागा अडणार नाही व गर्दीही विभागली जाईल. साईआश्रम भक्तनिवास प्रकल्पाचे जी इमारतीचे पश्चिमेस असलेल्या व एसटीपी प्लॅन्टचे उत्तरेकडील असलेले मोकळ्या जागेत तसेच आय इमारतीचे उत्तरेस असलेल्या पार्किंगचे जागेत असे दोन ठिकाणी कॅन्टीनचे बांधकाम करता येईल. याकामी आर.सी.सी. अथवा लोडबेअरींग स्ट्रक्चर असलेले तसेच छतास मेटा कलर शिट, व्हीट्रीफाईड फ्लोअरींग, किचन मध्ये ग्रेनाईट प्लॅटफार्म, भिंतींना ७ फुटापर्यंत सिरॅमिक टाईल्स लावणे इ.असे सुसज्ज उपहारगृह तयार करता येईल. याकामी येणारे अंदाजे खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| **अ.नं.** | **तपशिल** | **साईज/ परिमाण** | **अंदाजे दर (चौ.फुट)** | **एकूण अंदाजे रक्कम** |
|---|---|---|---|---|
| ०१ | G इमारतीचे पश्चिमेस | ७.५० मीटर x २० मीटर = १५० चौ.मी. (१६१४ चौ.फुट) | रु.१५००/- प्रती चौ.फुट | २४,२१,०००/- |
| ०२ | I इमारतीचे उत्तरेस | ७.५० मीटर x २० मीटर = १५० चौ.मी. (१६१४ चौ.फुट) | रु.१५००/- प्रती चौ.फुट | २४,२१,०००/- |
| | **अंदाजे एकूण रक्कम रु.** | | | **४८,४२,०००/-** |

**विभागाचा अभिप्राय/ मतः-** साई आश्रम भक्तनिवास येथे दोन उपहारगृह तयार करणेसाठी प्राथमिक ढोबळ अंदाजानुसार वरीलप्रमाणे एकूण रु.४८.४२ लक्ष मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. सदर नियोजीत उपहारगृहाचे बांधकाम हे साईआश्रम परिसरास सुसंगत असे होणेकामी साईआश्रम प्रकल्पाचे आर्किटेक्ट डी.ओ. निकम, पुणे यांचेकडून सदरहू उपहारगृहाचे बांधकामाचे आराखडे व सविस्तर अंदाजपत्रक तयार करुन घेता येतिल. तसेच सदर परिसरातील आर ब्लॉक इमारतीत पहिल्या मजल्यावर असलेल्या प्रसाद भोजन व्यवस्थेचे किचन अद्ययावत करणेसाठी संस्थानतर्फे अलिकडेच मेकॅनिकल विभागामार्फत एचसीटीएस इंटरनॅशनल, मुंबई यांची किचन सल्लागार म्हणून नेमणूक केलेली असल्याचे समजते. वर नमूद नियोजीत उपहारगृहांचे संकल्पन करणेसाठीही त्यांचा सल्ला घेता येईल.

मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी पी.आय.एल. नं.१८/२०११ मधिल सिव्हिल ॲप्लीकेशन नं.१२०५६/२०१२ वर दि.१६/१०/२०१२ रोजी दिलेल्या आदेशानुसार सदरहू प्रकल्प हा मोठ्या खर्चाचा असल्याने त्यासाठी प्रथम मा.त्रीसदस्य समितीची मान्यता घेऊन मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांची परवानगी घेणे आवश्यक आहे.

तरी वरील विषयांकीत कामासाठी प्राथमिक ढोबळ अंदाजानुसार येणारे अंदाजे रु.४८.४२ लक्ष मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती. तसेच सदर कामासाठी आर्किटेक्ट डी.ओ. निकम यांची नेमणूक करुन त्यांचेकडून नियोजीत बांधकामाचे प्लॅन, एस्टीमेट तयार करुन घेणेस, तसेच त्यासाठी एचसीटीएस इंटरनॅशनल, मुंबई यांचाही सल्ला घेणेस व या कामासाठी परवानगी मिळणेकामी मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लिकेशन दाखल करणेसाठी मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.१३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.१५** **श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस. ओ.टी.०१ करीता Shadowless Lamp खरेदी व जुना Shadowless Lamp Buyback करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुदः-** १७ (२) ण

**प्रस्ताविकः-** श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस ओ.टी- १ करिता शस्त्रक्रिया करणेकामी ०१ नग Shadowless Lamp (LED) आहे. सदर Shadowless Lamp हा सन २००५ मध्ये रु.२०,४२,४७०/- इतक्या रुपयात खरेदी केलेला आहे. सध्या सदर Shadowless Lamp हा

व्यवस्थित चालत नाही. मागील एक वर्षात सी.व्ही.टी.एस ओ.टी- १ मध्ये एकुण ८७६ शस्त्रक्रिया झालेल्या आहेत. त्यामुळे सदर Shadowless Lamp वर कामाचा अतिरिक्त भार पडल्यामुळे सदर Shadowless Lamp ची प्रखरता कमी झालेली आहे व त्याचा दुरुस्तीचा खर्च हा फार जास्त आहे त्यामुळे सदर Shadowless Lamp परत (Buyback) करणे योग्य राहील अशी शिफारस बायोमेडीकल विभागाने त्यांचे मागणी पत्रकावर केलेली आहे. जुने Shadowless Lamp ची घसारा वजा जाता दि.३१/०३/२०१३ अखेर किंमत रु. ३०१५०४/- इतकी आहे. तर सदर ०१ नग Shadowless Lamp खरेदीकामी अदांजे रक्कम रु.९,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

**मागणी:-** सध्या त्यांच्याकडे असलेला Shadowless Lamp हा सन २००५ मध्ये खरेदी केलेली असून तो सध्या व्यवस्थित काम करत नाही. त्यामुळे त्यांनी दि.०५/०६/२०१३ रोजी नवीन ०१ नग Shadowless Lamp ची मागणी केलेली आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येतात.

१. सदर मशिनची घसारा वजा जाता दि.३१/०३/२०१३ अखेर रु.३०१५०४/- इतकी आहे. सदरची रक्कम ही रु. ५००००/- पेक्षा जास्त असल्यामुळे संस्थान अधिनियम २००४ मधील कलम नं. १७(४) अन्वये खरेदीपुर्वी शासनाची पुर्व मान्यता घ्यावी लागणार आहे.

२. सदर प्रस्तावास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेऊन शासनास प्रस्ताव सादर करता येईल.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत:-** सी.व्ही.टी.एस ओ.टी - १ विभागात दैनंदिन शस्त्रक्रिया करतांनी अडचणी येऊ नये म्हणून वरील मागणी प्रमाणे ०१ नग Shadowless Lamp शासनाची मान्यता आल्यानंतर विहीत पध्दतीने निविदा मागवून खरेदी करता येईल.

तरी सदर प्रस्तावास मान्यता असावी.

निर्णय क्र.१४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस. ओ.टी.०१ करीता आवश्यक असलेला Shadowless Lamp वर्तमानपत्रात जाहिरात देऊन विहीत पध्दतीने खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच, श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस. ओ.टी.०१ मधील जुना Shadowless Lamp Buyback करणेचा प्रस्ताव रद्द करणेत येऊन, सदरचा Shadowless Lamp इतर ऑपरेशन थिएटरमध्ये वापरण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

विषय नं.१६ **सन २०१२-१३ मधील वार्षीक खरेदीमधील मंजूर दराने औषधे, सर्जिकल, लॅबोरेटरी साहित्य अतिरिक्त खरेदीबाबत.**

प्रस्ताव- अ) **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:-** मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२५/०८/२०१२ निर्णय क्रमांक ७२० Clause No.६ अन्वये मागणी केलेल्या औषधांच्या साठ्यापैकी काही औषधांची अतिरिक्त मागणी करावयाची असल्यास ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने खरेदी करुन रु. २५,०००/- पेक्षा अधिक रक्कमेच्या औषधांची मागणी करावयाची झाल्यास दैनंदिन कामाची गैरसोय होऊ नये, म्हणून ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मंजुरीने खरेदी करुन केवळ नोंद घेण्यासाठी / माहितीस्तव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावे, असे ठरले आहे.

**प्रस्ताविक :-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात दैनंदिन वापरासाठी लागणाऱ्या औषधे, सर्जिकल व कन्झूमेबल साहित्याकरीता सन २०१२-२०१३ या वर्षाकरीता वार्षिक निविदेतील मंजूर दराने एकुण ११७ पुरवठा धारकांना एकुण रक्कम रु. २४,९२,४८,०३०/- चे दि.२६/११/२०१२ रोजी पुरवठा आदेश देण्यात आलेले आहे.

त्यानुसार पुरवठा आदेशाप्रमाणे मालाचा पुरवठा चालू आहे तर त्यातील काही मालाचा पुरवठा पुर्ण झालेला आहे. त्यापैकी सध्या सोबतच्या यादीतील औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्यापैकी काही आयटमचा औषध भांडारात साठा शिल्लक नाही. सदरचे औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्य दैनंदिन वापरासाठी आवश्यक आहे. तसेच दोन्ही रुग्णालयात राजीव गांधी जीवनदायी योजना कार्यान्वित झालेली आहे. सदर योजनेअंतर्गत होणाऱ्या शस्त्रक्रिया व उपचार चालु असताना पुर्ण बरा होऊन डिसचार्ज दिल्यानंतर १० दिवसांची औषधे मोफत दयावी लागतात त्यामुळे औषधांचा खप हा वाढलेला आहे, त्यामुळे जसाजसा खप वाढेल व जशी जशी लागेल तशी तशी औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्य खरेदी करावी लागणार आहेत.

सदर औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी साहित्य वार्षिक मंजुर दरानुसार वेगवेगळ्या मंजूर पुरवठा धारकांकडून सदरचे खरेदीकामी पुर्णांकित रक्कम रु. ९,५०,४००/- इतका खर्च येणार आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच अर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमानः-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२(ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल. त्यासाठी संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालये चालविण्यात येते. सदर रुग्णालयकरिता औषधे / सर्जिकल / लॅबोरॅटरी साहित्य खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मतः-** रुग्णांची वाढती संख्या व राजीव गांधी योजने अंतर्गत उपचार घेणारे रुग्णांकरीता खरेदी करणे आवश्यक आहे.

तरी सदरचे खरेदीकामी येणाऱ्या पुर्णांकित रक्कम रु. ९,५०,४००/- चे खर्चाची नोंद घेण्यासाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.१५ अ) यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची व खर्चाची नोंद घेणेत आली.**

---

**ब )** व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:- मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२५/०८/२०१२ निर्णय क्रमांक ७२० Clause No.६ अन्वये मागणी केलेल्या औषधांच्या साठ्यापैकी काही औषधांची अतिरिक्त मागणी करावयाची असल्यास ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने खरेदी करुन रु. २५,०००/- पेक्षा अधिक रक्कमेच्या औषधांची मागणी करावयाची झाल्यास दैनंदिन कामाची गैरसोय होऊ नये, म्हणून ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मंजुरीने खरेदी करुन केवळ नोंद घेण्यासाठी / माहितीस्तव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावे, असे ठरले आहे.

**प्रस्ताविकः-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात दैनंदिन वापरासाठी लागणाऱ्या औषधे, सर्जिकल व कन्झूमेबल साहित्याकरीता सन २०१२-२०१३ या वर्षाकरीता वार्षिक निविदेतील मंजूर दराने एकुण ११७ पुरवठा धारकांना एकुण रक्कम रु. २४,९२,४८,०३०/- चे दि.२६/११/२०१२ रोजी पुरवठा आदेश देण्यात आलेले आहे.

त्यानुसार पुरवठा आदेशाप्रमाणे मालाचा पुरवठा चालू आहे तर त्यातील काही मालाचा पुरवठा पुर्ण झालेला आहे. त्यापैकी सध्या सोबतच्या यादीतील औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्यापैकी काही आयटमचा औषध भांडारात साठा शिल्लक नाही. सदरचे औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्य दैनंदिन वापरासाठी आवश्यक आहे. तसेच दोन्ही रुग्णालयात राजीव गांधी जीवनदायी योजना कार्यान्वित झालेली आहे. सदर योजनेअंतर्गत होणाऱ्या शस्त्रक्रिया व उपचार चालु असताना पुर्ण बरा होऊन डिसचार्ज दिल्यानंतर १० दिवसांची औषधे मोफत दयावी लागतात त्यामुळे औषधांचा खप हा वाढलेला आहे, त्यामुळे जसाजसा खप वाढेल व जशी जशी लागेल तशी तशी औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्य खरेदी करावी लागणार आहेत.

सदर औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी साहित्य वार्षिक मंजुर दरानुसार वेगवेगळ्या मंजूर पुरवठा धारकांकडून सदरचे खरेदीकामी पुर्णांकित रक्कम रु. ९९१५८४.४४ इतका खर्च येणार आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच अर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमानः-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२(ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल. त्यासाठी संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालये चालविण्यात येते. सदर रुग्णालयकरिता औषधे / सर्जिकल/ लॅबोरॅटरी साहित्य खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत :-** रुग्णांची वाढती संख्या व राजीव गांधी योजने अंतर्गत उपचार घेणारे रुग्णांकरीता खरेदी करणे आवश्यक आहे.

तरी सदरचे खरेदीकामी येणाऱ्या पुर्णांकित रक्कम रु.९,९१,५८४/- चे खर्चाची नोंद घेण्यासाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.१५ ब) यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची व खर्चाची नोंद घेणेत आली.**

---

**क)** व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :- मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२५/०८/२०१२ निर्णय क्रमांक ७२० Clause No.६ अन्वये मागणी केलेल्या औषधांच्या साठ्यापैकी काही औषधांची अतिरिक्त मागणी करावयाची असल्यास ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने खरेदी करुन रु. २५,०००/- पेक्षा अधिक रक्कमेच्या औषधांची मागणी करावयाची झाल्यास दैनंदिन कामाची गैरसोय होऊ नये, म्हणून ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मंजुरीने खरेदी करुन केवळ नोंद घेण्यासाठी / माहितीस्तव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावे, असे ठरले आहे.

**प्रस्ताविकः-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात दैनंदिन वापरासाठी लागणाऱ्या औषधे, सर्जिकल व कन्झूमेबल साहित्याकरीता सन २०१२-२०१३ या वर्षाकरीता वार्षिक निविदेतील मंजूर दराने एकुण ११७

पुरवठा धारकांना एकुण रक्कम रु. २४,९२,४८,०३०/- चे दि.२६/११/२०१२ रोजी पुरवठा आदेश देण्यात आलेले आहे.

त्यानुसार पुरवठा आदेशाप्रमाणे मालाचा पुरवठा चालू आहे तर त्यातील काही मालाचा पुरवठा पुर्ण झालेला आहे. त्यापैकी सध्या सोबतच्या यादीतील औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्यापैकी काही आयटमचा औषध भांडारात साठा शिल्लक नाही. सदरचे औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्य दैनंदिन वापरासाठी आवश्यक आहे. तसेच दोन्ही रुग्णालयात राजीव गांधी जीवनदायी योजना कार्यान्वित झालेली आहे. सदर योजनेअंतर्गत होणाऱ्या शस्त्रक्रिया व उपचार चालु असताना पुर्ण बरा होऊन डिसचार्ज दिल्यानंतर १० दिवसांची औषधे मोफत दयावी लागतात त्यामुळे औषधांचा खप हा वाढलेला आहे, त्यामुळे जसाजसा खप वाढेल व जशी जशी लागेल तशी तशी औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्य खरेदी करावी लागणार आहेत.

सदर औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी साहित्य वार्षिक मंजुर दरानुसार वेगवेगळ्या मंजूर पुरवठा धारकांकडून सदरचे खरेदीकामी पुर्णांकित रक्कम रु. ९६०८५०/- इतका खर्च येणार आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छानना, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच अर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमानः-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२(ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल. त्यासाठी संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालये चालविण्यात येते. सदर रुग्णालयकरिता औषधे/ सर्जिकल/ लॅबोरॅटरी साहित्य खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मतः-** रुग्णांची वाढती संख्या व राजीव गांधी योजने अंतर्गत उपचार घेणारे रुग्णांकरीता खरेदी करणे आवश्यक आहे.

तरी सदरचे खरेदीकामी येणाऱ्या पुर्णांकित रक्कम रु.९,६०,८५०/- चे खर्चाची नोंद घेण्यासाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.१५ क) यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची व खर्चाची नोंद घेणेत आली.**

---

ड) व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:- मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२५/०८/२०१२ निर्णय क्रमांक ७२० Clause No.६ अन्वये मागणी केलेल्या औषधांच्या साठ्यापैकी काही औषधांची अतिरिक्त मागणी करावयाची असल्यास ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने खरेदी करुन रु. २५,०००/- पेक्षा अधिक रक्कमेच्या औषधांची मागणी करावयाची झाल्यास दैनंदिन कामाची गैरसोय होऊ नये, म्हणून ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मंजुरीने खरेदी करुन केवळ नोंद घेण्यासाठी / माहितीस्तव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावे, असे ठरले आहे.

**प्रस्ताविकः-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात दैनंदिन वापरासाठी लागणाऱ्या औषधे, सर्जिकल व कन्झूमेबल साहित्याकरीता सन २०१२-२०१३ या वर्षाकरीता वार्षिक निविदेतील मंजूर दराने एकुण ११७ पुरवठा धारकांना एकुण रक्कम रु. २४,९२,४८,०३०/- चे दि.२६/११/२०१२ रोजी पुरवठा आदेश देण्यात आलेले आहे.

त्यानुसार पुरवठा आदेशाप्रमाणे मालाचा पुरवठा चालू आहे तर त्यातील काही मालाचा पुरवठा पुर्ण झालेला आहे. त्यापैकी सध्या सोबतच्या यादीतील औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्यापैकी काही आयटमचा औषध भांडारात साठा शिल्लक नाही. सदरचे औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्य दैनंदिन वापरासाठी आवश्यक आहे. तसेच दोन्ही रुग्णालयात राजीव गांधी जीवनदायी योजना कार्यान्वित झालेली आहे. सदर योजनेअंतर्गत होणाऱ्या शस्त्रक्रिया व उपचार चालु असताना पुर्ण बरा होऊन डिसचार्ज दिल्यानंतर १० दिवसांची औषधे मोफत दयावी लागतात त्यामुळे औषधांचा खप हा वाढलेला आहे, त्यामुळे जसाजसा खप वाढेल व जशी जशी लागेल तशी तशी औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व  कन्झूमेबल साहित्य खरेदी करावी लागणार आहेत.

सदर औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी साहित्य वार्षिक मंजुर दरानुसार वेगवेगळ्या मंजूर पुरवठा धारकांकडून सदरचे खरेदीकामी पुर्णांकित रक्कम रु. ९१६६७९.७८ इतका खर्च येणार आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच अर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमानः-** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२(ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल. त्यासाठी संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालये चालविण्यात येते. सदर रुग्णालयकरिता औषधे/ सर्जिकल/ लॅबोरॅटरी साहित्य खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मतः-** रुग्णांची वाढती संख्या व राजीव गांधी योजने अंतर्गत उपचार घेणारे रुग्णांकरीता खरेदी करणे आवश्यक आहे.

तरी सदरचे खरेदीकामी येणाऱ्या पुर्णांकित रक्कम रु. ९,१६,६८०/- चे खर्चाची नोंद घेण्यासाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.१५** **ड) यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची व खर्चाची नोंद घेणेत आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.१७** **वार्षीक औषधे खरेदीकामी वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे सन २०१३-१४ या वर्षाकरिता खरेदी करावयाचे वार्षिक औषधे खरेदीकामी एकूण रु.४८,६६,६४,२५२/- चे खर्चास मा. त्रिसदस्य समिती सभा दि.२६.०७.२०१३ निर्णय क्र. ५६४ अन्वये येणाऱ्या खरेदीस व खर्चास तसेच सदरचे प्रस्तावास मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचे मान्यता घेण्यात यावी, असा निर्णय झालेला आहे.

त्यानुसार सदरचे खरेदीस मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची दि. २५.१०.२०१३ रोजी मान्यता मिळालेली आहे. मा. उच्च न्यायालयाने सदरच्या आदेशात सदर खरेदीची संपूर्ण प्रक्रिया पार पाडणेकामी पुढील तज्ञ समिती गठीत केली असून सदर समितीने आलेल्या निविदावर निर्णय घेणे बाबतचे आदेश आहे.

डॉ. रविंद्र निटुरकर - जिल्हा शल्य चिकित्सक-अहमदनगर, डॉ. एम. डी. भोर- जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे प्रतिनिधी, ॲड. श्री. पी.पी. मोरे- सरकारी सहायक वकील-औरंगाबाद खंडपीठ, डॉ. कौशिक मकवाना- वैद्यकीय संचालक- श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी, डॉ. संजय पठारे- वैद्यकीय अधिक्षक - श्री साईनाथ रुग्णालय, शिर्डी.

त्यानुसार सर्व सदस्यांना इकडील पत्र क्र. ४१९५ दि. १.११.२०१३ अन्वये पत्र पाठवून सदर पत्रा सोबत जाहिरातीचा मसुदा, नियम व अटी, वार्षिक मागणी इ. बाबदची माहिती पाठवण्यात आली होती.

तद्नंतर सर्व सदस्यांची दि. २२.११.२०१३ रोजी रुग्णालयात सभा आयोजीत करणेत आली होती. सदर सभेत सर्व नियम व अटी जाहिरात इ. चा अभ्यास करुन त्यात काही सुधारणा करण्यात बाबत व प्रक्रिया कशा पध्दतीने पुर्ण करणेबाबत चर्चा करण्यात आली.

त्यानुसार सदरचे खरेदीकामी ई-निविदा मागविण्याची जाहिरात मा. उच्च न्यायालयाचे आदेशानुसार सदरची जाहिरात टाईम्स ऑफ इंडिया- न्यु दिल्ली आवृत्ती तसेच पंजाब व हरीयाणा या दोन राज्यात जास्त खपाचे वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करावी लागणार आहे. सदरचे जाहिरातीकामी अंदाजे रु.९,००,०००/- (अक्षरी रु. नऊ लाख मात्र) खर्च अपेक्षित आहे.

याशिवाय जास्तीत जास्त प्रतीसाद मिळणेसाठी टाईम्स ऑफ इंडिया- मुंबई, अहमदाबाद, सकाळ- पुणे, लोकमत नागपूर, तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करावी असे मत आहे.

मा. व्यवस्थापन समिती सभा दि.१५/०९/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७८६ अन्वये संस्थानच्या विविध विभागातील जाहिराती हया महाराष्ट्र शासनाच्या जनसंपर्क महासंचालनयामार्फत देण्यात येत असतात. परंतु सदर खरेदीकामी विशिष्ट वर्तमान पत्रात जाहिरात देणेबाबत मा. उच्च न्यायालयाचे आदेश आहेत. त्यामुळे सदरची जाहिरात ही वरील नमुद केलेल्या वर्तमान पत्रात देण्यास व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता असावी.

तरी नोंद घेण्यासाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.१६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.१८** **श्री साईबाबा हॉस्पिटलमधील विविध यु.पी.एस. च्या बॅटरीज बदलणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील विविध विभागात Life Saving Equipments & Machines नियमित वापरले जातात. अशा मशिन्स तातडीच्या वेळी वापरल्या जात असताना विदयुत प्रवाह खंडीत झाल्यास बंद पडु शकतात. त्यावेळी अत्यावश्यक सेवा आवश्यक असलेल्या किंवा अपघातग्रस्त रूग्णांचे पुढील उपचार करणे शक्य होत नाही. अशा महत्वाच्या मशिन्स करीता त्या विभागांमध्ये वेगवेगळया क्षमतेचे यु.पी.एस बसविण्यात आले आहेत.

सर्व यु.पी.एस.चे संबंधित कंपन्यांकडे दुरुस्ती व देखभालीकरीता AMC/CMC करणेत आलेले आहे. परंतू बॅटरीज हया कन्झ्युमेबल स्पेअर पार्ट असल्यामुळे कोणत्याही (AMC, CMC) कॉन्ट्रॅक्ट कालावधीत कंपनी बदलून देत नसल्यामुळे Batteries ची किंमत संस्थानला वेगळी अदा करावयाची आहे.

सध्या एक्स रे, जनरल व ऑर्थो ऑपरेशन थिएटर विभागातील यु.पी.एस.व्यवस्थीत काम देत नसल्याचे सदर विभागांनी पत्रान्वये कळविले आहे. त्यासाठी मे. तेजस इलेक्ट्रॅानिक्स, अहमदनगर यांचे इंजिनीअर यांचे नियमीत भेटीकरीता आले असता त्यांनी वरील यु.पी.एस.च्या तपासणी करून १२ V/१८ Ah या प्रकारच्या ३४ नग बॅटरीज खराब झाल्याचे कळविले आहे.

त्यासाठी विवीध यु.पी.एस.चे बॅटरीज करीता विवीध कंपनीकडून कोटेशन मागविणेत आले असुन त्यांनी दिलेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| Sr | Name | UPS | Battery | Qty | Rate/ | Sub | VAT @ | Installation | Service | Total in |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

| No | of Deptt. | Capacity & Qty | Ratings | | Unit in Rs. | Total | 12.5% | & Transp. Charges | Tax @ 12.36% | Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Cath Lab | 10KVA 01Nos | 12V, 26Ah | 10 | 2450 | 46550 | 5818.75 | 3000 | 370.80 | 55739.55 |
| 2 | X-ray | 3KVA | 12V, 26 Ah | 09 | | | | | | |
| 3 | Gen OT Ortho OT ICCU | 10KVA -3Nos | 12V, 18Ah | 34 | 2200 | NA | Inclusive | Inclusive | Inclusive | 74800.00 |
| 4 | M.R.I. | 120KVA | 12V, 120Ah | 32 | 10200 | 326400 | 40800 | 9000 | 1112.40 | 377312.40 |
| | | | | | | | | | **Total in Rs.(R/o)** | **5,07,852.00** |

वरीलप्रमाणे सर्व यु.पी.एस च्या बॅटरीज बदलणेस सर्व करांसहीत एकुण रू ५,०७,८५२/- (अक्षरी रू. पाच लाख सात हजार आठशे बावन्न मात्र) इतका खर्च येणार आहे. सदर बॅटरीजपैकी काही बॅटरीज करीता कंपनी एक वर्षाची व काही बॅटरीज करीता दोन वर्षाची वॉरंटी देत आहे. तसेच जुन्या खराब झालेल्या बॅटरीज रेकॉर्ड विभागाकडे जमा करून त्यांची विहीत पद्धतीने विक्री करता येईल असे नम्र मत आहे.

तरी वरीलप्रमाणे विविध विभागातील यु.पी.एस.च्या बॅटरीज विहीत पध्दतीने विविध पुरवठाधारकांकडुन निवीदा मागणी करून खरेदी करणेसाठी दर निश्चीत करणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे एकुण रु. ५,०७,८५२/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.१७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील विविध विभागातील यु.पी.एस.च्या बॅटरीज खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने निवीदा मागणी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु. ५,०७,८५२/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच, याठिकाणच्या खराब झालेल्या जुन्या बॅटऱ्यांची विहीत पध्दतीने लिलावाद्वारे विक्री करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.१९** **जादा वैद्यकीय बीलाचा परतावा आदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:-** १) जा.नं.एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९८ दि.१६/०१/१९९९ २) मा. व्यवस्थापन समिती सभा दि.०८/०२/२००९ निर्णय क्र. ७५ अन्वये रु. १०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

**प्रस्ताविक :-** खालील संस्थान कायम कर्मचाऱ्यांची रु. १०,०००/- पर्यंतचे खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु.१०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहे.

**मागणी:-**

| अ. नं. | कर्मचाऱ्यांचे नाव | कर्मचाऱ्या-शी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयांचे नाव | एकुण मागणी रक्कम | एकुण देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **अ- श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटल मध्ये उपचार घेतलेले** | | | | | | |
| १. | श्री. गमे सुर्यभान विठ्ठलराव विभाग- कामगार विभाग हुद्दा- कामगार अधिकारी | स्वतः | अस्थिव्यंग | डॉ. जपे | श्री साईबाबा हॉस्पिटल | ८३८०.०० | ७७३०.०० |
| २. | श्री.बाबर संजय आनंदराव विभाग - कन्या विद्या मंदीर हुद्दा - लिपीक | स्वतः | Spondilysis/ मधूमेह | डॉ. शर्मा डॉ. म्हात्रे | श्री साईबाबा हॉस्पिटल | ७४०२.०० | ७४०२.०० |
| | | आई | मधूमेह | डॉ. शर्मा डॉ. इंगळे | श्री साईबाबा हॉस्पिटल | | |
| ३. | श्री.लोखंडे दिपक सुर्यकांत विभाग - संरक्षण विभाग हुद्दा - लिपीक | आई | मधुमेह | डॉ. शर्मा | श्री साईबाबा हॉस्पिटल | ३६४४.०० | ३६४४.०० |
| ४. | गायकवाड सुरेखा राजू विभाग- साईनाथ हॉस्पिटल हुद्दा - इनचार्ज सिस्टर | स्वतः | Pain in Abdomen | डॉ. गोरे डॉ. मुंदडा | श्री साईबाबा हॉस्पिटल | १३४७३.०० | १३०७६.०० |
| ५. | रंजना प्रकाश मखाना विभाग- साईनाथ हॉस्पिटल हुद्दा - आया | पती | AV Fistula Lt Wrist | डॉ. मेहेरोत्रा | श्री साईबाबा हॉस्पिटल | ९१८२.०० | ८६८४.०० |

| अ. नं. | कर्मचाऱ्यांचे नाव | कर्मचाऱ्या-शी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयांचे नाव | एकुण मागणी रक्कम | एकुण देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ६. | श्री.गवळी किशोर साहेबराव<br>विभाग- माहिती तंत्रज्ञान<br>हुद्दा - ज्यु.मॅनेजर ई.डी.पी | स्वतः<br>मुलगा<br>मुलगी<br>आई | जनरल | डॉ. शर्मा<br>डॉ. साबळे<br>डॉ.पोरवाल | श्री साईनाथ हॉस्पिटल<br>श्री साईबाबा हॉस्पिटल | ५६१६.०० | ५६११.०० |
| ७. | श्री.नागरे प्रभाकर विश्वनाथ<br>विभाग - इंग्लिश मिडीयम स्कुल<br>हुद्दा - सहा. शिक्षक | वडील | ह्दयविकार / मधुमेह | डॉ. शर्मा | श्री साईबाबा हॉस्पिटल | ५९४०.०० | ५९४०.०० |
| ८. | श्री बबन गंगाधर भडांगे<br>विभाग- माहिती तंत्रज्ञान विभाग,<br>हुद्दा - लिपीक | वडील | अस्थमा | डॉ. मेहरोत्रा | श्री साईबाबा हॉस्पिटल | २१५५.०० | २१५५.०० |
| ९. | डॉ सरदार अमोल भगवंत<br>विभाग- श्री साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा - निवासी वैद्यकीय अधिकारी | वडील | Chronic Prostatitis with Benign Enlargement of prostate ? Ca. prostate | डॉ. इंगळे / डॉ. मुंदडा | श्री साईबाबा हॉस्पिटल | १५६१७.०० | १२९९२.०० |
| | | आई | Acute glomerulonephritis (A.R.F.) | | | | |
| १०. | श्री.त्रिभुवन प्रदिप वि.<br>विभाग- साईनाथ रुग्णालय<br>हुद्दा - मदतनीस | पत्नी | त्वचारोग | डॉ. कांबळे | श्री साईनाथ रुग्णालय | ६१२.०० | ६१२.०० |
| ११. | श्री.नवले रविंद्र बाळासाहेब<br>विभाग - साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा - एच.आर.मॅनेजर | आई | नेत्ररोग | डॉ. सोनटक्के | श्री साईनाथ रुग्णालय | ८४१.०० | ८४१.०० |
| | | स्वतः | ह्दयविकार | डॉ. बजाज | श्री साईबाबा हॉस्पिटल | १०२४.०० | १०२४.०० |
| १२. | श्री. चौधरी रवि प्रकाश<br>विभाग -वाहन विभाग<br>हुद्दा - वाहन चालक | वडील | Cervical Spondilysis | डॉ. शेळके | श्री साईनाथ रुग्णालय | २०७८.०० | २०७८.०० |
| १३. | श्री. गायके रविंद्र गोरख<br>विभाग - साई भक्तीनिवास<br>हुद्दा - लिपिक | वडील | मधुमेह | डॉ. पोरवाल | श्री साईनाथ रुग्णालय | २८५४.०० | २८५४.०० |
| १४ | श्री. कोते प्रकाश भाऊसाहेब<br>विभाग - साई भक्तीनिवास<br>हुद्दा - लिपिक | स्वतः | Kidney Failure | डॉ. मेहरोत्रा | श्री साईबाबा हॉस्पिटल | २७००५.०० | २६५५२.०० |
| १५. | डॉ सुरवसे संतोष बी<br>विभाग - साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा - भुलतज्ञ | स्वतः | ह्दयविकार | डॉ. बजाज | श्री साईबाबा हॉस्पिटल | १३७४४.०० | १३७४४.०० |
| १६. | डॉ. राठी विष्णूपंत रामेश्वर<br>विभाग - साईनाथ हॉस्पिटल<br>हुद्दा - निवासी वैद्यकीय अधिकारी | स्वतः | Epilepsy | डॉ. पोरवाल | श्री साईनाथ रुग्णालय | २८३२.०० | २८३२.०० |
| १७. | श्री. सोनवणे जयवंत गुलाबराव<br>विभाग - साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा - वॉर्डबॉय | वडील | मधुमेह | डॉ. शर्मा | श्री साईबाबा हॉस्पिटल | ३१७१.०० | ३१७१.०० |
| १८. | श्री.पठाण नसरुल्ला | पत्नी | TBD | डॉ. शर्मा | श्री साईबाबा | २८७०.०० | २८७०.०० |

| अ. नं. | कर्मचाऱ्यांचे नाव | कर्मचाऱ्या-शी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयांचे नाव | एकुण मागणी रक्कम | एकुण देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | नुरखा<br>विभाग - साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा - लिपीक | | | | हॉस्पिटल | | |
| १९ | डॉ. अजितकुमार तुकाराम वाघ<br>विभाग - साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा - निवासी वैद्यकीय अधिकारी | वडील | Nephrology dialysis peritoneal किडणी आजार | डॉ. शर्मा | श्री साईबाबा हॉस्पिटल | ३९२९८.०० | ३९२९८.०० |
| २० | श्री.नळे सुनिल नानासाहेब<br>विभाग - संरक्षण<br>हुद्दा - मदतनीस | वडील | Paralysis | डॉ.शर्मा | श्री साईबाबा हॉस्पिटल | २३३५.०० | २३३५.०० |
| २१ | श्री.बारहाते सुकदेव शंकर<br>विभाग - पाणी पुरवठा<br>हुद्दा - तारतंत्री | आई | मधुमेह | डॉ. शर्मा | श्री साईबाबा हॉस्पिटल | १२९६.०० | १२९६.०० |
| २२ | श्री. लुटे चंद्रकांत धोंडीराम<br>विभाग - रक्तपेढी<br>हुद्दा - तंत्रज्ञ | वडील | मधुमेह मेंदूविकार | डॉ. मेहरोत्रा | श्री साईबाबा हॉस्पिटल | २८७७.०० | २८७७.०० |
| २३ | श्री. वाकडे राजेश रमणलाल<br>विभाग - साईबाबा हॉस्पिटल<br>हुद्दा - सि.बायो.मे. इंजिनियर | आई | मधुमेह | डॉ. मेहरोत्रा | श्री साईबाबा हॉस्पिटल | २४६३.०० | २४६३.०० |
| | | | | | **एकूण रक्कम रु.** | **१७६७०८.००** | **१७२०८१.००** |
| | **ब - संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये रेफर केले होते** | | | | | | |
| २४ | श्री. खरात बाळासाहेब किसन<br>विभाग - आरोग्य विभाग<br>हुद्दा - मदतनीस | आई | Cancer of Lung | डॉ. शर्मा | टाटा मेमोरीयल हॉस्पिटल, मुंबई | ३३३०.०० | ३३३०.०० |
| २५ | श्री. वाणी हौशिराम गोरक्षनाथ<br>विभाग- साईबाबा हॉस्पि.<br>हुद्दा - वॉर्डबॉय | मुलगा | Seizyre disorder or Epilepsy | डॉ. रचना साबळे | प्रवरा रुरल हॉस्पिटल, लोणी | ३३३५.०० | ३३३५.०० |
| | | | | | **एकूण रक्कम रु** | **६६६५.००** | **६६६५.००** |
| | **क - संस्थानचे मान्य यादीत नसलेले परंतू रेफर केलेले हॉस्पिटल** | | | | | | |
| २६ | डॉ. उल्हास जी. पवार<br>विभाग- साईबाबा हॉस्पि.<br>हुद्दा - निवासी वैद्यकीय अधिकारी | आई | Audio problem | डॉ. कुलकर्णी | Samwad Specha Hearing Clinic | ११०००.०० | ८८००.०० |
| | | | | | **एकूण रक्कम रु** | **११०००.००** | **८८००.००** |
| | **ड- संस्थानचे मान्य यादीत नसलेले परंतू रेफर न केलेले हॉस्पिटल** | | | | | | |
| २७ | श्री. हरिश्चंद्र गोपाळ काते<br>विभाग- मुंबई कार्यालय<br>हुद्दा - शिपाई | मुलगा | Dengue | डॉ. रविंद्र देशपांडे | - | २२००९.०० | १५६८७.०० |
| | | | | | **एकूण रक्कम रु** | **२२००९.००** | **१५६८७.००** |
| | | | | | **एकुण रक्कम अ + ब + क +ड =** | **२१६३८२.००** | **२०३२३३.००** |

**संस्थान अधिनियम / ठराव त्यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रीक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :-**

सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकुण रक्कम रु. २,०३,२३३/- इतकी आहे.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत :-** नियमावली प्रमाणे छाननी केली असून देय होणारी रक्कम अदा करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.१८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या अ, ब, क व ड मधील संस्थान कायम कर्मचाऱ्यांच्या नावासमोरील देय असलेली रक्कम आदा करणेस मान्यता देणेत आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२०** **झेनॉन लाईट सोर्सकरीता बल्ब खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रूग्णालयामधील जनरल ओ.टी विभागाकरीता वरील पुरवठा आदेशान्वये मे.कार्ल स्टोअर्स एन्डोस्कॉपी इंडिया प्रा.लि.,नवी दिल्ली यांचेकडुन एक झेनॉन लाईट सोर्स एकुण रू. २,६१,९१३.५०/- इतक्या रकमेत खरेदी करण्यात आला आहे. सदर झेनॉन लाईट सोर्स १३/०७/२०१२ रोजी कार्यान्वीत करण्यात आला आहे. सदर झेनॉन लाईट सोर्स करीता कंपनीने दोन वर्षाची वॉरंटी दिलेली आहे. सदर वॉरंटी कालावधीमध्ये दुरुस्ती व देखभालीकरीता लागणारे सर्व कन्झ्युमेबल ॲक्सेसरीज व स्पेअर पार्ट ची (उदा.Xenon Bulb, Fiber optic cable, Adapter etc.) किंमत संस्थानला वेगळी अदा करावयाची आहे.

सदर झेनॉन लाईट सोर्स व्यवस्थीत काम देत नसल्याचे जनरल ओ. टी. विभागाने त्यांचे पत्र दि. १०/१२/२०१३ अन्वये कळविले आहे. त्यानुसार सदर झेनॉन लाईट सोर्सची तपासणी केली असता झेनॉन बल्ब खराब झाल्याचे निदर्शनास आहे. मे.कार्ल स्टोअर्स एन्डोस्कॉपी इंडिया प्रा.लि.,नवी दिल्ली यांचे पत्रानुसार झेनॉन बल्ब हा कन्झ्युमेबल पार्ट असून तो साधारणतः ५०० तासांच्या वापरानंतर खराब होतो. सदरचा झेनॉन लाईट सोर्सचा बल्ब कार्यान्वीत केल्यापासुन आजपावेतो बदलण्यात आलेला नाही. दि. १३/०७/२०१२ ते १०/१२/२०१३ या कालावधीत अंदाजे एकुण १६१ रुग्णांवर शस्त्रक्रिया झालेल्या आहेत. त्यासाठी सदर लाईट सोर्स ८०५ तास वापरला गेलेला आहे. त्यासाठी कंपनीने पत्र दि.११/१२/२०१३ अन्वये झेनॉन बल्ब खरेदी करणेस सर्व करांसहीत एकुण रु.६१,९६३/- (अक्षरी रु.एकसष्ट हजार नउशे त्रेसष्ट मात्र) इतका खर्च कळविला असुन कंपनीने सदर रक्कमेची अगाउ मागणी केलेली आहे. परंतु कंपनी प्रतिनिधीशी झालेल्या चर्चेअंती वरील झेनॉन बल्ब श्री साईनाथ रुग्णालयात प्राप्त झाल्यानंतर सदर रक्कम अदा होणेस कंपनीने स्वीकृती दर्शविली आहे. सदर झेनॉन बल्बसाठी कंपनी ५०० तासाची वॉरंटी देत आहे._सदर झेनॉन लाईट सोर्सचे स्पेअर पार्ट करीता मे. कार्ल स्टोअर्ज, एन्डोस्कोपी इं. प्रा. लि. नवी दिल्ली, हे एकमेव पुरवठाधारक आहेत.

तरी मे. कार्ल स्टोअर्ज, एन्डोस्कोपी इं. प्रा. लि. नवी दिल्ली, यांचेकडुन झेनॉन लाईट सोर्सचा बल्ब खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या एकुण रु. ६१,९६३/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.१९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रूग्णालयाकडील जनरल ओ.टी विभागामध्ये झेनॉन लाईट सोर्सकरीता बल्ब, झेनॉन लाईट सोर्स स्पेअर पार्टचे एकमेव पुरवठाधारक मे. कार्ल स्टोअर्ज, एन्डोस्कोपी इं. प्रा. लि. नवी दिल्ली यांचेकडून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रु.६१,९६३/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२१** **क्ष- किरण निर्मिती करणाऱ्या मशिन्सचे Quality Assurance Test करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटलमधील विविध विभागांमध्ये क्ष-किरण निर्मीती करणारे मशीन्स रुग्णांच्या विविध प्रकारच्या तपासण्या तसेच शस्त्रक्रीया करताना वापरले जातात (उदा. कॅथलॅब मशीन, सि. टी. स्कॅन मशीन, पोर्टेबल एक्स-रे मशीन्स, ५०० एम. ए. एक्स-रे मशीन, सी-आर्म इ.). सदर मशीन्सची परमाणु उर्जा नियामक परिषदेच्या (A.E.R.B.) च्या नियमानुसार Quality Assurance Test करणे अनिवार्य आहे. त्यामुळे श्री साईनाथ रुग्णालयाचे आर. एस. ऑफीसर यांनी या वर्षी सदर प्रकारची QA Test सर्व मशिनकरीता करुन घेणेबाबत कळविले आहे.

मागील वर्षी श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटलमधील विविध क्ष-किरण निर्मीती करणारे सर्व मशीन्सचे Quality Assurance Test विविध कंपन्याकडुन कोटेशन मागवुन निम्नतम दराने करणेत आलेल्या आहेत. तरी सन २०१३-२०१४ या वर्षीदेखील QA Test करणेकरीता मे. हिया मेडिकल सिस्टीम,मुंबई यांचेकडून कोटेशन मागविण्यात आले आहे. कंपनीने QA Test करणेकामी सर्व करांसहीत एकुण रु. ७५,२८१/- (अक्षरी रु.पंच्याहात्तर हजार दोनशे ऐक्याऐंशी मात्र) इतक्या रकमेचे कोटेशन पाठविले आहे. तरी सन २०१३-२०१४ या वर्षीदेखील QA Test करणाऱ्या विविध कंपन्याकडुन कोटेशन मागवुन QA Test निम्नतम दराने करता येईल तसेच पुढील पाच वर्षांकरीता दर निश्चीत करता येतील असे नम्र मत आहे.

तरी क्ष-किरण निर्मीती करणारे मशीन्सचे QA Test करणेकामी विविध कंपन्याकडुन कोटेशन मागवुन निम्नतम दराने QA Test करणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे रु. ७५,२८१/- चे खर्चास तसेच पुढील पाच वर्षाकरीता सदर प्रकारची करणेसाठी दर निश्चित करणेस मान्यता असावी.

| | |
|---|---|
| **निर्णय क्र.२०** | **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटलकडील विविध विभागांमध्ये क्ष-किरण निर्मीती करणाऱ्या मशिन्सची Quality Assurance Test करणेकामी विविध कंपन्याकडुन कोटेशन मागवुन निम्नतम दराने QA Test करणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे रु. ७५,२८१/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** |

**तसेच, पुढील पाच वर्षाकरीता सदर प्रकारची टेस्ट करणेसाठी दर निश्चित करणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२२** **सी.टी.स्कॅन मशिनचे १६० KVA यु.पी.एस. च्या बॅटरीज खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सी.टी.स्कॅन मशिन करीता सोकोमॅक कंपनीचे ०१ नग १६० KVA यु.पी.एस. दि.१४/०७/२०१० रोजी बसविण्यात आले होते. सदर सी.टी.स्कॅन मशिन तातडीच्या वेळी वापरले जात असताना विदयुत प्रवाह खंडीत झाल्यास बंद पडु शकतात. त्यावेळी अपघातग्रस्त अत्यावश्यक सेवा आवश्यक असलेल्या रूग्णांचे पुढील उपचार करणे शक्य होत नाही. त्यामुळे अशा महत्वाच्या मशिन्स करीता सदर यु.पी.एस.सिस्टीम बसविण्यात आली आहे.

सदर यु.पी.एस.चा दोन वर्षांचा वॉरंटी कालावधी दि.१३/०७/२०१२ रोजी संपलेला आहे.तसेच बॅटरीजचा एक वर्षाचा वॉरंटी कालावधी दि.१३/०७/२०११ रोजी संपलेला आहे. मे.सोकोमॅक इनोव्हेटिव पॉवर सोल्युशन प्रा.लि. मुंबई यांचेकडे दि.०१/०४/२०१३ ते दि. ३१/०३/२०१४ या कालावधीसाठी कॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षीक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (CMC) करणेत आलेले आहे. सदर कॉन्ट्रॅक्ट कालावधीत दुरुस्ती व देखभालीकरीता आवश्यक असणाऱ्या स्पेअर पार्ट कंपनी स्वखर्चाने बदलणार आहे. परंतु कन्झ्युमेबल स्पेअर पार्ट (उदा.Wound Component, Batteries) ची किंमत संस्थानला वेगळी अदा करावयाची आहे.तसेच यापुर्वी सी.टी.स्कॅन मशिनचे यु.पी.एस.च्या बॅटरीज कधीही बदलणेत आलेल्या नाहीत.

मे. सोकोमॅक इनोव्हेटिव पॉवर सोल्युशन प्रा. लि. मुंबई यांचेकडुन यु.पी.एस. बॅटरीजचे कोटेशन मागणी करण्यात आलेली आहे. कंपनीने त्यांचे पत्र क्र.SUIPL/MUM/CIM/GEN/SAI/१४१/०८/१३/A१,Dt.२८/११/२०१३ अन्वये बॅटरीज बदलणे करता सर्व करांसहीत एकुण रु.७,४६,७६०/- इतका खर्चाचे कोटेशन पाठविले आहे. सदर बॅटरीज करीता कंपनी दोन वर्षाची वॉरंटी देत आहे.

तसेच पुढील कालावधीत बॅटरीज खराब झाल्यास विहीत पद्धतीने निवीदा मागवून सदर बॅटरीज खरेदी करणेस विलंब होउ शकतो. त्यामुळे सध्या विहीत पध्दतीने निवीदा मागवून दर निश्चीत करता येतील व जेव्हा बॅटरीज खराब होतील तेव्हा बॅटरीज खरेदी करणेसाठी पुरवठा आदेश देता येईल असे नम्र मत आहे. तसेच जुन्या खराब झालेल्या बॅटरीज रेकॉर्ड विभागाकडे जमा करून त्यांची विहीत पद्धतीने विक्री करता येईल.

तरी सी.टी.स्कॅन मशिनचे यु.पी.एस.च्या बॅटरीज विहीत पध्दतीने निवीदा मागवून खरेदी करणेसाठी दर निश्चीत करणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे एकुण रु.७,४६,७६०/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.२१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सी.टी.स्कॅन मशिनच्या १६० KVA यु.पी.एस. च्या बॅटरीज खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने निविदा मागणी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु. ७,४६,७६०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच, याठिकाणच्या खराब झालेल्या जुन्या बॅटऱ्यांची विहीत पध्दतीने लिलावाद्वारे विक्री करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२३** **वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावली सुधारणा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी मार्फत गरीब व गरजु रूग्णांना त्यांचे वैद्यकीय उपचाराकरीता रूग्ण उपचार घेत असलेल्या रूग्णालयाचे नांवे आर्थिक अनुदान देण्यात येते. अनुदान देणेकामी संस्थान व्यवस्थापनाने स्वतंत्र नियमावली तयार केलेली आहे.

महाराष्ट्र शासन विधि व न्याय विभाग यांचेकडील सासंवि-२००५/३७६/(७६)- का.सोळा, दि.०५ मे २००६ रोजीचे पत्रान्वये अनुदान नियमावलीस मान्यता देण्यात आलेली आहे.

दि.२१/०६/२००९ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं.१९, निर्णय क्र.५२४ अन्वये ज्या रूग्णांना शासनाच्या जीवनदायी आरोग्य योजनेअंर्तगत अनुदान मंजुर झाले आहे अशा रूग्णांना संस्थानकडुन अनुदान देण्यात येऊ नये असा निर्णय झालेला आहे. व त्यानुसार सध्या कार्यवाही सुरू आहे.

महाराष्ट्र शासनाने राज्यातील जीवनदायी आरोग्य योजना बंद करुन याच धर्तीवर राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना संपुर्ण राज्यात लागु केलेली आहे.

दि.२६/०७/१३ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं.२२, निर्णय क्र.५५१ अन्वये संस्थानच्या सध्याच्या वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीत आवश्यक सुधारणा करुन सदर योजना

सर्वसमावेशक करण्यासाठी सुधारीत नियमावलीस मान्यता देण्यात आलेली आहे. सुधारीत नियमावलीनुसार राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेअंतर्गत लाभार्थी असणाऱ्या रूग्णांना संस्थानमार्फत अनुदान दिले जाणार नाही. सुधारीत नियमावली सुरू करणेबाबतची कार्यवाही सध्या चालु आहे.

तरी सुधारीत नियमावलीची अंमलबजावणी होईपर्यंत सध्याच्या नियमावलीत ज्या रूग्णांना राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेअंर्तगत अनुदान मंजुर झाले आहे, अशा रूग्णांना संस्थानकडुन अनुदान देण्यात येऊ नये असा बदल नियमावलीत करुन त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेबाबत योग्य तो निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२२ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२४ रुग्णालयाकडील खरेदीबाबतची ई निविदा उघडणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे आय .टी. विभागाकडील जा.नं. २८८६ दि.२७/११/२०१३ चे परिपत्रकान्वये रु. १० लाख किंवा त्यापेक्षा अधिक खर्चाच्या कामांना ई निविदा प्रक्रिया लागू करणेबाबत कळविलेले आहे. सदर परिपत्रकात "मा. व्यवस्थापन समिती सभा २६/०७/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५८४ नुसार किमान रक्कम रु. १० लाख किंवा त्यापेक्षा अधिक खर्चाच्या कामांना ई निविदा प्रक्रिया लागू करणेबाबतची नोंद घेण्यात येऊन सर्व निविदा या विश्वस्त समितीच्या वतीने समक्ष उघडण्याचे अधिकार कामगार, सामान्य प्रशासन, संरक्षण, विधी, बांधकाम, विद्युत, पाणीपुरवठा, खरेदी, प्रकाशने, लेखाशाखा व माहिती तंत्रज्ञान हे विभाग ज्यांच्याकडे पर्यवेक्षणासाठी आहेत अशा प्रशासकिय अधिकारी यांना प्रदान करणे बाबत निर्णय झालेला आहे."

दोन्ही रुग्णालयाचे पर्यवेक्षणाचे अधिकार हे वैद्यकिय संचालक यांना प्रदान करण्यात आलेले आहेत. परंतू रुग्णालयासंबंधी ई निविदा उघडणे बाबत सदर परिपत्रकात उल्लेख नाही त्यामुळे रुग्णालयासंबंधी सर्व खरेदीचे ई निविदा या वैद्यकिय संचालक यांचे समक्ष उघडावे किंवा कसे ? याबाबत आदेश होण्यास विनंती.

**निर्णय क्र.२३ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे दोन्ही रुग्णालयाच्या पर्यवेक्षणाचे अधिकार हे वैद्यकिय संचालक यांना असल्यामुळे रुग्णालयासंबंधी सर्व खरेदीच्या ई-निविदा वैद्यकिय संचालक यांचे समक्ष उघडणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२५ श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे स्वच्छता कामाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाची स्वच्छतेची कामे पुर्वी संस्थानचे आरोग्य विभागामार्फत केले जात होते. संस्थानचे दोन्ही रुग्णालयाचे स्वच्छतेच्या कामाचा दर्जा वाढावा या उद्देशाने सदरचे काम आऊट सोर्सिंग पध्दतीने करुन घेणेबाबत प्रस्ताव दाखल केला होता. त्यानुसार दि. २७.०१.२०१० रोजीच्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये विषय नं. २२ निर्णय क्र. २१४ नुसार प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे मान्यता मिळाली.

त्यानुसार मागील वर्षी सदरचे काम विहीत पध्दतीने दि. ०८.१२.२०१२ रोजीच्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं. ८२ निर्णय क्र. १०३४ नुसार मे. बी.व्ही.जी. (इं) लि. पुणे, यांना प्रति महिना रक्कम रु. १२,२२,८२०/- (बारा लाख बावीस हजार आठशे वीस रुपये मात्र) मध्ये आऊट सोर्स पध्दतीने देणेबाबत निर्णय झाला व त्यांना जा. नं. एसएसएस/एसएसबीएच/११८७/२०१३ दि. २१.०१.२०१३ रोजीचे पत्रान्वये कार्यादेश देण्यात आला.

मे. बी.व्ही.जी. (इं) प्रा. लि. पुणे, यांनी दि. १६.०२.२०१३ पासुन प्रत्यक्ष काम सुरु केलेले आहे. सदर कामाचा कालावधी दि. १५.०२.२०१४ रोजी संपणार असल्याने पुढील एक वर्षाच्या कालावधीसाठी नवीन निविदा धारकांची नेमणुक करणेकामी निविदा मागविणे व पुढील कार्यवाही करणे आवश्यक आहे.

त्यास्तव पुढील एक वर्षाकरिता श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे स्वच्छतेचे काम आऊट सोर्सिंगद्वारे विहीत पध्दतीने देणेकामी दरपत्रके मागविणे व प्राप्त दरपत्रके मा. त्रीसदस्यीय समितीचे सभेपुढे उघडणेकामी चर्चा होऊन निर्णय होणेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.२४ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाच्या स्वच्छतेचे काम आऊट सोर्सिंग पध्दतीने करत असलेल्या कंपनीची मुदत दि.१५.०२.२०१४ रोजी संपणार असल्याने सदर स्वच्छतेचे काम पुढील एक वर्षाकरिता आऊट सोर्सिंग पध्दतीने करुन घेणेकामी विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच, तोपर्यंत सध्या काम करत असलेल्या कंपनीस दि.१५.०२.२०१४ पासून पुढे दोन महिने कालावधीसाठी मुदतवाढ देणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२६ व्दारावती इमारतीतील रुममधील संडास- बाथरुममध्ये बसविणेसाठी बल्कहेड फिटींग खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** व्दारावती भक्तनिवास इमारतीमधील प्रत्येक रुमचे संडास-बाथरुम, बेसिन व रुमचे पॅसेजमध्ये चार नग, १४ वॅट T-५ टयुबपट्टया बसविण्यात आलेल्या आहेत. अशा एकुण ३२४ रुम आहेत. तसेच जनरल संडास-बाथरुममध्ये १४ वॅट T-५ टयुबपट्टया लावलेल्या आहेत. एका T-५ टयूब पट्टीची किंमत रुपये ३७५/- इतकी आहे व सर्वसाधारण २७ नग इतक्या महिन्यात सतत वापराने त्या खराब होतात. त्या पट्टयामध्ये जेथे इलेक्ट्रॉनिक किट फिट केलेले आहे, तेथे टयुब बॉक्सचे पीव्हीसी कव्हर गरम होऊन वितळते. त्यामुळे एखादे वेळी कव्हर पेटण्याची शक्यता नाकारता येत नाही. सुरक्षिततेच्या दृष्टीने धोक्याचे आहे. तसेच स्थानिक बाजारात सदरील T-५ टयुब पट्टया उपलब्ध होत नसतात. त्यामुळे मेन्टेनन्स करण्यासाठी नेहमी अडथळे येतात. या टयुबलाईट ऐवजी तेथे बल्कहेड फिटींग बसविले तर त्यामध्ये आपलेकडे उपलब्ध असलेले बल्ब, सीएफएल लॅम्प बसवून तातडीने तक्रारींचे निवारण करणे सोईस्कर होईल. शिवाय सीएफएलचे आयुष्यही जास्त असल्याने किमान वर्षभर तरी हे लॅम्प काम देऊ शकतात. एकुण व्दारावतीमध्ये ३२४ रुम असून इतर जनरल संडास कॉमन आहेत. या ३२४ रुममध्ये प्रत्येकी ४ बल्कहेडप्रमाणे १२९६ नग व कॉमन संडास-बाथरुमसाठी २०४ नग याप्रमाणे १५०० नगांची गरज आहे.

याकरीता खालीलप्रमाणे बल्कहेड फिटींग खरेदी करावे लागतील. तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | तपशील | मागणी | दर (अंदाजे) | एकुण किंमत |
|---|---|---|---|---|
| ०१) | Bulkhead Fittings, Ganpati Make, Type :- GB 020 Long C.F.L. Casting Jall MX 18 W | १५०० नग | रु. ३४०/- | रु. ५,१०,०००/- |
| ०२) | C.F.L.TUBE, Philips Make, Type :- 11W | १५०० नग | रु. १५०/- | रु. २,२५,०००/- |
| | | | **एकुण रक्कमः-** | **रु. ७,३५,०००/-** |

उपरोक्तप्रमाणे व्दारावती इमारतीच्या रुममधील संडास-बाथरुममध्ये बसविणेसाठी बल्कहेड फिटींग खरेदी करणेकरीता रक्कम रुपये ७,३५,०००/- खर्च येणे अपेक्षित आहे. सदरील खर्चास व बल्कहेड फिटींग खरेदी करणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन निविदा बोलविणेसाठी मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, व्दारावती इमारतीतील रुममधील संडास- बाथरुममध्ये बसविणेसाठी बल्कहेड फिटींग खरेदी करणेसाठी टेक्नीकल ओपिनियन घेण्यात यावे. त्यानंतर वर्तमानपत्रात जाहिरात देऊन व संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन निविदा मागविणेत याव्यात, असे ठरले.**

**तसेच, याकामी येणाऱ्या रु. ७,३५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.२७** **Van Mounted Hydraulic Extension Ladder खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मंदिर परीसर, भक्तनिवासस्थान परीसर, श्री साईबाबा हॉस्पीटल, श्री साई प्रसादालय, श्री साईनाथ हॉस्पीटल, व्दारावती इमारत, साईआश्रम परीसरातील इमारती, साई धर्मशाळा परीसरातील इमारती तसेच स्टाफ क्वॉर्टर परीसर या सर्व ठिकाणी रात्रीच्या वेळच्या प्रकाश योजनेकरीता स्ट्रीट लाईटची उभारणी करुन प्रकाश योजना करण्यात आलेली आहे. या विविध ठिकाणांच्या स्ट्रीट लाईट पोलची उंची ६ मीटर ते १६ मीटर इतकी आहे. या पथदिव्यांच्या पोलवरील लॅम्पची दुरुस्ती वेळोवेळी विद्युत विभागामार्फत चालू असते. पथदिव्यांच्या दुरुस्तीकामी विद्युत विभागाकडे असलेल्या चार चाकी Aluminium Ladder चा वापर केला जातो. सदर Ladder ही सुमारे १४ वर्षापूर्वी त्या वेळेच्या गरजेनुसार खरेदी करण्यात आलेली आहे. सततच्या वापरामुळे सदरील Ladder ही नेहमी नादुरुस्त होत असल्याने वापरास अडचणीचे होत आहे. शिवाय अडचणीच्या ठिकाणी असलेल्या पोलजवळ ही Ladder घेऊन जाता येत नाही. तसेच रोडवरील Divider च्या ठिकाणच्या पोलवरील लॅम्प दुरुस्तीकरीता सध्याच्या Ladder चा उपयोग करता येत नाही. त्यामुळे काही ठिकाणचे पोलवरील मेन्टेनन्स करणे राहून जाते. त्यामुळे त्या ठिकाणचे लॅम्प बंद अवस्थेत राहतात. याकरीता आपणास Van Mounted Hydraulic Extension Ladder खरेदी करावी लागणार आहे. Van Mounted Hydraulic Extension Ladder व्दारे उंचावरील ठिकाणी जाऊन काम करता येऊ शकते.

या Van Mounted Hydraulic Extension Ladder चा बांधकाम विभाग, पाणीपुरवठा विभाग, आरोग्य विभाग व बगीचा विभाग या विभागांना उंचावरील कामे करतेवेळी उपयोग होणार आहे. तसेच सदरील Van Mounted Hydraulic Extension Ladder चा उपयोग इमारतींना लागलेल्या आगीचे प्रतिबंधात्मक उपाययोजनेकरीता करता येईल. Van Mounted Hydraulic Extension Ladder आल्यानंतर वाहन विभागाकडे ठेवण्यात येईल व ज्या विभागाला गरज भासेल तशी त्या विभागास मागणी करुन घेता येईल. आणिबाणीच्या काळात रेस्क्यू लॅडर म्हणून सुद्धा याचा उपयोग होऊ शकतो. आपणाकडे सर्व बिल्डींग या ४-५ माळयाच्या असून बाहेरील साफसफाई, मेन्टेनन्स

साठी याचा उपयोग होऊ शकतो. या लॅडरला वर्षभर काम उपलब्ध होऊ शकते. याकरीता आपणास Van Mounted Hydraulic Extension Ladder खरेदी करावी लागणार आहे.

सध्याची गरज लक्षात घेता विद्युत विभागाकडील स्ट्रीट लाईट मेन्टेनन्स तसेच संस्थानचे उपरोक्तप्रमाणे विभागांचे वापरासाठी नविन प्रकारची Van Mounted Hydraulic Extension Ladder खरेदी करणे अत्यंत गरजेचे आहे. Van सह Hydraulic Extension Ladder खरेदी करण्याचा तपशील खालीलप्रमाणे :-

| Sr.No. | DESCRIPTION | Qty. | Rate. | Amount. |
|---|---|---|---|---|
| 01) | Tata 407 Van Mounted, Hydraulic Extension Ladder | 01 Nos. | Rs.40,00,000.00 | Rs. 40,00,000.00 |
| | | | **Total Amount :-** | **Rs. 40,00,000.00** |

उपरोक्तप्रमाणे Van सह Hydraulic Extension Ladder ची खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रुपये ४०,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. संस्थान ठरावानुसार रुपये ५ लाखाच्या वरील कामासाठी अथवा खरेदीसाठी ई टेंडरव्दारे तसेच वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा बोलाविणेसाठी या कामास व खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे विद्युत विभागासाठी आवश्यक असलेली २५ मीटर उंचीची Van Mounted Hydraulic Extension Ladder खरेदी करणेसाठी ई टेंडरव्दारे व वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणेस व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच, याकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.२८** **श्री साईभक्तांकरीता मार्गदर्शनासाठी IVRS (Interactive Voice Response System) सुविधा सुरु करणेबाबत.**

**निर्णय क्र.२७** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.२९** **गाय दुध दरवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २०१३-१४ करीता (जुन २०१३ ते मार्च २०१४ अखेर) संस्थानचे कॅन्टीन विभागासाठी आवश्यक दुध पुरवठा करणेकामी मे.गोदावरी खोरे ना.प.पा.ता.सह दुध उत्पा.संघ लि.कोपरगाव व श्री स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव यांना वरील संदर्भीय क्र. १ नुसार प्रति लिटर रु.२४.९० पैसे दराने दररोज गाय दुध होमीजीनाईज्ड व पाश्चराईज्ड, ५०० मिली पॅकिंग, ३.५ ते ३.८ फॅट, ८.५ एसएनएफ पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.त्यांचेकडून पुरवठा आदेशाप्रमाणे व कॅन्टीन विभागाचे मागणीप्रमाणे दुधाचा पुरवठा नियमितपणे चालू आहे.

गोदावरी खोरे ना.प.पा.ता.सह दुध उत्पा.संघ लि.कोपरगाव यांनी दि.०२.१२.२०१३ चे पत्राव्दारे व श्री स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव यांनी दि.०८.१२.२०१३ चे पत्राव्दारे "महाराष्ट्र शासनाने गायीचे दूधात व दि.२५.११.२०१३ पासून रु.२/- दरवाढ केलेली आहे. त्यानुसार आम्हांस दि.२५.११.२०१३ पासून मंजुर दरामध्ये रु.२/- मात्र दरवाढ देणेबाबत" विनंती केलेली असुन सोबत शासन निर्णयाची प्रत जोडलेली आहे.

महाराष्ट्र शासन कृषी,पशुसंवर्धन, दूग्धव्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग मंत्रालय,मुंबई-३२ यांचेकडील शासन निर्णय क्र. एमएलके/२०१३/प्र.क्र.४५/प्रदुम-८, दिनांक २१.११.२०१३ चे आदेशाने "शासकीय दूध योजनेमार्फत बृहन्मुंबई व ग्रामिण योजनांमार्फत होणा-या दूध विक्रीसाठी गाय दूध आणि टोण्ट दूध विक्री दरात प्रति लिटर रु.२/- मात्रने वाढ करण्यात येत आहे. तसेच सदरची दरवाढ ही दि.२५.११.२०१३ पासून लागू करण्यात आलेली आहे.

सबंधीत दोन्ही पुरवठाधारकांशी केलेल्या करारनाम्यातील अट क्र. ५ मध्ये "महाराष्ट्र शासनाने दुध खरेदी दरात दरवाढ केल्यास व संबंधीतांनी शासन निर्णयाची प्रत सादर केल्यानंतर मा.व्यवस्थापन समिती त्याबाबत निर्णय घेईल." असे नमुद केलेले आहे.

तरी मे.गोदावरी खोरे ना.प.पा.ता.सह दुध उत्पा.संघ लि.कोपरगाव व मे.श्री स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव यांनी पुरवठा करावयाचे दुधाच्या मंजुर वार्षिक दरामध्ये शासन निर्णयानुसार मागणी केलेल्या प्रति लिटर रु.२/- मात्रचे दरवाढीबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२८** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**विषय नं.३०** **चपाती/ पुरी, लाडू/ बर्फी व अन्नपाकिटे तयार करणारे ठेकेदार यांना सन २०१४-२०१५ करीता दरवाढीसह मुदतवाढ देणेबाबत अथवा वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्द करुन नव्याने निविदा मागविणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समिती दि.२७/०४/२०१३ चे सभेतील निर्णय क्र.३४७ अन्वये, सन २०१२-२०१३ करीता साईभक्तांना प्रसाद भोजनामध्ये चपाती/पुरी व अल्पोपहार म्हणून विक्री करण्यात येणारी अन्नपाकीटे तसेच मा.व्यवस्थापन समिती दि.०८/१०/२०१३ चे सभेतील निर्णय क्र.१०२ नूसार श्रींचा प्रसाद म्हणून विक्री करण्यात येत असणारे तसेच भक्तांना दर्शन रांगेतूर मोफत देण्यात येत असलेले मोतीचूर लाडू व बर्फी, बनविणेकामी खालील ठेकेदार यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यानूसार

१. जा.नं.एसएसएस-वशी/प्रसादा/५१०/२०१३ दि.३०/०४/२०१३ (चपाती/पुरी)
२. जा.नं.एसएसएस-वशी/प्रसादा/५११/२०१३ दि.३०/०४/२०१३. (चपाती/पुरी)
३. जा.नं.एसएसएस-वशी/प्रसादा/५०९/२०१३ दि.३०/०४/२०१३. (अन्नपाकीटे)
४. जा.नं.एसएसएस-वशी/प्रसादा/३७९३/२०१३ दि.२२/११/२०१३. (लाडू व बर्फी)
५. जा.नं.एसएसएस-वशी/प्रसादा/३७९४/२०१३ दि.२२/११/२०१३. (लाडू व बर्फी)

वरील अं.नं.१ ते ५ नूसार खालीलप्रमाणे चपाती/पुरी,अन्नपाकीटे, मोतीचूर लाडू व बर्फी ठेकेदारांना निन्मतम दराप्रमाणे कार्यादेश देण्यात आलेले आहे.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | कामाचे स्वरुप | सन २०१२-२०१३ |
|---|---|---|---|
| १) | श्री साई केटरर्स, श्रीरामपूर | स्वामी नारायण चपाती तयार करणे<br>पुरी तयार करणे | प्रति क्विंटल रु.८५०/- (सर्व करांसह)<br>प्रति क्विंटल रु.८२५/- (सर्व करांसह) |
| २) | श्री साई सिध्दी महिला बचत गट, शिरडी | स्वामी नारायण चपाती तयार करणे<br>पुरी तयार करणे | प्रति क्विंटल रु.८५०/- (सर्व करांसह)<br>प्रति क्विंटल रु.८२५/- (सर्व करांसह) |
| ३) | श्री शिवसाई केटरर्स & लेबर कॉन्ट्रक्टर, शिर्डी | अन्नपाकीटे तयार करणे | प्रति नग पाकीट ०१/४५ पै. (सर्व करांसह) |
| ४) | श्री दिपक माधव नाईकवाडी, अंदरसुल | मोतीचूर लाडू व बर्फी तयार करणे | लाडू प्रति हजारी रु. २३०/- (सर्व करांसह)<br>प्रति क्विं.साखरेस रु.२००/- (सर्व करांसह) |
| ५) | श्री शिवसाई केटरर्स,& लेबर कॉन्ट्रक्टर, शिर्डी | मोतीचूर लाडू व बर्फी तयार करणे | लाडू प्रति हजारी रु. २३०/- (सर्व करांसह)<br>प्रति क्विं.साखरेस रु.२००/- (सर्व करांसह) |

**अ.नं.१)** साई केटरर्स, श्रीरामपूर हे स्वामी नारायण चपाती/पुरी बनविणेचे काम करतात. त्यांचे कामगारांना सुरवातीपासून निवास, दोन वेळ भोजन व एक वेळ चहा विनामुल्य देण्यात येतो.

**अ.नं.२)** श्री साई सिध्दी महिला बचत गट, शिरडी हे स्वामी नारायण चपाती/पुरी बनविणेचे काम करतात.सदर ठेकेदार स्थानिक असल्यामुळे त्यांनी निवासव्यवस्था घेतलेली नसून त्यांचेकडील कामगारांना सुरवातीपासून निवास, दोन वेळ भोजन व एक वेळ चहा विनामुल्य देण्यात येतो.

**अ.नं.३)** श्री शिवसाई केटरर्स & लेबर कॉन्ट्रक्टर, अन्नपाकीटे ठेकेदार यांचेकडील कामगारांना संख्येनूसार एकवेळचे भोजन व चहाची व्यवस्था संस्थान तर्फे विनामुल्य केली जाते.

**अ.नं.४)** दिपक माधव नाईकवाडी, लाडू व बर्फी ठेकेदार यांचे कामगारांना निवासाकरीता संस्थानचे प्रचलित दराने सेवा आकार घेऊन खोल्या देण्यात येतात. तसेच कर्मचारी संख्येनूसार दोन वेळ भोजन व चहा विनामुल्य देण्यात येतो.

**अ.न.५)** श्री शिवसाई केटरर्स & लेबर कॉन्ट्रक्टर, लाडू व बर्फी ठेकेदार यांचे कामगारांना निवासाकरीता संस्थानचे प्रचलित दराने सेवा आकार घेऊन खोल्या देण्यात येतात. तसेच कर्मचारी संख्येनूसार दोन वेळ भोजन व चहा विनामुल्य देण्यात येतो.

वरील पाचही ठेकेदारांचे कामाची मुदत दि.३१/०३/२०१४ रोजी संपत असल्याने पैकी अ.नं १) चपाती/ पुरी ठेकेदार,श्री साई केटरर्स, श्रीरामपूर व अ.नं.२) चपाती/पुरी ठेकेदार, श्री साई सिध्दी महिला बचत गट,शिरडी, व अ.नं.४) मोतीचूर लाडू व बर्फी ठेकेदार श्री नाईकवाडी यांनी सन २०१४-२०१५ करीता मुदतवाढसह दरवाढ मिळणेबाबत अर्ज सादर केलेला आहे. परंतू अ.नं.३) अन्नपाकीटे व मोतीचूर लाडू व बर्फी ठेकेदार श्री शिवसाई केटरर्स ॲण्ड लेबर कॉन्ट्रॅक्टर, शिरडी, यांनी मुदतवाढसह दरवाढ मिळणेबाबत अर्ज सादर केलेला नाही.

वरील तक्त्यांतील अं.नं.१) श्री साई केटरर्स, श्रीरामपूर, चपाती/पुरी ठेकेदार अ.नं.२) श्री साई सिध्दी महिला बचत गट, शिरडी, चपाती/पुरी ठेकेदार व अ.नं.४) श्री दिपक माधव नाईकवाडी, साकुरी, लाडु/बर्फी ठेकेदार या तीन ठेकेदारांनी पूर्वीचे दरामध्ये + दरवाढसह मुदतवाढ मिळावी अशी पत्राद्वारे विनंती केलेली आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे दरवाढ मागितलेली आहे.

| अ. नं. | ठेकेदाराचे नांव | सन २०१३-२०१४ ची मंजूर रक्कम | मागितलेली दरवाढ | सन २०१४-२०१५ करीता दरवाढीसह होणारी रक्कम |
|---|---|---|---|---|
| १) | श्री साई सिध्दी महिला बचत गट, शिरडी चपाती/पुरी ठेकेदार | चपाती तयार करणे प्रति क्विंटल - रु.८५०/-(सर्व करांसह) पुरी तयार करणे प्रति क्विंटल - रु.८२५/- (सर्व करांसह) | ३०% (रु.२५५.००) ३०% रु.२४८.००) | चपाती तयार करणे प्रति क्विंटल- रु.११०५/- (स.टॅक्ससह) पुरी तयार करणे प्रति क्विंटल- रु.१०७३/- (स.टॅक्ससह) |
| २) | श्री साई केटरर्स, श्रीरामपूर चपाती/पुरी ठेकेदार | चपाती तयार करणे प्रति क्विंटल - रु.८५०/-(सर्व करांसह) पुरी तयार करणे प्रति क्विंटल - रु.८२५/- (सर्व करांसह) | १५% (रु.१२८.००) १५% (रु.१२४.००) | चपाती तयार करणे प्रति क्विंटल- रु.९७८/- (स.टॅक्ससह) पुरी तयार करणे प्रति क्विंटल- रु.९४९/- (स.टॅक्ससह) |
| ३) | श्री दिपक माधव नाईकवाडी, अंदरसुल लाडू बर्फी ठेकेदार | लाडू प्र.हजारी - रु. २३०/-(सर्व करांसह) बर्फी प्र.क्विं.साखर - रु.२००/- (सर्व करांसह) | ४५% (रु.१०४.००) ४५% (रु.९०/-) | लाडू प्रति हजारी रु.३३४/- (स.टॅक्ससह) बर्फी प्रति क्विं.साखरेस रु.२९०/- (स.टॅक्ससह) |

१) श्री साई सिध्दी महिला बचत गट, शिरडी यांनी पुढील वर्षासाठी ३०% दरवाढसह मुदतवाढ व अ.नं.२) श्री साई केटरर्स, श्रीरामपूर यांनी १५% दरवाढसह मुदतवाढ मागितलेली आहे. दोन्ही ठेकेदारांचे दरवाढीमध्ये मोठी तफावत असल्यामुळे मुदतवाढ देणे बाबत विचार करणे गरजेचे वाटते.

३) लाडू व बर्फी ठेकेदार श्री दिपक माधव नाईकवाडी, यांनी दरवाढसह मुदतवाढ मागितलेली आहे. परंतू त्यांनी मागितलेली दरवाढ ही अवाजवी वाटते.

अन्नपाकीटे व मोतीचूर लाडू/बर्फी ठेकेदार श्री शिवसाई केटरर्स अॅण्ड लेबर कॉन्ट्रॅक्टर, यांनी सन २०१४-२०१५ करीता दरवाढसह मुदतवाढ मिळणेबाबत अर्ज सादर केलेला नसल्यामुळे श्री दिपक माधव नाईकवाडी, लाडु व बर्फी ठेकेदार यांचे एकटयाच्याने भक्तांचे गरजेएवढे लाडूचा पुरवठा केला जाणार नाही. उर्वरीत दोन चपाती/पुरी ठेकेदार श्री साई केटरर्स, श्रीरामपूर व श्री साई सिध्दी महिला बचत गट, शिरडी तसेच श्री दिपक माधव नाईकवाडी, लाडू/बर्फी ठेकेदार यांनी सादर केलेल्या दरवाढसह मुदतवाढ मिळणेबाबतचे अर्जांमध्ये साम्यता आढळून येत नाही. त्यामुळे कामकाजाच्या सोईचे दृष्टीने कुणासही मुदतवाढ न देता वृत्तपत्रात जाहीरात देऊन निवीदा मागविणेत याव्यात असे नम्र मत आहे.

तरी वरीलप्रमाणे तीन ठेकेदार यांचे विनंती अर्जानुसार दरवाढसह मुदतवाढबाबत अथवा उपरोक्त कामासाठी वृत्तपत्रात जाहिरात देऊन निवीदा मागविणेबाबत मा.त्रिसदस्यीय समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, चपाती/ पुरी, लाडू/ बर्फी व अन्नपाकिटे तयार करणाऱ्या ठेकेदारांची मुदत संपुष्ठात येत असल्याने सन २०१४-२०१५ करीता तात्काळ वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्द करुन नव्याने निविदा मागविणेत याव्या, असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, श्री साई प्रसादालय)

---

**विषय नं.३१** **श्री साई प्रसादालयामधील स्वच्छता/ हाऊसकिपींगचे काम आऊट सोर्सिंग पध्दतीने करुन घेणेसाठी वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्द करुन नव्याने निविदा मागविणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूदः-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ (भाग- ४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील २१ (१ घ) नूसार भक्तांना जेवण पुरवणे आणि अन्नछत्र चालवणे.

**प्रस्ताविक :-** श्री साई प्रसादालयातील स्वच्छता /हाऊसकिपींगचे काम आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेण्यात येत आहे. १ एप्रिल २०१३ ते ३१ मार्च २०१४ करीता सदर काम आऊट सोर्सिंग पध्दतीने देणेकामी दि.०७/११/२०१२ रोजी वृत्तपत्रात व संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. वृत्तपत्रातील जाहिरातीनूसार आलेले सर्व दरपत्रक मा.व्यवस्थापन समिती दि.२६/०२/२०१३ चे सभेपुढे ठेवण्यात आलेले होते. सदर सभेतील निर्णय क्रं.१४४ अन्वये उपरोक्तकामी निवीदा सादरकर्त्याकडून वापरणेत येणारी मशिनरी, मनुष्यबळाची संख्या, कामाचा दर्जा, काम करण्याची पध्दती व कामाचा अनुभव या सर्व बाबींचा विचार होऊन दि.०१/०४/२०१३ ते ३१/०३/२०१४ या कालावधीसाठी मे.बी.व्ही.जी. इंडिया लि., पुणे यांचे दरमहा रक्कम रु.११,००,०००/- ( अक्षरी रुपये अकरा लाख मात्र) दर मान्य करुन काम देण्यात आलेले आहे. सदर कामाची मुदत दिनांक ३१/०३/२०१४ रोजी संपत आहे.

बी.व्ही.जी.इंडिया प्रा.लि.पुणे यांनी दिनांक ०१/०४/२०१३ ते आजपावेतो या कालावधीमध्ये स्वच्छता/ हाऊसकिपींग/पेस्ट कंट्रोलचे काम समाधानकारक केलेले आहे. सदरील कामाचा कालावधी

दिनांक ३१/०३/२०१४ रोजी संपणार असल्याने पुढील कालावधीसाठी हाऊसकिपींग व पेस्ट कंट्रोल अभावी साईभक्तांची अडचण निर्माण होवू नये, याकरीता सन २०१४-२०१५ साठी वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द करुन नव्याने निविदा मागविणे गरजेचे आहे.

**मागणी:-** सध्या असलेले ठेकेदार बी.व्ही.जी.इंडिया प्रा.लि.पुणे यांचे कामाची मुदत दि.३१/०३/२०१४ रोजी संपत असल्याने, सन २०१४-२०१५ साठी वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द करुन नव्याने निविदा मागविणे गरजेचे आहे.

**संस्थान अधिनियम/ठराव यानूसार अनुमान :-**आर्थिक

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:-** तरी साईभक्तांची स्वच्छता/हाऊसकिपींग व पेस्ट कंट्रोल अभावी अभावी गैरसोय होवू नये म्हणून पुढील कालावधीसाठी सन-२०१४-२०१५ करीता वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन नव्याने निवीदा मागविणेस प्रशासकीय मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन त्रिसदस्य समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, श्री साई प्रसादालय)

---

**विषय नं.३२** **साईभक्तनिवासाकरीता नविन बेडशीट उशी कव्हरसह, फोम उशी खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** साईभक्तनिवासाकरीता आवश्यक बेडशीट उशीकव्हरसह, फोम उशी, खरेदी प्रस्ताव सर्व आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून संदर्भ क्रं-३ नुसार पूढिल कार्यवाहीसाठी खरेदी विभागाकडें सादर केला.

खरेदी विभागाने सदरचा प्रस्ताव संदर्भ क्रं- ४ चे पत्रासोबत उचीत कार्यवाही विना परत पाठविला आहे. प्रस्तावासोबतचे पत्रामध्ये खालीलबाबीमुळे कार्यवाही करता येत नसल्याचे व उचीत कार्यवाहीसाठी सदरच्या निर्णयामध्ये योग्य ती दुरुस्तीकरुन फेरसादर करणेबाबत कळविले आहे.

| अ.क्र | खरेदी विभागाचा मुद्दा | विभागाचा अभिप्राय |
|---|---|---|
| १ | सदर निर्णयामध्ये नवीन बेडशीट, उशीकव्हरसह, फोम उशी व गादीकव्हर खरेदी करतेवेळी निविदेमध्ये पुरवठा धारकांकडून सध्याचे व दुस-या दिड वर्षाने आवश्यक असलेल्याची संख्या निश्चित करावी असे नमुद आहे. मुळात बेडशीट उशीकव्हर गादीकव्हर यांची संख्या निश्चित करणे संबंधित विभागाची जबाबदारी असते त्यामुळे सदर गोष्टीचे आकलन होत नाही. | खरेदी प्रक्रिया सुरु करणेसाठी खरेदी विभागाकडे मंजूर निर्णयाच्या प्रतिसह सर्व संबंधित कागदपत्रे उदा.मुळप्रस्ताव, मा. व्यवस्थापन समितीसमोर सादर करावयाची संक्षीप्त टिपणी,मा. न्यायालयाची मंजूरी सोबत पाठविणेचा शिरस्ता आहे. जेणेकरून खरेदी प्रक्रियेमध्ये अडचण येऊ नये.<br>प्रस्तुत नस्तीमध्ये मुळ प्रस्ताव सलग्न आहे. सदरच्या मुळ प्रस्तावामध्ये प्रत्येक विभागाने त्यांना आवश्यक संख्या निश्चित करुनच प्रस्ताव सादर केलेला आहे. खरेदी एकदाच आवश्यक त्या सर्व नगाची करावी असे नमूद आहे.<br>संमंत निर्णयामध्येच आवश्यक संख्येचे दोन टप्पे करुन खरेदीस मान्यता दिलेली आहे. |
| २ | निर्णयामध्ये नवीन बेडशीट,उशीकव्हर, गादी कव्हर खरेदीकरते वेळी निविदेमध्ये पुरवठाधारंकडून सध्याचे व दुस-या दिड वर्षाने आवश्यक असलेल्याची संख्या निश्चित करुन त्यासाठी त्यांचा निविदेमध्ये समावेश करण्यात येऊन निविदा मागविण्यात याव्यात व त्यांचे दोनही वेळचे दर व नमुने निश्चित करण्यात यावेत यानुसार दिड वर्षाने त्याच मंजूर दराने त्यांचेकडून दुस-या टप्यातील बेडशीट, उशीकव्हर, गादी कव्हर यांची खरेदी करुन घेण्यात यावी असे ठरले.<br>याबाबत संस्थानचे नियमीत पुरवठा धारंकाना फोनव्दारे विचारणा केली असता त्यांनी आंतरराष्ट्रीय बाजारात रुपयाचे चढ-उतारामुळे टेक्सटाईल इंड्रस्टीजमध्ये कापडाचे दर हे दररोज बदलत असतात त्यामुळे पुढिल दिड वर्षाचे दर देण्यास असमर्थता दर्शविलेली आहे. | खरेदी विभागाचा हा मुद्दा रास्त आहे. यासाठी प्रस्तावात नमूद संख्येप्रमाणे बेडशीट उशीकव्हर, गादी कव्हर, फोमउशी खरेदीकरुन आवश्यकतेनुसार त्यांचा वापर करता येईल.<br>किबहूना हाच मुद्दा विचारात घेऊन नेहमीप्रमाणे प्रस्ताव मान्यतेसाठी सादर केला होता.<br>कोणत्याही खरेदीकामी जास्तीतजास्त तीन ते चार महिन्यांचे मुदतीचे दर देता येतील असे नमुद असल्याने प्रस्तुतचे मंजुर निर्णयामध्ये योग्य ती दुरुस्तीकरुन कार्यवाही करणे उचीत ठरेल. |

यासाठी नमूद दि.२७/०४/२०१३ रोजीचे सभेमधील विषय नं.५८ व निर्णय क्र.४०१ या मंजूर निर्णयामध्ये दुरुस्ती करावी लागणार आहे. **प्रस्तावित दुरुस्त्या खालीलप्रमाणे केल्यास** खरेदीप्रकिया सुचारु पध्दतीने होऊन साईभक्तासाठी आवश्यक बेडशीट उशीकव्हरसह, फोमउशी व गादीकव्हर खरेदी तातडीने करता येईल.

| अ.नं | पुर्वीचा मंजुर प्रस्ताव | दुरुस्तीकरुन मंजुरीसाठीचा प्रस्तावीत प्रस्ताव |
|---|---|---|
| १ | विषय नं.५८ व निर्णय क्र.४०१ दि.२७/०४/२०१३ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान भक्तनिवासस्थांनामधील बेडशीट, उशीकव्हर व गादीकव्हर दीड वर्षानी (१८ महिने) नंतर बदलणेस मान्यता देण्यात आली.<br>तसेच, नविन बेडशीट, उशीकव्हर व गादीकव्हर खरेदी करतेवेळी निविदेमध्ये पुरवठाधारकांकडून सध्याचे व दुस-या दीड वर्षानी आवश्यक असलेल्यांची संख्या निश्चित करुन, त्यासाठी त्यांचा निविदेमध्ये समावेश करण्यात येवून निविदा मागविण्यात याव्यात व त्यांचे दोनही वेळचे दर व नमुने निश्चित करण्यात यावे. यानुसार दीड वर्षानी त्यामंजुर दराने त्यांचेकडून दुस-या टप्प्यातील बेडशीट, उशीकव्ह व गादीकव्हर यांची खरेदी करुन घेण्यात यावी. पुर्वीचे बदलेले बेडशीट, उशीकव्हर व गादीकव्हर यांचा लिलाव/ वार्षिक निश्चित केलेल्या दराने विक्री करणेत यावी, असे ठरले.<br>तसेच, उपरोक्त खरेदीकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.३१,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. | यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान भक्तनिवासस्थांनामधील बेडशीट, उशीकव्हर व गादीकव्हर दर दीड वर्षानी (१८ महिने) बदलणेस मान्यता देण्यात आली.<br>तसेच संस्थानचे भक्तनिवासांसाठी आवश्यक नविन बेडशीट उशीकव्हरसह, तथा फोम उशी, गादीकव्हर खरेदीस निविदा मागवून संबंधित विभागाचे मागणीनुसार व मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचे सिव्हिल ॲप्लीकेशन नं. ९४२१/२०१३ दि.०२/०८/२०१३ चे मान्यतेनुसार एकदम करण्यात यावी. संबंधित विभागांनी त्यांचें आवश्यकतेनुसार आलेल्या वस्तुंचा वापर करावा. पुर्वीचे बदललेले बेडशीट उशीकव्हरसह, गादीकव्हर यांचा निर्णयाप्रमाणे लिलाव/ वार्षिक निश्चित केलेल्या दराने विक्री करण्यात यावी असे ठरले.<br>तसेच उपरोक्त खरेदीकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये ३१,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. |

खरेदी प्रक्रियेस अडथळे निर्माण होत असल्याने यापुर्वी दि.२७/०४/२०१३ चे सभेतील विषय नं.५८ व निर्णय क्र.४०१ चे निर्णयामध्ये प्रस्तावीत केलेप्रमाणे दुरुस्ती होणेकामी चर्चा होऊन निर्णय होणेस्तव सादर.

**निर्णय क्र.३१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा भक्तनिवासकरीता नविन बेडशीट, कव्हरसह फोम उशी खरेदी प्रक्रियेस अडथळे निर्माण होत असल्याने, यापुर्वी दि.२७/०४/२०१३ चे सभेतील निर्णय क्र.४०१ मध्ये प्रस्तावीत केलेप्रमाणे दुरुस्ती करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान)

---

**विषय नं.३३** **ऑन लाईन रुम आरक्षण नियमावलीत बदल करणेबाबत.**

**प्रस्ताव-** द्वारावती निवासस्थान इमारतीमध्ये नॉन एसी २३६ व एसी ८० अशा एकूण ३१६ खोल्या भक्तांचे निवासाकरीता उपलब्ध आहेत.जुलै २०११ पासून साईटेक संगणक प्रणाली कार्यान्वीत करण्यात आली आहे.या प्रणालीद्वारे इमारतीमधील नॉन एसी २२१ व एसी ६५ अशा एकूण २८६ खोल्या भक्तांना ऑन लाईन पद्धतीने आगाऊ आरक्षण करणेसाठी माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत संस्थानचे वेबसाईटर उपलब्ध करण्यात आलेल्या आहेत.

निवासी भक्तांकरीता ऑन लाईन पद्धतीने आगाऊ खोल्या आरक्षीत करणेसाठी माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत नियमावली तयार करण्यात आलेली आहे.या नियमावलीमध्ये एका व्यक्तीसाठी खोली आरक्षीत करण्याची सुविधा आहे. या पुर्वी संस्थानचे निवासस्थानात एका व्यक्तीसाठी खोली दिली जात नव्हती.त्या व्यक्तीसाठी लॉकर्स देऊन त्याची सुविधा करण्यात येत असे.तसेच एका व्यक्तीला खोली दिल्यास इतर कुटुंबवत्सल साईभक्त खोलीपासून वंचीत राहतात.इमारतीचे सर्व खोल्यांमध्ये तीन बेडची सुविधा असल्याने एका व्यक्तीमुळे २ बेड खाली राहतात.फक्त सेवा आकार संस्थान नावे जमा होतो. एका व्यक्तीस खोली दिल्यास भविष्यात त्याचे कडुन अनुचित प्रकार घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

संस्थानचे सर्व निवासस्थानमधील खोल्या तीन किंवा त्यापेक्षा जास्त बेडच्या आहेत.या खोल्यांमध्ये कुटुंब वत्सल साईभक्तांची निवासाची सोय महत्वाची असल्याने ऑन लाईन पद्धतीमध्ये एका

व्यक्तीसाठी खोली आरक्षीत करण्याची सुविधा नसावी.किंवा कमीत कमी तीन व्यक्तींकरीता खोली आरक्षीत करता येईल असा नियम ऑन लाईन रुम आरक्षण नियमावलीत माहिती व तंत्रज्ञान विभागामार्फत समाविष्ट करणे आवश्यक व गरजेचे आहे.सदरचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.३२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानची निवासस्थाने पुर्ण क्षमतेने भरली जात नाहीत व येणाऱ्या सर्व भक्तांना निवासासाठी खोल्या मिळत आहेत, त्यामुळे सध्या ऑन लाईन रुम आरक्षण नियमावलीत बदल करणेत येऊ नये, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, द्वारावती भक्तनिवास)

---

**विषय नं.३४** **द्वारावती निवासस्थानसाठी प्लॅस्टीक ट्रे खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** द्वारावती भक्तनिवास मधील खोल्या साईभक्तांचे निवासासाठी दि.५/०३/२००९ पासून सुरु करण्यात आल्या आहे. या इमारती मध्ये नॉन एसी २३६ व एसी ८० एकूण ३१६ खोल्या आहे.या सर्व खोल्यांमधील भक्तांना पाणी पिण्यासाठी प्रत्येक मजल्यावर पुर्व व पश्चिम बाजूस प्रत्येकी १ या प्रमाणे २ नग वॉटर कुलर बसविण्यात आलेले आहे.तसेच प्रत्येक खोली मध्ये पाण्याचे स्टील ग्लास, जग व त्यासाठी आवश्यक असलेले प्लॅस्टीक ट्रे सन २०११ मध्ये खरेदी करण्यात आलेले आहे.भक्तांचे सोयीसाठी वरील सर्व वस्तु खोल्यांमध्ये ठेवण्यात आलेले आहे.

त्यामध्ये प्लॅस्टीक ट्रे हे सततच्या वापराने खराब झालेले आहे.तरी ३१६ खोल्यांकरीता ३१६ नग व तुटफुट झाल्यास त्यासाठी जादा ३४ असे एकूण नवीन ३५० नग प्लॅस्टिक ट्रे खरेदी करणे आवश्यक आहे.त्यासाठी Cello कंपनीचे Exotica Tray Deluxe Small ट्रे ची अंदाजे प्रती नग किंमत रु.२०० असून ३५० नग खरेदीसाठी अंदाजे रु.७०,०००/- ( अक्षरी रुपये सत्तर हजार मात्र) खर्च अपेक्षित आहे.

सध्याला साईआश्रम भक्तनिवास विभागामार्फत सेलो कंपनीचे प्लॅस्टिक ट्रे चे दरपत्रक मागवून खरेदी प्रक्रिया चालु असून त्यावर मा.त्रीसदस्यीय व्यवस्थापन सभेपुढे ज्या दराने खरेदी बाबतचा निर्णय होईल.त्याच दराने त्याच पुरवठाधारकाला या विभागातील ३५० नगाचा पुरवठा आदेश देता येईल.

तरी सदरचे खरेदीसाठी येणा-या खर्चास मंजूरी मिळणेस तसेच साईआश्रम भक्तनिवास कडील प्लॅस्टीक ट्रे पुरवठा धारकांचे निश्चिती नंतर त्याच धर्तीवर या विभागाचा पुरवठा आदेश देणेस मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व याकामी येणाऱ्या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, द्वारावती भक्तनिवास)

---

**विषय नं.३५** **संस्थान नियुक्त अंतर्गत लेखापरिक्षक, पुर्वलेखापरिक्षक यांची नव्याने नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानच्या कामकाजात दिवसेंदिवस वाढ होत आहे. संस्थानच्या आर्थिक कारभारात अधिकाधिक पारदर्शकता यावी आर्थिक व्यवहार सुरळीत पणे पार पाडावेत व्यवहारात त्रुटी राहु नये या उद्देशाने मा. व्यवस्थापन समितीने सन २००५-०६ या आर्थिक वर्षापासुन संस्थानचे आर्थिक व्यवहाराचे लेखापरिक्षण होण्यासाठी पुर्व लेखापरिक्षक व अंतर्गत लेखापरिक्षक यांची नेमणुक करण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार प्रत्येक वर्षासाठी या लेखापरिक्षकांच्या नेमणुका होत आहेत.

मा. व्यवस्थापन समितीच्या दि. २१ जून,२०१३ रोजीच्या सभेतील निर्णय क्र. ४८१ अन्वये खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे लेखापरिक्षकांची संस्थानने मानधनावर नेमणूक करण्यात आलेल्या आहेत. त्याप्रमाणे त्यांना नियुक्ती आदेश देण्यात आले आहेत.

| अ.क्र | तपशिल | लेखापरिक्षक संस्थांची नावे | मानधन | एकत्रीत मानधन |
|---|---|---|---|---|
| ०१ | संस्थान पूर्व लेखापरीक्षक | श्री.मे.अभय शास्त्री ॲण्ड असो.पुणे | २,२०,०००/- + सेवाकर | ४,६०,०००/- + सेवाकर |
| ०२ | संस्थान अंतर्गत लेखापरीक्षक | श्री.सुरेश डौले ॲन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस राहुरी | २,४०,०००/-+ सेवाकर | |
| ०३ | रुग्णालय अंतर्गत लेखापरीक्षक | श्री.एस.एल.कुलकर्णी चार्टर्ड अकौटंटस कोपरगाव. | २,१०,०००/-+ सेवाकर | ४,०५,०००/-+ सेवाकर |
| ०४ | रुग्णालय पूर्व लेखापरीक्षक | श्री.व्ही.व्ही.कोठारी चार्टर्ड अकौटंटस श्रीरामपुर | १,९५,०००/-+ सेवाकर | |
| ०५ | कर सल्लागार | श्री.शंकर अंदाणी चार्टर्ड अकौटंटस, अहमदनगर | १,७५,०००/-+ सेवाकर | |
| ०६ | माहिती व सुविधा केंद्रासाठी | श्री अमोल दातार चार्टर्ड अकौटंटस, पुणे | ५०,०००/- + सेवाकर | |

उपरोक्त नेमणुकी प्रमाणे संस्थानमध्ये लेखापरिक्षक त्यांना नेमणुक आदेशामध्ये दिलेल्या मानधनावर काम करीत आहेत. परंतु श्री.सुरेश डौले अॅन्ड कं. चार्टर्ड अकौटंटस राहुरी, श्री.व्ही.व्ही.कोठारी चार्टर्ड अकौटंटस श्रीरामपुर आणि श्री.मे.अभय शास्त्री अॅण्ड असो.पुणे यांनी संस्थानला लेखी पत्र पाठवुन संस्थान सध्या देत असलेल्या मानधनामध्ये काम करणे अवघड होत आहे. लेखापरिक्षण करण्यासाठी आम्हाला मनुष्यबळाची गरज असल्याने ते या मानधनात पुरविणे शक्य होत नाही. आम्हास संस्थानने काहीप्रमाणात मानधन वाढवुन दिल्यास आम्हाला संस्थानसाठी चांगल्या प्रतीच्या सेवा पुरविणे शक्य होईल असे पत्रात नमुद केले आहे.

संस्थानमध्ये सध्या पुर्व व अंतर्गत लेखापरिक्षण करणेसाठी ०४ लेखापरिक्षक असुन ०१ कर सल्लागार व ०१ माहिती व सुविधा केंद्रासाठी असे एकुण ०६ लेखापरिक्षकांची नेमणुक करण्यात आलेली आहे. संस्थानमध्ये रुग्णालयांचे हिशेब स्वतंत्र्य असल्याने तेथील लेखापरिक्षण स्वतंत्र्यरित्या केले जाते. लेखापरिक्षकांची संख्या जास्त झाल्याने त्यांचे कामकाज व्यवस्थित सुरु आहे किंवा कसे यावर संस्थानचे प्रभावी नियंत्रण राहू शकत नाही. प्रत्येक लेखापरिक्षक आपली जबाबदारी इतरांवर ढकलण्याचा प्रयत्न केल्याने त्यांच्याकडून संस्थानला चांगल्या प्रतीच्या सेवा मिळत नाहीत, तसेच आवश्यक त्यावेळी संस्थानला योग्य ते मार्गदर्शन होत नसल्याचे दिसुन येत आहे. लेखापरिक्षण कामकाजात सुसुत्रता येण्यासाठी व कामकाज योग्यरीतीने पार पाडण्यासाठी लेखापरिक्षकांची संख्या कमी करुन पुर्व व अंतर्गत लेखापरिक्षक असे दोनच लेखापरिक्षक संस्थान व रुग्णालय विभागासाठी ठेवण्यात यावेत संस्थानसाठी जे पुर्व लेखापरिक्षक असतील त्यांचेकडेच रुग्णालय विभागाचे अंतर्गत लेखापरिक्षण देण्यात यावे तसेच रुग्णालयाचे जे पुर्व लेखापरिक्षक असतील त्यांना संस्थानचे अंतर्गत लेखापरिक्षणाचे कामकाजाची जबाबदारी देण्यात यावी. सध्या मानधन विभागून जात असल्याने प्रत्येक लेखापरिक्षकांना देण्यात येणाऱ्या मानधनात सेवा पुरविणे अवघड होत असल्याचे त्यांचे पत्रावरुन दिसुन येत आहे. हेच मानधन चार लेखापरिक्षकां ऐवजी ०२ लेखापरिक्षकांना दिल्यास व त्यात थोडी वाढ करुन दोन्ही लेखापरिक्षकांना रुपये ०५ लाख प्रत्येकी असे मानधन दिल्यास त्यांना संस्थानला यथायोग्य सेवा पुरविणे शक्य होईल असे मत आहे.

उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे संस्थानसाठी ०२ लेखापरिक्षकांची नेमणुक नविन मानधनावर प्रत्येकी रुपये पाच लाख मात्र करण्यासाठी सध्या संस्थानमध्ये काम करत असलेल्या लेखापरिक्षकांकडून नव्याने अर्ज मागवून त्याप्रमाणे कार्यवाही करता येईल. त्याव्यतिरीक्त कर सल्लागार श्री.शंकर अंदाणी चार्टर्ड अकौटंटस. अहमदनगर, माहिती व सुविधा केंद्रासाठी श्री.अमोल दातार चार्टर्ड अकौटंटस. पुणे, तसेच परकिय चलनाच्या लेखापरिक्षण व मुंबई कार्यालय अंतर्गत लेखापरिक्षक म्हणुन नियुक्त करण्यात आलेले श्री.एन.पी.रेडीज अॅण्ड कं.चार्टर्ड अकौटंट, मुंबई, व आयकरासाठी श्री. राहूल केळकर असो. चार्टर्ड अकौटंट, मुंबई, यांची पुर्वीच्याच अटी शर्तिवर नेमणुक कायम ठेवता येईल.

तरी संस्थान नियुक्त अंतर्गत लेखापरिक्षक, पुर्वलेखापरिक्षक यांची नव्याने नेमणुक करणेबाबत त्यांचेकडून नव्याने अर्ज मागवुन घेणे अगर या मानधनात सदर लेखापरिक्षक काम करण्यास तयार नसतील तर इतर लेखापरिक्षकांकडून या मानधनावर काम करण्याबाबतचे अर्ज मागवुन घेण्याच्या कार्यवाहीसाठीचा निर्णय होणेकामी मा.त्रीसदस्सीय समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.३४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानच्या आर्थिक कारभाराचे लेखापरिक्षण होण्यासाठी सध्या आहे त्याच संस्थांमधून फक्त दोनच संस्थांची नेमणूक करावी व त्यांच्या मानधनात वाढ करुन देण्यात यावी, असे ठरले.**

**तसेच, लेखापरिक्षण संस्थांची नेमणूक व मानधन ठरविणेचे अधिकार मा.कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करणेत आले.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.३६** **माहे जानेवारी- २०१४ अखेर गुंतवणूकीविषयी निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** माहे **जानेवारी,२०१४** अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे : -

| अ.नं. | तपशील | मुदतपूर्तीचा दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| १) | बँक ऑफ बरोडा,नाशिक | ३/१/२०१४ | २७,३६,४५,१८२/- |
| २) | बँक ऑफ बरोडा,नाशिक | १६/१/२०१४ | २२,९८,८४,४२७/- |
| ३) | बँक ऑफ बरोडा,नाशिक | १७/१/२०१४ | १,०९,४६ ,८७७/- |
| ४) | आंध्रा बँक, शिर्डी (NPAY) | १७/१/२०१४ | ७४,८८,०४७ /- |
| ५) | आंध्रा बँक, शिर्डी (NPAY) | २६/१/२०१४ | ५०,०१ ,५६३/- |
| ६) | सेंट्रल बँक ऑफ इंडिया,शिर्डी | ३१/१/२०१४ | १०,९४,६८,७७५/- |
| ७) | दैनंदिन खर्च वजा जाता माहे जानेवारी २०१४ अखेर | | १०,००,००,०००/- |

गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी अंदाजे रक्कम

**एकूण रक्कम- ७३,६४,३४,८७१/-**

वरील तपशीलानुसार साधारणतः रक्कम **रु. ७३.६४ कोटी** गुंतवणूकीसाठी उपलब्ध आहेत.

उपलब्ध होणारी रक्कम ही नियमित सेवा देणा-या राष्ट्रीयीकृत बँकेकडे उच्चतम व्याजदराने गुंतविल्यास त्यांचेकडून संस्थानला जास्तीत-जास्त सेवाही मिळविता येतील. विश्वस्तव्यवस्थेचे वैधानिक लेखापरिक्षण करतेवेळी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होत असलेली रक्कम ही स्थानिक राष्ट्रीयीकृत/सेवा देणा-या बँकेकडेच जास्तीत-जास्त व्याजदराने गुंतविण्यात यावी असे लेखापरिक्षक यांनी सुचविले असल्याने, संस्थानला प्रामुख्याने सेवा देणा-या खालील बँकांकडून व्याजदर मागवून जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे सदरची गुंतवणूक करता येईल असे नम्र मत आहे :-

१ ) आंध्र बँक, शिर्डी
२) बँक ऑफ बरोडा, नासिक
३) बँक ऑफ इंडीया, शिर्डी
४) कॅनरा बँक, शिर्डी
५) सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी
६) कॉर्पोरेशन बँक, शिर्डी
७) देना बँक, शिर्डी
८) स्टेट बँक ऑफ इंडीया, शिर्डी
९) युको बँक, शिर्डी
१०) युनियन बँक ऑफ इंडीया, शिर्डी
११) बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी
१२) विजया बँक, शिर्डी
१३) इंडीयन बँक, शिर्डी
१४) ओरीएंटल बँक ऑफ कॉमर्स, शिर्डी
१५) स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, शिर्डी

तरी अ.नं. १ ते १५ या बँकांकडून जसजशी गुतवणूकीसाठी रक्कम उपलब्ध होईल तसतसे व्याजदर मागवून जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम **रु.७३.६४ कोटींची** टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करण्यासाठी सदरचा विषय मा व्यवस्थापन समितीच्या मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.३५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे अ.नं. १ ते १५ या सर्व स्थानिक राष्ट्रीयीकृत सेवा देणाऱ्या बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणाऱ्या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रु. ७३.६४ कोटी मात्र रक्कमेची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.३७** **दक्षिणा पेटी मोजणीसाठी कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या मंदिर व परिसरातील दक्षिणापेटयांतील रकमेची मोजणी साधारणपणे आठवडयातून दोन वेळेस होत असते. याकामी संस्थानमधील विविध विभागातील साधारणतः १२५ ते १३० कायम संस्थान कर्मचारी हजर असतात. दक्षिणा पेटीतील रक्कम मोजणीच्या कामासाठी उपरोक्त संदर्भान्वये प्रत्येक कर्मचा-यास सन २००६ पासून ७५/- विशेष मेहनताना देण्यात येत आहे.

तथापि, पूर्वी दक्षिणा पेटयांतील रकमेची मोजणी आठवड्यातून एक वेळेस होत असे व त्यामध्ये साधारणतः ४० ते ५० लाखापर्यंत रक्कम प्राप्त होत असे. परंतु, दिवसेंदिवस साईभक्तांच्या वाढत्या संख्येमुळे यामध्ये वाढ होत चालली असून, सध्या दक्षिणा पेट्यातील रकमेची मोजणी आठवडयातून दोन वेळेस घ्यावी लागत आहे. तसेच दक्षिणापेटयांतून मिळणा-या रकमेतही मोठया प्रमाणात वाढ होत चाललेली आहे. सध्या प्रत्येक मोजणीमधून साधारणतः १.५० ते २ कोटीपर्यत रक्कम प्राप्त होत आहे.

दक्षिणा पेटीतील रकम मोजणीच्या कामासाठी संस्थानच्या विविध विभागातील कर्मचारी सकाळी ७.३० वाजता उपस्थित राहतात. तद्नंतर सदर काम पूर्ण झाल्यावर प्रत्येक कर्मचा-यास त्याला ठरवून दिलेले त्याचे नित्याचे कार्यालयीन कामकाज करावे लागत आहे, त्यामुळे त्यांचेवर कामाचा व वेळेचा ताण पडतो.

सदर कामामध्ये दिवसेंदिवस वाढ होत गेलेली असल्याने, सन २००६ पासून देण्यात येणारा रु.७५/- मात्र विशेष मेहनतानामध्ये वाढ करणे गरजचे आहे. सदर कामासाठी देण्यात येणा-या विशेष मेहनताना रक्कम रु.७५ ऐवजी रु.१००/- मात्र इतका करण्यात यावा, असे मत आहे.

उपरोक्तप्रमाणे विशेष मेहनतानाच्या रकमेमध्ये वाढ केल्यास, एकूण १३० कर्मचा-यांसाठी प्रति दक्षिणा पेटीतील रक्कम मोजणीसाठी साधारणतः रु.३,२५०/- मात्र इतका वाढीव खर्च अपेक्षित आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे दक्षिणा पेटीतील रक्कम मोजणीच्या कामांकरीता येणा-या कायम कर्मचाऱ्यांना सध्या देण्यात येणाऱ्या विशेष मेहनताना रूपये ७५/- ऐवजी १००/- देणेबाबत मा.त्रिसदस्यीय समितीची मान्यता मिळणेकामी सविनय सादर.

**निर्णय क्र.३६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, यावर सविस्तर चर्चा होऊन, दक्षिणा पेटीतील रक्कम मोजणीसाठी येणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना दि.१० जानेवारी, २०१४ पासून विशेष मेहनताना रूपये ७५/- ऐवजी १००/- मात्र देणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.३८** **नवीन टायर्स खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** वाहन विभागाकडील वापरात असलेल्या खालील प्रमाणे कार्यालयीन-०२, शववाहीका-०१, स्कुलबस-०२, भक्तनिवास बसेस-०५ व ट्रॅक्टर-०२ अशा एकुण १२ वाहनांचे सध्याचे टायर्स खराब झालेने त्यांना नवीन टायर्स (टयुब, फ्लॅपसह) खरेदी करणे आवश्यक आहे. त्यांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. नं. | वाहन क्रं. | वाहन प्रकार / वापर | सध्याचे टायरचा एकूण वापर | आवश्यक टायर्स साईज | टायरची कंपनी | टायर्स नग |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | MH-17-AJ-1691 | स्विफ्ट डिझायर कार्यालयीन वाहन | ४५,७१२ | १६५-८०R-१४ | ब्रिजस्टोन (टयुबलेस) | ०५ |
| ०२ | MH-17-V-8483 | महिंद्रा झायलो कार्यालयीन वाहन | ७१,६०३ | २१५-७५R-१५ | ब्रिजस्टोन (टयुबलेस) | ०४ |
| ०३ | MH-17-AG-2420 | टाटा४०७ शववाहिका | ३८,११४ | ७-००-१६ | अपोलो | ०७ |
| ०४ | MH-17-T-8502 | टाटा बस | ३८,१२५ | ९-००-२० | अपोलो | ०२ |
| ०५ | MH-17-T-8503 | स्कुल बस | ३७,१६४ | ९-००-२० | अपोलो | ०२ |
| ०६ | T-3301, T-3302 T-8504, T-8505 & T-7109 | पाच भक्तनिवास बसेसचे स्टेपनी | --- | १०-००-२० | अपोलो | ०५ |
| ०७ | MH-17-V-6421 | स्वराज ट्रॅक्टर | २९५२ तास | ६-००-१६ | अपोलो | ०२ |
| ०८ | MH-17-H-284 | मालवाहतुक | ३,१२५ तास | ६-००-१६ | अपोलो | ०२ |
| | | | | | **एकुण टायर्स** | **२९** |

वरील प्रमाणे विविध प्रकारचे २९ टायर्स (टयुब, फ्लॅपसह) खरेदी करणे आवश्यक आहे. या कामी सध्याचे मार्केटमधील दरानुसार रु.३,५०,०००/- (अक्षरी रक्कम रु. तिन लाख पन्नास हजार) मात्र खर्च अपेक्षीत आहे.

उपरोक्त वाहनांकरीता नवीन टायर्स ब्रिजस्टोन व अपोलो कंपनीचे अधिकृत डिलर यांचेकडून कोटेशन बोलावुन खरेदी करण्यात येतील.

तरी वरील प्रमाणे संस्थान वाहनांकरीता नवीन २९ टायर्स (टयुब, फ्लॅपसह) खरेदी करणेस व या कामी येणारे अंदाजे रु.३,५०,०००/- (अक्षरी रक्कम रु. तिन लाख पन्नास हजार) मात्रचे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, वाहन विभागाकडील वापरात असलेल्या प्रस्तावात नमुद केलेल्या वाहनांकरिता नवीन २९ टायर्स (टयुब, फ्लॅपसह) खरेदी करणेसाठी ब्रिजस्टोन, अपोलो कंपनीचे अधिकृत डिलर्सकडून कोटेशन मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.३,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वाहन विभागप्रमुख)

---

**विषय नं.३९** **शैक्षणिक वर्ष २०१४-१५ करीता ज्युनिअर केजी वर्गासाठी प्रवेश प्रक्रिया राबवितांना शासनाचे बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ (RTE Act, २००९) अन्वये अधीन राहून प्रवेश देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूदः-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १४ (भाग -४) मध्ये विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापीत केलेले अध्यादेश व केलेले विनीमय मधील २१(२ ग) नुसार राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने, कोणतीही शैक्षणिक संस्था, क्रीडा अकादमी अथवा संस्था, सार्वजनिक ग्रंथालय, रुग्णालय, दवाखाना, निराश्रीत अथवा शारीरिकदृष्टया विकलांग व्यक्तीसाठी आधारगृह किंवा इतर धर्मदाय संस्था किंवा सोसायटी नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी केलेली,

कला व साहित्य या क्षेत्राशी संबधित असलेली कोणतीही अन्य बिगरवाणिज्यिक सांस्कृतीक संघटना अथवा सोसायटी स्थापन करणे व त्याची देखभाल करणे.

**प्रस्ताविक:-** श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूलकडे वाढती विद्यार्थ्यी संख्या व अपुऱ्या वर्ग/खोल्यामुळे सन २०१३-१४ पासून शाळा दोन सत्रात भरविण्यात येत आहे. सकाळचे सत्रात ज्यु. के.जी ,सि. केजी. व इयत्ता ६ वी ते १० वी असे एकूण २१ वर्ग व दुपारचे सत्रात इयत्ता १ ली ते इ. ५ वी चे एकूण २२ वर्ग चालविले जातात. ज्यु.केजी च्या वर्ग/ तुकडयांची संख्या मर्यादित ३ तुकडयांची ठेवली तरच पुढे भविष्यात वर्ग खोल्यांची अडचण निर्माण होणार नाही. सन २००९-१० पासून ज्यु. केजीच्या ६ तुकडया होत गेल्याने आज अखेर वर्गखोल्या अपुऱ्या पडल्या असून शाळा दोन सत्रात भरवावी लागली आहे. मागील वर्षी ज्यु. केजी च्या ३ तुकडया करुन मर्यादीत प्रवेश देणेबाबत ठरविले असूनही विद्यार्थी संख्येत वाढ झाल्याने ५ तुकडया कराव्या लागल्या. तरी शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये ज्यु. केजीसाठी प्रवेश देतांना किमान १२० प्रवेश देण्यात यावे जेणेकरुन ३ तुकडया करता येतील. ज्यु. केजीसाठी प्रवेश देतांना शासनाचे आर.टी. ई. कायदा २००९ (बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षण अधिनियम कायदा) अन्वये २५% प्रवेश देणे असल्याने मर्यादीत प्रवेश संख्या ठेवण्यात यावी. ही प्रवेश प्रक्रिया राबवितांना मागील वर्षाचे प्रवेश प्रक्रियाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी असे नम्र मत आहे.

**मागणी:-** शैक्षणिक वर्ष २०१४-१५ करिता ज्यु. के.जी या वर्गातील प्रवेश प्रक्रिया सुरु करावयाची असल्याने खालीलप्रमाणे महत्वाच्या व आवश्यक बार्बीचा विचार करुन विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावा असे नम्र मत आहे.

१. ज्यु. के.जी चे वर्ग सकाळचे सत्रात म्हणजे सकाळी ०८.०० ते दुपारी १२.०० यावेळेत भरविण्यात यावे जेणेकरुन स्कुलबसचे नियोजन करण्यास सोयीस्कर होईल.

२. सन २०१४-१५ शैक्षणिक वर्षात केवळ १२० विद्यार्थ्यांना प्रवेश देवून फक्त ३ तुकडया करण्यात याव्यात. ज्यु. के.जी. साठी फक्त १२० विद्यार्थ्यांनाच प्रवेश अर्ज देण्यात यावेत व फक्त १२० फॉमर्ची विक्री करण्यात यावी. दिलेल्या मुदतीतच ज्यु. के.जी. प्रवेशासाठी फॉर्म विक्री करण्यात यावी मुदत संपलेनंतर प्रवेशासाठीच्या फॉर्मची विक्री करण्यात येवू नयेत, यामुळे व्यवस्थापनात बऱ्याच अडचणी निर्माण होतात.

३. दि. ३१ मे २०१४ अखेर पाल्यांचे वय ३.३ ते ४.३ या वयोगटापर्यंत असावे, म्हणजे जन्मतारीख (फेब्रुवारी २०१० ते फेब्रुवारी २०११) या कालावधीतील असावी. मागील वर्षीही अशाच वयोगटातील पाल्यांना प्रवेश देण्यात आला होता.

४. ज्या पालकांचे पाल्याचे वय ३.३ ते ४.३ वयोगटात बसत असेल फक्त अशाच पालकांना प्रवेश अर्ज देण्यात यावेत इतरांना प्रवेश अर्ज विक्री करण्यात येवू नयेत, जेणेकरुन प्रशासनावर पालकांचा रोष राहणार नाही.

५. ज्यु. के.जी. साठी प्रवेश देतांना प्रथम प्राधान्य संस्थान कायम कर्मचारी पाल्य / कंत्राटी कर्मचारी पाल्य व त्यांनतर शिरडी नगरपंचायत हद्दीतील रहिवाशी फक्त यांनाच प्रवेश देण्यात यावा. शिर्डी परिसरातील इतर गावात इंगजी माध्यमाच्या ब-याच शाळा असल्याने पालक इतर शाळेतही आपल्या पाल्यांचा प्रवेश घेवू शकतात.

६. प्रवेश अर्ज देतेवेळी विद्यार्थ्यांचा मूळ जन्म दाखला (ग्रामपंचायत/ नगरपालीका/ महानगरपालीका) यांनी प्रमाणीत केलेला, तसेच शिरडी गावातील रहिवाशी दाखला, रेशनकार्ड तपासून अशाच पालकांना पाल्यांचे प्रवेशासाठी प्रवेश अर्ज देण्यात यावा.

७. प्रवेश निश्चित करतांना विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व स्कुलबस शुल्क एकाच वेळी दिलेल्या मुदतीत भरुन घेण्यात यावे जे पालक मुदतीचे आत शुल्क भरणार नाहीत त्यांचे पाल्याचा प्रवेश रद्द करण्यात यावा.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी/ शासन निर्देश तांत्रिक कायदेशिर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** अद्याप शासनाची आर. टी. ई. २००९ अधिनियमाबाबतची शालेय प्रवेश प्रक्रिया जाहिर झालेली नसल्याने तूर्त शालेय प्रवेश प्रक्रीया राबविता येणार नाही. शासनाने ठरविलेल्या वेळापत्रका शिवाय आपणास प्रवेश प्रक्रीया राबविता येणार नाही. याबाबत पंचायत संमिती राहाता B.D.O. यांचेशी समक्ष चर्चा झालेली असून माहे जानेवारी २०१४ अखेर सदरचे वेळापत्रक जाहिर होणार असल्याचे त्यांनी दूरध्ध्वनीनरुन सांगीतले आहे. सन २०१४-१५ ज्यु.के.जी प्रवेश प्रक्रिया राबवितांना शासनाचे वेळापत्रकानुसार तारखा ठरवून प्रवेशा बाबतचे वेळापत्रक जाहीर करता येईल.

उपरोक्त नियमावलीतील आवश्यक माहिती पालकांना माहिती व्हावी यासाठी शहराचे मध्यवर्ती ठिकाणी, शाळेच्या प्रवेशद्वारावर डिजीटल बोर्ड तयार करुन लावणेत येणार आहेत, जेणेकरुन पालकांचा प्रशासनावर रोष राहणार नाही.

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय:-** ज्यु. के.जी. साठी प्रवेश प्रक्रिया राबवितांना मर्यादीत १२० प्रवेश दिले तर भविष्यात वर्ग खोल्या आपुऱ्या पडणार नाहीत असे नम्र मत आहे. सदरचा विषय धोरणात्मक असल्याने मा.व्यवस्थापन त्रिसदस्यीय समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्राचार्या, इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

**विषय नं.४०** **कनिष्ठ महाविद्यालयातील प्रयोग शाळेकरीता टेबल खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद:-** क्र.१७ (१) व १७ (२) (ढ) मध्ये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किवा तसे करण्यास सहाय्य करील. तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन करील.

**प्रास्तविक:-** कनिष्ठ महाविद्यालयाचे साईआश्रम नं. २ मधील डी इमारतीत स्थलांतर झाले आहे. तसेच सन २०१३-१४ मध्ये ११ वी विज्ञान शाखेची एक नवीन तुकडी सुरु करणेत आलेली आहे. वाढलेली विद्यार्थी संख्या विचारात घेता विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक करण्यासाठी प्रयोग शाळेतील टेबल अपुरे पडत आहेत. तसेच वर्ग शिक्षकांना कामकाजासाठीही टेबल अपूरे आहेत. त्याकरीता नव्याने टेबल खरेदी करणे आवश्यक आहे.

**मागणी :-** खालील प्रमाणे टेबल खरेदी करणे आवश्यक आहे.

| अ.नं. | तपशिल | संख्या | अंदाजे दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | भौतिक शास्त्र प्रयोगशाळा टेबल -पार्टीकल बोर्ड १९ एमएम. लॅमिनेटेड टॉप - साइज ६ x ३ फुट, फ्रेम १४ गेज स्क्वेअर पाईप १ इंच, १४ गेज L ॲंगल- १ इंच टॉपसाठी- फ्रेम साईज ५.५ फुट x २.५ फुट x २.५फुट | ९ नग | ४५००/- | ४०५००.०० |
| ०२ | जीवशास्त्र प्रयोगशाळा टेबल - पार्टीकल बोर्ड १९ एमएम. लॅमिनेटेड टॉप- साईज ८ x २.५ फुट फ्रेम १४ गेज स्क्वेअर पाईप १ इंच, १४ गेज L ॲंगल- १ इंच टॉपसाठी- फ्रेम साईज ७.५ फुट x २.३ फुट x २.५ फुट | ९ नग | ५०००/- | ४५०००.०० |
| ०३ | रसायणशास्त्र प्रयोगशाळा - टेबल -पार्टीकल बोर्ड १९ एमएम. लॅमिनेटेड टॉप - साईज ६ x ४ फुट, फ्रेम १४ गेज स्क्वेअर पाईप १ इंच , १४ गेज L ॲंगल- १ इंच टॉपसाठी- फ्रेम साईज ५.५ x ३.७५ x २.५ फुट | ६ नग | ४५००/- | २७०००.०० |
| ०४ | माहिती तंत्रज्ञान - टेबल -पार्टीकल बोर्ड १९ एमएम. लॅमिनेटेड टॉप- साईज ८ फुट x २ फुट, फ्रेम १४ गेज स्क्वेअर पाईप १ इंच ,१४ गेज L ॲंगल- १ इंच टॉपसाठी- फ्रेम साईज ७.५ x १.७५ फुट x २.५ फुट | १४ नग | ४५००/- | ६३०००.०० |
| ०५ | वाचनालय - टेबल - पार्टीकल बोर्ड १९ एमएम. लॅमिनेटेड टॉप- साईज ८ फुट x २ फुट, फ्रेम १४ गेज स्क्वेअर पाईप १ इंच , १४ गेज L ॲंगल- १ इंच टॉपसाठी- फ्रेम साईज ७.५ फुट x १.७५ फुट x २.५ फुट | ८ नग | ४५००/- | ३६०००.०० |
| ०६ | वाचनालय -टेबल - पार्टीकल बोर्ड १९ एमएम. लॅमिनेटेड टॉप - साईज ६ x २ , फ्रेम १४ गेज स्क्वेअर पाईप १ इंच १४ गेज L ॲंगल- १ इंच टॉपसाठी- फ्रेम साईज ५.५ फुट x १.७५फुट x २.५ फुट | १० नग | ३५००/- | ३५,०००.०० |
| ०७ | गोदरेज टेबल- सनमायका टॉप टाईप टी- ०८ , सिंगल ड्रावर साईज- साईज ४ फुट x २ फुट x२.५ फुट | १५ नग | १५,०००/- | २,२५,०००.०० |
| | | | एकूण रुपये | ४,७१,५००.०० |

**संस्थान अधिनियम/ठराव यानुसार अनुमान :-** आर्थिक खर्चाचा विषय आहे.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत :-** वरील प्रमाणे टेबल खरेदी करणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे टेबल खरेदी विभागामार्फत खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रु. ४,७१,५००/- (अक्षरी रुपये- चार लाख,एक्काहत्तर हजार,पाचशे) मात्र पर्यंतचे खर्चास मान्यता असावी.

प्रस्ताव निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.३९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, कनिष्ठ महाविद्यालयातील प्रयोग शाळेकरीता आवश्यक असलेले प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे टेबल्स खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.४,७१,५००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.प्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालय)

---

**विषय नं.४१** **कनिष्ठ महाविद्यालयाकरीता झेरॉक्स मशिन खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुदः-** क्र.१७ (१) व १७ (२) (ढ) मध्ये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किवा तसे करण्यास सहाय्य करील. तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन करील.

**प्रास्तविकः-** मा.व्यवस्थापन समिती दि. ०८/१०/२०१२ चे सभेतील निर्णय क्र. ८४३ चे निर्णयानुसार संस्थानचे श्री साईबाबा औ. प्र.संस्था,शिर्डी या विभागास Rate Contract नुसार झेरॉक्स मशिन खरेदी करण्यात आलेले आहे. संस्थानचे श्री कनिष्ठ महाविद्यालयात इ.११ कला २ तुकडया, वाणिज्य २ तुकडया व विज्ञान शाखेच्या ३ तुकडया तसेच व १२ वी कला शाखेच्या २ तुकडया, वाणिज्य २ तुकडया व विज्ञान शाखेच्या २ तुकडया मध्ये एकूण १०९२ विद्यार्थी व विद्यार्थीनी शिक्षण घेत आहेत. या विद्यालयात शैक्षणिक वर्षात शालेय अंतर्गत कला,वाणिज्य व विज्ञान या तीन शाखाच्या वर्षभरात प्रथम सत्रात एक चाचणी परीक्षा व दुस-या सत्रात एक चाचणी परीक्षा घेण्यात येतात. तसेच इ. १२ वी (HSC) एचएससी बोर्ड परीक्षाच्या सराव घेण्यात येत असतात. या वर्गाच्या प्रशन पत्रिकेच्या झेरॉक्स प्रती काढाव्या लागतात. कनिष्ठ महाविद्यालयास यापूर्वी प्रशासन शाखेकडून मिळालेले जूने झेरॉक्स मशिनची प्रती काढणेची मर्यादा संपलेली आहे. त्यामुळे कनिष्ठ महाविद्यालयास M/s Ricoh India Ltd, India कंपनीचे झेरॉक्स मशिन प्रतिनिधी श्री प्रमोद दशरथ पवार यांचे व्दारा खरेदी करणे आवश्यक आहे.

**मागणी :-** खालील कंपनीचे झेरॉक्स मशिन खरेदी करणे आवश्यक आहे.

| अ.नं. | झेरॉक्स मशिनचा तपशिल | मागणी संख्या | कंपनी कॉन्ट्रक्ट दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| 01 | Ricoh / MP 2001L<br>Digital Copier with Printer<br>(SIZE A-3) Minimum copying speed (cpm) : 20/20, Paper Size (Original/Image) : A3/A3,RAM (MB): 16,Bye Pass: 50SHEET, Zoom:50TO 200%, Category: SIMPLEX, Networking Features:YES | 01 Qty | 58368/- | 58,368.00 |
| | Add Vat Tax 5% | | | 2918.40 |
| | Total | | | 61286.40 |
| | Round up | | | 61286.00 |

**संस्थान अधिनियम/ठराव यानुसार अनुमान :-**आर्थिक खर्चाचा विषय आहे.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत :-** वरील प्रमाणे झेरॉक्स मशिन खरेदी करणे आवश्यक आहे.

तरी वर नमुद केलेप्रमाणे M/s Ricoh India Ltd, India कंपनीकडून झेरॉक्स मशिन खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या रु.६१,२८६/- (अक्षरी रुपये- एकसष्ठ हजार, दोनशे, श्याऐंशी) मात्र खर्चाचा प्रस्ताव निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.४०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कनिष्ठ महाविद्यालयाकरीता आवश्यक असलेले झेरॉक्स मशिन M/s Ricoh India Ltd, India या कंपनीकडून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रु.६१,२८६/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.प्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालय)

---

**विषय नं.४२** **व्दारावती भक्तनिवास इमारत येथे गरम पाणी सुविधा उपलब्ध होणेसाठी व प्लंबींग मेंटेनन्स करणेसाठी मटेरियल खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईच्या दर्शनासाठी शिर्डी येथे येणाऱ्या भक्तांना निवासाची सुविधा उपलब्ध व्हावी म्हणून संस्थानमार्फत निवासस्थान इमारतीची उभारणी करण्यात आलेली आहे. ही निवासाची सुविधा मोठया प्रमाणावर व विनासायास उपलब्ध व्हावी म्हणून व्दारावती या निवासस्थान प्रकल्पाची उभारणी करण्यात आलेली आहे. सदर इमारतीमधील खोल्या/हॉल साईभक्तांना निवासासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

व्दारावती भक्तनिवास येथील इमारतींवर सोलर सिस्टिम लावण्यात आलेली आहे. त्याव्दारे साईभक्तांकरीता रुमध्ये २४ तास गरम पाण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. रुममधील साईभक्तांसाठी आवश्यकता असेल त्याप्रमाणे गरम पाणी व थंड पाण्याचे मिळणेकरीता मिक्सर कॉक बसविण्यात आलेले आहेत. सध्या हिवाळयाचे दिवस असल्याने तसेच ढगाळ वातावरणांमळे पहाटे भक्तांना गरम पाणी मिळत नाही. याबाबत साईभक्तांकडुन वारंवार तक्रारी येत असल्याने उपकार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग यांचेसमवेत पाणीपुरवठा विभागाकडील कर्मचारी यांनी चर्चा केली असता, संस्थान आर्किटक्ट श्री कापरे साहेब, नाशिक यांचेकडुन याबाबत मार्गदर्शन घेतले असता, त्यांनी तेथे बसविण्यात आलेले मिक्सर कॉकचे नॉब साईभक्तांकडुन चालू राहत असल्याने गरम पाणी व थंड पाणी पुन्हा एकत्र होत असल्याचे आढळले आहे. याकरीता सोलर सिस्टिमचे पाईपलाईनसाठी नॉन-रिटर्न व्हॉल

बसविणेबाबत सुचना केलेल्या आहेत. तसेच व्दारावती भक्तनिवासस्थान इमारतींमधीत सर्व प्रकारचे नळ दुरुस्त करुन लिकेज बंद करणेबाबत सुचना केलेल्या आहेत.

सदर काम पाणी पुरवठा विभागांतर्गत करता येईल परंतू त्यासाठी आवश्यक साहित्य पाणी पुरवठा विभागाकडे उपलब्ध नाही. यासाठी आवश्यक साहित्य खरेदी करावे लागतील. सदरचे काम करणेसाठी आवश्यक साहित्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अं. नं. | मटेरियल तपशिल | कंपनी | परिमाण | एकक | अंदाजे दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | १/२" नॉन रिटर्न व्हॉल. (आडवे) | | ७५ | नग | ३५०.०० | २६,२५०.०० |
| ०२ | ३/४" नॉन रिटर्न व्हॉल. (आडवे) | | ७५ | नग. | ४५०.०० | ३३,७५०.०० |
| ०३ | १/२" सी.पि.व्ही.सी. थ्रेडर (बाहेरील आटे) | फिनोलेक्स | १५० | नग. | २४.०० | ३,६००.०० |
| ०४ | ३/४" सी.पि.व्ही.सी. थ्रेडर (बाहेरील आटे) | फिनोलेक्स | १५० | नग. | ३४.०० | ५,१००.०० |
| ०५ | १/२" सी.पि.व्ही.सी. सॉकेट. | फिनोलेक्स | ५० | नग. | १२.०० | ६००.०० |
| ०६ | ३/४" सी.पि.व्ही.सी. सॉकेट. | फिनोलेक्स | ३० | नग. | १८.०० | ५४०.०० |
| ०७ | ३/४" सी.पि.व्ही.सी. एलबो. | फिनोलेक्स | ३० | नग. | २०.०० | ६००.०० |
| ०८ | सी.पि.व्ही.सी. सोल्युशन. (५० मि.ली.टयुब) | | ०१ | लिटर | १५००.०० | १५००.०० |
| ०९ | जेट स्प्रे | रॅप्स कं. | ५० | नग. | ३२०.०० | १६,०००.०० |
| १० | फ्लश व्हॉल शो प्लेट | प्लंबर | ५० | नग. | २४०.०० | १२,०००.०० |
| ११ | फ्लश नॉब | प्लंबर | ५० | नग. | १८०.०० | ९,०००.०० |
| १२ | स्पिंडल (US-१३) | प्लंबर | १५० | नग. | १४०.०० | २१,०००.०० |
| १३ | स्पिंडल (इकोनॉमी) | प्लंबर | ५० | नग. | १८०.०० | ९,०००.०० |
| | | | | | **एकुण खर्च-** | **१,३८,९४०.००** |
| | | | | | **वॅट १२.५%-** | **१७,३६७.५०** |
| | | | | | **एकुण पुर्णांकित-** | **१,५६,३०८.००** |

व्दारावती भक्तनिवास येथील प्लंबींग काम करणेसाठी व नळांचे लिकेज बंद करणेसाठी वरीलप्रमाणे प्लंबींग साहित्य खरेदी करणे आवश्यक असून त्यासाठी अंदाजे रु. १,५६,३०८/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

तरी सदरचे साहित्य कोटेशन मागवून खरेदी करणेसाठी व त्यासाठी येणारे अंदाजे रु.१,५६,३०८/- मात्रचे खर्चास मान्यता मिळावी ही विनंती.

**निर्णय क्र.४१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, व्दारावती भक्तनिवास इमारत येथे निवासी साईभक्तांसाठी गरम पाणी सुविधा उपलब्ध होणेसाठी व प्लंबींग मेंटेनन्स करणेसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे साहित्य विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१,५६,३०८/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

**विषय नं.४३** **श्रींचे हार तयार करणेकामी फुले खरेदी करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** बगीचा विभागामार्फत समाधीसाठी, मुर्तीसाठी, द्वारकामाईतील फोटोंसाठी श्रीगुरुस्थान मंदिर, श्रीदत्त मंदिर, श्रीगणपती मंदिर, श्रीशनि मंदिर, श्रीमहादेव मंदिर, श्रीमारुती मंदिर याठिकाणी लागणारे हार देण्यात येतात. तसेच अभिषेक पुजा व सत्यनारायण पुजा याय ठिकाणी लागणारे फुले ही बगीचा विभागामार्फत पुरविण्यात येतात. सध्या त्यासाठी स्थानिक फुल मार्केटमधून देणगी स्वरुपात फुले येतात. तसेच श्री गंगवाल यांचेकडून १ किलो गुलछडी, श्री बारहाते यांच्याकडून १ किलो झेंडू, शिव तसेच श्री विजय कोते यांच्याकडून १००० गुलाब फुले हे दररोज पाठवितात. मात्र यांचे स्वत:चे उत्पादन नाही. पुढे यातून अशाप्रकारे श्रीसाईबाबांना आम्ही दररोज फुले देतो. संस्थान खरेदी करत नाही म्हणून आम्ही फुले देतो असे होईल व वरील कोणीही व्यक्तीकडून अथवा दुकानदाराकडून श्रीसाईबाबांना दररोज हाराकरीता लागणारी फुले मागून न घेता अथवा तसेच (विनामुल्य) न घेता संस्थानने श्रीसाईबाबांसाठी स्वत: संस्थानने खरेदी करुन त्याचे हार बनवून श्रीसाईबाबांना घालण्यात यावे. श्रीसाईबाबांचे मुर्तीस, समाधीस अथवा इतर मंदिरामध्ये कोणाचे अथवा कोणत्याही व्यक्तीचे खाजगी हार, फुले सन मार्च १९९० पासून घालण्यात किंवा चढविण्यात येत नाही. ते फक्त साईबाबा संस्थानचे, संस्थानने बनविलेले हारच व फुले चढविण्यात येतात. त्यासाठी बगीचा विभागामार्फत स्वतंत्र कर्मचारी वर्ग हार बनविणेकामी नेमण्यात आलेले आहेत.

मंदिर विभागाचे ताब्यात दररोज ३२ हार दिले जातात तसेच संस्थान आयोजित पारायण, अभिषेक पूजा, श्रीगणेश उत्सव व इतर धार्मिक विधीकरीता दैनंदिन हारांचे व्यतिरिक्त लागणारे हार, फुले देण्यात येतात. मंदिर विभागामार्फत हार ताब्यात घेणा-या कर्मचा-याची स्वाक्षरी घेतली जाते. तसेच मा.कार्यकारी अधिकारी साो.यांचे कार्यालय, मा उपकार्यकारी अधिकारी साो.यांचे कार्यालय, मा प्रशासकीय अधिकारी साो. यांच्या कार्यालयातील फोटोसाठी १० हार देण्यात येतात. बगीचा विभागामार्फत दररोज ४२ हार तयार करण्यात येतात. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**अ) मंदिरासाठी बनविण्यात येणारे हार**

| अ.क्र. | ठिकाण | तपशील | सकाळ | दुपार |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्रीसमाधी मंदिर | १.मुर्ती, समाधी व फोटो | ०८ | ०२ |
| ०२ | श्रीगुरुस्थान मंदिर | १.फोटो | ०१ | ०१ |
| | | २.महादेव पिंड | ०१ | ०१ |
| | | ३.पादुका | ०१ | ०१ |
| ०३ | श्रीद्वारकामाई मंदिर | १.फोटो (आतील बाजूस) | ०१ | ०१ |
| | | २.फोटो (दगडावरील) | ०१ (मोठाहार) | ०१ (मोठाहार) |
| ०४ | श्रीचावडी मंदिर | १.फोटो (पालखीचा) | ०१ | ०१ |
| ०५ | श्रीदत्त मंदिर | १.मुर्ती | ०१ | ०१ |
| ०६ | श्रीगणपती मंदिर | १.मुर्ती | ०१ | ०१ |
| ०७ | श्रीमहादेव मंदिर | १.शंकराची पिंड | ०१ | ०१ |
| | | २.पार्वती माता मुर्ती | ०१ | ०१ |
| ०८ | श्रीशनि मंदिर | १.मुर्ती (रुईच्या पानांचे) | ०२ | -- |

**ब) कार्यालयासाठी बनविण्यात येणारे हार**

| अ.क्र. | ठिकाण | तपशील | सकाळ | दुपार |
|---|---|---|---|---|
| ०१ | कार्यालय | मा कार्यकारी अधिकारी साो.यांचे कार्यालय मा उपकार्यकारी अधिकारी साो.यांचे कार्यालय,मा प्रशासकीय अधिकारी साो.यांचे कार्यालयातील फोटोसाठी हार देणे | १० | -- |

मंदिर विभागाने मागणी केलेले ३२ हार व कार्यालयासाठी लागणारे १० हार बनविणेसाठी आवश्यक असणारी फुले बगीचा विभागातील कर्मचारी फुल मार्केटमध्ये जाऊन शेतकरी, व्यापारी, साईभक्त यांचेकडून विनामुल्य मागून व मिळणारी फुले गोळा करुन त्यापासून हार तयार करण्यात येत आहेत. ही पद्धत बरीच जुनी आहे.

श्रींचे हार तयार करण्यासाठी आवश्यक असणारी फुले स्थानिक लोकांमधून गोळा न करता ती विकत घेऊन हार तयार करण्यात यावे अशी सूचना मा कार्यकारी अधिकारी साो.यांनी दिली व ती योग्य आहे.

श्रींचे हार तयार करण्यासाठी गुलाब फुले ५००० नग, गुलछडी फुले १० कि.ग्रॅ, गलांडा फुले किंवा झेंडू फुले १५ कि.ग्रॅ फुलांची दररोज आवश्यकता आहे. सदरची फुले शिर्डी येथील फुल मार्केट मधून दररोज खरेदी करावे लागणार आहे. दररोज फुले खरेदी करणेसाठी अंदाजे रु ३९००/- (अक्षरी रुपये तीन हजार नऊशे) मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरचे दर हे वार्षिक सरासरीचे दर आहेत. शिर्डीत साईभक्तांची गर्दी वाढल्यास फुलांचे दरही वाढतात. त्यामुळे हारांसाठी आवश्यक असणारी फुले बाजारभावाप्रमाणे खरेदी करावी लागणार आहेत.

| अ.क्र | तपशील | नग | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | गुलछडी फुले | १० कि.ग्रॅ. | ८० रु प्रति किलो | ८००.०० |
| ०२ | झेंडू किंवा गलांडा फुले | १५ कि.ग्रॅ. | ४० रु प्रति किलो | ६००.०० |
| ०३ | गुलाब फुले | ५००० नग | ५० रु प्रति शेकडा | २५००.०० |
| (एकूण अक्षरी रुपये- तीन हजार नऊशे मात्र.) | | | | ३९००.०० |

तरी फुले खरेदी करणेस दररोज रुपये ३९००/-(अक्षरी रुपये तीन हजार नऊशे)मात्र खर्च येणार आहे. फुल मार्केटमध्ये समक्ष फुले खरेदी करणेस व याकामी दररोज येणा-या अंदाजे रुपये ३९००/- (अक्षरी रुपये तीन हजार नऊशे) मात्र खर्च येईल.

| अ.क्र. | प्रति दिन खर्च | एक वर्षाकरीता | अंदाजे रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | ३९००/- | ३६५ दिवस | १४,२३,५००/- |
| एकूण अक्षरी चौदा लक्ष तेवीस हजार पाचशे मात्र | | | १४,२३,५००/- |

याप्रमाणे १ वर्षाकरीता रु.१४,२३,५००/- मात्र खर्च येईल. यापुढे प्रत्येक वर्षी फुले खरेदीचा खर्च वाढत राहील. हारासाठी लागणारी फुले ही शिर्डी, कोपरगांव, राहाता, अहमदनगर, नाशिक, पुणे, मुंबई व इतर ठिकाणाहून खरेदी करता येतील.

तरी फुले संस्थानने स्वतः खरेदी करणेस व हार बनवून देणेस व तेच हार श्रीसाईबाबांना वापरणेस मंजूरी मिळणेस विनंती व त्यासाठी येणा-या खर्चास व निरंतरचे खरेदीस मान्यता मिळणेस विनंती.

तरी सदरचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४२ यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर विभागासाठी हार बनविणेकामी आवश्यक असलेली फुले खरेदी करणेसाठी विहित पध्दतीने जाहिरात देणेत येऊन, त्यासाठी (शिर्डी पोहोच) वार्षिक दर मागविणेत यावे व प्रति दिवशी आवश्यक असलेली फुले पुरवठाधारकांकडून घेण्यात यावी.**

**तत्पुर्वी याकामी येणाऱ्या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.४४ गुरुस्थान निंबवृक्षाची टिश्युकल्चर पध्दतीने रोपे तयार करणेबाबत.**

**प्रस्ताव-** समाधी मंदिर परिसरातील गुरुस्थान निंबवृक्षाचे वय अंदाजे १५० वर्षाहुन अधिक झालेले आहे. हा निंबवृक्ष संस्थान व साई भक्तांच्या दृष्टीने फारच महत्वाचा आहे. निंबवृक्ष जतन करण्याचे दृष्टीने सदर निंबवृक्षापासुन टिश्युकल्चर पध्दतीने रोपे तयार करणेसाठी वेळो-वेळी कृषी विदयापीठ ,राहुरी यांच्या सल्ल्याने रोपे तयार करणेकामी सदर झाडांच्या निंबोळी (बीयां),पाने, रोपे पाठविण्यात आलेली होती. त्या पासुन विद्यापीठाने रोपे तयार करण्याचे त्यांचे प्रयत्न चालू आहे.

टिश्युकल्चर पध्दतीने रोपे तयार करणे करिता मा.डायरेक्टर,फोरेस्ट रिसर्च इन्संटीटयुट, डेहराडुन व डायरेक्टर ऑफ फोरेस्ट जनेटीक्स ॲण्ड ट्री ब्रीडींग,कोईमतूर. यांना रोपे तयार करणेसाठी संस्थानला मार्गदर्शन करणेकामी विनंती करण्यात आली होती.

डायरेक्टर, इन्स्टीटयूट ऑफ फोरेस्ट जनेटीक्स ॲण्ड टी ब्रीडींग ,कोईमतुर. यांनी टिश्युकल्चर करणे करिता नॅशनल केमीकल लॅब्रोटरी,पुणे. अथवा इतर संस्था महाराष्ट्रात संशोधन करीत आहेत. अशा संस्थाशी संपर्क करावा असे कळविले आहे. त्यानुसार त्यांचेशी चर्चा केली असता नॅशनल केमीकल लॅब्रोटरी, पुणे यांनी संस्थानने लॅब तयार करावी यासाठी प्राथमिक खर्च रु.०५ लक्ष कळविलेला आहे.

गुरुस्थान निंबवृक्ष पासुन टिश्युकल्चर पध्दतीने रोपे तयार करणेसाठी डॉ.बी.बी.जाधव, डायरेक्टर ऑफ रिसर्च, डॉ.बी.एस. कोकण कृषि विद्यापीठ, दापोली. यांचे मार्गदर्शन घेवुन टिश्युकल्चर पध्दतीने रोपे तयार करुन घेणेसाठी, पत्र दिलेले आहे. सध्या के. एफ, बायोप्लॉन्ट, पुणे हे रोपे तयार करुन देण्यास तयार आहे. रोपे तयार करणेसाठी त्यांना झाडाच्या निंबोळी (बीयां), पाने, रोपे इत्यादी आवश्यक साहित्य संस्थानमार्फत उपलब्ध करुन देता येईल. विद्यापीठाचे शास्त्रज्ञ व के. एफ, बायोप्लॉन्ट, पुणे यांचे शास्त्रज्ञ त्यांना ये-जा करणेकामी संस्थान वाहन व त्यांची शिर्डी येथे मुक्कामाची व्यवस्था संस्थान मार्फत संस्थान निवासस्थानात मोफत करता येईल.

गुरुस्थान निंबाच्या झाडांपासून टिश्युकल्चर पध्दतीने रोपे तयार करणेस व याकामी येणारे खर्चास मान्यता मिळावी ही विनंती.

तरी सदरच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४३ यावर सविस्तर चर्चा होऊन, समाधी मंदिर परिसरातील गुरुस्थान निंबवृक्षाच्या झाडापासून टिश्युकल्चर पध्दतीने रोपे तयार करणेस व याकामी येणारे सर्वसमावेशक खर्चास मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

**विषय नं.४५ श्री.शरदचंद्र बाळ यांनी गायलेल्या भक्तीप्रेम लहरी भजन व्हीसीडी संचाचे ४ व ५ भागाचे प्रकाशन संस्थानतर्फे करुन विक्रीची व्यवस्था करणेबाबत.**

**निर्णय क्र.४४ सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही- अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.४६ संस्थान निर्मित सी.डी. व डी.व्ही.डी. निर्मिती कामाचे खर्चास मंजूरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे १०.०१.२००८ चे सभेतील विषय नं.७१ निर्णय क्र.७१ नुसार मे.सोनी डीएडीसी मॅन्युपॅक्चरींग इंडिया प्रा.लि., मुंबई यांचेकडील सी.डी./ व्हीसीडी निर्मितीसाठी असलेल्या शर्ती /अटी मान्य करण्यात येऊन त्यांचेकडून कायमस्वरुपी संस्थान निर्मित सी.डी., व्हीसीडी चे काम करुन घेण्यास मान्यता मिळालेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८.१०.२००८ चे सभेतील निर्णय क्र.८१२ नुसार संस्थान प्रकाशित पुस्तके/फोटो/छपाई करणे, संस्थान प्रकाशित सी.डी. निर्मिती करणे व विक्री किंमती ठरविणे वगैरे कामाची कार्यालयीन पद्धती निश्चित करण्यात आली आहे. त्यात सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम १४ चा नं. १७ ठ मध्ये समितीची कर्तव्ये व अधिकार यातील तरतुदीनुसार भक्तांची गैरसोय होऊ नये, वेळोवेळी साठा उपलब्ध व्हावा याकरीता खालील सुधारित पद्धत अवलंबणे बाबत विचार करण्यात आलेला आहे.

सोनी कंपनीची सी.डी. निर्मितीची गुणवत्ता चांगली असल्याने त्यांचेकडून मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार दरपत्रक मागविण्यात यावे व त्यानुसार मा. कार्यकारी अधिकारी यांनी कार्यादेश द्यावेत. असे ठरले आहे. संस्थान निर्मित खालील ऑडीओ /सीडीरोम/डीव्हीडी चा साठा अल्प प्रमाणात शिल्लक असल्याने त्यांची पुनर्निर्मिती करुन घेणे आवश्यक आहे. त्यानुसार मे. सोनी डीएडीसी मॅन्युपॅक्चरींग इंडिया प्रा.लि., मुंबई यांचेकडून खालील प्रमाणे दरपत्रक मागविण्यात आले असून, त्यांचे दि.२१.१२.२०१३ चे इमेलमधील दराने प्रस्तावित परिमाणाचे पुनर्निर्मिती खर्चाचा तपशिल पुढीलप्रमाणे.

| अ. नं. | तपशिल | शिल्लक संख्या | शिल्लक किती महिने पुरेल | निर्मिती संख्या | एक्साइज, व्हॅटसह दर | एकूण रक्कम रुपये | संस्थान विक्री किंमत रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई सत्चरित्र हिंदी दोहावली एमपी-३ (३ सीडीचा संच) | ३८३६ | ९ | ७००० संच | ६४.८३ | ४५३८१०.०० | १००.०० |
| ०२ | साईबाबा दी ग्रेट संत ऑफ शिर्डी (सीडी रोम) | ८०० | ५ | ५००० नग | २५.८९ | १२९४५०.०० | ५०.०० |
| ०३ | ग्लीम्पसेस ऑफ श्री साईबाबा डीव्हीडी (एका नगाची डीव्हीडी.) | ५०४० | ७ | ८००० नग | ४८.१० | ३८४८००.०० | १००.०० |
| | | | | | **एकूण रु.** | **९६८०६०.००** | |

वरील तक्त्यात दर्शविलेप्रमाणे ऑडीओ/सीडीरोम/डीव्हीडी यांची पुनर्निर्मिती मे सोनी डीएडीसी मॅन्युफॅक्चरींग इंडिया प्रा.लि.,मुंबई यांचेकडून करुन घेणेस रु.९,६८,०६०/- (अक्षरी रुपये - नऊ लाख, अडुसष्ठ हजार, साठ) मात्र खर्च अपेक्षित आहे. कंपनीचे शर्ती अटीनुसार कंपनीस अग्रीम रक्कम द्यावी लागते.

सबब M/s.Sony DADC Manufacturing India Pvt. ltd. Mumbai यांचेकडून प्रस्तावित काम करुन घेणेस त्याकामी येणारे रु.९,६८,०६०/- मात्रचे खर्चास तसेच M/s.Sony DADC Manufacturing India Pvt. ltd. Mumbai नावाने रुपये ९,६८,०६०/- चा डी.डी. काढण्यास मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.४५ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.४७ साईटेक प्रकल्पाचे कामकाजाबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद:** कलम १७ (१) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**मा. व्यवस्थापन समितीचा ठराव** :१. दिनांक ०७/११/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७९९.

२. दिनांक१८/०७/२०१२रोजीचे सभेतील निर्णय क्र.६२६ (मुदतवाढ)

३.दिनांक२६/०७/२०१३रोजीच्या सभेतील निर्णय क्र.६११ (मुदतवाढ)

**प्रास्ताविक:** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०७/११/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ७९९ नुसार माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत साईटेक प्रकल्प उभारणीची कार्यवाही हाती घेण्यात आलेली आहे. त्यानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलोजी यांना प्रकल्प उभारणी साठी जा.क्र.एसएसएसटी/आयटी/१५०३०/२००९ दि. ०९/१२/२००९ रोजीच कार्यादेश देण्यात आलेला आहे. साईटेक प्रकल्प एकुण ६ टप्प्यामध्ये कार्यान्वीत करण्यात येणार होता. सहा टप्प्यातील ३६ संगणक प्रणाली करारनाम्यानुसार प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील पहिली कार्यप्रणाली संस्थानने स्विकारल्यापासून १८ महिन्याच्या कालावधीत कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडून प्राप्त होणे बंधनकारक होते.

त्यास अनुसरुन कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी प्रकल्प उभारणीचे कामास माहे जानेवारी, २०१० पासून सुरुवात केलेली आहे. करारनाम्यानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडून खालीलप्रमाणे संगणक प्रणाली संस्थानला प्राप्त होणे आपेक्षीत आहे.

| अ.नं. | रिलीज टाईप | संगणक प्रणाली |
|---|---|---|
| ०१ | Release - 1 | Accounts, Store/ Inventory, Prasadalaya, Room Allotment, Online Services, Q Management-1 |
| ०२ | Release – 2 | Cheque/DD, Donation, HR & Payroll, Labour Dept, Ladu-Prasad, Money-Order, Telephone Billing, Purchase. |
| ०३ | Release – 3 | Canteen, Information Systems For Sr. Officers, Inward-Outward, Life Membership, Book Store/ Shop, Saileela Enrollment. |
| ०४ | Release – 4 | Electrical Dept, Kiosk, Legal Dept, Meeting Section, Vehicle Dept, Water Supply |
| ०५ | Release – 5 | Cloth Store/ Shop, Conustruction, Guest Information, |

| | | |
|---|---|---|
| | | Medical Aid, MIS, Security Dept. |
| ०६ | Release - 6 | Education Complex, Festival Budgeting & Management, Integration with HMS System, Old Data Migration, Proxy and E-Mail Server Integration & Setup, Record Maintenance, Online Q Management -2. |

प्रकल्पातील पहिल्या टप्प्यातील कार्यप्रणाली या दि. १४/०७/२०११ रोजी कार्यान्वीत करण्यात ओलेल्या आहेत. या कार्यप्रणाली पुढीलप्रमाणे आहेत :-

१.ऑनलाईन सर्व्हिसेस २. दर्शन पास (Q-management-१)

३.प्रसादालय कुपन विक्री (Prasadalya Coupan) ४.रुम रिझर्वेशन (Room Allotment)

पहिली संगणक कार्यप्रणाली दिनांक १४/०७/२०११ रोजी कार्यान्वित झालेली असून करारनाम्यातील अटी / शर्ती नुसार पहिली संगणक कार्यप्रणाली स्विकारले पासून, कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना दरमहा रक्कम रुपये २७,६४,५४३/- ६९ माहिने देणे बंधनकारक असून, ती त्यांना दिली जात आहे. त्यानुसार आज अखेर (जुन-२०१३अखेर)अंदाजे ७,३४,२९,५३०/- इतकी रक्कम त्यांना अदा करण्यात आलेली आहे.

साईटेक प्रकल्प करारनाम्यातील अटी / शर्तीनुसार सदरील प्रकल्पाचे सहा टप्पे जुन २०११ ला पूर्ण होणे अपेक्षित होते. परंतु प्रत्यक्षात कार्यवाही न झालेमुळे कॉग्नीझंट कंपनीने साईटेक प्रकल्प उभारणीसाठी सादर केलेल्या Revised Deployment Plan ला दिनांक १८/०७/२०१२ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.६२६ नुसार दिनांक ३१/०३/२०१३ अखेर मुदतवाढ देण्यात आलेली होती. त्यानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना देण्यात आलेल्या मुदतीत त्यांना विविध विभागांचे संगणक प्रणाली पूर्ण क्षमतेने चालू करणे बंधन कारक होते. परंतु त्यांना दिलेली कामे मुदतीत पूर्ण न झाल्यामुळे, त्यांनी केलेल्या विनंतीवरुन प्रकल्प उभारणीस, मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २६/०७/२०१३ रोजीच्या सभेतील निर्णय क्र. ६११ नुसार दिनांक ३१/०८/२०१३ अखेर मुदतवाढ देण्यात आली होती. याही वेळी त्यानी कामात चालढकलपणा केल्यामुळे प्रकल्प कार्यान्वीत करण्यात आलेल्या अडचणी दुर झालेल्या नाहीत.

दरम्यानचे काळात मा. श्री. के. व्ही. रमणी सो., यांनी सुचित केलेनुसार विविध विभागांचे साईटेक प्रकल्पातील संगणक प्रणालीमधील त्रुटी / अडचणी माहिती तंत्रज्ञान विभागास लेखी स्वरुपात कळविणेबाबत विभागांना परिपत्रकाव्दारे सुचित करण्यात आले होते. त्यानुसार विविध विभागांचे साईटेक संगणक प्रणालीतील त्रुटी/अडचणी यांचा गोषवारा खालीलप्रमाणे -

| **अ.नं.** | **संगणक प्रणाली / System** | **त्रुटी / अडचणी संख्या** |
|---|---|---|
| ०१ | Mumbai Office | 17 |
| ०२ | Membership | 11 |
| ०३ | Guest Information System | 5 |
| ०४ | Purchase | 15 |
| ०५ | Store | 3 |
| ०६ | Construction A | 3 |
| | Construction B | 24 |
| | Construction C | 16 |
| ०७ | Security | 2 |
| ०८ | Meeting | 2 |
| ०९ | Water Supply Department | 5 |
| १० | Accommodation-Dwarawati | 4 |
| ११ | Accommodation-Saiashram Dharmashala | 2 |
| १२ | Saiashram Bhaktiniwas | 5 |
| १३ | Bookshop System | 6 |
| १४ | Prasadalay System | 19 |
| १५ | Prasadalay Subsotre System | 10 |
| १६ | Canteen System | 2 |
| १७ | Vehicle System | 20 |
| १८ | Record System | 2 |
| १९ | Telephone Billing System | 12 |
| २० | Inward System | 42 |
| २१ | Outward System | 11 |
| २२ | Cheque/ Demand Draft | 24 |

| | | |
|---|---|---|
| २३ | Postal Money Order | 12 |
| २४ | Net Banking or payment Gateway Facility | 11 |
| २५ | Money Transfer | 3 |
| २६ | Cashier office | 7 |
| २७ | ERP System | 4 |
| २८ | Oracle System of Accounts (blling) | 7 |
| २९ | Receipts | 5 |
| ३० | Cloth Shop | 10 |
| ३१ | Donation Counter | 21 |
| ३२ | HR & Payroll | 14 |
| ३३ | Labour | 2 |
| ३४ | Education | 1 |
| ३५ | Medical Aid | 7 |
| ३६ | Legal | 10 |
| ३७ | OLS | 3 |
| ३८ | LAN Point | 1 |

मा. श्री. के. व्ही. रमणी सो. यांनी उपरोक्त नमुद त्रुटींचे निराकरण करणेसाठी दिनांक १५/०९/२०१३ ही अंतिम मुदत दिलेली होती. यासही कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडून कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही. याबबत इकडील विभागाने कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे प्रतिनिधी श्री संदिप भाले व श्री लक्ष्मण वराडकर यांना विचारण केली असता त्यानी टाळाटाळीचे धोरण घेतले आहे. त्यामुळे प्रकल्पातील त्रुटींचे निरसन झाले किंवा कसे याबाबत साशंकता आहे. त्यामुळे इकडील विभागाला सध्यस्थितीची माहिती घेता येत नाही व कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे प्रतिनिधी याबाबत सहकार्य करत नाही.

**मागणीः अ]** श्री अजय मोरे सो., मा. कार्यकारी अधिकारी यांनी साईटेक प्रकल्पाची आढावा बैठक दिनांक ०८/११/२०१३ रोजी आयोजित केलेली होती. सदर बैठकीमध्ये रिलायन्स बील, कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे यांची बीले, मा. श्री. लेखाशाखा विभागाची संगणक प्रणाली, (ERP System,) चेक डीडी संगणक प्रणाली, खरेदी भांडार विभागांची संगणक प्रणाली व निवास्थाने विभागांचे संगणक प्रणालीबाबत आढावा घेण्यात आला. सदरचे संगणक प्रणालींमध्ये विविध विभागांचे असलेल्या अडचणी/ त्रुटी, विविध विभागांचे END USER यांनी मांडल्या सदर अडचणी/ त्रुटी दुरुस्त करुन त्याचा अहवाल पुढील बुधवारी दिनांक १३/११/२०१३ रोजी होणाऱ्या आढावा बैठकीमध्ये सादर करणेबाबत श्री संदिप भाले- कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे प्रतिनिधी यांना सांगितलेले होते. मा.कार्यकारी अधिकारी यांचे निर्देशनानुसार प्रत्येक बुधवारी सांयकाळी ६ वाजता साईटेक प्रकल्पाची आढावा बैठक आयोजित करण्याचे ठरले आहे. त्यानुसार दिनांक १३/११/२०१३ रोजी मा. कार्यकारी अधिकारी सो. यांचे अध्यक्षतेखाली साईटेक प्रकल्प आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये मागील बैठकीत सुचविण्यात आलेल्या त्रुंटींबाबत आढावा घेतला असता त्यातील फक्त दोनच त्रुटीं निरसन झाल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे सदरील प्रकल्पावर काम करणारे कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे यांचे प्रतिनिधी गांभिर्याने काम करत नाही, असे निदर्शनास आले आहे. कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना करारनाम्यातील अटी शर्तीनुसार प्रति महिना रक्कम रुपये २७ लाख अदा केली जात असून दुसरीकडे ते दिलेली कामे करत नाही. यामुळे संस्थानचे दोन्ही बाजूने नुकसान होत आहे. शिवाय करारनाम्यानुसार त्यांचे सध्याचे Deduction फक्त ७ % ते ९ % इतकेच आहे. या सर्व बाबींचे अध्ययन करता कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे यांना संदर्भ क्र. ०३ ने दिलेल्या त्रुटी / दोष निरसन होईपर्यंत त्यांना दिले जाणारे मासिक बीलाचे पूर्ण पेमेंट अथवा मासिक बीलाच्या रक्कमेतून ५० % रक्कम कपात करावी, असे नम्र मत आहे.

**ब]** साईटेक प्रकल्पातील संगणक प्रणालीचे कामकाजाचे आणि मुल्यांकणाचे महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रज्ञान संचनालय विभागामार्फत Third Party Audit करुन घेण्यात यावे, असे नम्र मत आहे. यामुळे सदर प्रकल्पातील कामकाजाचा आढावा येऊन पुढील रुपरेषा ठरेल.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत :** उपरोक्त अ मध्ये नमूद केलेप्रामणे कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे यांनी विविध विभागांचे संगणक प्रणालीमध्ये असणाऱ्या त्रुटी / दोषांचे निरसन होईपर्यंत त्यांना देण्यात येणारे मासिक बीले थांबविण्यात यावीत अथवा मासिक बीलाच्या रक्कमेतून ५० % रक्कम कपात करावी. तसेच घ्बङ नुसार साईटेक प्रकल्पाअंतर्गत प्राप्त झालेल्या संगणक प्रणालींचे कामकाजाचे आणि मुल्यांकणाचे, महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रज्ञान संचनालय विभागामार्फत Third Party Audit करुन

घेणेस व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.४६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमध्ये राबविल्या जात असणाऱ्या साईटेक प्रकल्पातील संगणक प्रणालीच्या कामकाजाचे आणि मुल्यांकणाचे महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रज्ञान संचनालय विभागामार्फत Third Party Audit करुन घेणे अत्यावश्यक आहे. परंतु याबाबतीत शासनास पत्रव्यवहार करणेपुर्वी मा.श्री.के.व्ही. रमणी, अध्यक्ष, तांत्रिक सल्लागार समिती व कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे प्रतिनिधी यांची त्रिसदस्य समिती समवेत बैठक आयोजित करणेत यावी. या बैठकीमध्ये चर्चा झाल्यानंतर प्रस्तावात नमुद केलेल्या परिच्छेद 'अ' चा विचार करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.४८** **साईटेक प्रकल्पचे ऑनलाईन सेवासाठीच्या टेलिकॉम सुविधेबाबत.**

**प्रस्ताव-** **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:** दिनांक ०७/११/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७९९.

**प्रास्ताविक :** माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत साईटेक प्रकल्प उभारणीची कार्यवाही हाती घेण्यात आलेली आहे. त्यानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना प्रकल्प उभारणीसाठीचा कार्यादेश देण्यात आलेला आहे. सदर प्रकल्पाअंतर्गत श्री साईभक्तांना ऑनलाईन रुम बुकिंग, दर्शनपास व देणगी या सुविधा online.sai.org.in या संकेतस्थळावर (वेबसाईट) सुरु करण्यात आलेल्या आहेत. या सेवेचा लाभ घेणेसाठी ऐअरटेल व रिलायन्स यांचेकडून इंटरनेटव्दारे शिरडी येथील सर्व्हरला इंटरनेटव्दारे कनेक्ट व्हावे लागते. परंतू असे निर्दशनास आले आहे की, ऐअरटेल (५१२ KBPS) व रिलायन्स (२ MBPS) यांची सेवा वेळो-वेळी खंडीत पडते. यामुळे मा. कार्यकारी अधिकारी सो. यांनी ऐअरटेल व रिलायन्स यांची सेवा बंद करणेबाबत निर्देश दिलेले आहे. याबाबत कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे यांना ऐअरटेल व रिलायन्स यांचे ऐवजी नविन नामांकित कंपन्यांचे दर पत्रक मागविणेबाबत दिनांक ०५/१२/२०१३ रोजीचे पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे यांनी दिनांक १३/१२/२०१३ रोजीचे ई-मेलव्दारे खालीलप्रमाणे दरपत्रक सादर केलेली आहे.

| Sr. No. | COMPANY Name | Internet Speed (Bandwidth) | One Time Charges | Charges for per year |
|---|---|---|---|---|
| 01 | BSNL | 8/10 MBPS | 50,000/- + Fiber laying cost as Actual | Rs. 10,00,000/- + Tax |
| 02 | TATA Teleservices | 8 MBPS | 5000/- + Tax | Rs. 4,00,000/- + Tax |
| 03 | TATA TTML | 2 MBPS | 75,000/- | Rs. 4,25,000/- + Tax |

उपरोक्त इंटरनेट सुविधा पुरवठादारांपैकी BSNL यांचेकडुन (Primary Link) तसेच TATA Teleservices व TATA TTML यांचेपैकी एका कंपनीचे इंटरनेट सुविधा घेणेसाठी दिनांक १४/१२/२०१३ रोजीची टिपणी व मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढील विषयाकरीता टिपणी सादर केली असता, मा.कार्यकारी अधिकारी सो., यांनी BSNL घ्यावे. प्रथम कार्यवाही पुर्ण करावी व कार्योत्तर मंजुरीसाठी नंतर येत्या बैठकीत सादर करावेछ, असे निर्देश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार BSNL यांना दिनांक १७/१२/२०१३ रोजी १० MBPS क्षमतेची इंटरनेट लिंक सुरु करणेबाबत पत्र देण्यात आलेले आहे. तसेच दिनांक ०३/१२/२०१३ रोजी कॉग्नीझंट यांनी सदर इंटरनेट लिंकसाठी आवश्यक असणाऱ्या तांत्रिक बाबींची BSNL यांचेकडुन पुर्तता करुन मिळणेबाबत पत्राने त्यांना कळविले असता, दिनांक १९/१२/२०१३ रोजीचे पत्राव्दारे BSNL यांनी कॉग्नीझंट यांना पत्राव्दारे समर्थता दर्शवलेली आहे. त्यानुसार दिनांक २१/१२/२०१३ रोजीचे कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे BSNL यांचे अभिप्रायनुसार यांचे ई-मेल व्दारे त्यांनी BSNL ची १० MBPS क्षमतेची इंटरनेट लिंक घेणेस हरकत नाही, असे कळविलेले आहे.

**मागणी**: BSNL ची १० MBPS क्षमतेची इंटरनेट लिंक डेटा सेंटर येथे संस्थानचे नेटवर्कमध्ये कार्यान्वित करणेसाठी कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी अंदाजे रक्कम रुपये चार लाख + Tax इतका खर्च कळविलेला आहे. तसेच BSNL यांनी १० MBPS क्षमतेची इंटरनेट लिंकसाठी रुपये ८,८१,१८०/- (Tax सहीत) इतका खर्च कळविलेला आहे. सदर इंटरनेट सुविधा पूर्णपणे कार्यान्वित करणेसाठी येणाऱ्या कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांच्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता मिळणेसाठी तसेच BSNL यांना १० MBPS क्षमतेची इंटरनेट लिंकसाठी पुढील एका वर्षाकरीता रुपये ८,८१,१८०/- (Tax सहीत) रक्कम ॲडव्हान्स स्वरुपात देणेकामी व सदर कामाची कार्यवाही पूर्ण करणेस आपली मान्यता असावी, असे नम्र मत आहे.

**विभागाचा अभिप्राय स्पष्ट**: इंटरनेट सुविधा पुरवठादारांपैकी BSNL यांचेकडुन १० MBPS क्षमतेची इंटरनेट लिंक (Primary Link) घेणेसाठी पुढील एक वर्षाकरीता रुपये ८,८१,१८०/- (Tax सहीत) रक्कम ॲडव्हान्स स्वरुपात त्यांना चेकव्दारे देणेस, तसेच सदर इंटरनेट सुविधा पूर्णपणे कार्यान्वित

करणेसाठी कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांच्या येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता मिळणेसाठीचा प्रस्ताव निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.४७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

**तसेच, मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडून सदरच्या लिंकची साईटेक प्रकल्पांतर्गत उभारणी (सेटअप) करणेत यावी, याकामी येणारा अंदाजे रु.१,२५,०००+ टॅक्सेस मात्र खर्च मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना आदा करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.४९** **साईटेक प्रकल्पासाठी मानधन तत्वावर तंत्रज्ञ घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुदः** कलम १७ (१) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**प्रास्ताविकः** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०७/११/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ७९९ नुसार माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत साईटेक प्रकल्प उभारणीची कार्यवाही हाती घेण्यात आलेली आहे. त्यानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी यांना प्रकल्प उभारणी साठी जा.क्र.एसएसएसटी/आयटी/१५०३०/२००९ दि.०९/१२/२००९ रोजीच कार्यादेश देण्यात आलेला आहे. साईटेक प्रकल्प एकुण ६ टप्प्यामध्ये कार्यान्वीत करण्यात येणार होता. सहा टप्प्यातील ३६ संगणक प्रणाली करारनाम्यानुसार प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील पहिली कार्यप्रणाली संस्थानने स्विकारल्यापासून १८ महिन्याच्या कालावधीत कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडून प्राप्त होणे बंधनकारक होते.

त्यास अनुसरुन कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे यांनी प्रकल्प उभारणीचे कामास माहे जानेवारी, २०१० पासून सुरुवात केलेली आहे. करारनाम्यानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे यांचेकडून खालीलप्रमाणे संगणक प्रणाली संस्थानला प्राप्त होणे अपेक्षीत आहे.

| **अ.नं.** | **रिलीज टाईप** | **संगणक प्रणाली** |
|---|---|---|
| ०१ | Release - 1 | Accounts, Store/ Inventory, Prasadalaya, Room Allotment, Online Services, Q Management-1 |
| ०२ | Release – 2 | Cheque/DD, Donation, HR & Payroll, Labour Dept, Ladu-Prasad, Money-Order, Telephone Billing, Purchase. |
| ०३ | Release – 3 | Canteen, Information Systems For Sr. Officers, Inward-Outward, Life Membership, Book Store/ Shop, Saileela Enrollment. |
| ०४ | Release – 4 | Electrical Dept, Kiosk, Legal Dept, Meeting Section, Vehicle Dept, Water Supply |
| ०५ | Release – 5 | Cloth Store/ Shop, Conustruction, Guest Information, Medical Aid, MIS, Security Dept. |
| ०६ | Release - 6 | Education Complex, Festival Budgeting & Management, Integration with HMS System, Old Data Migration, Proxy and E-Mail Server Integration & Setup, Record Maintenance, Online Q Management -2. |

प्रकल्पातील पहिल्या टप्प्यातील कार्यप्रणाली या दि. १४/०७/२०११ रोजी कार्यान्वीत करण्यात ओलेल्या आहेत. या कार्यप्रणाली पुढीलप्रमाणे आहेत:-

१.ऑनलाईन सर्व्हिसेस २. दर्शन पास (Q-management-१)

३.प्रसादालय कुपन विक्री (Prasadalya Coupan) ४. रुम रिझर्वेशन (Room Allotment)

पहिली संगणक कार्यप्रणाली दिनांक १४/०७/२०११ रोजी कार्यान्वित झालेली असून करारनाम्यातील अटी / शर्ती नुसार पहिली संगणक कार्यप्रणाली स्विकारले पासून, कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे यांना दरमहा रक्कम रुपये २७,६४,५४३/- ६९ माहिने देणे बंधनकारक असून, ती त्यांना दिली जात आहे. त्यानुसार आज अखेर (जुन-२०१३अखेर) अंदाजे ७,३४,२९,५३०/- इतकी रक्कम त्यांना अदा करण्यात आलेली आहे.

साईटेक प्रकल्प करारनाम्यातील अटी / शर्तीनुसार सदरील प्रकल्पाचे सहा टप्पे जुन २०११ ला पूर्ण होणे अपेक्षित होते. परंतु प्रत्यक्षात कार्यवाही न झालेमुळे कॉग्नीझंट कंपनीने साईटेक प्रकल्प उभारणीसाठी सादर केलेल्या Revised Deployment Plan ला दिनांक १८/०७/२०१२ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.६२६ नुसार दिनांक ३१/०३/२०१३ अखेर मुदतवाढ देण्यात आलेली होती. त्यानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना देण्यात आलेल्या मुदतीत त्यांना विविध विभागांचे संगणक प्रणाली पूर्ण क्षमतेने चालू करणे बंधन कारक होते. परंतु त्यांना दिलेली कामे मुदतीत पूर्ण न झाल्यामुळे, त्यांनी केलेल्या विनंतीवरुन प्रकल्प उभारणीस, मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २६/०७/२०१३ रोजीच्या सभेतील निर्णय क्र. ६११ नुसार दिनांक ३१/०८/२०१३ अखेर मुदतवाढ देण्यात

आली होती. याही वेळी त्यानी कामात चालढकलपणा केल्यामुळे प्रकल्प कार्यान्वीत करण्यात आलेल्या अडचणी दुर झालेल्या नाहीत. दिवसें-दिवस त्यांचे तांत्रिक कामकाजाचा उराका मंदगतीने चालू आहे. शिवाय चालू झालेल्या संगणक प्रणालींचे Source Code इकडील विभागास मिळालेले नाही. सध्यस्थितीत इकडील विभागाकडे विभाग प्रमुखांव्यतिरीक्त फक्त तिनच तांत्रिक मनुष्यबळ आहे. त्यांची शैक्षणीक पत्रताही कमी असून त्यांना अद्यायावत संगणक प्रणालीचे प्रशिक्षण दिल्यानंतरही त्यांना साईटेक प्रकल्पातील Source Code वर काम करता येईल याबाबत साशंकता आहे. यामुळेच कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे यांनी तुमच्याकडे तज्ञ तंत्रज्ञ नसल्यामुळे Source Code देण्यास टाळा-टाळ करत आहे. परंतु हि सध्याचे इकडील विभागाच्या मनुष्यबळाच्या आधारे वस्तुस्थिती आहे.

**मागणी:** वरील सर्व बाबींचे अध्ययन करीता साईटेक प्रकल्प कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे यांनी मध्येच सोडल्यास नविन निविदाधारक मिळे पर्यंत सर्व सुविधा बंद पडू शकतात. शिवाय अद्यायावत तंत्रज्ञानाचे ज्ञान असणारे कर्मचारी नसल्यामुळे, संबंधित कंपनीकडून Source Code घेता येत नाही. तसेच सदरील सॉफ्टवेअर राबवितांनाही अनेक अडचणी उद्‌भावत आहे.शिवाय लेखा परिक्षण अहवालात तंत्रज्ञ रिपोर्ट राईटर व अनुषंगिक तंत्रज्ञ घेणेबाबत सुचित केले आहे. सदरील साईटेक प्रकल्पाचा आढावा घेता खालील तंत्रज्ञ यांची किमान दोन वर्षाकरीता मानधन तत्वावर नेमणूक होणे गरजेचे आहे.

| अ. न | Designation/ पदनाम | Qualification पात्रता | पदसंख्या | मानधन (प्रति महा) |
|---|---|---|---|---|
| 01 | ERP programmer | B.E. Electronics/IT/computer/ MCA<br>4 years of experience in software development at large scale<br>ERP –oracle International certification | 2 | Rs. 32,000/- |
| 02 | ERP Report writer | B.E. Electronics/IT/computer/ MCA<br>4 years of experience in software development at large scale<br>ERP –oracle report International certification | 2 | Rs. 25,000/- |
| 03 | ERP Functional | B.E. Electronics/IT/computer/ MCA<br>4 years of experience in software development at large scale<br>ERP –oracle International certification | 2 | Rs. 30,000/- |
| 04 | Software Programmer | B.E. Electronics/IT/computer/ MCA<br>4 years of experience in software development at large scale<br>J2EE / JAVA International certification | 2 | Rs. 30,000/- |
| 05 | System Administrator | B.E. Electronics/IT/computer<br>4 years of experience in software development at large scale<br>Linux International certification | 1 | Rs. 30,000/- |
| 06 | Database Administrator | B.E. Electronics/IT/computer/ MCA<br>4 years of experience in software development at large scale<br>Oracle Database & Application Server-International Certification<br>Must be team lead for application team. | 1 | Rs. 35,000/- |
| 07 | Network Engineer | B.E. Electronics/IT/computer<br>4 years of experience in software development at large scale<br>CCNA-International certification | 1 | Rs. 20,000/- |
| 08 | Webmaster-Cum Programmer | B.E. Electronics/IT/computer/ MCA<br>4 years of experience in software development at large scale<br>Should have Six Month C-DAC Web Design Diploma.<br>Web HTML, Coral-Draw, Flash player<br>ASP.Net International Certification<br>Knowledge of SQL Server & Scripting. | 1 | Rs. 20,000/- |

वरीलप्रमाणे मानधन तत्वावर तातडीने नेमणूक केल्यास दैनंदिन कामकाजात गती येईल शिवाय साईटेक प्रकल्पातील सध्याच्या व संभाव्य अडचणी दुर होतील. तसेच कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पूणे यांनी मध्येच प्रकल्प सोडल्यास संस्थानचे फारसे नुकसान होणार नाही. नविन कंपनी नेमणेपर्यंत, सदरील कर्मचाऱ्यांच्या आधारे सदरील सेवा सुरु राहतील त्यामुळे श्री साईभक्तंना अखंडीत सेवा देता येईल, असे नम्र मत आहे.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:** साईटेक प्रकल्पासाठी उपरोक्त नमूद केलेप्रमाणे मानधन तत्वावर तंत्रज्ञ नेमणेच्या मान्यतेसाठी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

निर्णय क्र.४८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईटेक प्रकल्पासाठी मानधन तत्वावर तंत्रज्ञाची नेमणूक करणेकामी वर्तमानपत्रामध्ये तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेत यावी, असे ठरले व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.५०** **ऑनलाईन सेवेव्दारे रद्द केलेल्या सेवेच्या रक्कमेतून ५०% ऐवजी ७५% रक्कम कपात करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **व्यवस्थापन समितीचे ठराव क्र.:** मा.व्यवस्थापन समितीचे दि. ०७/११/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७९९.

**प्रास्ताविकः** मा.व्यवस्थापान समितीचे विविध निर्णयानुंसार, माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत साईटेक प्रकल्प उभारणीची कार्यवाही हाती घेण्यात आलेली आहे. प्रकल्पाअंतर्गत साईभक्तांना ईंटरनेटद्वारे रुम बुकींग व दर्शन पासची सुविधा ऑनलाईन सर्व्हिसेसद्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. ऑनलाईन सेवेचा लाभ घेणाऱ्या भक्तांना त्यांनी घेतलेल्या सेवेचा आकार भरण्यासाठी वेबसाईटवर सध्या एचडीएफसी बँकेचा गेटवे उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. सदरची कार्यप्रणाली १४-०७-२०१३ रोजी कार्यान्वीत करण्यात आलेली आहे. ऑनलाईन सर्व्हिसेस या सेवेचा लाभ घेणाऱ्या साईभक्तांच्या संखेमध्ये दिवसेंदिवस लक्षणीय वाढ होत आहे. सदर कार्यप्रणालीसंदर्भातील धोरणात्मक निर्णयास मा.व्यवस्थापन समितीचे दि. १२/०६/२०१३ रोजीच्या सभेत विषय नं.१०५, निर्णय क्रं.४४२ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

ऑनलाईन सर्व्हिसेसद्वारे आरक्षीत केलेली रुम अथवा दर्शन/आरती पास काही करणास्तव साईभक्ताने दिलेल्या मुदतीत रद्द केली असता, त्यांचे रक्कमेच्या ५०% रक्कम साईभक्तांचे बँक खात्यामध्ये ऑनलाईन जमा केली जाते व उर्वरीत ५०% रक्कम संस्थानचे जनरल डोनेशन खाती जमा होते. दिवसेंदिवस साईभक्तांकडून सेवा रद्द करण्याचे प्रमाण वाढत चाललेले आहे. अनेक भक्त लवकर रुम अथवा दर्शन/आरती पास बुक करुन शेवटच्याक्षणी सदरची सेवा रद्द करतात, सबब काही साईभक्तांना आवश्यक असतानाही सदर सेवेचा लाभ घेता येत नाही.

**मागणीः** ऑनलाईन सर्व्हिसेस या कार्यप्रणालीमधून सेवांचा लाभ घेणाऱ्या भक्तांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चाललेले आहे, त्याच प्रमाणात सेवा रद्द करणाऱ्यांची संख्याही वाढत आहे. दिलेल्या मुदतीच्या शेवटच्या क्षणी सेवा रद्द केल्याने काही साईभक्तांना गरज असतानाही सदर सेवेचा लाभ घेता येत नाही. सध्या साईभक्तांनी रद्द केलेल्या सेवांच्या रक्कमेतुन ५०% रक्कम कपात करुन उर्वरीत ५०% रक्कम त्यांचे बँक खात्यामध्ये ऑनलाईन जमा केले जातात. कपात केलेली रक्कम संस्थानचे जनरल डोनेशन खाती जमा केली जाती. बुक केलेल्या सेवा रद्द करणाऱ्या भक्तांची वाढती संख्या लक्षात घेता, सदर साईभक्तांच्या रक्कमेतुन ५०% ऐवजी ७५% रक्कम कपात करुन उर्वरीत २५% रक्कम त्यांचे बँक खात्यामध्ये जमा केल्यास, विनाकारण सर्व्हिस बुक करुन नंतर सदरची सेवा रद्द करणाऱ्या साईभक्तांचे प्रमाण कमी होऊन गरजु साईभक्तांना सदर सेवांचा लाभ घेता येईल असे नम्र मत आहे. सबब ऑनलाईन सर्व्हिसेस कार्यप्रणालीतून रद्द केलेल्या सेवांच्या रक्कमेतुन ५०% ऐवजी ७५% रक्कम कपात करुन उर्वरीत २५% रक्कम साईभक्तांचे बँक खात्यामध्ये जमा करण्यात यावी असे नम्र मत आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मतः** ऑनलाईन सर्व्हिसेस या कार्यप्रणालीद्वारे बुक केलेली रुम अथवा दर्शन/आरती पास साईभक्ताने काही कारणास्तव रद्द केल्यास, त्यांचे रक्कमेतुन ५०% ऐवजी ७५% रक्कम कपात करण्याचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.४९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, बरेचसे साईभक्त ऑनलाईन सर्व्हिसेस या कार्यप्रणालीमधून आरक्षीत केलेली रुम अथवा दर्शन/ आरती पास काही कारणास्तव मुदतीच्या शेवटच्या क्षणी रद्द करतात, त्यामुळे बऱ्याच साईभक्तांना गरज असतानाही सदर सेवेचा लाभ घेता येत नाही. यामुळे दि.०१ फेब्रुवारी २०१४ पासून साईभक्तांनी रद्द केलेल्या उपरोक्त सेवांची रक्कम १०० % कपात करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.५१** **Trend Micro Anti Virus सॉफ्टवेअर नुतनीकरणाची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद :** कलम १७ (१) नुसार

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रः** दि. ०६/०४/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३१३.

**प्रास्ताविक**: नेटवर्कमध्ये चालू असणाऱ्या संगणक प्रणालीला संगणक व्हायरसचा प्रादूर्भाव होऊ नये, साठविण्यात आलेली माहिती सुरक्षित राहावी, नेटवर्क पूर्ण क्षमतेने सतत कार्यान्वीत राहावे यासाठी TREND MICRO ANTI VIRUS १०० युजर्ससाठी चालणारे सॉफ्टवेअरचे नुतनिकरण करणेस दि. ०६/०४/२०१२ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. ३१३ ने मान्यता देण्यात आलेली होती. TREND MICRO ANTIVIRUS (सॉफ्टवेअर) १०० युजर्सचे पॅकेज एक वर्षाचे कालावधीसाठी कार्यान्वित करण्यात आलेले होते त्याची मुदत दिनांक १०/०९/२०१३ रोजी संपल्याने, सदर सॉफ्टवेअर पुढील कालावधीसाठी नुतनिकरण करणे आवश्यक होते.

VIRUS चा प्रदुर्भाव होऊ नये यासाठी, TREND MICRO ANTI VIRUS सॉफ्टवेअरचे १०० युजर्सची क्षमता असलेले पॅकेजचे पुढील एक वर्षाचे कालावधीसाठी नुतनिकरण करणेसाठी

संस्थानचे अधिकृत वेबसाईटवर दिनांक २९/०८/२०१३ अखेर जाहिरात प्रसिध्द करुन सिलबंद निविदा दिनांक ३१/०८/२०१३ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत स्विकारुन प्राप्त झालेल्या निविदा मा. कार्यकारी अधिकारी सो. यांचे समक्ष उघडून न्युनत्तम निविदाधारक यांचेकडून नुतनिकरण करुन त्यास मा. व्यवस्थापन समितीची कार्योत्तर मान्यता घेणेस इकडील विभागाचे दिनांक १६/०८/२०१३ रोजीचे टिपणी अन्वये मान्यता घेण्यात आलेली होती.

परंतु Gadgets Laptops (Division of Sujata Computert P. Ltd.) Pune यांची एकच निविदा आवक विभागाकडून उघडलेल्या स्थितीत प्राप्त झालेली होती. निविदा प्रक्रियेसाठी एकुण तिन निविदांची आवश्यकता असल्याने TREND MICRO ANTI VIRUS सॉफ्टवेअरचे नुतनिकरण करणेसाठी संस्थानचे www.sai.org.in या अधिकृत वेबसाईटवर दिनांक १९/०९/२०१३ अखेर फेर निविदा प्रसिध्द करुन संस्थानचे शिरडी येथील कार्यालयामध्ये दिनांक २०/०९/२०१३ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत सिलबंद निविदा सादर करण्याची अंतिम मुदत ठेवणेस दिनांक ०९/०९/२०१३ रोजीचे टिपणी अन्वये मान्यता घेण्यात आलेली होती. त्यानुसार प्राप्त झालेल्या निविदांचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | तपशिल | दर प्रति युजर्स | एकूण किमंत |
|---|---|---|---|---|
| ०१ | Gadgets Laptops (Division of Sujata Computert P. Ltd.) Pune | Trend Micro (Worry-Free Business Security Standard ver 7.x) 100 users | 702/- | 70,200/- |
| **०२** | **Minitek systems (I) Pvt. Ltd. Nashik** | | **615/-** | **61,500/-** |
| ०३ | SM Enterprises, Pune | | 900/-+ Tax | 90,000/-+ Tax |
| ०४ | Softech, Pune | | 1,000/- + Tax | 1,00,000/- + Tax |

उपरोक्त प्राप्त झालेल्या निविदांपैकी Minitek systems (I) Pvt. Ltd. Nashik यांची निविदा रक्कम रुपये ६१,५००/- या न्युनत्तम दराची असल्याने TREND MICRO ANTI VIRUS १०० युजर्सचे सॉफ्टवेअर नुतनिकरण करणेस त्यांना कार्यादेश देण्यात आला होता. त्यास अनुसरुन Minitek systems (I) Pvt. Ltd. Nashik यांनी दिनांक ०५/१२/२०१३ रोजी दिनांक ११/०९/२०१३ ते दिनांक १०/०९/२०१४ या एक वर्षाचे कालावधीसाठी Installation करुन दिलेले आहे.

**मागणी** : Minitek systems (I) Pvt. Ltd. Nashik यांची निविदा रक्कम रुपये ६१,५००/- या न्युनत्तम दराची असल्याने TREND MICRO ANTI VIRUS 100 युजर्सचे सॉफ्टवेअर नुतनिकरण करणेस त्यांचेकडून दिनांक ११/०९/२०१३ ते दिनांक १०/०९/२०१४ या एक वर्षाचे कालावधीसाठी Installation करुन घेण्यात आलेले आहे. Minitek systems (I) Pvt. Ltd. Nashik यांचे TREND MICRO ANTI VIRUS 100 युजर्सचे सॉफ्टवेअर नुतनिकरण बील दि. १२/१२/२०१३ रोजीचे टिपणी अन्वये आदागीसाठी पाठविण्यात आलेले आहे. सदर प्रस्तावास मा. व्यवस्थापन समितीची कार्योत्तर मान्यता व नोंद घेण्यात यावी, असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :** तांत्रिक व आर्थिक.

**विभागाचा अभिप्राय/ सष्ट मत :** तरी, Minitek systems (I) Pvt. Ltd. Nashik यांची निविदा न्युनत्तम दराची असल्याने TREND MICRO ANTI VIRUS 100 युजर्सचे सॉफ्टवेअरचे त्यांचेकडून (दिनांक ११/०९/२०१३ ते दिनांक १०/०९/२०१४) या एक वर्षाचे कालावधीसाठी नुतनिकरण करण्यात आलेली असून त्यासाठी खर्च रक्कम रुपये ६१,५००/- इतका खर्च आलेला आहे. सदर खर्चाची नोंद घेणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.५०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची व झालेल्या खर्चाची नोंद घेणेत आली.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.५२** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी शिर्डी नगरपंचायत यांचे विरुध्द दाखल केलेले टॅक्स अपील समझोत्याने लोकन्यायालयात मिटविणेबाबत.**

**प्रस्ताव-** शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडुन इमारतीवर आकारणेत येणारे कराचे नाराजीने संस्थानने मा. कोपरगाव कोर्टात शिर्डी नगरपंचायत यांचे विरुध्द् संस्थानने अपीले दाखल केली होती. नगरपालीके विरुध्द् संस्थानने दाखल केलेले टॅक्स अपीलांचे कामकाज चालू होते. याशिवाय शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचे विरुध्द संस्थानने सदरचे कर आकारणीचे अपीले सन १९९१ पासुनचे दाखल केलेले होते. शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडून संसथान मिळकतीबाबत मिळकत टॅक्स आकारण्यात येऊ नये. अशी मागणी संस्थानने प्रस्तुत टॅक्स अपीलात केलेली आहे. एकूण सोळा टॅक्स अपीले दाखल करणेत आलेले होते. टॅक्समध्ये सवलत मिळावी, अशी संस्थानची विनंती होती. परंतू इतर कामाचे संदर्भात उदा. रस्त्ये दुरुस्ती, स्वच्छता आकार इत्यादी कामात संस्थान नगरपालीकेस आर्थिक मदत देते, ही बाब विचारात घेंता राहाता येथील महालोक अदालत मध्ये १६ टॅक्स अपीले संस्थानने मागे घेतलेले आहेत.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) चे संबंधीत विविध न्यायालयात जे दावे प्रलंबित आहेत. मा. राहाता कोर्टातील व मा.कोपरगांव कोर्टातील काही दाखल केलेले दाव्यांचे स्वरुप दावा दाखल करतेवेळीची परिस्थिती व त्यामध्ये झालेला बदल इत्यादी बाबी विचारात घेता कांही कोर्ट प्रकरणे मा.लोक अदालत समोर सादर करुन समझोत्याने वाद संपुष्टात आल्यास, संस्थानचा वेळ, प्रासंगिक संभाव्य खर्च बचत होईल. असा विचार होऊन त्याचबरोबर संस्थानबद्दल लोकांमध्ये सामंजस्य वाढण्यास मदत होईल. मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६/०२/२०१३ रोजीचे ठरावातील विषय नं.६० निर्णय क्रमांक १८० अनुसरुन दि.०३/०३/२०१३ रोजीचे महालोक अदालत मध्ये संस्थानने शिर्डी नगरपंचायत शिर्डी याचे विरुध्द् दाखल केलेले एकुण १६ टॅक्स अपील संस्थानने विनाशर्त मागे घेतलेले आहे . मात्र राहाता कोर्टातील एक टॅक्स अपील त्यावेळी Hearing सुनावणीसाठी तसेच लोक अदालत समोर मागे घेणेसाठी मा. कोर्टापुढे सादर झाले नव्हते .त्यामुळे प्रस्तुतचे टॅक्स अपील जुना नंबर ६३६/२००४, नविन नंबर ७१९/२००५ मध्ये समझोता होऊन अपील Withdraw कॉम्प्रमाईज झालेले नाही. इतर टॅक्स अपीला प्रमाणेच प्रस्तुत उर्वरीत टॅक्स अपील मागे घेता येईल.

तरी प्रस्तुतचे टॅक्स अपिल इतर १६ टॅक्स अपिला प्रमाणेच लोकअदालत मध्ये किंवा तारखांचे वेळी Withdraw मागे घेणेबाबतचे विचारार्थ सादर.

निर्णय क्र.५१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी शिर्डी नगरपंचायत यांचे विरुध्द दाखल केलेले टॅक्स अपील समझोत्याने लोकन्यायालयात मिटविणेसाठी मा.कार्यकारी अधिकारी यांनी मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेशी चर्चा करावी, असे ठरले.** (कार्यवाही- विधी अधिकारी)

---

विषय नं.५३ **संरक्षण अधिकारी यांचेकरीता कायमस्वरुपी चारचाकी वाहन मिळणेबाबत.**

प्रस्ताव- संरक्षण विभागाअंतर्गत चार एजन्सींची नेमणूक करुन मंदिर, मंदीर परिसर, साईप्रसाद परिसर, श्री साईप्रसादालय, शांती निकेतन (पिंपळवाडी रोड), साईआश्रम निवासस्थान भाग -०१, साईआश्रम भाग-०२ (निमगांव शिवार), हेलीपॅड, साईगार्डन, कनकुरी तळे, श्रीरामनगर जवळील वॉटर हेड टँक, साईनाथ रुग्णालय, साईबाबा हॉस्पीटल, द्वारावती भक्तनिवास, साईबाबा भक्तनिवास, वाहन विभाग येथे संस्थान मालमत्तेची रक्षण करणे व साईभक्तांना मदत, मार्गदर्शन करणेकामी रक्षकांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

सुरक्षा रक्षकांवर नियंत्रण राहणेसाठी तसेच संस्थान परिसराची पहाणी करणेसाठी संरक्षण अधिकारी, सुरक्षा निरीक्षक यांना राऊंड घेणेसाठी, मंदीर परिसरात पकडण्यात आलेले पाकिटमार पुरुष, महिला, लहान मुले यांना शिर्डी पोलिस स्टेशनमध्ये पोहच करणेकामी, तसेच मंदीर व संस्थानचे इतर परिसरात आवश्यक तेवढे सिक्युरिटी गार्ड नसल्याने काही अनुचित प्रकार घडल्यास तातडीने जाणे-येणेकामी संरक्षण विभागाकडील अधिकारी, सुपरवायझर कर्मचारी यांना जाणे-येणेकामी कायम स्वरुपी वाहन मिळणेबाबत संरक्षण विभागाकडून टिपणी सादर करण्यात आलेली आहे. सदरचे टिपणीवर मा.प्रशासकीय अधिकारी सो. यांनी वाहन विभागास वाहन/ड्रायव्हर उपलब्ध करुन देणेकामी तपासुन टिपणी सादर करावी, असे आदेश दिलेले आहेत.

तरी सदर टिपणीच्या आदेशान्वये संरक्षण विभागाने वेळोवेळी फोन केल्यास संरक्षण अधिकारी व सुपरवायझर यांना राऊंड मारणेकामी वाहन व ड्रायव्हर उपलब्ध करुन देतात.

परंतू बऱ्याच वेळेस वाहन येण्यास जादा वेळ लागतो, कधी-कधी ड्रायव्हर उपलब्ध नसल्याचे सांगितले जाते, त्यामुळे इमर्जन्सीचेवेळी अडचण येतात. संरक्षणाच्या दृष्टीकोनातून संरक्षण विभागास कायमस्वरुपी एक वाहन उपलब्ध असणे आवश्यक आहे.

तरी संरक्षण अधिकारी यांना निवासस्थान येथून घटनेठिकाणी जाणे-येणेकामी तसेच कार्यालयीन ईमरजेंन्सीकरीता कायमस्वरुपी चारचाकी वाहन चालकासह सध्याची परीस्थिती व संस्थान मालमत्ता व्याप लक्षात घेता मिळणेकरीता निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.५२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानच्या संरक्षण विभागाचे संरक्षण अधिकारी यांना कायम स्वरुपी वाहन देणेची आवश्यकता नाही, संरक्षण अधिकारी यांना फक्त कार्यालयीन कामासाठी सध्या आहे त्याच प्रचलीत पध्दतीने त्यांची मागणी येईल, त्यावेळेस तातडीने वाहन उपलब्ध करुन देणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख/ वाहन विभागप्रमुख)

---

विषय नं.५४ **साईआश्रम भाग- ०१/ ०२ व संस्थानचे इतर इमारतीमध्ये सी.सी. टी.व्ही. कॅमेरा बसविणेकामी सुरक्षा कन्सल्टंट नेमणूकीसाठी आलेल्या निविदेतील दरपत्रकांचा तुलनात्मक तक्त्यानुसार निर्णय होऊन सुरक्षा कन्सल्टंटची नियुक्तीकरणे.**

**किंवा-**

**सौ.स्मिता अशोक ढगे, ऑपटिमिस्टिक, अहमदनगर यांचे अर्जावर निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईआश्रम भाग ०१/०२ साईप्रसादालय, साईबाबा भक्तनिवासस्थान, द्वारावती व इतर संस्थान संलग्न इमारतींमध्ये तसेच संस्थानचे महत्वाचे परिसरात सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून सी.सी.टी.व्ही.कॅमेरे व इतर अनुषंगीक सुरक्षा साहित्य खरेदी करुन कार्यान्वित करणेकामी तांत्रीक सुरक्षा सल्लागार नियुक्त करणे आवश्यक असल्याने त्याकामी दि.०७.०४.२०१२ रोजीचे वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिद्ध केली होती. त्यानंतर मुदतीत १) महेंद्र स्पेशल सर्व्हीसेस ग्रुप,मुंबई, ०२) इंडियन इन्डुस्टीयल सिक्युरिटी सर्व्हीसेस प्रा.लि., दिल्ली ०३) डिग्नीटी आयटी कन्सल्टंटस्, पुणे ४) मे.डॉल्फिन,अ.नगर अशा ०४ निविदा धारकांनी सुरक्षा कन्सल्टंट बाबत निविदा या कार्यालयाकडे सादर केलेल्या होत्या.

**अ)** दि.१४.०७.२०१२ रोजी निविदा मा.त्रिसदस्सीय समितीचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आल्या.परंतु निविदाधारकांनी निविदेच्या दरामध्ये एकत्रित मानधन रक्कमेचा सर्व करांसहित एकत्रित मानधनाची रक्कम पुढील १५ दिवसांत सुधारित दरासहित सादर करावी,असे निविदाधारकांना सांगण्यात आले.

**ब)** दि.२९.०७.२०१२ रोजीचे मा.त्रिसदस्सीय समितीचे सभेपुढे उपरोक्त ०४ निविदाधारकांना बोलविण्यात आले. त्यांनी सुरक्षा कन्सल्टंन्सी बाबत सर्व करांसहित एकत्रित मानधन रक्कमेची सुधारीत दरपत्रके पुन्हा सादर केली. सदरची सुधारीत दरपत्रके पुन्हा त्याच दिवशी समक्षपणे उघडण्यात आली असुन त्या सुधारीत दरपत्रकांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन त्याच दिवशी सभेपुढे सादर करण्यात आला होता. त्यानंतर उपरोक्त निविदाधारकांना चर्चा /वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले. यापुर्वी निविदाधारकांनी दि.१४.०७.२०१२ रोजी सादर केलेल्या सुधारीत दरपत्रकानुसार तुलनात्मक तक्त्यात नमुद करण्यात आलेले दराचा तुलनात्मक तक्ता अवलोकनार्थ सोबत जोडण्यात आलेला आहे. दि.२९.०७.२०१२ रोजी उपरोक्त निविदाधारकांचा तांत्रीक तुलनात्मक तक्ता तयार केला असता त्यामध्ये अ.नं. ०३ चे निविदाधारक मे.डिग्नीटी आय.टी.कन्सल्टंट, पुणे यांचेकडे कामाचा अनुभव, वार्षिक उलाढाल, कामाची क्वॅालिटी, मनुष्यबळ संख्या याबाबत अनुभव नसल्याने तत्कालीन मा. कार्यकारी अधिकारी सो. यांनी No experience of Security work असा शेरा देण्यात आलेला आहे.

**क)** संरक्षण विभागाकडील दि.२६.०३.२०१३ रोजीचे मंजुर टिपणीवरील मा.कार्यकारी अधिकारी सो. यांचे निर्देशानुसार उपरोक्त चारही निविदाधारकांना दि.२७.०४.२०१३ रोजी मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर समक्ष चर्चा वाटाघाटीकरीता पुन्हा बोलविण्यात आले होते.मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार निविदाधारकांकडून पुन्हा बंद पाकीटात दर घेण्यात यावे, असे ठरले. त्यानुसार चारही निविदाधारकांनी बंद पाकीटात दर दिलेले आहेत.

**ड)** तथापी मा.कार्यकारी अधिकारी सो.यांनी दि. १०/५/२०१३ रोजीचे सुचनेनुसार चारही निविदाधारकांना ई-मेल करुन कामासाठी लागणारा कालावधी, या सर्व कामासाठी वापरणेत येणारे मनुष्यबळ व लावलेले इंजिनियर यांना दिले जाणारे वेतन, प्रवास खर्च इ.माहिती मागविणेत आली होती. त्यानुसार चारही निविदाधारकांनी ई-मेलद्वारे मागविण्यात आलेल्या माहितीचा तुलनात्मक तक्ता तयार करणे बाबत ठरले होते. त्यानुसार दि.२५/०४/२०१३ रोजी पुन्हा सुरक्षा कन्सल्टंट यांचे कडून बंद पाकीटात आलेले दरपत्रक फोडून तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला असून मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१४/११/२०१३ रोजीचे विषय नं.०७ अन्वये सादर केला असता, निर्णय क्र.८९६ अन्वये यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित कामी संस्थानचे पुर्वीचे कन्सल्टंट हे काम करत असतील तर त्यांना विचारणा करुन पहाण्यात यावी व उपरोक्त चारही कन्सल्टंटला पुढील सभेपुढे चर्चेसाठी बोलविण्यात यावे. तसेच महाराष्ट्र शासनाच्या गृह मंत्रालयाकडे अशा प्रकारची मोठी कामे केलेली असतील अशा कन्सल्टंटला याकामी विचारणा करणेत यावी, असे ठरले आहे.

त्यानुसार याबाबत पुर्वीचे कन्सल्टंट जनरल कौल हे दि.१४.१२.२०१३ रोजी शिर्डी येथे येऊन मा.कार्यकारी अधिकारी सो,यांचे समवेत चर्चा केली असता सध्या त्यांचेकडे मनुष्य बळ नाही.पुर्वीची कामे करणेकरीता त्यांना वेळ नाही. तसेच त्यांना महत्वाच्या कामाकरीता बोलविल्यानंतर त्वरीत उपस्थित राहत नाहीत.त्यामुळे पुर्वीचेच त्यांचेकडून कामे वेळेवर होत नाहीत,असे त्यांनी नमुद केले.

आता दि. १६/१२/२०१३ रोजी सौ.स्मिता अशोक ढगे, ऑपिटिमिस्टिक, ट्रेडिंग व सर्व्हीस जयेश मार्केट, बालाजी मंदिराजवळ, पाईपलाईन रोड, अ.नगर यांनी संस्थानचे कंन्सल्टंटचे काम मोफत करणे बाबतचे प्र शा.आ.नं./१५२३५ दि.१६/१२/२०१३ रोजीचे पत्र संरक्षण विभागाकडे प्राप्त झालेले असून सेवा करण्याची संधी द्यावी,अशी विनंती केलेली आहे.

अर्जकरते:- सौ.स्मिता अशोक ढगे,ऑपिटिमिस्टिक,अ.नगर अनुभव १२ वर्ष शै. पात्रता आय.टी. आय.
पतीचे नाव:- श्री अशोक रामचंद्र ढगे अ नगर अनुभव:- २४ वर्षे शै.डिप्लोमा इलेक्ट्रॉनिक्स.
त्यांचा कामाचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ नं | कामाचा तपशिल | कर्मचारी संख्या | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | भारतातील फोर्टीस हॉस्पिटल लि,मुख्य शाखा दिल्ली येथे असून परदेशातही ७ शाखा आहेत.त्यातील भारतातील पुणे, बेंगलोर, ठाणे, कल्याण अशा २४ शाखेत कामे केली. | २४ | रु.४ कोटी, २५ लाख |

| | | | |
|---|---|---|---|
| ०२ | इन्फोटेक कंपनी,बिहार व नोईडा ०२ शाखेत कामे केली. | ०६ | रु ०१ कोटी,१३ लाख |
| ०३ | साईप्रभा इंटरप्रायजेस प्रा लि शिर्डी पार्किंग मॅनेजमेंट, सी सी टी व्ही इ. | ०६ | रु.०१ कोटी,६० लाख |
| ०४ | श्री जी एस कोते पाटील इंटरप्रायजेस प्रा.लि.शिर्डी ए सी सी सी टी व्ही पार्किंग मॅनेजमेंट,सोलर इत्यादी | ०६ | रु.०२ कोटी,३० लाख |
| ०५ | शिर्डी पोलिस स्टेशन व शिर्डी परिसरात सी सी टी व्ही बसविणेबाबतचा अहवाल मा.जिल्हाधिकारी सो‍ो यांचे मान्यतेसाठी सादर. | २८ | रु.५८ कोटी मंजुरी मिळालेनंतर |

तरी १) सौ स्मिता अशोक ढगे, ऑपटिमिस्टिक, ट्रेडिंग व सर्व्हीस जयेश मार्केट, बालाजी मंदिराजवळ, पाईपलाईन रोड,अ.नगर यांनी शिर्डी मध्ये व इतर ठिकाणी कामे केलेली आहेत. आता संस्थानचे समाधी मंदिर व इतर संस्थान सलंग्न इमारतीचे कन्सल्टंटची सर्व कामे मोफत करीत असल्याने त्यांचीही कन्सल्टंट म्हणुन नेमणुक करता येईल,असे मत आहे.

**किंवा**

२) पूर्वीचे उपरोक्त चारही कन्सल्टंटला पुढील सभेपुढे चर्चेसाठी बोलविण्यात यावे किंवा कसे,यावर निर्णय होणेस विनंती.

उपरोक्त ०१ व ०२ मुद्दयावर निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.५३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सौ स्मिता अशोक ढगे, ऑपटिमिस्टिक, अहमदनगर यांनी शिर्डी व इतर ठिकाणी प्रस्तावित कामे केलेली आहेत. तसेच संस्थानसाठी त्या विनामुल्य सेवा देणार असल्यामुळे साईआश्रम भाग- ०१/ ०२ आणि संस्थानचे इतर इमारतीमध्ये सी.सी. टी.व्ही. कॅमेरा बसविणेकामी सौ स्मिता अशोक ढगे, ऑपटिमिस्टिक, अहमदनगर यांची सुरक्षा कन्सल्टंट म्हणून नेमणूक करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

**विषय नं.५५** **श्री.रंगनाथ पांडुरंग थेटे, मदतनीस मंदिर विभाग यांना संस्थान सेवेतून कमी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री.रंगनाथ पांडुरंग थेटे,मदतनीस, मंदिर विभाग यांनी दि.०९-११-२०१३ चे रजा मागणी अर्जान्वये दि.१३-११-२०१३ ते दि.१०-०२-२०१४ अखेर ९० दिवसांकरीता येरवडा जेलमध्ये शिक्षा भोगणेकामी जाणे आहे. असे रजा मागणीचे कारण नमूद करुन, अधिक्षक,मंदिर विभाग यांचे मार्फत अर्ज इकडील कार्यालयाकडे सादर केलेला आहे. त्यावर अधिक्षक,मंदिर विभाग यांनी प्रशासनाच्या नियमाप्रमाणे रजा देणेस हरकत नाही. बदली कामगार मिळणेस विनंती असा शेरा नोंदविणेत आला आहे.

श्री.थेटे यांचे संदर्भात थोडक्यात माहिती अशी की, श्री.थेटे यांना खाजगी शेताचे बांधावरील मारहाण प्रकरणाबाबत मा.जिल्हा व सत्र न्यायालयाचे आदेशानुसार ०२ वर्षे सक्त मजूरीची व रु.२०००/- दंड अशी शिक्षा झालेली आहे. सदर शिक्षा पुढे मा.उच्च न्यायालय व मा.सुप्रिम कोर्ट ऑफ इंडिया यांनी कायम केलेली आहे.श्री.थेटे हे दि.२५-०९-२०१२ पासून सक्त मजूरीचे शिक्षेकामी तुरुंगात होते.तथापी, संस्थानला लागू असलेल्या दि.इंडस्ट्रियल एम्प्लॉयमेंट (स्टॅडींग ऑर्डर्स) ॲक्ट १९४६ मध्ये एखादया गुन्हयाबाबत शिक्षा झाल्यास कर्मचाऱ्यास सेवेतून बडतर्फ करणेची तरतूद नसल्यामुळे श्री.थेटे यांना संस्थान सेवेतून बडतर्फ करणेत आले नाही.संस्थानने शासनाकडे सादर केलेल्या नविन सेवा नियमामध्ये त्याबाबत तरतूद करणेत आलेली आहे.तथापी सदर सेवा नियम अहवाल संस्थान कर्मचाऱ्यांना लागू करणे प्रलंबीत आहे.

दरम्यानचे काळात श्री.थेटे यांची मंदिर अधिक्षक यांचे पुर्व परवानगीने दि.२५-०९-२०१२ ते दि.२३-११-२०१२ अखेर ६० दिवस, दि.२४-११-२०१२ ते दि.०२-१२-२०१२ अखेर ०९ दिवस अर्जित रजा मंजूर करणेत आली त्यानंतर दि.०३-१२-२०१२ ते दि.०१-०१-२०१३ अखेर ३० दिवसांची कमाल मर्यादा संपलेली असल्याने, संस्थान सेवानियम ११ (२) नुसार सदरची रजा (विनावेतन) गैरहजेरी धरणेत आली आहे. पुन्हा श्री.थेटे यांनी दि.२१-०१-२०१३ चे रजा मागणी अर्जान्वये दि.२३-०१-२०१३ ते दि३१-०१-२०१३ अखेर ५८ दिवसांची मागणी केलेली रजा नामंजुर करणेत आलेली होती. तसे मंदिर अधिक्षक यांना जा.नं.एसएसएस/वशी-७ए/४६०९/२०१३, दि.२१-०१-२०१३ चे पत्रान्वये कळविले होते. तसेच जा.नं.एसएसएस/ वशी-७ए/५३८८/२०१३, दि.२३-०२-२०१३ चे पत्रान्वये श्री.थेटे यांना रजि.ए.डी.अन्वये रजा नामंजुरी बाबत कळविले होते.

त्यानंतर श्री.थेटे हे दि.२२-०३-२०१३ पासून ते दि.०७-०९-२०१३ अखेर विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय कामावरुन गैरहजर होते. श्री.थेटे यांनी दि.१७-०८-२०१३ रोजीचे विनंती अर्जान्वये कामावर हजर करुन घेणेबाबत विनंती केली होती. त्यांचे विनंती अर्जास अनुसरुन उपरोक्त संदर्भिय क्र.०३ नुसार संस्थान कामगार कायदे सल्लागार श्री.अशोकराव पाटील यांचा अभिप्राय घेणेत आला आहे. त्यात त्यांनी," यापुढे श्री.थेटे यांनी रजा मागणी केल्यास त्यांची रजा विभाग प्रमुख व संस्थानने मंजुर करु नये, त्यांची गैरहजेरी धरणेत यावी व पुढील कायदेशीर कारवाई करणेत यावी." असा अभिप्राय दिलेला आहे.

याबाबत अधिक्षक, मंदिर विभाग यांना रजा मंजुर न करणेबाबत पत्रान्वये कळविणेत आले आहे. तरी देखील अधिक्षक,मंदिर विभाग यांनी श्री.थेटे यांचे रजा मागणी अर्जावर स्वाक्षरी करुन प्रशासनाचे नियमाप्रमाणे रजा देणेस हरकत नाही अशी शिफारस करुन अर्ज इकडील कार्यालयाकडे पाठविलेला आहे.संस्थान ॲड.श्री.अशोकराव पाटील,अहमदनगर यांचे लेखी अभिप्रायास अनुसरुन श्री.रंगनाथ पांडुरंग थेटे यांना विनापरवानगी,रजा अर्जाशिवाय गैरहजर राहणे या गैरशिस्तवर्तनाबाबत जा.नं.एसएसएस/ वशी-७ए/ २१५९/२०१३ दि.०२-१०-२०१३ अन्वये आरोपपत्र देणेत आले आहे.सदर आरोपपत्रातील आरोपांची खाते चौकशी ॲड.श्री.बी.वाय.काळवाघे, कोपरगांव, चौकशी अधिकारी यांचे समोर चालू आहे.तथापी श्री.थेटे हे येरवडा जेलमध्ये शिक्षा भोगणेकामी गेलेले असल्यामुळे खाते चौकशीचे कामकाज सध्या प्रलंबीत आहे.

सबब, रंगनाथ पांडूरंग थेटे,मदतनीस,मंदिर विभाग यांना खाजगी कारणास्तव शेताचे बांधावरील मारहाण प्रकरणाबाबत मा.जिल्हा व सत्र न्यायालय यांनी ०२ वर्षे सक्त मजूरीची व रु.२,०००/- दंडाची शिक्षा सुनावलेली असल्यामुळे व सदर शिक्षा मा.उच्च न्यायालय व सुप्रीम कोर्टात कायम झालेली आहे व त्यानुसार ते सध्या येरवडा जेलमध्ये शिक्षा भोगत असून श्री.थेटे हे दि.२२-०३-२०१३ पासून ते दि.०७-०९-२०१३ अखेर व तसेच दि.१३-११-२०१३ पासून ते आज अखेरपर्यंत कामावरुन गैरहजर आहेत.त्यामुळे श्री.थेटे यांना संस्थान सेवेतून कायम स्वरुपी कमी (टर्मीनेट) करणेस मान्यता असावी.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री. रंगनाथ पांडूरंग थेटे, मदतनीस, मंदिर विभाग यांना मा.जिल्हा व सत्र न्यायालयाने ०२ वर्षे सक्त मजूरी व रु.२,०००/- मात्र दंडाची शिक्षा सुनावलेली आहे व सदर शिक्षा मा.उच्च न्यायालय आणि सुप्रीम कोर्टात कायम झालेली आहे. त्यानुसार ते सध्या येरवडा जेलमध्ये शिक्षा भोगत असून दि.२२-०३-२०१३ पासून ते दि.०७-०९-२०१३ पर्यंत तसेच दि.१३-११-२०१३ पासून ते आज अखेरपर्यंत कामावरुन गैरहजर आहेत.**

**त्यामुळे श्री.रंगनाथ पांडूरग थेटे यांना दि.०४ जानेवारी २०१४ पासून संस्थान सेवेतून कायम स्वरुपी कमी (टर्मीनेट) करणेत आलेले आहे, या केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

**विषय नं.५६** **मे.ईगल आय एन्टरप्रायईज, दमन (युटी) गुजरात, महाद्वार सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर यांचेकडील माजी सैनिक सुरक्षा कर्मचाऱ्यांचे वेतन दराबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानला कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल कामगार पुरविणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२७-०२-२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१३७ नुसार मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.,पुणे यांची दि.०१-०४-२०११ पासून ते आज अखेर कालावधीसाठी लेबर कॉन्ट्रॅक्टर म्हणून नेमणूक करणेत आलेली आहे. त्याचप्रमाणे मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६-०३-२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२११ नुसार अनुक्रमे **१)** मे.मॉडर्न व्ही.आर.सिक्युरिटी फोर्स (इंडिया) प्रा.लि.,पुणे, **२)** मे.ईगल आय एन्टरप्राईज, दमन (यु.टी), **३)** मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि., मुंबई, **४)** मे.रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲन्ड सिस्टम्स प्रा.लि.,पुणे यांची दि.०१-०५-२०११ पासून ते आज अखेरपर्यंत या कालावधीसाठी सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स म्हणून नेमणूक करणेत आलेली आहे.

त्याचप्रमाणे मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६-०३-२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२११ नुसार मे.ईगल आय एन्टरप्राईज, वापी-दमन रोड, दमन (युटी) गुजरात यांचेमार्फत संस्थानचे मंदिर परिसर, महाद्वार सुरक्षेकामी कंत्राटी पध्दतीने माजी सैनिक सुरक्षा अधिकारी-०१, सुरक्षा सुपरवायझर-०३, सशस्त्र सुरक्षा रक्षक-३०, माजी सैनिक सुरक्षा गार्ड-४८ व सिव्हीलियन स्त्री सुरक्षा गार्ड-३३ असे एकूण-११५ कंत्राटी माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी व सिव्हीलियन स्त्री सुरक्षा कर्मचारी दि.०१-०५-२०११ रोजी पासून पुरविणेत येत आहे.

मे.ईगल आय एन्टरप्राईज दमन (यु.टी.)कॅम्प-शिर्डी यांनी उपरोक्त संदर्भानुसार दि.२२-११-२०१३ रोजीचे पत्र सादर केले असुन त्यात त्यांनी "आमच्या ईगल आय एन्टरप्राईज वापी सुरक्षा एजन्सीला श्री साईबाबा संस्थानमार्फत जा.नं.एसएसएस/वशी-७ए/११५०/२०११ दि.०१-०६-२०११ अन्वये दि.०१-०५-२०११ ते दि.३०-०४-२०१३ या दोन वर्ष कालावधीसाठी चारही महाद्वार चेकींग व देणगी काउंटर समाधी मंदिर कापडकोठी येथे माजी सैनिक सुरक्षा रक्षक व माजी सैनिक बंदुकधारी आणि सिव्हील महिला सुरक्षा रक्षक यांचे प्रतिदिनी ११५ कर्मचारी पुरविणेबाबत कार्यादेश देण्यात आलेला आहे. तथापि, आम्हास देण्यात आलेल्या कार्यादेशामध्ये सुरक्षा अधिकारीस ३८५.०० रुपये आणि माजी सैनिकास २५०.०० रूपये व माजी सैनिक सुरक्षा बंदुकधारीस २७१.०० रूपये प्रतिदिनी वेतन असे आहे. दि.३०-०४-२०१३ नंतर इतर कंत्राटी कर्मचारी झालेल्या जा.नं.एसएसएस/वशी-७ए/१७४९/२०१३ दि.२२-०८-२०१३ अन्वये कंत्राटी सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या सुधारीत किमान वेतन दरामध्ये झालेल्या वाढीव (९.५५

रूपये प्रतिदिन) दराप्रमाणे आमच्या एजन्सीतील माजी सैनिकांना ही वाढुन देण्यात यावी अशी नम्र विनंती आहे" असे म्हटलेले आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयास अनुसरून मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.,पुणे लेबर कॉन्ट्रॅक्टर व मे.मॉडर्न व्ही.आर.सिक्युरिटी फोर्स (इंडिया) प्रा.लि.,पुणे, मे.ईगल आय एन्टरप्राईज, दमन (यु.टी), मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि., मुंबई व मे.रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲन्ड सिस्टम्स प्रा.लि.,पुणे यांचेमार्फत पुरविणेत येणारे अकुशल,कुशल कंत्राटी कामगार व सिव्हीलियन सुरक्षा गार्ड यांना शॉप ॲन्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंट झोन नं.३ (तसेच मुंबई व सिकंदराबाद कार्यालयासाठी झोन नं.१) ला किमान वेतन कायद्यानुसार अनुज्ञेय असणारे किमान वेतन दर (शासनाकडून किमान वेतनदर व स्पेशल अलौंन्स दरात वेळोवेळी होणाऱ्या वाढीनुसार किमान वेतनदर) याप्रमाणे वेतनदर देण्यात येतात. तसेच वरील चारही सुरक्षा एजन्सीमार्फत पुरविणेत येणाऱ्या माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी यांना मा.व्यवस्थापन समितीचे सभेत केलेल्या चर्चा/वाटाघाटीप्रमाणे वेतनदर देणेत येतात. सध्या दि.०१-०७-२०१३ पासुन अकुशल कामगारास रूपये २३९.४३/- प्रतिदिनी, कुशल कामगारास रूपये २७०.२०/- प्रतिदिनी व सिव्हीलियन सुरक्षा गार्ड रूपये २३९.४३/- प्रतिदिनी याप्रमाणे किमान वेतनदर देणेत येत आहे. त्याप्रमाणे वरिल सुरक्षा एजन्सी / ठेकेदार यांचेमार्फत पुरविणेत येणाऱ्या माजी सैनिक सुरक्षा अधिकारी-रूपये ३८५.००/-रुपये, माजी सैनिक सुरक्षा पर्यवेक्षक-रूपये २८९.३३/- प्रतिदिनी, माजी सैनिक सशस्त्र सुरक्षा रक्षक रूपये-२७१.००/- प्रतिदिनी व माजी सैनिक सुरक्षा गार्ड रूपये २५०.००/- प्रतिदिनी याप्रमाणे चर्चा वाटाघाटीत ठरलेप्रमाणे वेतनदर देणेत येत आहे.

लेबर व सिक्युरिटी कंत्राटदार (एजन्सी) यांचेमार्फत पुरविणेत येणाऱ्या कंत्राटी अकुशल, कुशल कामगार व सिव्हीलियन सुरक्षा गार्ड यांना महाराष्ट्र शासनाचे किमान वेतन दराप्रमाणे प्रत्येकवर्षी ०१ जानेवारी व ०१ जुलै रोजी होणारी स्पेशल अलौंन्समधील वाढ देणेत येते. सदर कंत्राटी अकुशल, कुशल कामगार व सिव्हीलियन सुरक्षा गार्ड यांचे किमान वेतनदरामध्ये (स्पेशल अलौंन्समध्ये) दि.०१-०७-२०१३ पासुन रूपये-९.५५ प्रतिदिनी याप्रमाणे वाढ करणेत आलेली आहे. तथापि, सुरक्षा एजन्सीमार्फत पुरविणेत आलेल्या माजी सैनिक सुरक्षा अधिकारी, माजी सैनिक सुरक्षा पर्यवेक्षक, माजी सैनिक सशस्त्र सुरक्षा रक्षक यांचे वेतनदरात दि.०१-०५-२०११ पासून ते अद्यापपर्यंत एकदाही वाढ करणेत आलेली नाही. त्यामुळे मे.ईगल आय एन्टरप्राईज सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर यांनी माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी यांचे वेतनदरात सिव्हीलियन कंत्राटी कर्मचाऱ्यांप्रमाणे प्रतिदिनी रूपये-९.५५ याप्रमाणे वाढ करणेत यावी अशी विनंती संदर्भीय पत्रान्वये केलेली आहे.

सबब, वरीलप्रमाणे लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर/एजन्सीमार्फत पुरविणेत येणाऱ्या कंत्राटी अकुशल, कुशल कामगार व सिव्हीलियन सुरक्षा गार्ड यांचेप्रमाणेच संबंधीत सुरक्षा एजन्सीमार्फत पुरविणेत येणाऱ्या सर्व माजी सैनिक सुरक्षा अधिकारी, माजी सैनिक सुरक्षा सुपरवायझर, माजी सैनिक सशस्त्र सुरक्षा रक्षक व माजी सैनिक सुरक्षा गार्ड यांचे वेतनदरात दि.०१-०७-२०१३ पासून रूपये ९.५५/- प्रतिदिनी पुर्वलक्षी प्रभावाने वेतनवाढ देणेस, तसेच यापुढेही प्रतिवर्षी माहे-०१ जानेवारी व माहे-०१ जुलै रोजी महाराष्ट्र शासनाचे किमान वेतन दराप्रमाणे होणारी वेतनवाढ (स्पेशल अलौंन्स वाढ) कंत्राटी अकुशल, कुशल कामगार व सिव्हीलियन सुरक्षा गार्ड यांचेप्रमाणेच माजी सैनिक सुरक्षा अधिकारी, माजी सैनिक सुरक्षा सुपरवायझर, माजी सैनिक सशस्त्र सुरक्षा रक्षक व माजी सैनिक सुरक्षा गार्ड यांना देखील देणेस मान्यता असावी.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती

**निर्णय क्र.५५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देणेत आली.**

(कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

**विषय नं.५७** **सन- २०१४ मधील उत्सवांच्या निमंत्रण पत्रिका व पाकिटे छपाईकामी एकाचवेळी दरपत्रक मागणीसाठी वर्तमान पत्रात जाहिरात देणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ च्या कलम नं.१९ मध्ये प्रस्तावित केलेल्या व विनिमयात प्रामुख्याने या संदर्भात भक्तमंडळाच्या सभासदांना दर उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका व उदीप्रसाद पाठविण्याची तरतुद आहे.

सुमारे १९२२ पासून भक्तमंडळाच्या सभासदांना व मान्यवरांना श्री रामनवमी, श्री गुरुपौर्णिमा व श्री पुण्यतिथी या उत्सवाच्या निमत्रंण पत्रिका व उदीप्रसाद पाठविण्यात येतो. त्याकामी निमत्रंण पत्रिका व पाकीटांची छपाई करुन घेण्यात येते. सन २०१३ च्या तीनही उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका व पाकीटे छपाईकामी रुपये ७४६०९६/- खर्च आलेला आहे.

हयावर्षी निमंत्रण पत्रिका आर्ट पेपर 90gsm वर छापण्यात आलेल्या होत्या. त्यानुसार हयाही वर्षी सन २०१४ ला छापता येतील.

१) सध्या भक्तमंडळाची एकुण संख्या १७०००० इतकी आहे. त्याप्रमाणे तीन उत्सवासाठी अंदाजे ५१०००० निमंत्रण पत्रिका व पाकीटे छपाई करावी लागतील. त्यासाठी अंदाजे रुपये ९,००,०००/- (नऊ लाख मात्र) खर्च अपेक्षित आहे. त्यास मान्यता असावी.

२) उपरोक्त छपाईकामी सोबतच्या नमुन्याप्रमाणे जाहिरात वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्यास व जाहिरातीकामी अंदाजे रुपये १०,०००/- चे खर्चास मान्यता असावी.

३) सर्व निमंत्रण पत्रिकासाठी 90gsm आर्ट पेपर वापरण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.५६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन- २०१४ मधील उत्सवांच्या निमंत्रण पत्रिका व पाकिटे प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे छपाई करुन घेणेस व तीनही उत्सवांच्या निमंत्रण पत्रिका व पाकिटे छपाईकामी एकाचवेळी दरपत्रक मागणीसाठी वर्तमान पत्रात जाहिरात देणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच, सदरहू छपाईकामी येणाऱ्या अंदाजे रु.९,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

**विषय नं.५८** **संतकवी कै.दासगणू महाराज जन्मस्थळ अकोळनेर ता.जि.अहमदनगर यांना विकास कामासाठी आर्थिक मदत देणेबाबत.**

**प्रस्ताव-** अध्यक्ष, राष्ट्र हित संवर्धक मंडळ, अहमदनगर यांनी दि.१७/०१/२०१० चे पत्रान्वये, आमचा ट्रस्ट नोंदणीकृत (सार्व.नों.क्र.एफ-१२० अ.नगर) असून ॲड.श्री.दाजीसाहेब दाभोळकर यांनी अकोळनेर, जि.अ.नगर येथील त्यांचा राहता वाडा व परसबागेची जागा बक्षीसपत्र करुन राष्ट्रहित संवर्धक मंडळास दिली आहे. या वाडयात संत कवी कै.दासगणू महाराजांचा जन्म दि.६ जानेवारी १८६८ रोजी झालेला आहे. त्यांच्या जन्मस्थळाचा विकास करण्यासाठी रु.१ कोटी २६ लाख रक्कमेचा आराखडा तयार केला आहे. कै.दासगणु महाराज व श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांचे ऋणानुबंध व नाते लक्षात घेता संस्थानमार्फत विकास प्रकल्पास लागणारे अर्थ सहाय्य उपलब्ध करुन द्यावे, अशी विनंती केली होती.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०३/२०१० चे सभेतील निर्णय क्र.३१७ अन्वये सदरच्या प्रस्तावास रु.२५ लाख आर्थिक मदत देण्यास मान्यता देऊन प्रस्तावास छाननी समितीची मान्यता घ्यावी, असे ठरले.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम २१ (२) (एक) चे तरतुदीनुसार छाननी समितीचे शिफारसीनूसार व राज्य शासनाचे मान्यतेने नोंदणीकृत विश्वस्तव्यवस्था किंवा नोदंणीकृत सोसायटी यांना अनुदान देण्याची तरतूद आहे. सदर प्रस्तावास अद्याप छाननी समितीची मान्यता मिळालेली नाही. तत्कालीन छाननी समितीची मुदत संपलेली असुन सध्या नविन छाननी समितीची स्थापना झालेली नाही.

संतकवी कै.दासगणु महाराज यांनी काही वर्षे श्री साईबाबा संस्थानचे अध्यक्ष पद भुषविलेले आहे. तसेच शिर्डी माझे पंढपुर ही आरती लिहीली असून ती आजही मंदिरात म्हटली जाते. त्याचप्रमाणे दासगणु महाराजांनी किर्तनाच्या माध्यमातुन श्री साईबाबांचा प्रचार व प्रसार केलेला आहे. संतकवी दासगणु महाराजांचे श्री साईबाबा संस्थानला फार मोठे योगदान लाभलेले आहे.

सदर प्रस्ताव विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुंबई यांचे मंजुरीसाठी पाठविण्यात येत आहे, त्यास मान्यता असावी.

प्रस्ताव अवलोकनार्थ सादर.

**निर्णय क्र.५७** **संतकवी कै.दासगणू महाराज जन्मस्थळ अकोळनेर, ता.जि.अहमदनगर येथे मा.अध्यक्ष महोदय यांनी स्वतः पाहणी करुन माहिती घेतलेली आहे, असे सभेस कळविणेत आले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्या छाननी समिती अस्तित्वात नसल्याने संतकवी कै.दासगणू महाराज जन्मस्थळ अकोळनेर यांना विकास कामासाठी संस्थानकडून निधी देणेबाबत मा.अध्यक्ष महोदय यांनी विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुंबई यांचेबरोबर पत्रव्यवहार करावा, असे ठरले.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०३)

---

**विषय नं.५९** **डिजीटल फ्रॅकींग मशिन IJ-९० वार्षीक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट बाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचा दैनंदिन पत्रव्यवहार फ्रॅकिंग करून पोष्टाव्दारे पाठविणेकामी सामान्य प्रशासन जावक विभागासाठी डिजीटल फ्रॅकिंग मशिन IJ ९० खरेदी करण्यात आले आहे. सदर फ्रॅकिंग मशिनचा ०१ जानेवारी २०१२ पासुन वापर करण्यात आला असुन त्याची वारंटी दि. ३१ /१२ /२०१३ अखेर पर्यंत संपत असल्याने मे.कोरस इंडिया लि. पुणे यांनी दि.१५ /१२ /२०१२ च्या पत्रान्वये एक वर्षाकरीता दि. ०१ /०१ / २०१३ पासुन. ते दि. ३१ /१२ /२०१३ अखेर पर्यंत वार्षीक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेबाबत कळविण्यात आले होते . त्याप्रमाणे सदर सर्व्हिस कॉन्ट्रक्ट कामी मे. कोरस इं. लि. पुणे यांना ०१/०१/२०१३ ते ३१/१२/२०१३ अखेर कालावधीकरीता रू. ७८६५२ /- मात्र अदा करण्यात आले आहे.

आता मे. कोरस इं लि पुणे यांनी दि. १३ /१२ / २०१३ पत्रान्वये दि. ०१/०१/ २०१४ पासुन ते ३१/१२/२०१४ अखेर वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट करणे बाबत कळविले आहे. सोबत त्यांनी ॲग्रीमेंन्टचा मसुदा पाठविला असुन सर्व्हिस कॉन्टक्ट येणारा खर्च खालील प्रमाणे कळविला आहे.

| अ.क्र | तपशिल | कालावधी | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१ | डिजीटल फ्रॅकिंग मशिन IJ ९० वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट | दि. ०१ /०१ /२०१४ ते ३१ /१२ /२०१४ | ७८६५२ /- | ७०,००० /- +८६५२/- (सर्व्हिस टॅक्स) |
| (अक्षरी रक्कम रूपये अठठयाहत्तर हजार सहाशे बावन्न मात्र ) | | | | **७८,६५२ /-** |

सदरचे फ्रॅकिंग मशिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट करणे आवश्यक आहे. त्याकामी येणारे एकूण रक्कम रू. ७८,६५२ /- मात्रचे वार्षीक खर्चास मान्यता मिळावी. तसेच फ्रॅकिंग मशिनचे सर्व्हिस कॉन्ट्रक्ट दरवर्षी देणे आवश्यक असल्याने त्यास स्थायी मंजुरी मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.५८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन, जावक विभाग)

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.६०** **मयत अनुकंपा तत्वावर कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने संस्थानमध्ये नोकरी मिळणेबाबत श्री.दिपक सुर्यभान नेहे यांचा अर्ज.**

**प्रस्ताव-** श्री दिपक सुर्यभान नेहे, रा. निमगाव ता. राहाता यांनी त्यांच्या पत्नी कै. संगिता दिपक नेहे यांचे संस्थान सेवेत असतांना निधन झालेने अनुकंपा तत्वावर कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने नोकरी मिळणेबाबत दि.१०/१०/२०१३ रोजी अर्ज सादर केलेला आहे. अर्जाचा सुधारीत विहीत नमुना तयार करण्यात आलेला आहे त्यास अनुसरुन अर्जदाराने अर्ज सादर केला आहे. सदर अर्जासोबत त्यांनी खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर केलेली आहेत.

१) दिवंगत संगिता दिपक नेहे यांचे मृत्यू प्रमाणपत्र

२) श्री दिपक सुर्यभान नेहे यांचा शाळा सोडल्याचा दाखला असून सदर दाखल्यानुसार जन्मतारीख १६/०६/१९७१ अशी असल्याने त्यांचे आजमितीस वय ४२ वर्षे ०३ महिने आहे.

३) श्री दिपक सुर्यभान नेहे यांचे शिक्षण बी.ए. झालेले आहेत. ( बी.ए. चे मार्कशिटवरुन).

४) संगिता दिपक नेहे ह्या संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पीटलकडे परिचारीका या पदावर सेवेत होत्या. त्यांचे **दि.१२/०५/२०१३** रोजी निधन झालेले असून त्यांच्या झालेल्या सेवेबाबतची माहिती खालील प्रमाणे-

०१) दिवंगत कर्मचाऱ्यांचे नांव :- संगिता दिपक नेहे

०२) मृत्युचे वेळी हुद्या व विभाग :- परिचारीका, श्री साईबाबा हॉस्पीटल

०३) संस्थानमधील सेवेचा कालावधी :- दि. २७/०४/२००६ ते दि.११/०५/२०१३ एकूण सेवा ०७ वर्षे

०४) मृत्यु दिनांक :- १२/०५/२०१३

अनुकंपा तत्वावर नेमणूक देतांना मयत कर्मचाऱ्याचे वारसाचे वय ४५ वर्ष असल्यास त्यांना प्राधान्याने नोकरीवर घेतले जाते. या करीता कर्मचाऱ्याने त्याच्या हयातीत करुन दिलेले विहीत नमून्यातील नॉमिनेशन (Form 'F' See Sub - Rule (1) of Rule 6 - " Nomination made herein invalidates my previous nomination.") फॉर्ममध्ये संबंधीत व्यक्तीचे नांव असलेबाबत व त्याबाबत खातरजमा करुन अशा नेमणूका दिल्या जातात.

दिवंगत संगिता नेहे ह्या हयात असतांना त्यांची ग्रॅच्यूएटी ॲक्ट १९७२ चे नियम नं.६ (१) नुसारचे दि. ०४/०७/२००६ नॉमीनेशन पत्रात श्री दिपक सुर्यभान नेहे यांचे नाव नसल्याने त्यांनी राहाता येथील मे. सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, राहाता यांचे न्यायालयातील दि.०५/१०/२०१३ रोजीचे वारसदार प्रमाणपत्र सादर केले आहे.

महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१०००-प्र.क्र.२०/२०००,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२८/०३/२००१ व महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१००४-प्र.क्र.५१/२००४,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२२/०८/२००५ सुधारीत शासन निर्णय २ (२) नुसार शासकीय सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकांस अनुकंपा कारणास्तव शासकीय सेवेत घेण्याची तरतूद आहे. त्यास अनुसरुन संस्थान सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकास मानवतेच्या दृष्टीकोणातून यापुर्वी अनुकंपाकारणास्तव संस्थान सेवेत घेण्यात आलेले आहे. त्यानुसार दिवंगत नेहे यांचे पती नामे श्री दिपक सुर्यभान नेहे हे उपरोक्त निर्णयानुसार पात्र आहेत. तथापी -

शासन निर्णय क्र.सासंवि-२००९/४३३/(३७/०९) का.सोळा मुंबई-३२ दि.०७/०८/२००९ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे कर्मचारी आकृतीबंधास मान्यता मिळाली आहे. त्यात वर्ग ४ च्या कर्मचाऱ्यांची १२३९ स्थायी पदे मंजूर आहेत. सद्य:स्थितीनुसार वर्ग ४ चे पदावर १२८० इतके कर्मचारी भरलेले आहेत. त्यानुसार सध्या वर्ग ४ चे ४१ कर्मचारी अतिरिक्त आहेत.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९/११/२०११ चे सभेतील निर्णय क्र.७६५ खालीलप्रमाणे झालेला आहे.

"सध्या संस्थान आस्थापनेवर वर्ग ४ ची पदे रिक्त नाहीत. त्यामुळे संस्थान सेवेत असतांना मयत झालेल्या कर्मचाऱ्यांचे नातेवाईकांना तूर्त लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत संस्थानमध्ये कामास घेण्यात यावे व त्यांना कॉन्ट्रॅक्टरमार्फत किमान वेतनाप्रमाणे वेतन देण्यात यावे."

उपरोक्त निर्णयानुसार यापूर्वीच्या अर्जदारांना लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत प्रसादालय विभागाकडे कंत्राटी पध्दतीने कामावर घेण्यात आलेले आहे.

उपरोक्त शासन निर्णय व दिवंगत संगिता दिपक नेहे यांचे पती नामे श्री. दिपक सुर्यभान नेहे यांचा लेखी अर्ज विचारात घेता, दिवंगत संगिता नेहे यांचे जागेवर त्यांचे पती नामे श्री. दिपक सुर्यभान नेहे यांना लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत किमान वेतन देणेत येऊन संस्थानमध्ये कामास घेणेस मान्यता असावी. तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.५९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शासन निर्णय व दिवंगत संगिता दिपक नेहे यांचे पती नामे श्री. दिपक सुर्यभान नेहे यांचा लेखी अर्ज विचारात घेता, दिवंगत संगिता नेहे यांचे जागेवर त्यांचे पती नामे श्री. दिपक सुर्यभान नेहे यांना सध्या संस्थानचे लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत कंत्राटी पध्दतीने, किमान वेतन देणेत येवून, जागा उपलब्ध असल्यास कामावर घेणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक/ कामगार अधिकारी)

---

**विषय नं.६१** **सि.व्ही.टी.एस. विभागातील डॉक्टरांच्या इन्सेंटीव्हमध्ये सुधारणा करणेबाबत.**

**निर्णय क्र.६०** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.६२** **डॉ.हर्षल अशोक वाळूंज, कंत्राटी परफ्युजनिस्ट यांचे सेवेबाबत.**

**प्रस्ताव-** डॉ. हर्षल अशोक वाळूंज यांनी दि. २५/११/२०१३ रोजीचे अर्जान्वये परफ्युजनिस्ट या पदावर पुढील नेमणूक मिळावी. तसेच प्रति महिना रु. ३०,०००/- मानधन व ड्युटी व्यतिरिक्त जादा कामाचे नियमानुसार मोबदला मिळावा, अशी विनंती केली आहे.

सदरचे अर्जावर कार्डीयाक विभाग प्रमुख यांचा असा अभिप्राय आहे की, श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये दोन कार्डीयाक शस्त्रक्रिया युनिट सतत चालू असून त्यासाठी ३ परफ्यूजनिस्ट आवश्यकता असल्याने डॉ. हर्षल वाळूंज यांना पुढील मुदतवाढ देण्यात यावी.

मा. त्रिसदस्यीय समितीचे दि. ०८/०१/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ३१ नुसार जा.नं. एसएसएस/वशी-७ए/४३२०/२०१३ दि. २६/०१/२०१३ अन्वये डॉ. हर्षल अशोक वाळूंज यांना कुशल कंत्राटी कर्मचारी म्हणून प्रति महिना रु. २१,०००/- या प्रमाणे एकत्रित वेतनावर ठेकेदारामार्फत पुढील आदेश होईपावेतो कामावर घेण्यात आलेले असून ते दि. ०१/०२/२०१३ रोजी कामावर हजर झालेले असल्याने त्यांचा ११ महिने तात्पुरते नेमणूकीचा कालावधी दि. ०१/०१/२०१४ अखेर संपुष्टात येत आहे.

परफ्यूजनिस्टचे तीन स्थायी पदांपैकी एका पदावर श्री मोहमद नदीम अहमद कार्यरत असून त्यांना वेतनबॅन्ड ९३००-३४८०० व ग्रेड वेतन रु. ४४०० प्रमाणे वेतन देण्यात येत आहे. तसेच श्री बाबासाहेब लहानु म्हस्के यांची ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी नेमणूक करण्यात आलेली असून ते दि. ०९/०३/२०१३ रोजी कामावर हजर झालेले आहे. त्यांना मासिक रु. २१,०००/- एकत्रित मासिक वेतन देण्यात येत आहे.

श्री साईबाबा हॉस्पीटलचे आकृतीबंधानुसार परफ्यूजनिस्टची रिक्त दोन पदे भरणेकामी जाहिरात देण्यात आलेली असून त्याबाबतची पुढील कार्यवाही चालू आहे. सदरची प्रक्रिया पूर्ण होणेस काहीसा कालावधी लागणार असल्याने डॉ. वाळूंज यांना पुढील कालावधीसाठी तात्पुरती नेमणूक देणे आवश्यक आहे. सबब, डॉ. हर्षल वाळूंज यांची रु. २१,०००/- प्रतिमाह वेतनावर पुढील ११ महिन्यांसाठी कंत्राटी पध्दतीने नेमणूक करता येईल.

तसेच जाहिरात प्रक्रियेव्दारे परफ्यूजनिस्ट या पदावर उमेदवार उपलब्ध झाल्यास डॉ. हर्षल अशोक वाळूंज यांना देण्यात आलेली पुढील नेमणूक संपुष्टात आणता येईल, असे मत आहे.

तरी, कार्डीयाक विभाग प्रमुख यांचे अभिप्रायाप्रमाणे डॉ. हर्षल अशोक वाळूंज यांचे दि. २५/११/२०१३ रोजीचे अर्जावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये असलेली परफ्यूजनिस्टची आवश्यकता व कार्डीयाक विभाग प्रमुख यांचे अभिप्राय विचारात घेता डॉ.हर्षल अशोक वाळूंज यांना श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये ठेकेदारामार्फत कंत्राटी पध्दतीने परफ्यूजनिस्ट या पदावर रु. २१,०००/- मात्र प्रतिमहा एकत्रित वेतनावर त्यांची मुदत संपलेचे तारखेपासून (दि.०१.०१.२०१४) पुढे ११ महिने कालावधीकरीता तात्पुरती नेमणूक देणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच दरम्यानचे कालावधीत जाहिरात प्रक्रियेव्दारे परफ्यूजनिस्ट या पदावर उमेदवार उपलब्ध झाल्यास डॉ. हर्षल अशोक वाळूंज यांना देण्यात आलेली नेमणूक संपुष्टात आणणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.६३ श्री साईबाबा हॉस्पिटलकडे व्हिजीटींग इंटरव्हेशनल कार्डीओलॉजीस्टचे नेमणूकीबाबत.**

**प्रस्ताव-** डॉ. राहुल रावसाहेब पाटील, पुणे यांनी दि. ०४/१२/२०१३ रोजीचे अर्जान्वये प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी संलग्न असलेल्या सोमवारी श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये व्हिजीटींग इंटरव्हेशनल कार्डीओलॉजीस्ट म्हणून नेमणूक करणेस विनंती केली आहे.

श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये श्री साईबाबा हॉस्पीटलचे आकृतीबंधामध्ये इंटरव्हेशनल कार्डीओलॉजीस्टची दोन स्थायी पदे मंजूर असून सदरचे पदांवर डॉ. हरिष हुकुमचंद बजाज व डॉ. गौरव सरदारीलाल वर्मा कार्यरत आहे.

जा.नं. एसएसएस/वशी-०१/२००४६/२००७ दि. २०/१२/२००७ अन्वये डॉ. राहुल पाटील हे पूर्वी प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी संलग्न असलेल्या सोमवारी श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये व्हिजीटींग इंटरव्हेशनल कार्डीओलॉजीस्ट म्हणून कार्यरत होते. परंतु मध्यंतरीच्या काळात डॉ. पाटील हे त्यांचे दि. २९/१२/२००८ रोजीचे अर्जानुसार ट्रेनिंगसाठी नेदरलँड येथे गेले होते. त्यामुळे त्यांनी श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये येऊन सेवा देणे बंद केले होते. आता डॉ. पाटील यांनी दि. ०४/१२/२०१३ रोजीचे अर्जान्वये पुन्हा श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये व्हिजीटींग इंटरव्हेशनल कार्डीओलॉजीस्ट म्हणून नेमणूक करावी, अशी विनंती केली आहे.

डॉ. राहुल रावसाहेब पाटील, पुणे यांची श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये व्हिजीटींग इंटरव्हेशनल कार्डीओलॉजीस्ट म्हणून पूर्वीप्रमाणे एक वर्षासाठी पुनर्नेमणूक करता येईल.

तरी, डॉ. राहुल रावसाहेब पाटील, पुणे यांची श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये व्हिजीटींग इंटरव्हेशनल कार्डीओलॉजीस्ट म्हणून पूर्वीप्रमाणे एक वर्षासाठी पुनर्नेमणूक करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६२ यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ. राहुल रावसाहेब पाटील, पुणे यांची श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये व्हिजीटींग इंटरव्हेशनल कार्डीओलॉजीस्ट म्हणून पूर्वीचेच अटी/ शर्तीवर एक वर्ष कालावधीसाठी पुनर्नेमणूक करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.६४ श्रीमती संगिता शामराव पवार (हिस्टोपॅथ टेक्निशियन- ११ महिने कालावधीसाठी) यांचा दि.२५.१०.२०१३ रोजीचा संस्थान सेवेत कायम करणेबाबतचा अर्ज.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी अधिनियम २००४ मधील समितीचा कार्यकारी अधिकारी व इतर अधिकारी कलम १३ (४) मध्ये प्रामुख्याने खालीलप्रमाणे तरतूद आहे.

समितीस, संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिकाऱ्यांची (कार्यकारी अधिकाऱ्याव्यतिरिक्त) व कर्मचाऱ्यांची नेमणूक करता येईलः

परंतु, ज्या अधिकाऱ्याला किंवा कर्मचाऱ्याला दरमहा दोन हजार रुपयाहून अधिक वेतन देण्यात येत असेल किंवा द्यावयाचे असेल, अशा कोणत्याही अधिकाऱ्याची किंवा कर्मचाऱ्याची नेमणूक समितीकडून, असे पद शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात येईपर्यंत, केली जाणार नाही अशी तरतूद आहे.

शासन मान्य कर्मचारी आकृतीबंधामध्ये शासन निर्णयात पुढीलप्रमाणे तरतूद आहे. अटी-शर्ती क्र.०३) सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदांची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परिक्षा घेऊन नियुक्ती करावी. अटी-शर्ती क्र. ०८) समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पध्दतीने भरावी जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही. याप्रमाणे आकृतीबंधामध्ये तरतूद आहे.

श्री साईबाबा हॉस्पीटलसाठी हिस्टोपॅथ तंत्रज्ञाची दोन पदे मंजूर असून एक पद खुल्या प्रवर्गासाठी व दुसरे पद अनु. जाती प्रवर्गासाठी राखीव आहेत. दि. ०५/०१/२०१० रोजीचे दै. सकाळ व महाराष्ट्र टाईम्स या वृत्तपत्रामध्ये श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये आवश्यक हिस्टोपॅथ तंत्रज्ञ व इतर पॅरामेडिकल स्टाफची पदे भरणेकामी जाहिरात प्रसिध्द करुन सदर पदाकरीता लेखी, प्रात्यक्षिक व तोंडी मुलाखती घेण्यात आल्या. त्यातून दोन उमेदवारांची निवड करुन मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०७/०८/२०१० रोजीचे निर्णयानुसार त्यांना नेमणुक आदेश देण्यात आले. परंतु त्यापैकी श्री रशिद रज्जाक शेख यांनी राजीनामा दिल्याने त्यांचे जागेवर श्रीमती संगिता शामराव पवार यांना वेळोवेळी ११ महिने कालावधीसाठी मासिक रु. १०,०००/- मानधनावर तात्पुरती नेमणूक देण्यात आलेली असून मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०८/०१/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २९ नुसार देण्यात आलेली नेमणूकीची मुदत दि. १०/०१/२०१४ अखेर संपुष्टात येत आहे.

संस्थानचे दोन्ही रुग्णालयांकरीता वैद्यकीय संचालक, निवासी उपवैद्यकीय संचालक, वैद्यकीय अधिक्षक, इतर वैद्यकीय अधिकारी व इतर पदे भरणेकामी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे मान्यतेनुसार वर्तमान पत्रामध्ये जाहिरात देण्यात आली होती. या जाहिरातीमध्ये हिस्टोपॅथ

टेक्निशियन या पदाच्या एका जागेचा समावेश करण्यात आलेला असून सदरचे पद अनुसुचीत जाती प्रवर्गासाठी राखीव आहे.

परंतु, या जाहिरातीस पाहिजे तसा प्रतिसाद न मिळाल्याने सदरची पदे भरणेकामी मा. त्रिसदस्यीय समितीचे दि. १४/११/२०१३ रोजीचे सभेमध्ये सध्या देण्यात आलेल्या जाहिरातीच्या निम्म्या आकाराची जाहिरात देशातील प्रमुख शहरांमधील टाईम्स ऑफ इंडिया, इडियन एक्सप्रेस, महाराष्ट्र टाईम्स, सकाळ या वर्तमान पत्रांमध्ये व संस्थान वेबसाईटवर फेर जाहिरात प्रसिध्द करणेस व त्यासाठी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत आली आहे. त्यानुसार दि. १५/११/२०१३ रोजीचे मंजूर टिपणीअन्वये संस्थानचे जनसंपर्क कार्यालयामार्फत जाहिरात देणेची कार्यवाही चालू आहे.

श्रीमती संगिता शामराव पवार यांनी दि. २५/१०/२०१३ रोजी अर्ज सादर केला असून त्यात पुढीलप्रमाणे नमूद केले आहे. च्मला संस्थानने दि. ०७/०१/२०११ पासुन रु. १०,०००/- इतक्या वेतनावर मुलाखतीद्वारा हिस्टोपॅथ तंत्रज्ञ म्हणून ११ महिने कालावधी करीता नेमणूक दिलेली आहे. सदर सेवेचा कालावधी प्रत्येक ११ महिन्यांनी वाढविणेत येत आहे. मला आतापर्यंत तीन वेळा अशा प्रकारे सेवेची मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदर सेवेची मुदत १० जानेवारी, २०१४ रोजी संपत आहे. यापुर्वी मी दि. २०/०९/२००६ पासुन दि. ०६/०१/२०११ पर्यंत कुशल कंत्राटी कर्मचारी म्हणून प्रयोगशाळा तंत्रज्ञ या पदाचे काम श्री साईनाथ रुग्णालयात केलेले आहे. तरी महोदय साहेबांनी माझ्या वरील अनुभवाचा व मी करत असलेल्या कामाचा सहानुभूतीपुर्वक विचार करुन मला संस्थान सेवेत कायम स्वरुपी सामावून घ्यावे. असा विनंती अर्ज केला आहे.

श्रीमती संगिता शामराव पवार यांची ११ महिने कालावधीची मुदत दि. १०/०१/२०१४ अखेर संपुष्टात येत असल्याने, त्यांचेबाबत प्र. वैद्यकिय अधिक्षक, श्री साईनाथ रुग्णालय यांचेकडून अभिप्राय मागविण्यात आलेला असून, त्यांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे. श्रीमती संगिता शामराव पवार यांचे काम व वर्तणूक समाधानकारक आहे. त्या हुकुमाप्रमाणे व योग्य रितीने कामे करतात. त्यांचे विषयी काहीही प्रकरण चालू नाहीत. तरी त्यांना संस्थान नियमाप्रमाणे पुढील ११ महिने कालावधीसाठी तात्पुरती नेमणूक देण्यास हरकत नाही.

उपरोक्तप्रमाणे प्र. वैद्यकिय अधिक्षक, श्री साईनाथ रुग्णालय यांनी अभिप्राय दिलेला आहे. तथापि, श्रीमती संगिता पवार या खुल्या प्रवर्गातील आहेत. हिस्टोपॅथ टेक्निशियनचे एक पद रिक्त आहे. सदरचे पद अनुसुचीत जाती प्रवर्गासाठी राखीव असून या पदाची जाहिरात देण्यात आलेली आहे. जाहिरातीव्दारे या पदावर उमेदवार उपलब्ध झाल्यास श्रीमती संगिता पवार यांना देण्यात येणारी ११ महिन्यांसाठीची नेमणूक संपुष्टात आणावी लागेल, असे मत आहे.

तरी, प्र. वैद्यकिय अधिक्षक, श्री साईनाथ रुग्णालय यांचे अभिप्रायानुसार श्रीमती संगिता शामराव पवार यांना पुढील ११ महिने कालावधीकरीता हिस्टोपॅथ टेक्निशियन या पदावर तात्पुरती नेमणुक देणबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्र. वैद्यकिय अधिक्षक, श्री साईनाथ रुग्णालय यांचे अभिप्रायानुसार श्रीमती संगिता शामराव पवार यांना पुढील ११ महिने कालावधीकरीता पुर्वीच्याच अटी/ शर्तीवर कंत्राटी पध्दतीने हिस्टोपॅथ टेक्निशियन या पदावर तात्पुरती नेमणूक देणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.६५** **संस्थान रुग्णालयांचे विविध विभागात टेक्निकल स्वरुपाचे काम करणाऱ्या कंत्राटी कुशल कर्मचाऱ्यांना प्रतिमहिना रु.११,०००/- वेतन मिळणेच्या अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री मांडे परमेश्वर भगवान व इतर १४ प्रयोगशाळा तंत्रज्ञ व प्रयोगशाळा सहाय्यक यांनी पुढील प्रमाणे अर्ज सादर केला आहे. आम्ही श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पीटलमधील प्रयोगशाळा तंत्रज्ञ व प्रयोगशाळा सहाय्यक विनंतीपूर्वक अर्ज करतो की, आम्ही गेल्या ६-७ वर्षापासून श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये कुशल कंत्राटी कर्मचारी (प्रयोगशाळा तंत्रज्ञ व सहाय्यक) म्हणून काम करत आहे. आम्हाला महिन्याकाठी साधरणतः ५,०००/- इतके वेतन मिळत आहे. आमच्या बरोबरच काम करणारे व आमच्या नंतर संस्थानमध्ये आलेले कुशल कंत्राटी कर्मचारी (परिचारक /परिचारीका), एम आर आय टेक्निशियन, डायलेसिस टेक्निशियन, बायोमेडिकल टेक्निशियन, फिजीओथेरापिस्ट इ.) यांना दरमहा रु. ११,०००/- इतके वेतन दिले जात आहे.

वरील कर्मचाऱ्यांप्रमाणे प्रयोगशाळा विभागातील आमच्या पैकी काही कर्मचारी बी.एस्सी. डि.एम.एल.टी. व काही कर्मचारी एच.एस.सी. डि.एम.एल.टी. झालेले आहेत. आम्हीही सदर परिचारक / परिचारीका व इतर टेक्निशियन यांच्या प्रमाणे जोखमीचे व जबाबदारीचे काम करत आहे. आम्ही केल्या ६-७ वर्षापासून सदर ठिकाणी कंत्राटी कुशल कर्मचारी म्हणून काम करत आहे. आतापर्यंत कामकाजाबाबत कुठल्याही प्रकारची अडचण आलेली नाही. तरी देखील आम्हाला वरील वेतनापासून

वंचीत ठेवले जात आहे. त्यामुळे आम्हालाही त्यांचे प्रमाणे रु. ११,०००/- वेतन मिळणेस विनंती आहे. तरी महोदय साहेबांनी याबाबत सहानुभूतीपूर्वक लक्ष घालून आम्हास योग्य न्याय द्यावा, ही नम्र विनंती.

ज्यू. फिजिओथेरापिस्ट, एम आर आय टेक्निशियन, डायलेसिस टेक्निशियन, ज्यू. पी.एफ.टी. टेक्निशियन, ज्यू. बायोमेडिकल टेक्निशियन यांना रु. ११,०००/- वेतन देण्यात येत असल्यामुळे त्याच धरतीवर वेतन मिळणेबाबत उपरोक्तप्रमाणे अर्ज सादर केलेला आहे.

दि. २८/०८/२०११ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र. ६६६ नुसार सध्या कंत्राटी पध्दतीने कंत्राटदारामार्फत व ११ महिने कालावधीकरीता कार्यरत असलेल्या व नव्याने घेण्यात येणाऱ्या परिचारक / परिचारीका यांना प्रतिमहा रु. ११,०००/- वेतन देण्यात येत आहे.

तसेच ज्यू. फिजिओथेरापिस्ट, एम आर आय टेक्निशियन, डायलेसिस टेक्निशियन, ज्यू. पी.एफ.टी. टेक्निशियन, ज्यू. बायोमेडिकल टेक्निशियन आदि. पदे भरणेकामी स्थानिक समितीचे सभेपुढे दि. २१/०१/२०१२ रोजी मुलाखती घेऊन त्याव्दारे संबंधीत पदांवर उमेदवार निवडण्यात आले आहे. सदर निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना मा. व्यवस्थापन समितीचे दि. १९/०२/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र. १७३ नुसार कंत्राटदारामार्फत कामावर घेऊन त्यांना रु. ११,०००/- मासिक मेहनताना देण्यात येत आहे.

श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पीटलसाठी आकृतीबंधामध्ये प्रयोग शाळा तंत्रज्ञ व प्रयोगशाळा सहाय्यक, फार्मासिस्ट या पदाच्या मंजूर असलेल्या जागा, भरलेल्या जागा व रिक्त जागा यांचा तपशील पुढीलप्रमाणे आहेत.

| पदाचे नाव | शैक्षणिक पात्रता | मंजूर पदे | | | | भरलेली पदे | | | | अतिरिक्त पदे | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | साईनाथ | | साईबाबा | | साईनाथ | | साईबाबा | | साईनाथ | | साईबाबा | |
| | | स्थायी | आऊट सोर्स | स्थायी | आऊट सोर्स | स्थायी | आऊट सोर्स | स्थायी | आऊट सोर्स | स्थायी | आऊट सोर्स | स्थायी | आऊट सोर्स |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| प्रयोग शाळा तंत्रज्ञ | 1) PB 9300-34800 GP 4200<br>2) Age not more than 33 years;<br>3) B.Sc. with D.M.L.T / B.M. Tech.of an Institute recognized by the Government;<br>4) MS-CIT or Government prescribed equivalant Computer Operating Course;<br>5) Experience minimum 5 years as Lab.Technicians in any renowed Hospital. | ०५ | ०० | ०६ | ०० | ०५ | ०२ | ०६ | ०६ | ०० | ०२ | ०० | ०६ |
| प्रयोगशाळा सहाय्यक | 1) PB 5200-2000 GP 2000<br>2) Age not more than 33 years;<br>3) Higher Secondary Certificate Examination passed and CMLT/ DMLT from any recognized University/ Institute; | ०६ | ०३ | ०३ | ०१ | ०३ | ०७ | ०३ | ०३ | ०० | ०१ | ०० | ०२ |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 4) Similar experience minimum 3 years. | | | | | | | | | | | | |
| फार्मासिस्ट | 1) PB 5200-20200 GP 2800<br>2) Age not more than 33 years;<br>3) Degree/ Dip in pharmacy from any recognized University/ Institute;<br>4) MSCIT or Govt prescribed equivalent computer operating course.<br>5) Experience minimum 3 years in handling medical store in a govt/ semi govt hospital. | ०९ | ०० | ०६ | ०० | ०७ | ०१ | ०६ | ११ | ०० | ०१ | ०० | ११ |
| | **TOTAL** | **२०** | **०३** | **१५** | **०१** | **१५** | **१०** | **१५** | **२०** | **००** | **०४** | **००** | **१९** |

श्री साईनाथ रुग्णालयाचे आकृतीबंधामध्ये प्रयोग शाळा तंत्रज्ञ या पदाच्या स्थायी ०५ जागा मंजूर असून सदर ठिकाणी ०५ कायम व ०२ कुशल कंत्राटी कर्मचारी असे एकूण ०७ कर्मचारी कार्यरत आहे. आकृतीबंधातील मंजुरीपेक्षा ०२ कर्मचारी अतिरिक्त आहेत. तसेच श्री साईबाबा हॉस्पीटलचे आकृतीबंधामध्ये प्रयोगशाळा तंत्रज्ञ या पदाच्या ०६ स्थायी जागा मंजूर असून सदर ठिकाणी ०६ कायम व ०६ कंत्राटी कर्मचारी असे एकूण १२ कर्मचारी कार्यरत आहेत. म्हणजेच आकृतीबंधातील मंजूर पदांपैकी ०६ कर्मचारी अतिरिक्त आहेत.

श्री साईनाथ रुग्णालयाकडे प्रयोगशाळा सहाय्यक या पदाच्या ०९ जागा मंजूर असून १० कर्मचारी कार्यरत आहे. म्हणजेच सदर ठिकाणी ०१ कर्मचारी अतिरिक्त आहे. श्री साईबाबा हॉस्पीटलकडे या पदाच्या स्थायी ०३ व आऊट सोर्स ०१ अशा ०४ जागा मंजूर असून ६ कर्मचारी कार्यरत आहेत. २ कर्मचारी अतिरिक्त आहे.

तसेच आकृतीबंधामध्ये श्री साईनाथ रुग्णालयासाठी फार्मासिस्टचे ०९ व श्री साईबाबा हॉस्पीटलसाठी ०६ असे एकूण १५ स्थायी पदे मंजूर आहेत. सध्या दोन्ही रुग्णालयांकडे १३ स्थायी व १२ कंत्राटी फार्मासिस्ट असे एकूण २५ फार्मासिस्ट कार्यरत आहे. म्हणजेच आकृतीबंधातील मंजूरीपेक्षा १० फार्मासिस्ट अतिरिक्त आहेत.

प्रयोगशाळा तंत्रज्ञ व फार्मासिस्ट यांचेप्रमाणेच रुग्णालयातील टेक्निकल (डेंटल, एक्स-रे, ईसीजी, सीटी स्कॅन इ. टेक्नि.) कर्मचारी यांनीही मासिक रु. ११,०००/- वेतन मिळणेसाठी अर्ज सादर केलेले आहेत.

उपरोक्तप्रमाणे रुग्णालयातील कंत्राटी प्रयोगशाळा तंत्रज्ञ, फार्मासिस्ट व टेक्निकल (डेंटल, एक्स-रे, ईसीजी, सीटी स्कॅन इ. टेक्नि.) कर्मचारी यांचे पगारवाढीचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान रुग्णालयांचे विविध विभागात टेक्निकल स्वरुपाचे काम करणाऱ्या कंत्राटी कुशल कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र शासनाच्या किमान वेतनाप्रमाणे वेतन दिले जात आहे, त्यामुळे त्यांच्या अर्जाचा विचार करणेत येऊ नये, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.६६** **सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना दुसरा लाभ मंजुर करणेबाबत.**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय,क्रमांक वेतन-११०९/प्र.क्र.४४/सेवा-३ दि.१/४/२०१० व महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय,क्रमांक वेतन-११०९/प्र.क्र.४१/सेवा-३ दि.५/७/२०१० अन्वये राज्य शासकिय कर्मचा-यांना लागू असलेली 'सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना ' संस्थान आस्थापनेवरील कर्मचा-यांना लागू करणेबाबत मा.व्यवस्थापन त्रिसदसीय समितीचे दि.२६/०२/२०१३ रोजीचे सभेमध्ये खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

निर्णय क्र. १४७ :- "शासन निर्णय क्रमांक वेतन -११०९/प्र.क्र.४४/सेवा मंत्रालय मुंबई ४०० ०३२ दि.०१ एप्रिल २०१० नुसार राज्य शासकिय कर्मचा-यांना लागू करणेत आलेली "सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना " संस्थान आस्थापनेवरील पात्र ठरणा-या कर्मचा-यांना लागू करण्यात यावी.

तसेच सदर योजनेचा दुसरा लाभ मिळणेसाठी साधारणपणे पात्र असलेल्या २३४ कर्मचा-यांची शासन निर्णयाप्रमाणे गोपनीय अहवालाची पडताळणी करुन पात्र कर्मचा-यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत दुसरा लाभ देणेत यावा."

उपरोक्त शासन निर्णय व मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार व मार्गदर्शक तत्वानुसार पात्र ठरलेल्या एकूण - १३५ कर्मचा-यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना दुसरा लाभ देण्यात आलेला आहे.

आता, सदर योजनेचा दुसरा लाभ मिळणेकामी साधारणपणे पात्र असलेल्या एकूण-१३६ कर्मचा-यांची यादी सोबत सादर केलेली आहे.

सदर योजनेच्या दुस-या लाभासाठी पात्रतेच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत.

०१) पहिला लाभ घेतलेल्या व त्यानंतर प्रत्यक्ष पदोन्नती मिळालेल्या कर्मचा-यास दुसरा लाभ मंजूर करतांना तो पहिल्या लाभाप्रमाणेच दिनांक २० जुलै २००१, च्या आदेशामधील व यासंबंधी वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या स्पष्टीकरणात्मक आदेशातील तरतूदींच्या अधिन राहून मंजूर करण्यात यावा. म्हणजेच ज्या पदाची वेतनसंरचना मंजूर करण्यात येणार आहे, त्या पदावर प्रत्यक्ष पदोन्नती मिळण्यासाठी विहीत केलेल्या अटी व शर्तीची पूर्तता करणे आवश्यक राहील.

०२) पहिल्या लाभांतर्गत पदोन्नतीच्या ज्या पदाची वेतनसंरचना मंजूर करण्यात आली आहे त्या पदावर प्रत्यक्ष पदोन्नती न मिळालेल्या कर्मचा-यांच्या बाबतीत, दुसरा लाभ मंजूर करण्यासाठी, त्याला ज्या पदाची वेतनसंरचना मंजूर करण्यात येणार आहे त्या पदावरील पदोन्नतीसाठी विहीत केलेली गोपनीय अहवालाची किमान सरासरी प्रतवारी प्राप्त करणे आवश्यक राहील.

संस्थान कर्मचा-यांना यापूर्वी आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी मंजूर करतांना पात्र तारखेच्या लगतच्या मागील पाच वर्षाचे गोपनीय अहवाल विचारात घेऊनच कालबध्द वरची वेतनश्रेणी देण्यात आलेली आहे. या कारणासाठी विभागीय परिक्षा घेण्यात आलेली नाही.

सदर योजनेच्या मार्गदर्शक तत्वांचा विचार करता सोबतचे यादीमध्ये नमूद केलेले १२९ कर्मचारी सुधारित आश्वासित प्रगती योजना मधील दुसरा लाभ देण्यास पात्र होतात किंवा कसे ? याची छाननी प्रशासना तर्फे प्रामुख्याने खालील निकषावर करण्यात आलेली आहे.

संबंधीत कर्मचा-यांचे देय तारखेच्या लगतच्या मागील ०५ वर्षाचे (दि.२००८-०९, २००९-१०, २०१०-११, २०११-१२,२०१२-२०१३) गोपनीय अहवाल विचारात घेण्यात आलेले आहेत.

गोपनीय अहवाल लिहीतांना कर्मचा-याबाबत सर्वसाधारण मूल्यमापन खालील प्रमाणे करण्याची पध्दती आहे.

०१) अ+ = अत्युकृष्ट ०२) अ= उत्कृष्ट ०३) ब+ = निश्चित चांगला ०४) ब = चांगला
०५) ब - = साधारण ०६) क = साधारणपेक्षा कमी.

शासकिय सेवेतील कर्मचा-यांचे पदोन्नतीसाठी गोपनीय अभिलेख्यांच्या प्रतवारीचे निकष ठरविण्यासाठी खालील प्रमाणे मार्गदर्शक तत्वाचा विचार करण्यात येतो.

**०१)** वेतन श्रेणीतील पे बँड -१एस (रु. ४४४०-७४४०) पासून पद धारण करणारे आणि प्रतिमहिना रु.१३०० परंतु वेतन श्रेणीतील पे बँड -२ (रु. ९३००-३४८००) पर्यंत पद धारण करणारे आणि प्रतिमहिना रु.४२०० पर्यंत ग्रेड वेतन घेणारे कर्मचा-यांसाठी पाच वर्षाचे गोपनीय अभिलेखाची सरासरी प्रतवारी ब+(निश्चित चांगली) प्राप्त करणे आवश्यक आहे.

**०२)** वेतन श्रेणीतील पे बँड -२ (रु. ९३००-३४८००) पासून पद धारण करणारे आणि प्रतिमहिना रु. ४२०० पेक्षा जास्त परंतु वेतन श्रेणीतील पे बँड -३ (रु. १५६००-३९१००) पर्यंत पद धारण करणारे आणि प्रतिमहिना ५४०० पर्यंत ग्रेड वेतन घेणारे कर्मचा-यांसाठी पाच वर्षाचे गोपनीय अभिलेखाची सरासरी प्रतवारी 'अ ' (उत्कृष्ट ) प्राप्त करणे आवश्यक आहे.

**०३)** वेतन श्रेणीतील पे बँड-०१ एस (रु.४४४०-७४४०) व प्रतिमहिना ग्रेड वेतन रु.१३०० पासून ते वेतन श्रेणीतील पे बँड -३ (रु. १५६००-३९१००) व प्रतिमहिना ग्रेड वेतन रु.५४०० पर्यंत ग्रेड वेतन घेणारे एकाकी/ पदोन्नतीची संधी उपलब्ध्द नसलेल्या पदावरील कर्मचा-यांच्या गोपनीय अहवालाची सरासरी प्रतवारी 'ब+' (निश्चित चांगली) प्राप्त करणे आवश्यक आहे.

उपरोक्त प्रमाणे मार्गदर्शक तत्वानुसार.

सोबतच्या यादीमधील एकूण -१३६ (वरिष्ठ-लिपीक-०६, सहा.आचारी-०१, मदतनीस-१२९) कर्मचा-यांपैकी-

**अ)** "सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजने अंतर्गत" दुस-या लाभासाठी सोबतच्या परिशिष्ट '१' मधील एकूण- ११४ कर्मचारी पात्र होत आहेत.

**ब)** "सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजने अंतर्गत" दुस-या लाभासाठी सोबतच्या परिशिष्ट '२' मधील एकूण- २२ कर्मचारी अपात्र होत आहेत.

तरी उपरोक्त प्रस्तावित केलेप्रमाणे परिशिष्ट-०१ मधील एकूण- ११४ (वरिष्ठ-लिपीक-०६, सहा.आचारी-०१, मदतनीस-१०७) कर्मचा-यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या तारखेपासून "सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजने अंतर्गत" दुसरा लाभ मंजूर करणेबाबतचे प्रस्तावावर विचार होणेस विनंती.

**निर्णय क्र.६५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान मधील कायम कर्मचाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत दुसरा लाभ देणेसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे पात्र ठरत असलेल्या खालील ११४ कर्मचाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत दुसरा लाभ त्यांचे नावासमोरील देय असलेल्या तारखेपासून लागू करणेत यावा, असे ठरले.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **SENIOR CLERK<br>EXISTING PAY BAND 5200-20200 + GRADE PAY 2400<br>REVISED PAY BAND - 9300-34800 GRADE PAY-4200** | | | | |
| **SR. NO.** | **NAME AND DESIGNATION, DEPT** | **DATE OF FIRST JOINING** | **TIME BOUND PRAMOTION** | **REVIED ASSURED CAREER SCHEME (2ND BENEFIT)** |
| 1 | SHRI. GHAIDAR KAILAS NARAYAN.<br>SENIOR CLERK,<br>CONSTRUCTION DEPTT | 12-Jun-1989 | 12-Jun-01 | 12-Jun-13 |
| 2 | SHRI. BARGE VITTHALRAO MANIKRAO<br>SENIOR CLERK<br>ADMINISTRATION DEPARTMENT | 18-May-1989 | 18-May-01 | 18-May-13 |
| 3 | SHRI. BAJAJ VISHWANATH HARIKISAN SENIOR CLERK,<br>ACCOUNTS DEPARTMENT | 18-May-1989 | 18-May-01 | 18-May-13 |
| 4 | SHRI. KULKARNI AVINASH VINAYAK<br>SENIOR CLERK,<br>ADMINISTRATION DEPARTMENT | 18-May-1989 | 18-May-01 | 18-May-13 |
| 5 | SHRI. GAIKWAD SANJAY CHANDRAKANT<br>SENIOR CLERK,<br>SAIPRASAD NIWASSTHAN | 01/06/1989. | 1-Jun-01 | 1-Jun-13 |
| 6 | SHRI. CHAUDHARY RAMESH NARAYAN SENIOR CLERK,<br>INFORMATION TECH. DEPARTMENT | 12-Jun-1989 | 12-Jun-01 | 12-Jun-13 |
| **ASSTT.COOK<br>EXISTING PAY BAND-4440-7440 GRADE PAY-1600<br>REVISED PAY BAND -5200-20200 GRADE PAY-1800** | | | | |
| 7 | SHRI. PUROHIT DHANNARAM ANNARAM, ASSTT.COOK,<br>PRASADALAYA DEPARTMENT | 03/05/1989. | 3-May-01 | 3-May-13 |
| **CLASS 4 EMPLOYEE<br>EXISTING PAY BAND-4440-7440 GRADE PAY-1600<br>REVISED PAY BAND -4440-7440 GRADE PAY-1600+300** | | | | |
| 8 | SMT. BORAWAKE SARUBAI EKNATH<br>ATTENDANT,<br>GARDEN DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 9 | SHRI. SASANE DEORAM MAHADU<br>SWEEPER,<br>SANITATION DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 10 | SMT. SUTAR KANTABAI KONDIBA<br>SWEEPER,<br>SANITATION DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 11 | SHRI. WANI VASANT GANGADHAR<br>ATTENDANT,<br>SAIBABA BHAKTANIWASSTHAN DEPT. | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 12 | SMT. THORAT DAGUBAI KASHINATH<br>ATTENDANT,<br>PRASADALAYA DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 13 | SHRI.THETE RANGNATH PANDURANG ATTENDANT, MANDIR DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 14 | SHRI. WANI SUDAM GHAMAJI ATTENDANT, CANTEEN DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 15 | SMT. TUWAR CHANDRABHAGABAI HIRALAL ATTENDANT, PRASADALAYA DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 16 | SHRI. ARANE EKNATH RAMU ATTENDANT, PRASADALAYA DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 17 | SHRI. SHIRSATH BABAN RAMA ATTENDANT, ENGLISH MEDIUM SCHOOL DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 18 | SMT. DARULE VENUBAI LAXMAN ATTENDANT, PRASADALAYA DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 19 | SHRI.SARODE ASHOK GORAKSHNATH ATTENDANT, PRASADALAYA DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 20 | SHRI. DEOKAR DWARKANATH RAMCHANDRA ATTENDANT, CANTEEN DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 21 | SHRI. TORADMAL SUBHASH KISAN ATTENDANT, PRASADALAYA DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 22 | SMT. PAGARE SUMAN VITTHAL ATTENDANT, PRASADALAYA DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 23 | SMT. WANI YAMUNABAI POPAT ATTENDANT, PRASADALAYA DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 24 | SHRI. JAGTAP VITTHAL APPA ATTENDANT, SAIPRASAD NIWASSTHAN | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 25 | SHRI. KOLGE NANASAHEB DAMU ATTENDANT, TEMPLE DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 26 | SMT.SHEJWAL HIRABAI RAKHMA ATTENDANT, PRASADALAYA DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 27 | SMT. BADE SINDHUBAI PUNDLIK ATTENDANT, PRASADALAYA DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 28 | SMT. JADHAV YAMUNABAI JANARDHAN ATTENDANT, PRASADALAYA DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 29 | SHRI. ARANE TANHAJI SALABA ATTENDANT, TEMPLE DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 30 | SMT. BANKAR GAYABAI RAMESH ATTENDANT, PRASADALAYA DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 31 | SMT. PATHARE SHOBHA SURESH ATTENDANT, PRASADALAYA DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 32 | SHRI.GONDKAR RADHAKISAN HARI ATTENDANT, CANTEEN DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 33 | SHRI.GADAKH SHIVAJI BABAN WATCHMAN, SECURITY DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 34 | SHRI. JADHAV RAGHUNATH SHANKAR ATTENDANT, CANTEEN DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 35 | SHRI. BANSODE BHAUSAHEB JAGANNATH ATTENDANT, STORE DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 36 | SHRI. KHAMBEKAR ARUN ANANT ATTENDANT, SAIPRASAD NIWASSTHAN | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 37 | SHRI. LOKHANDE HARI NARAYAN SWEEPER, SANITATION DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 38 | SHRI. BANSODE DEOCHAND GOPINATH ATTENDANT, PRASADALAYA DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 39 | SHRI. BANSODE MARTAND DADA ATTENDANT, TEMPLE DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 40 | SHRI. BHAGWAT SAMBHAJI MOHINIRAJ ATTENDANT, PURCHASE DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 41 | SHRI. GAYAKE NIVRUTTI JANKU ATTENDANT, ADMINISTRATION DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 42 | SHRI. GADEKAR MADHUKAR DAMU PEON, TEMPLE DEPARMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 43 | SHRI. MAHANKALE NAMDEO KASHINATH WARDBOY, SHRI SAINATH HOSPITAL DEPT. | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 44 | SMT. BHALAKE KAMAL CHHABU ATTENDANT, PRASADALAYA DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 45 | SHRI. DANGE MACHINDRA BHIKAJI ATTENDANT, GARDEN DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 46 | SHRI. TURAKANE BHIMRAJ PARVAT ATTENDANT, PRASADALAYA DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 47 | SHRI. NIKAM RAJU KISAN ATTENDANT, TEMPLE DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 48 | SHRI. GONDKAR SOMNATH RAMDAS WATCHMAN, SECURITY DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 49 | SHRI.SHEJWAL PRAKASH SAYAJI ATTENDANT, PUBLICATION DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 50 | SHRI. KANASE JAGANNATH KARBHARI ATTENDANT, SAIPRASAD NIWASSTHAN | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 51 | SHRI. KHOTKAR ASARAM BHIMRAO SWEEPER, SANITATION DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 52 | SHRI. ASANE LAXMAN GANGADHAR ATTENDANT, CANTEEN DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 53 | SHRI. DANGE SUDAM APPASAHEB ATTENDANT, ADMINISTRATION DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 54 | SHRI. GADE BALASAHEB MURALIDHAR ATTENDANT, RECORD DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 55 | SHRI. WANI SUDAM BHANUDAS ATTENDANT, CANTEEN DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 56 | SHRI. SALVE SUDHAKAR BAPURAO ATTENDANT, PRASADALAYA DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 57 | SHRI. BANKAR SONYABAPU BHIMAJI ATTENDANT, TEMPLE DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 58 | SMT.BHARASKAR SUSHILA BABAN ATTENDANT, PRASADALAYA DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 59 | SMT. SHELAR SUSHILA PRALHAD ATTENDANT, PRASADALAYA DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 60 | SHRI. DANGE ASHOK BANSI ATTENDANT, PRASADALAYA DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 61 | SHRI. DOKHE MADHUKAR BHIVAJI WARDBOY, SHRI SAINATH HOSPITAL | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 62 | SHRI. BHALERAO VISHWANATH KACHARU SWEEPER, SANITATION DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 63 | SHRI. TAKWALE MANOHAR UTTAM SWEEPER, SANITATION DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 64 | SMT. LONDHE SHALU VILAS ATTENDANT, PRASADALAYA DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 65 | SMT.KOKATE LEELA MAHENDRA ATTENDANT, PRASADALAYA DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 66 | SHRI. KHAIRNAR ARUN PARASHRAM ATTENDANT, TEMPLE DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 67 | SMT. SURYAWANSHI KAMAL GOVIND LADY ATTENDANT, KANYA VIDYA MANDIR DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 68 | SMT. SHAIKH MADINA AMIN ATTENDANT, PRASADALAYA DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 69 | SHRI. KALEKAR NANASAHEB KARBHARI WATCHMAN, SECURITY DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 70 | SHRI. BANKAR PRAKASH SAKHARAM PEON, ADMINISTRATION DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 71 | SHRI. DHIWAR ASHOK REVAJI SWEEPER, SANITATION DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 72 | SHRI. GAIKWAD BHASKAR RAOSAHEB WATCHMAN, SECURITY DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 73 | SHRI. HUSALE SURESH TANHAJI WATCHMAN, SECURITY DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 74 | SHRI. RAUT SHIVAJI SAVLERAM ATTENDANT, CANTEEN DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 75 | SHRI. SONAWANE BALU SHANKAR ATTENDANT, PRASADALAYA DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 76 | SHRI. GONDKAR AVINASH KISAN WATCHMAN, SECURITY DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 77 | SHRI. ARANE GANPAT BHAGWANTA SWEEPER, SANITATION DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 78 | SHRI. INAMDAR MANSUR ISMAIL WARDBOY, SHRI SAINATH HOSPITAL DEPT. | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 79 | SMT. PATHAN SALIMA KARIM SWEEPER, SANITATION DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 80 | SHRI.CHAUDHARY CHANDRABHAN PANDHARINATH ATTENDANT, PRASADALAYA DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 81 | SMT. PATHAN AMINA HABIB ATTENDANT, PRASADALAYA DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 82 | SHRI. KSHIRSAGAR BALASAHEB NAMDEO ATTENDANT, SAIPRASAD NIWASSTHAN | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 83 | SHRI. DANGE SITARAM RAMBHAU WATCHMAN, SECURITY DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 84 | SHRI. PAWADE JANARDHAN KACHARU PEON, ADMINISTRATION DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 85 | SHRI. SHEJWAL KAILASH KUSHABA WATCHMAN, SECURITY DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 86 | SHRI. TUPKE BALASAHEB MURALIDHAR ATTENDANT, TEMPLE DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 87 | SHRI. VARPE ASHOK HARIBHAU WATCHMAN, SECURITY DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 88 | SHRI. RAKSHE POPAT LAVHAJI ATTENDANT, PRASADALAYA DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 89 | SHRI. DANGE UTTAM RADHU ATTENDANT, CONSTRUCTION DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 90 | SMT. MORE VIMALBAI ASARAM AYA, SHRI SAINATH HOSPITAL DEPT. | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 91 | SHRI. PAIK BHIMA DINKAR SWEEPER, SANITATION DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 92 | SHRI. DANGE ROHIDAS NATHA ATTENDANT, CANTEEN DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 93 | SHRI. PAWAR NIVRUTTI MARUTI SWEEPER, SANITATION DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 94 | SHRI. SONAWANE NANASAHEB RAJARAM ATTENDANT, PRASADALAYA DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 95 | SHRI. JADHAV BHAUSAHEB VINAYAK ATTENDANT, CANTEEN DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 96 | SHRI. GAYAKE RAOSAHEB DAGADU ATTENDANT, CANTEEN DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 97 | SHRI. GAIKWAD PRAKASH TUKARAM WATCHMAN, SECURITY DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 98 | SHRI. SALVE MADHUKAR BAPU ATTENDANT, TEMPLE DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 99 | SHRI. SHEJWAL GANPAT NATHA ATTENDANT, ACCOUNTS DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 100 | SMT. SHAIKH HASINA SAYAPU ATTENDANT, PRASADALAYA DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 101 | SHRI. KOTE RAMESH BABURAO ATTENDANT, SAIPRASAD NIWASSTHAN | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 102 | SHRI. GONDKAR AMBADAS GOPINATH PEON, ADMINISTRATION DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 103 | SHRI. DHANESHWAR POPAT ANANDRAO PEON, ADMINISTRATION DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 104 | SHRI. BACCHE BHAUSAHEB SHAMRAO WATCHMAN, SECURITY DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 105 | SHRI. RAHANE DADASAHEB GOPINATH ATTENDANT, SAIBABA BHAKTNIWAS DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 106 | SHRI. BHOKARE ARUN MHASU WATCHMAN, SECURITY DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 107 | SHRI. THETE RAIBHAN KASHINATH ATTENDANT, SAIBABA BHAKTNIWAS DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 108 | SHRI. KOTE SUDAM SOPAN WATCHMAN, SECURITY DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 109 | SHRI. PAWAR SUDAM ABAJI ATTENDANT, SAIPRASAD NIWASSTHAN | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 110 | SHRI. BHALERAO PARSHRAM SOMAJI WATCHMAN, SECURITY DEPARTMENT | 6-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 111 | SHRI. BIBE LAHANU DEORAM PEON, ADMINISTRATION DEPARTMENT | 7-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 112 | SHRI. SHIKHARE RAMESH KACHARU SWEEPER, SANITATION DEPARTMENT | 7-Mar-1989 | 6-Mar-01 | 6-Mar-13 |
| 113 | SHRI. RANE ARVIND DATTATRAYA ATTENDANT, WATER SUPPLY DEPARTMENT | 9-May-1989 | 9-May-01 | 9-May-13 |
| 114 | SMT. DHANGARE PRAMILA BHIKAJI AYA, SHRI SAINATH HOSPITAL DEPT. | 16-Mar-1982 | 1-Oct-94 | 1-Oct-06 |

**उपरोक्त पात्र कर्मचाऱ्यांपैकी अ.नं.०७ चे श्री.पुरोहित धन्नाराम अन्नाराम, सहाय्यक आचारी, श्री साई प्रसादालय यांना सदरचा दुसरा लाभ मंजूर झालेनंतर पदोन्नतीची संधी नसल्याने, त्यांना मंजूर केलेल्या ५२००-२०२०० या वेतन बॅण्डमध्ये ग्रेड पे रु.१८०० + अतिरिक्त ग्रेड पे रु.३०० मात्र देणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.६७** **सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना दुसरा लाभ मंजुर करणेबाबत. (५२ कर्मचारी)**

**प्रस्ताव-** संस्थान कर्मचा-यांना सुधारित आश्वासित प्रगती योजना लागू करणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि. २६/०२/२०१३ रोजीच्या सभेमध्ये प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. त्यावर खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

निर्णय क्र. १४७:- शासन निर्णय क्र.वेतन-११०९/प्र.क्र.४४/सेवा-३ मंत्रालय मुंबई ४०० ०३२ दि.०१ एप्रिल २०१० नुसार राज्य शासकिय कर्मचा-यांना लागू करणेत आलेली 'सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना' संस्थान आस्थापनेवरील पात्र ठरणा-या कर्मचा-यांना लागू करणेत यावी.

तसेच, सदर योजनेचा दुसरा लाभ मिळणेसाठी साधारणपणे पात्र असलेल्या २३४ कर्मचा-यांची शासन निर्णयाप्रमाणे गोपनीय अहवालाची पडताळणी करुन पात्र कर्मचा-यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत लाभ देणेत यावा.

मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार सदर योजनेच्या दुस-या लाभासाठी पात्रतेच्या अटी व शर्ती तसेच शासकिय सेवेतील कर्मचा-यांचे पदोन्नतीसाठी गोपनीय अभिलेख्यांच्या प्रतवारीचे निकषानुसार -

**अ)** सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजने अंतर्गत दुस-या लाभासाठी एकूण- १३५ कर्मचारी पात्र झाल्यामुळे जा.नं.एसएसएस/वशी-०१/८९१/२०१३ दि.१० जून २०१३ अन्वये संबंधीत कर्मचा-यांना सदर योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे.

**ब)** सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजने अंतर्गत दुस-या लाभासाठी -८७ कर्मचारी अपात्र ठरले आहेत. त्यामुळे त्यांना सदर योजनेचा लाभ देण्यात आलेला नाही.

**क)** सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजने अंतर्गत दुस-या लाभासाठी एकूण- ०५ कर्मचा-यांचे गोपनीय अहवाल अपूर्ण असल्याने -०५ कर्मचा-यांना सदर योजनेचा लाभ देण्यात आलेला नव्हता. तथापी सदर ०५ कर्मचा-यांपैकी एकूण-०३ कर्मचा-यांचे अहवाल नियमानुसार पुर्ण झाल्याने व सदर योजनेचा लाभ देण्यासाठी ते पात्र ठरल्याने त्यांना जा.नं.एसएसएस/वशी-०१/२४७१/२०१३ दि.०१ नोव्हेंबर २०१३ व जा.नं.एसएसएस/वशी-१/२८९२/२०१३ दि. २९ नोव्हेंबर २०१३ अन्वये मंजूर करण्यात आलेली आहे.

उपरोक्त सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजने अंतर्गत दुस-या लाभासाठी -८७ कर्मचारी अपात्र ठरले आहेत. त्यामुळे त्यांना सदर योजनेचा लाभ देण्यात आलेला नाही. सबब सदर कर्मचा-यांनी 'आम्ही सर्व ०१ ते ८७ कर्मचा-यांची सेवा साधारण ३४ ते ३६ वर्षे झालेली आहे. या काळात आमचेकडून कोणतेही गैरवर्तन झालेले नाही. तरीही आम्ही सदरचे लाभापासून वंचीत रहात आहोत. तरी आमचे गोपनीय अहवालाची सरासरी प्रतवारी शिथील करुन सदरचे योजनेचा लाभ आम्हास मिळावा' अशी विनंती केली होती.

उपरोक्त कर्मचा-यामध्ये- ०१ सहाय्यक पुजारी, ८३ वर्ग-०४ कर्मचारी तसेच ०३ सिस्टर इनचार्ज असून त्यांचेबाबत लगतचे ०५ वर्षामध्ये सेवा पुस्तकातील नोंदी तसेच वैयक्तीक धारिण्या पाहील्या असता त्यामध्ये खालील प्रमाणे वर्गवारी करण्यात आली.

| अ.नं. | तपशील | ४२०० किंवा त्यापेक्षा कमी ग्रेड वेतन घेणारे कर्मचारी | ४२०० किंवा त्यापेक्षा जास्त ग्रेड वेतन घेणारे कर्मचारी |
|---|---|---|---|
| ०१ | गैरवर्तन नसलेले कर्मचारी | ४२ | ०१ |
| ०२ | गैरवर्तन रिपोर्ट नुसार ताकीद, सक्त ताकीद अशी किरकोळ स्वरुपाची शिक्षा झालेले कर्मचारी | ०७ | ०२ |
| ०३ | गैरवर्तन रिपोर्ट नुसार विनापरवानगी गैरहजर, दंड, सेवा निलंबन अशा गंभीर स्वरुपाची शिक्षा झालेले कर्मचारी | २५ | ०० |
| ०४ | गोपनीय अहवालानुसार बी- प्रत वारी असलेले कर्मचारी | १० | ०० |

उपरोक्त कर्मचा-यांनी केलेल्या विनंती नुसार सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना दुसरा लाभ लागू करणेकामी गोपनीय अभिलेख्याच्या सरासरी प्रतवारी मध्ये शिथीलता देणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८/१०/२०१३ रोजीच्या सभेमध्ये प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

निर्णय क्र.८४० :- प्रस्तावीत कर्मचा-यांना त्याच्या गोपनीय अहवालाबाबत माहिती देण्यात यावी व त्यानुसार संबंधीत कर्मचा-यांचे लेखी म्हणणे घेण्यात येऊन, त्या-त्या विभागाचे विभाग प्रमुख तसेच, प्रशासकिय अधिकारी /प्र. प्रशासकिय अधिकारी यांचे अभिप्राय घेण्यात यावे व अपात्र कर्मचा-यामधील

योग्य कर्मचा-यांच्या गोपनीय अहवालाचा पुर्नविचार होणेसाठी सदर अभिप्राय मा. व्यवस्थापन समितीचे समोर निर्णयार्थ सादर करण्यात यावे. असे ठरले.

उपरोक्त कर्मचा-यापैकी अ.नं. ०१ व ०२ वरील कर्मचारी (एकूण-५२) यांना त्यांचे गोपनीय अहवाल दाखविण्यात आलेले आहेत. त्यानुसार सदर कर्मचा-यांकडून त्यांचे लेखी म्हणणे घेण्यात आलेले असून संबंधीत विभागाचे अधिक्षक/विभाग प्रमुख यांचेकडून अभिप्राय घेण्यात आलेले आहेत. व सदर अभिप्रायांचे पुर्नविलोकन प्रशासकिय अधिकारी/ प्र. प्रशासकिय अधिकारी यांचे केले असून सोबत **परिशिष्ट** जोडले आहे.

संबंधीत कर्मचा-यांबाबत संबंधीत विभाग प्रमुख यांचे अभिप्राय व पुर्नविलोकन अधिकारी यांचे अभिप्राय विचारात घेऊन संबंधीत कर्मचारी यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना दुसरा लाभ मंजूर करणेबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावा सोबत सादर केलेल्या परिशिष्टामध्ये नमुद केलेले कर्मचारी, सध्या ज्या विभागात काम करत आहेत, त्या विभागाचे अधिक्षक/ विभागप्रमुख व पुर्नविलोकन अधिकारी यांचे अभिप्राय विचारात घेता, खालील ५२ कर्मचाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ त्यांचे नावासमोरील देय तारखेपासून लागु करणेत यावा, असे ठरले.**

(जा.नं.एसएसएस/ वशी-०१/ १७४१/ २०१३, दि.२१.०८.२०१३ रोजीचे आदेशान्वये सहाय्यक पुजारी व वर्ग-०४ या पदाच्या कर्मचाऱ्यांना पुर्ण ग्रेड वेतन देण्यात आलेले आहे. तो खालील तक्त्यामध्ये नमुद केलेला आहे.)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **ASSTT.POOJARI<br>PAY BAND 4440-7440 + GRADE PAY 1600<br>PAY BAND 5200-20200 + GRADE PAY 1900** | | | | |
| **Sr. No.** | **NAME AND DESIGNATION, DEPT.** | **DATE OF 1ST. JOINDING** | **TIME BOND PROMOTION (1ST)** | **TIME BOND PROMOTION (2nd)** |
| 1 | SHRI.KULKARNI VINAYAK KESHAV | 20/03/1978 | 1-10-1994 | 01/10/2006 |
| **ATTENDANT<br>PAY BAND 4440-7440 + GRADE PAY - 1600<br>HIGHER PAY BAND 5200-20200 + GRADE PAY-1600+300** | | | | |
| 2 | SHRI. TURAKANE SURESH KASHINATH<br>SANITATION DEPARTMENT | 01/08/1977 | 01/10/1994 | 01/10/2006 |
| 3 | SHRI. SUPEKAR ARJUN NIVRUTTI<br>PRASADALAYA DEPARTMENT | 01/08/1977 | 01/10/1994 | 01/10/2006 |
| 4 | SHRI. PAWAR GORAKH MARUTI<br>PRASADALAYA DEPARTMENT | 01/09/1979 | 01/10/1994 | 01/10/2006 |
| 5 | SHRI.SAYYAD AHMED BABULAL<br>PRASADALAYA DEPARTMENT | 01/01/1982 | 01/10/1994 | 01/10/2006 |
| 6 | SHRI. SUPEKAR ASHOK RAGHUNATH<br>SHRI SAIBABA BHAKTANIWASTHAN DEPT. | 01/01/1982 | 01/10/1994 | 01/10/2006 |
| 7 | SHRI. JADHAV SHIVAJI PANDURANG<br>PRASADALAYA DEPARTMENT | 01/01/1982 | 01/10/1994 | 01/10/2006 |
| 8 | SHRI.GUNJAL BABAN DHONDIBA<br>SAIPRASAD NIWASSTHAN | 16/03/1982 | 01/10/1994 | 01/10/2006 |
| 9 | SHRI. SHELKE BALASAHEB GANGADHAR<br>SAIPRASAD NIWASSTHAN | 16/03/1982 | 01/10/1994 | 01/10/2006 |
| 10 | SHRI. KORATE SHARAD KASHINATH<br>SHRI SAIBABA BHAKTANIWASTHAN DEPT. | 16/03/1982 | 01/10/1994 | 01/10/2006 |
| 11 | SHRI. THORE BABAN PATILBA<br>TEMPLE DEPARTMENT | 16/03/1982 | 01/10/1994 | 01/10/2006 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 12 | SHRI. MAHANKALE VITTHAL KASHINATH SHRI SAIBABA BHAKTANIWASTHAN DEPT. | 16/03/1982 | 01/10/1994 | 01/10/2006 |
| 13 | SHRI. GONDKAR RAGHUNATH KARBHARI PRASADALAYA DEPARTMENT | 16/03/1982 | 01/10/1994 | 01/10/2006 |
| 14 | SHRI. SHEJWAL BALU BAJIRAO SHRI SAIBABA BHAKTANIWASTHAN DEPT. | 16/03/1982 | 01/10/1994 | 01/10/2006 |
| 15 | SHRI. JADHAV BABAN BHANUDAS SAIPRASAD NIWASSTHAN | 16/03/1982 | 01/10/1994 | 01/10/2006 |
| 16 | SHRI. KOTE RAJARAM MARUTI SECURITY DEPARTMENT | 16/03/1982 | 01/10/1994 | 01/10/2006 |
| 17 | SHRI. WANI MACHINDRA KARBHARI SHRI SAIBABA BHAKTANIWASTHAN DEPT. | 16/03/1982 | 01/10/1994 | 01/10/2006 |
| 18 | SHRI.DAREKAR BHAUSAHEB NANA SECURITY DEPARTMENT | 16/03/1982 | 01/10/1994 | 01/10/2006 |
| 19 | SHRI. KOTE JAGANNATH PUNJA TEMPLE DEPARTMENT | 16/03/1982 | 01/10/1994 | 01/10/2006 |
| 20 | SHRI. SALVE KUNDLIK BABURAO SANITATION DEPARTMENT | 01/04/1982 | 01/10/1994 | 01/10/2006 |
| 21 | SHRI. JADHAV SAVALERAM SHIVRAM WATER SUPPLY DEPARTMENT | 01/04/1982 | 01/10/1994 | 01/10/2006 |
| 22 | SHRI. THORAT DASHARATH JAGANNATH PRASADALAYA DEPARTMENT | 01/09/1982 | 01/10/1994 | 01/10/2006 |
| 23 | SHRI. JONDHALE DNYANESHWAR BABURAO PRASADALAYA DEPARTMENT | 06/10/1983 | 06/10/1995 | 06/10/2007 |
| 24 | SHRI. SALPURE GORAKSHNATH RANGNATH SAIBABA BHAKTANIWASSTHAN | 06/10/1983 | 06/10/1995 | 06/10/2007 |
| 25 | SHRI. MAHANKALE JIJABA KASHINATH TEMPLE DEPARTMENT | 06/10/1983 | 06/10/1995 | 06/10/2007 |
| 26 | SHRI. BANKAR CHANDRABHAN FAKKAD SECURITY DEPARTMENT | 06/10/1983 | 06/10/1995 | 06/10/2007 |
| 27 | SHRI.ARANE DADA BHIMAJI PRASADALAYA DEPARTMENT | 06/10/1983 | 06/10/1995 | 06/10/2007 |
| 28 | SMT. KULKARNI DEEPALI DIGAMBAR PRASADALAYA DEPARTMENT | 06/10/1983 | 06/10/1995 | 06/10/2007 |
| 29 | SHRI. KALE BHAUSAHEB GANGADHAR SHRI SAIBABA BHAKTANIWASTHAN DEPT. | 06/10/1983 | 06/10/1995 | 06/10/2007 |
| 30 | SHRI. DANGE KISAN MARUTI SECURITY DEPARTMENT | 07/08/1984 | 07/08/1996 | 07/08/2008 |
| 31 | SHRI. KOTE BHAUSAHEB MURALIDHAR CANTEEN DEPARTMENT | 07/08/1984 | 07/08/1996 | 07/08/2008 |
| 32 | SHRI.KANASE MADHAV NIVRUTTI PRASADALAYA DEPARTMENT | 07/08/1984 | 07/08/1996 | 07/08/2008 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 33 | SHRI. DHANAWATE BHIMRAO MALIRAM<br>TEMPLE DEPARTMENT | 07/08/1984 | 07/08/1996 | 07/08/2008 |
| 34 | SHRI. KOTE BABASAHEB MURALIDHAR<br>SECURITY DEPARTMENT | 07/08/1984 | 07/08/1996 | 07/08/2008 |
| 35 | SHRI. GAIKWAD RAOSAHEB DAMU<br>SAIPRASAD NIWASSTHAN | 07/08/1984 | 07/08/1996 | 07/08/2008 |
| 36 | SHRI. BANKAR HARIBHAU GANGADHAR<br>SECURITY DEPARTMENT | 07/08/1984 | 07/08/1996 | 07/08/2008 |
| 37 | SHRI. SHINDE BHASKAR NAMDEO<br>ENGLISH MEDIUM SCHOOL DEPARTMENT | 07/08/1984 | 07/08/1996 | 07/08/2008 |
| 38 | SHRI. BANKAR ASHOK ANAJI<br>SECURITY DEPARTMENT | 07/08/1984 | 07/08/1996 | 07/08/2008 |
| 39 | SHRI. WANI SAHEBRAO EKNATH<br>PRASADALAYA DEPARTMENT | 07/08/1984 | 07/08/1996 | 07/08/2008 |
| 40 | SMT.BACHHE VIMAL RATAN<br>SHRI SAIBABA HOSPITAL DEPARTMENT | 11/08/1984 | 11/08/1996 | 11/08/2008 |
| 41 | SHRI. VAIDYA SITARAM BAPU<br>SHRI SAIBABA BHAKTANIWASTHAN DEPT. | 01/09/1984 | 01/09/1996 | 01/09/2008 |
| 42 | SHRI. SHINDE MACHINDRA GANGADHAR<br>CANTEEN DEPARTMENT | 01/09/1984 | 01/09/1996 | 01/09/2008 |
| | **SISTER INCHARGE<br>PAYBAND 9300 - 34800 + GRADE PAY 4300<br>PAYBAND 9300 - 34800 + GRADE PAY 4400** | | | |
| 43 | MRS. MASIH NILIMA MOHOMAD ANEES<br>SHRI SAINATH HOSPITAL DEPARTMENT | 05/03/1986 | 16/01/2000 SISTER INCHARGE | 05/03/2010 |
| | **ATTENDANT<br>PAY BAND 4440-7440 + GRADE PAY - 1600<br>HIGHER PAY BAND 5200-20200 + GRADE PAY-1600 + 300** | | | |
| 44 | SHRI. MUPIDWAR SAYALU RAMANNA<br>PRASADALAYA DEPARTMENT | 01/01/1982 | 01/10/1994 | 01/10/2006 |
| 45 | SHRI. WANI SARANGDHAR HARIBHAU<br>TEMPLE DEPARTMENT | 01/01/1982 | 01/10/1994 | 01/10/2006 |
| 46 | SMT. TARABAI EKNATH FUNDE<br>SECURITY DEPARTMENT | 16/03/1982 | 01/10/1994 | 01/10/2006 |
| 47 | SHRI. SALVE SURESH BAPURAO<br>TEMPLE DEPARTMENT | 16/03/1982 | 01/10/1994 | 01/10/2006 |
| 48 | SHRI. GAVHANE LAXMAN SHRIPAT<br>SHRI SAINATH HOSPITAL | 26/05/1982 | 01/10/1994 | 01/10/2006 |
| 49 | SHRI. FUNDE MARUTI EKNATH<br>CANTEEN DEPARTMENT | 06/10/1983 | 06/10/1995 | 06/10/2007 |
| 50 | SHRI. THORAT TRIMBAK MARUTI<br>TEMPLE DEPARTMENT | 07/08/1984 | 07/08/1996 | 07/08/2008 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | **SISTER INCHARGE<br>PAYBAND 9300 - 34800 + GRADE PAY 4300<br>PAYBAND 9300 - 34800 + GRADE PAY 4400** | | | |
| 51 | MRS.AMOLIK LUSIYA SHYAM<br>SHRI SAINATH HOSPITAL DEPARTMENT | 02/09/1986 | 16/01/2000<br>SISTER INCHARGE | 02/09/2010 |
| 52 | MRS. JOSHI SUJATA NANDKUMAR<br>SHRI SAINATH HOSPITAL DEPARTMENT | 12/10/1986 | 16/01/2000<br>SISTER INCHARGE | 01/10/2010 |

**उपरोक्त पात्र कर्मचाऱ्यांपैकी अ.नं.०१ चे श्री.कुलकर्णी विनायक केशव, सहाय्यक पुजारी, मंदिर विभाग यांना सदरचा दुसरा लाभ मंजूर झालेनंतर, पदोन्नतीची संधी नसल्याने, त्यांना मंजूर केलेल्या ५२००-२०२०० या वेतन बॅण्डमध्ये ग्रेड पे रु.१९०० + अतिरिक्त ग्रेड पे रु.३०० मात्र देणेत यावा.**

**याचप्रमाणे मा.त्रिसदस्यीय समितीच्या दि.२६.०२.२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१४७ अन्वये श्री.खोत सतिष रामचंद्र, सहाय्यक पुजारी, मंदिर विभाग यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ मंजूर झालेला आहे. श्री.खोत यांनाही पदोन्नतीची संधी नसल्याने, मंजूर केलेल्या ५२००-२०२०० या वेतन बॅण्डमध्ये ग्रेड पे रु.१९०० + अतिरिक्त ग्रेड पे रु.३०० मात्र त्यांचे मंजूर देय तारखेपासून आदा करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.६८** **श्री.चंद्रकांत जयवंत रणशुर, कंत्राटी सल्लागार, बांधकाम विभाग यांचे मुदत वाढीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री चंद्रकांत जयवंत रणशूर, कंत्राटी सल्लागार, बांधकाम विभाग यांनी दि.१७/१२/२०१३ चे अर्जाने खालीलप्रमाणे विनंती केलेली आहे.

" मला जा.नं.एसएसएस वशी ०१/४८१०/२०१३ दि.०९/०३/२०१३ अन्वये दि.०१/०३/२०१३ पासून बांधकाम विभागाकडील भू-संपादन कक्षाकडे कंत्राटी सल्लागार म्हणून एक वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ मिळालेली आहे. मी सध्या भू संपादनकक्ष, बांधकाम विभागाकडे काम करीत आहे. मला दरमहा रु.१५०००/- मात्र मानधन मिळत आहे. माझी प्रकृती चांगली असून मी इमाने इतबारे काम करीत आहे. सध्या मी बांधकाम विभागाकडील भूसंपादन कक्षाकडे जमीन खरेदी, बिनशेती प्रकरणे, मा.जिल्हाधिकारी, अ.नगर यांचेकडे सादर करण्यात आलेल्या भूसंपादन प्रस्तावांबाबत कार्यवाही आदी कामे करीत आहे. मी संस्थान अधिकाऱ्यांबरोबर मा.तहसिल कार्यालय, राहाता, मा.उपविभागीय कार्यालय, श्रीरामपूर-संगमनेर, विभागीय आयूक्त नाशिक तसेच मा.न्यायालयीन कामकाजासाठी कोपरगांव, अ.नगर, औ.बाद येथे हजर राहून सहाय्य केलेले आहे. तसेच विविध शासन निर्णय, परिपत्रके यांच्या नकला आणणेकामी कार्यवाही केलेली आहे. सध्या माझेकडे जे कामे आहेत ती चांगल्या रितीने पूर्ण करुन मा.वरिष्ठ अधिकाऱ्यांना संतूष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे / करीत आहे. कृपया उपरोक्त नमूद केलेल्या बाबींचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन तसेच माझे कामाचे मूल्यमापन करुन मला कंत्राटी सल्लागार म्हणून किमान एक वर्ष मूदतवाढ मिळावी व मला रु.२०,०००/- मात्र दरमहा मानधन मिळावे."

सदर अर्जावर वरिष्ठ मुख्य अभियंता बांधकाम विभाग यांनी "श्री रणशूर यांनी अर्जात नमूद केलेप्रमाणे मा.व्य.स.मान्यतेने कामाच्या संलग्नतेच्या दृष्टीने त्यांना किमान एक वर्ष मूदतवाढ देणेस व त्यांचे मानधनात उचित वाढ करणेबाबतच्या त्यांचे विनंती अर्जाचा सहानुभूतीपूर्वक विचार होणेस विनंती." असे अभिप्राय दिलेले आहे.

श्री. रणशूर यांना मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार वेळोवेळी मुदतवाढ व मानधनात वाढ करण्यात आलेली आहे. त्यांना जा.नं.एसएसएस वशी ०१/४८१०/२०१३ दि.०९/०३/२०१३ अन्वये दि.०१/०३/२०१३ पासून एक वर्ष कालावधीसाठी मूदतवाढ व दरमहा रु.११,०००/- ऐवजी रु.१५,००० /- मानधनात वाढ करण्यात आलेली आहे. त्यांना देण्यात आलेल्या कंत्राटी पध्दतीच्या मुदतवाढीचा कालावधी दि.२८/०२/२०१४ रोजी संपुष्ठात येत आहे.

श्री. रणशूर यांचे आज मितीस वय ७२ वर्षे ०३ महिने असे आहे.

श्री. रणशूर यांची उपरोक्त अर्जातील विनंती व वरिष्ठ मुख्य अभियंता बांधकाम विभाग यांचे अभिप्राय विचारात घेता त्यांना मुदतवाढ व मानधनात वाढ देणेबाबतच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, भू-संपादन कक्षाकडील कामाचा आवाका पहाता व वरीष्ठ मुख्य अभियंता, बांधकाम विभाग यांचे अभिप्राय विचारात घेता, श्री.चंद्रकांत जयवंत रणशुर, कंत्राटी सल्लागार, बांधकाम विभाग यांना रु.१५,०००/- मात्र एकत्रित मानधनावर पुर्वीच्याच अटी/ शर्तीवर दि.०१.०३.२०१४ पासून पुढे एक वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.६९ मयत अनुकंपा तत्वावर कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने संस्थानमध्ये नोकरी मिळणेबाबत श्री. प्रविण भगवान पाईक यांचा अर्ज.**

**प्रस्ताव-** श्री.प्रविण भगवान पाईक, रा.शिर्डी यांनी त्यांचे वडील कै.भगवान दिनकर पाईक यांचे संस्थान सेवेत असतांना निधन झालेने अनुकंपा तत्वावर कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने नोकरी मिळणेबाबत दि.२३/१०/२०१३ रोजी अर्ज सादर केलेला आहे. अर्जाचा सुधारीत विहीत नमुना तयार करण्यात आलेला आहे, त्यास अनुसरुन अर्जदाराने अर्ज सादर केला आहे. सदर अर्जासोबत त्यांनी खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर केलेली आहेत.

१) दिवंगत भगवान दिनकर पाईक यांचे मृत्यू प्रमाणपत्र

२) श्री प्रविण भगवान पाईक यांचा श्री साईनाथ माध्यमिक विद्यालय, शिर्डी यांचेकडील शाळा सोडल्याच्या दाखल्यानुसार त्यांची जन्मतारीख १३/०६/१९९६ अशी असल्याने त्यांचे आजमितीस वय १८ वर्ष ०४ म. आहे.

३) श्री प्रविण पाईक यास कामावर घेणेबाबत श्रीमती हिराबाई पाईक व संदिप पाईक यांनी सादर केलेले मा.तहसिलदार, राहाता यांचेकडील दि.२०/०६/२०१३ चे प्रतिज्ञापत्र

४) दिवंगत भगवान पाईक यांच्या शिधापत्रिकेवरील श्री प्रविण भगवान पाईक यांचे नांवाची नोंद.

५) श्री प्रविण भगवान पाईक यांचा मोठा भाऊ नामे श्री संदिप भगवान पाईक हे विभक्त असलेबाबत स्वतंत्र रेशन कार्डची झेरॉक्स प्रत

६) श्री संदिप पाईक यांनी विभक्त राहत असलेबाबत मा.तहसिलदार, राहाता यांचेकडील सादर केलेले दि.२३/१०/२०१३ चे प्रतिज्ञापत्र तसेच घरभाडे पावती.

भगवान दिनकर पाईक हे संस्थानचे प्रसादालय विभागाकडे वर्ग ४ कर्मचारी या पदावर सेवेत होते. त्यांचे **दि.१२/०३/२०१३** रोजी निधन झालेले असून त्यांच्या झालेल्या सेवेबाबतची माहिती खालील प्रमाणे

| | |
|---|---|
| ०१) दिवंगत कर्मचाऱ्यांचे नांव | :- भगवान दिनकर पाईक |
| ०२) मृत्युचे वेळी हुद्या व विभाग | :- वर्ग ४ कर्मचारी, प्रसादालय |
| ०३) संस्थानमधील सेवेचा कालावधी | :- दि. ०६/०३/१९८९ ते दि.११/०३/२०१३ एकूण सेवा २३ वर्षे |
| ०४) मृत्यु दिनांक | :- १२/०३/२०१३ |

अनुकंपा तत्वावर नेमणूक देतांना मयत कर्मचाऱ्याचे पत्नीचे वय ४५ वर्ष असल्यास त्यांना प्राधान्याने नोकरीवर घेतले जाते. या करीता कर्मचाऱ्याने त्याच्या हयातीत करुन दिलेले विहीत नमून्यातील नॉमिनेशन (Form 'F' See Sub - Rule (१) of Rule ६ - " Nomination made herein invalidates my previous nomination.") फॉर्ममध्ये संबंधीत व्यक्तीचे नांव असलेबाबत व त्याबाबत खातरजमा करुन अशा नेमणूका दिल्या जातात.

दिवंगत पाईक हे हयात असतांना त्यांची ग्रॅच्यूएटी ॲक्ट १९७२ चे नियम नं.६ (१) नुसारचे नॉमीनेशन पत्रात श्रीमती हिराबाई भगवान पाईक (दिवंगत पाईक यांनी पत्नी) व श्री ज्ञानेश्वर भगवान पाईक (दिवंगत पाईक यांचा मोठा मुलगा) यांची (Nominees) वारसदार म्हणून नेमणूक केलेली आहे.

श्रीमती हिराबाई भगवान पाईक (वय-४५) व श्री संदिप (ज्ञानेश्वर) भगवान पाईक (वय-२५) यांनी माझा मुलगा / लहान भाऊ श्री प्रविण भगवान पाईक यांस वडीलांचे जागी अनुकंपा तत्वावर नोकरी घेणेकामी आमची कोणतीही हरकत राहणार नाही असे आशयाचे मा.तहसिलदार, राहाता यांचेकडील दि.२०/०६/२०१३ चे प्रतिज्ञापत्र सादर केले आहे.

महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१०००-प्र.क्र.२०/२०००,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२८/०३/२००१ व महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अकंपा-१००४-प्र.क्र.५१/२००४,आठ मंत्रालय मुंबई ३२ दि.२२/०८/२००५ सुधारीत शासन निर्णय २ (२) नुसार शासकीय सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकांस अनुकंपा कारणास्तव शासकीय सेवेत घेण्याची तरतूद आहे. त्यास अनुसरुन संस्थान सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकास मानवतेच्या दृष्टीकोणातून यापुर्वी अनुकंपाकारणास्तव संस्थान सेवेत घेण्यात आलेले आहे.

दिवंगत भगवान पाईक यांचा मोठा मुलगा नामे श्री संदिप भगवान पाईक हे लेबर कॉन्ट्रॅक्टर यांचेमार्फत सन २००६ पासून कामास आहे. तथापी ते आई वडीलांतून विभक्त असून वेगळे राहत आहेत व त्यांची शिधापत्रिका वेगळी आहे. याबाबत श्री संदिप पाईक यांची शिधा प्रत्रिका सोबत सादर केली आहे, तसेच मा.तहसिलदार यांचेकडील विभक्त राहत असलेबाबत प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे.

शासन निर्णय क्र.सासंवि-२००९/४३३/(३७/०९) का.सोळा मुंबई-३२ दि.०७/०८/२००९ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीचे कर्मचारी आकृतीबंधास मान्यता मिळाली आहे. त्यात वर्ग ४ च्या कर्मचाऱ्यांची **१२३९** स्थायी पदे मंजूर आहेत. सद्य स्थितीनुसार वर्ग ४ चे पदावर **१२८०** इतके कर्मचारी भरलेले आहेत. त्यानुसार सध्या वर्ग ४ चे **४१** कर्मचारी अतिरिक्त आहेत.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९/११/२०११ चे सभेतील निर्णय क्र.७६५ खालीलप्रमाणे झालेला आहे.

"सध्या संस्थान आस्थापनेवर वर्ग ४ ची पदे रिक्त नाहीत. त्यामुळे संस्थान सेवेत असतांना मयत झालेल्या कर्मचाऱ्यांचे नातेवाईकांना तूर्त लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत संस्थानमध्ये कामास घेण्यात यावे व त्यांना कॉन्ट्रॅक्टरमार्फत किमान वेतनाप्रमाणे वेतन देण्यात यावे."

उपरोक्त निर्णयानुसार यापूर्वीच्या अर्जदारांना लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत प्रसादालय विभागाकडे कंत्राटी पध्दतीने कामावर घेण्यात आलेले आहे.

दिवंगत पाईक यांचा मोठा मुलगा नामे श्री संदिप भगवान पाईक हे संस्थानकडे कंत्राटदारामार्फत आरोग्य विभागाकडे अकुशल कामगार म्हणून कामास आहे तथापी ते विभक्त राहत असलेबाबत मा.तहसिलदार यांचेकडील प्रतिज्ञापत्र तसेच शिधापत्रिका सोबत सादर केलेली आहे.

उपरोक्त परिस्थिती विचारात घेता श्री संदिप भगवान पाईक यांना लेबर कॉन्ट्रॅक्टर यांचेमार्फत अकुशल कामगार म्हणून प्रसादालय विभागाकडे कामावर घेणेबाबतच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.६८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शासन निर्णय व दिवंगत भगवान दिनकर पाईक यांचा मुलगा नामे श्री.प्रविण भगवान पाईक यांचा लेखी अर्ज विचारात घेता, दिवंगत भगवान दिनकर पाईक यांचे जागेवर त्यांचा मुलगा नामे श्री.प्रविण भगवान पाईक यांना सध्या संस्थानचे लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत कंत्राटी पध्दतीने, किमान वेतन देणेत येवून, जागा उपलब्ध असल्यास कामावर घेणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक, सामान्य प्रशासन/ कामगार अधिकारी)

---

**विषय नं.७०** **प्रशासकीय अधिकारी पदाचे अतिरिक्त कार्यभाराबाबत.**

**विषय नं.७१** **प्रशासकीय अधिकारी "अतिरिक्त कार्यभाराबाबत" श्री.एस.व्ही.गमे, श्री.एस.एन.गर्कल, श्री.यु.पी.गोंदकर व श्री.डी.टी. उगले प्र.प्रशासकीय अधिकारी यांचे पत्र व त्यांचेकडून प्राप्त झालेल्या उल्लेखनिय अशा महत्वपुर्ण केलेल्या कामाचा अहवाल (Self Assesment Report) बाबत.**

**निर्णय क्र.६९** **विषय नं.७० व ७१ वरील चर्चा पुढे ढकलणेत आली.** (कार्यवाही-अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.७२** **जनसंपर्क अधिकारी या पदाचे ग्रेड वेतन बदलाबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** श्री.मोहन जगन्नाथ यादव यांनी दि.०५/१२/२०१३ चे अर्जान्वये खालीलप्रमाणे विनंती केलेली आहे. सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रकान्वये श्री साईबाबा संस्थानचे आस्थापनेवरील विविध संवर्ग, त्यांची शैक्षणिक पात्रता, नियुक्ती, वेतनश्रेणी व पदोन्नती इत्यादीबाबत छाननी करुन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती व पदोन्नतीच्या विनियमांचे प्रारुप पदांच्या तपशिलांच्या परिशिष्टांसह शासनास तातडीने सादर करणेबाबत कळविण्यात आलेले आहे.

सदर परिपत्रकान्वये मी मोहन जगन्नाथ यादव, जनसंपर्क अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) कळवू ईच्छितो की, जनसंपर्क अधिकारी या पदासाठी आवश्यक असलेल्या सर्व शैक्षणिक अर्हता माझ्याकडे आहे. त्यानुसारच मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयाने व राज्यशासनाचे मान्यतेने माझी या पदावर निवड झालेली आहे. मला संस्थानचे स्टापींग पॅटर्ननुसार शासनाचे वेतनबँड ९३००-३४८०० मिळत असून यासाठी ग्रेड वेतन रुपये ४४००/- इतके आहे. परंतु शासन अधिसुचना क्रमांक:वेपूर-१२१२/प्र.क्र.३८/सुधारणा-६३/सेवा-९ मंत्रालय, मुंबई-३२ दिनांक २१.१०.२०१३ अन्वये जनसंपर्क अधिकारी या पदासाठी सुधारीत वेतनसंरचनेप्रमाणे वेतनबँड ९३००-३४८०० असून ग्रेड वेतन रुपये ५०००/- असल्याचे नमुद केलेले आहे.

तसेच श्री साईबाबा संस्थानने विविध पदांवर नियुक्त केलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना शासनाच्या वेतनबँडप्रमाणे वेतन दिले जाते. तरी मला जनसंपर्क अधिकारी या पदासाठी शासनाच्या सुधारीत वेतनसंरचनेप्रमाणे ग्रेड वेतन मिळावे, ही विनंती.

**(ब)** महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्र.: सासंवि २००६/६६५/(१०१)/का.सोळा मंत्रालय, मुंबई-३२ दि.०७ डिसेंबर २००६ व मा.व्यवस्थापन समिती दि.१८/०९/२००५ चे सभेतील निर्णय क्र.४७७ नुसार श्री.मोहन जगन्नाथ यादव यांची जनसंपर्क अधिकारी या पदावर दि.१०/०७/२००५ पासून पाचव्या वेतन आयोगानुसार रु.६५००-२००-१०५०० मध्ये नेमणूक करण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयात खालीलप्रमाणे नमूद करण्यात आलेले आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या न्यासाच्या आस्थापनेवर कार्यरत असलेल्या श्री.मोहन यादव यांच्या जनसंपर्क अधिकारी या पदावरील दि.१०/०७/२००५ पासूनच्या नियुक्तीस तसेच सदर पदास रु.६५००-२००-१०५०० ही वेतनश्रेणी लागू करण्यास श्री.मोहन यादव यांच्या सेवानिवृत्तीच्या दिनांकापर्यंत पुढील अटींच्या अधीन राहून शासन मंजूर देण्यात येत आहे.

अ) सदर बाब अन्य कोणत्याही प्रकरणी पूर्वोदाहरण म्हणून दर्शविण्यात येवू नये.

ब) सदर वेतनश्रेणीचा लाभ श्री.यादव यांना देण्यात आल्यानंतर त्यांना त्यांच्या सदर पदावरील पूर्ण सेवा कालावधीत पुन्हा सुधारीत वेतनश्रेणी मागता येणार नाही.

क) सदर वेतनश्रेणी देण्यात आल्याने श्री.यादव यांच्या दर्जात कोणताही फरक पडणार नाही.

ड) उपरोक्त सुधारीत वेतनश्रेणी श्री.यादव यांना, त्यांच्या सदर पदावरील नियुक्तीच्या दिनांकापासून म्हणजेच दिनांक १०/७/२००५ पासून लागू करण्यात यावी.

**(क)** जनसंपर्क विभागाकडील दि.२०/१२/२०१३ रोजीचे टिपणीत प्रामुख्याने श्री.यादव यांनी मागील तीन वर्षात केलेल्या महत्वपुर्ण कामांचा गोषवारा नमुद करुन जनसंपर्क अधिकारी या पदासाठी महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन अधिसूचना क्रमांक : वेपूर-१२१२/प्र.क्र.३८/सुधारणा-६३/सेवा-९ मंत्रालय, मुंबई-३२ दि.२१ ऑक्टोबर, २०१३ नुसार सुधारीत वेतनसंरचनेप्रमाणे ग्रेड वेतन मिळणेकरीता प्रस्ताव मा.त्रिसदस्य समितीच्या सभेत ठेवण्यात यावा. मा.त्रिसदस्य समितीच्या मान्यतेअंती सदर वेतनश्रेणी बदलाचा प्रस्ताव राज्यशासनाकडे पाठविण्यात यावा असे नमुद करण्यात आलेले आहे. त्यावर मा.उपकार्यकारी व कार्यकारी अधिकारी यांनी सदरचा प्रस्ताव मा.त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सादर करणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

**(ड)** (१) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या आस्थापनेवरील पदांचे आकृतीबंधाबाबतचा महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग शासन निर्णय क्र.सासंवि-०९/४३३/(३७/०९) का.सोळा, मंत्रालय मुंबई-३२ दि.७/८/२००९ मध्ये खालीलप्रमाणे अटी-शर्ती नमुद करण्यात आलेल्या आहेत.

**७) समितीला कोणत्याही पदाचे पदनाम अथवा वेतनश्रेणी शासनाच्या पुर्व मान्यतेशिवाय बदलता येणार नाही.**

(२) महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्र.: सासंवि २००६/६६५/(१०१)/का.सोळा मंत्रालय, मुंबई-३२ दि.०७ डिसेंबर २००६ चे शासन निर्णयात खालीलप्रमाणे नमुद करण्यात आलेले आहे.

श्री.मोहन यादव यांना जनसंपर्क अधिकारी या पदावरील दि.१०/७/२००५ पासूनच्या नियुक्तीस तसेच सदर पदास रु.६५००-२००-१०५०० ही वेतनश्रेणी त्यांच्या सेवानिवृत्तीच्या दिनांकापर्यंत लागू करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर शासन निर्णयात प्रामुख्याने ब) सदर वेतनश्रेणीचा लाभ श्री.यादव यांना देण्यात आल्यानंतर त्यांना त्यांच्या सदर पदावरील पूर्ण सेवा कालावधीत पुन्हा सुधारीत वेतनश्रेणी मागता येणार नाही. असे नमूद करण्यात आलेले आहे.

श्री.मोहन जगन्नाथ यादव यांना (पाचव्या वेतन आयोगानुसार रु.६५००-२००-१०५००) सध्या सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनबँड ९३००-३४८०० अधिक ग्रेड पे रु.४४००/- प्रमाणे वेतन अदा करण्यात येत आहे.

वरीलप्रमाणे "**ड**" मधील १ व २ चे शासन निर्णयातील अटी-शर्ती विचारात घेता श्री.मोहन जगनन्नाथ यादव यांचे जनसंपर्क अधिकारी या पदाचे ग्रेड वेतनात महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन अधिसूचना क्रमांकः वेपूर-१२१२/प्र.क्र.३८/सुधारणा-६३/सेवा-९ मंत्रालय, मुंबई-३२ दि.२१ ऑक्टोबर, २०१३ नुसार ग्रेड वेतन रु.४४००/- ऐवजी रु.५०००/- प्रमाणे बदल करणेकामी सदरचा प्रस्ताव मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे मान्यतेसाठी सादर करणेबाबतचे विषयावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या परिच्छेद "ड" मधील १ व २ चे शासन निर्णयातील अटी-शर्ती विचारात घेता, श्री.मोहन जगन्नाथ यादव यांचे जनसंपर्क अधिकारी या पदाचे ग्रेड वेतनात महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन अधिसूचना क्रमांकः वेपूर-१२१२/ प्र.क्र.३८/ सुधारणा-६३/सेवा-९ मंत्रालय, मुंबई-३२ दि.२१ ऑक्टोबर, २०१३ नुसार ९३००-३४८०० या वेतन बँडमधील ग्रेड वेतन रु.४४००/- ऐवजी रु.५०००/- प्रमाणे बदल करणेकामी सदरचा प्रस्ताव मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे मान्यतेसाठी सादर करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.७३** **मंजुर आकृतीबंधानुसार उप कार्यकारी अभियंता (विद्युत) या पदासाठीचा वेतनबँड १५६००-३९१०० अधिक ग्रेड वेतन ५४०० मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अ)** श्री.विजय गणपत रोहमारे, उप कार्यकारी अभियंता (विद्युत विभाग) यांनी दि.१२/१२/२०१३ रोजीचे अर्जात खालीलप्रमाणे नमुद केलेले आहे.

मी दि.०१/०६/१९८६ पासून संस्थानमध्ये विद्युत विभाग प्रमुख/विद्युत अभियंता म्हणून काम करीत होतो. जा.नं.एसएसएस/वशी-०१/३१९/२०१३ दि.२६/०४/२०१३ रोजीचा आदेश व महाराष्ट्र शासन निर्णय क्र.सासंवि-२००९/४३३/(३७/०९) का.सोळा, मंत्रालय मुंबई-३२ दि.०७/०८/२००९ अन्वये माझे पदनाम विद्युत विभाग प्रमुख/विद्युत अभियंता या ऐवजी उप कार्यकारी अभियंता (विद्युत) हे करण्यात

आले आहे. सध्या माझी वेतनश्रेणी ९३००-३४८०० अधिक ग्रेड पे ४५०० ही आहे. गेल्या २७ वर्षात एकदाच १२ वर्षाची कालबध्द पदोन्नतीची वेतनश्रेणी मिळालेली आहे. व वेतन आयोगानुसार माझे वेतनश्रेणीत बदल झालेले आहेत. हे वगळता मी गेल्या २७ वर्षापासून आहे त्याच ठराविक वेतनश्रेणीत काम करीत आहे.

महाराष्ट्र शासनाने दि.०७/०८/२००९ रोजी स्टाफिंग पॅटर्न मंजुर केलेला आहे. या स्टाफींग पॅटर्नमध्ये उप कार्यकारी अभियंता (विद्युत) व उपकार्यकारी अभियंता (बांधकाम) या पदांकरिता ८०००-१३५०० (सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनबँड १५६००-३९१०० अधिक ग्रेड पे ५४००) ही वेतनश्रेणी आहे.

तरी मला दि.०७/०८/२००९ पासून उपकार्यकारी अभियंता (विद्युत) या पदाचा वेतनबँड १५६००-३९१०० अधिक ग्रेड पे ५४०० ही वेतनश्रेणी मिळावी म्हणून यापुर्वी अर्ज केला होता. महाराष्ट्र शासनाने दि.०७/०८/२००९ रोजी स्टाफिंग पॅटर्न मंजुर केलेला आहे. या स्टाफींग पॅटर्नमध्ये उप कार्यकारी अभियंता (विद्युत) या पदाकरिता पाचव्या वेतन आयोगानुसार ८०००-१३५०० (सहाव्या वेतन आयोगानुसार १५६००-३९१०० ग्रेड पे ५४००) ही वेतनश्रेणी मंजुर झालेली असतांना देखील मला उपकार्यकारी अभियंता (विद्युत) या पदासाठी १५६००-३९१०० ग्रेड पे ५४०० ही वेतनश्रेणी न देता जा.नं.एसएसएस/वशी-०१/३०१९/२०१३ दि.१२/१२/२०१३ नुसार सदर पदासाठी उप अभियंता (विद्युत) या पदाची समकक्ष ९३००-३४८०० अधिक ग्रेड पे ५४०० ही वेतनश्रेणी दर्शविण्यात आलेली आहे. परंतु महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन अधिसूचना क्रमांकः वेपुर-१२०९/प्र.क्र.७८/सेवा-९ मंत्रालय, मुंबई-३२ दि.१२ जून २००९ मध्ये अ.क्र.१८ अन्वये उप अभियंता (विद्युत) या पदाची सुधारीत नोंद करणेत आलेली असुन मला त्यानुसार उपकार्यकारी अभियंता (विद्युत) या पदाची १५६००-३९१०० ग्रेड पे ५४०० ही वेतनश्रेणी मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

**ब) संस्थानचे मंजुर आकृतीबंधानुसार उपकार्यकारी अभियंता (विद्युत) पदाबाबतची तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे:-**

| **Designation पदनाम** | **Pay Scale वेतनश्रेणी** | **Sanction Post मंजुर पदसंख्या** | **Proposed Qualification प्रस्तावीत शैक्षणिक पात्रता** |
|---|---|---|---|
| Dy.Executive Engineer Electrical उप कार्यकारी अभियंता विद्युत | 8000-13500<br><br>6th Pay Band 15600-39100 Grade Pay 5400 | 01 | **By Nomination OR By Promotion :-**<br>1) Degree / Diploma in Electrical Engineering from Government recognized University;<br>2) MS-CIT or Government prescribed equivalant computer operating course;<br>3) Electrical Supervisor License must;<br>4) Knowledge of reading Electrical drawings and Auto CAD;<br>5) Experience minimum 5 years as Assistant Electrical Engineer / Incharge Electrical Department in sansthan. |

संस्थान कर्मचारी आकृतीबंधास मिळालेला महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभागाकडील शासन नर्णय क्रमांकः सासंवि-२००९/४३३/(३७/०९) का.सोळा. मंत्रालय मुंबई-३२. दि.०७/०८/२००९ चे शासन निर्णयानुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे आकृतीबंधास मान्यता मिळालेली आहे. तथापि, सेवाप्रवेश नियम अद्यापपावेतो अंतिम होणे बाकी आहे.

सदर शासन निर्णय व दैनंदिन कार्यालयीन कामाचे सोईच्या दृष्टीने संस्थान आस्थापनेवरील जुन्या पदनामांमध्ये जा.नं.एसएसएस/वशी-०१/३१९/२०१३ दि.२६/०४/२०१३ रोजीचा पदनाम बदलाचा आदेश चे आदेशान्वये बदल करण्यात आलेला आहे. त्यानुसार श्री.विजय गणपत रोहमारे यांचे पुर्वीचे विद्युत अभियंता/ विभाग प्रमुख ऐवजी उपकार्यकारी अभियंता (विद्युत) असा पदनामात बदल करण्यात आलेला आहे.

श्री.विजय गणपत रोहमारे यांनी सन २०१० मध्ये प्रसिध्द झालेल्या सेवाजेष्ठता यादीनुसार DEE, ELECT. SUPERVISOR COURSE, MS-CIT अशी शैक्षणिक पात्रता धारण केलेली असून आज पावेतो त्यांची संस्थानकडे २७ वर्ष सलग सेवा झालेली आहे. थोडक्यात उपरोक्त उपकार्यकारी अभियंता (विद्युत) या पदासाठी आवश्यक प्रस्तावीत शैक्षणिक पात्रता व सेवानिकष श्री.रोहमारे यांनी पुर्ण केलेले आहे.

सध्या श्री.रोहमारे यांना वेतनबँड ९३००-३४८०० अधिक ग्रेड पे ४५०० प्रमाणे वेतन अदा करण्यात येत आहे. संस्थान कर्मचारी आकृतीबंधास मिळालेला महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभागाकडील शासन निर्णय क्रमांकः सासंवि-२००९/४३३/(३७/०९) का.सोळा. मंत्रालय मुंबई-३२.

दि.०७/०८/२००९ चे शासन निर्णयानुसार उप कार्यकारी अभियंता (विद्युत) या पदासाठी पाचव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी ८०००-१३५०० मंजुर करण्यात आलेली आहे.

तसेच महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन अधिसूचना क्रमांक : वेपुर-१२०९/प्र.क्र.७८/सेवा-९ मंत्रालय, मुंबई-३२ दि.१२ जून २००९ चे शासन अधिसूचनेत अ.नं.१८ उप अभियंता (विद्युत) या पदासाठी सुधारित नोंद पाचव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी ८०००-१३५०० (सहाव्या वेतन आयोगानुसार १५६००-३९१०० अधिक ग्रेड पे ५४०० नमूद करण्यात आलेला आहे.

सबब, श्री.रोहमारे यांनी धारण केलेली शैक्षणिक पात्रता, कामाचा अनुभव तसेच मंजुर आकृतीबंधातील उपकार्यकारी अभियंता (विद्युत) या पदाची पाचव्या वेतनआयोगानुसार वेतनश्रेणी ८०००-१३५०० साठी महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन अधिसूचना क्रमांकः वेपुर-१२०९/ प्र.क्र.७८/ सेवा-९ मंत्रालय, मुंबई-३२ दि.१२ जून २००९ शासन अधिसूचनेनुसार समकक्ष सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनबँड १५६००-३९१०० अधिक ग्रेड वेतन ५४०० याप्रमाणे दि.०७/०८/२००९ पासून पुर्वलक्षी प्रभावाने श्री.रोहमारे यांना लागू करणेबाबतच्या विषयावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.विजय गणपत रोहमारे, उप कार्यकारी अभियंता (विद्युत विभाग) यांनी धारण केलेली शैक्षणिक पात्रता, कामाचा अनुभव तसेच मंजुर आकृतीबंधातील उपकार्यकारी अभियंता (विद्युत) या पदाची पाचव्या वेतनआयोगानुसार वेतनश्रेणी ८०००-१३५०० साठी महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन अधिसूचना क्रमांकः वेपुर-१२०९/ प्र.क्र.७८/ सेवा-९ मंत्रालय, मुंबई-३२ दि.१२ जून २००९ शासन अधिसूचनेनुसार समकक्ष सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनबँड १५६००-३९१०० अधिक ग्रेड वेतन ५४०० याप्रमाणे दि.०७/०८/२००९ पासून पुर्वलक्षी प्रभावाने श्री.रोहमारे यांना लागू करणेस मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.७४** **शासन नियमाप्रमाणे मंजूर असलेले वेतन मिळणेबाबत श्री. संपत रेवजी जाधव, पोलिस उपनिरिक्षक प्रतिनियुक्तीने संरक्षण अधिकारी यांचा दि.०८.१०.२०१३ रोजीचा अर्ज.**

**प्रस्ताव-** श्री. संपत रेवजी जाधव, पोलीस उपनिरीक्षक प्रतिनियुक्तीने संरक्षण अधिकारी, संरक्षण विभाग श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांनी शासन नियमाप्रमाणे मंजूर असलेले वेतन मिळणेबाबत दि.०८/१०/२०१३ रोजी अर्ज केला असून त्यात-

"मी श्री. संपत रेवजी जाधव, पोलीस उपनिरीक्षक माझी मा.पो.महा.महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडील आदेश क्र.पोमसं/५/५२८२/प्रतिनियुक्ती /शिर्डी संस्थान -१/दि.१६/०७/२०१३ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी कडे प्रतिनियुक्तीने संरक्षण अधिकारी या पदावर नेमणूक झालेली असून मी दि.१९/०८/२०१३ रोजी हजर झालो आहे.

परंतु मला शासन सेवेत असतांना शासनाने ठरवून दिलेल्या नियमाप्रमाणे वेतन मिळत होते. परंतु संस्थान मध्ये संरक्षण अधिकारी या पदावर नियुक्ती झालेनंतर मला खालील प्रमाणे भत्ता मिळणे आवश्यक असतांना ते मिळालेले नाहीत.

**०१) व्हेकल अलौंन्स (Trans Allow) रु. १५०/- ०२) प्रोत्साहन अलाऊन्स (Fit Allow) रु. २५०/-**
**०३) धुलाई अलौंन्स (W.A) रु. १००/- ०४) आहार अलौंन्स (Ref. Allow) रु. ८४०/-**
**एकूण- रु. १३४०/-**

संरक्षणाची महत्वाची जबाबदारी असून मला शासनाचे मंजूरीने प्रदान (मिळालेले) भत्ते आकारणी होऊन माहे सप्टेंबर-२०१३ चे पुरविणेसह मिळावे. असे नमूद केले आहे.

श्री. किसन दलसिंग राठोड, पोलीस उपनिरीक्षक प्रतिनियुक्तीने संरक्षण अधिकारी यांचे बदली झाल्याने त्यांचे जागी क्र.डी.जी.पी/५/५२८२/डेप्यु/शिरडी संस्थान /२००९ डी.जी.पी. कार्यालय कुलाबा मुंबई यांचेकडील आदेशान्वये श्री. संपत रेवजी जाधव पोलीस उपनिरीक्षक अहमदनगर यांची प्रतिनियुक्तीने संरक्षण अधिकारी या पदावर नेमणूक करण्यात आलेली असून ते दि.१९/०८/२०१३ रोजी कार्यालयीन वेळेपूर्वी संरक्षण अधिकारी या पदावर हजर झाले आहेत.

श्री. साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी कडे प्रतिनियुक्तीने नेमणूक झालेल्या संरक्षण अधिकारी यांना संस्थानकडून खालील प्रमाणे सुविधा पुरविल्या जातात.

०१) शासनाकडून संस्थान कडे प्रतिनियुक्तीने हजर झाल्यानंतर संबंधीत पदाचे वेतन बँड मधील मूळ वेतन + ग्रेड वेतन शासन निर्णयानुसार वेळोवेळी देण्यात आलेला महागाई भत्ता व प्रतिनियुक्ती भत्ता. (दरमहा रु.२०००/- च्या कमाल मर्यादेच्या अधिनतेने मूळ वेतनाच्या १० टक्के )

०२) संस्थान कर्मचा-या प्रमाणे दिपावली सानुग्रह अनुदान (माहे ऑक्टोबर ते माहे सप्टेबर अखेर या कालावधीत मिळालेले पगाराची रक्कम - १२ इतकी रक्कम.

०३) संस्थान निवासस्थान (मासिक भाडे व येणारा विद्युत आकार भरुन)

०४) संस्थान कर्मचा-यांना संस्थान रुग्णालयामार्फत पुरविण्यात येणा-या वैद्यकिय सुविधा व वैद्यकिय बिले, मुलांचा शैक्षणिक फि परतावा.

०५) संस्थान कामकाजाकरीता लॅन्डलाईल फोन, मोबाईल (संस्थान अधिक्षक/विभाग प्रमुख यांचे प्रमाणे)

०६) संस्थान कामकाजाकरीता संस्थानचे वाहन ( मागणीनुसार वाहनचालकासह )

यापूर्वी प्रतिनियुक्तीने संस्थानकडे हजर झालेल्या पोलीस उपनिरीक्षक यांना वरीलप्रमाणे सोयी देण्यात आलेल्या आहेत. श्री जाधव पोलीस उपनिरीक्षक प्रतिनियुक्तीने संरक्षण अधिकारी यांनाही सदरच्या सोयी सुविधा देण्यात आलेल्या आहेत. त्याव्यतिरिक्त त्यांनी उपरोक्त मागणी केलेली आहे. यापूर्वी प्रतिनियुक्तीने आलेल्या पो.उ.नि. (संरक्षण अधिकारी ) यांनी अशा प्रकारची मागणी केलेली नाही.

तरी उपरोक्त प्रमाणे प्रतिनियुक्तीने नेमणूकीस असलेल्या संरक्षण अधिकारी यांना देण्यात येत असलेल्या सोयी सुविधा अ.नं. ०१ ते ०६ व्यतिरिक्त श्री. संपत रेवजी जाधव पोलीस उपनिरीक्षक प्रतिनियुक्तीने संरक्षण अधिकारी यांचे विनंती नुसार आलौंन्सेस द्यावे अगर कसे? याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शासन नियमाप्रमाणे मंजूर असलेले वेतन मिळणेबाबत, श्री. संपत रेवजी जाधव, पोलिस उपनिरिक्षक प्रतिनियुक्तीने संरक्षण अधिकारी यांचा दि.०८.१०.२०१३ रोजीचा अर्ज अमान्य करणेत आला.** (कार्यवाही-अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.७५** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी विनियम व नियमांबाबत.**

**निर्णय क्र.७३** **सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.** (कार्यवाही-अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.७६** **माहिती तंत्रज्ञान विभाग व साईबाबा हॉस्पिटलकडील ईडीपी विभागाचे कामकाजाबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** श्री.राहुल वामन गलांडे, प्र.माहिती तंत्रज्ञान विभाग प्रमुख यांनी दि.०४/१२/२०१३ रोजीचे अर्जान्वये खालीलप्रमाणे विनंती केलेली आहे.

माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत साईटेक प्रकल्प उभारणीची कार्यवाही हाती घेण्यात आलेली आहे. उपरोक्त संदर्भीय आदेशान्वये माहिती तंत्रज्ञान विभागाचे व ईडीपी विभागाचे प्रायोगिक तथा तात्पुरत्या स्वरुपात एकत्रिकरण करण्यात आलेले आहे. माहिती तंत्रज्ञान विभागाचा वर्कलोड दिवसें-दिवस वाढत चालला आहे. माहिती तंत्रज्ञान विभागाकडील दैनंदिन कामे तसेच साईटेक प्रकल्पाची कामे करतांना अपुर्ण मनुष्यबळामुळे वेळेवर कामे करणे कठीण होत आहे. इकडील विभागांची दैनंदिन कामांव्यतिरिक्त रुग्णालये विभागांकडील अतिरिक्त कामांकडे लक्ष देण्यास वेळ पुरत नाही.

माहिती तंत्रज्ञान विभागाचे स्टाफिंग पॅटर्नमध्ये तिन तांत्रिक सहाय्यक व मी एकूण चारच तांत्रिक कर्मचारी आहेत. सदर कर्मचाऱ्यांना दैनंदिन कामाचा वर्कलोड असल्यामुळे नविन अद्ययावत तांत्रिक ज्ञान अवगत करणेस वेळच मिळत नाही. तसेच कामाचा वर्कलोड मर्यादेपेक्षा जास्त झाल्याने कामाची प्रत घसरण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे कामाचे नियोजनात सुसूत्रता राहिलेली नाही.

माहिती तंत्रज्ञान विभागाचे व रुग्णालये विभागाचे कामकाजात सुसूत्रता येणेकामी दोन्ही विभागाचे तात्पुरते विलीनीकरण रद्द करावे व रुग्णालये विभागाचा अतिरिक्त कार्यभार माझ्याकडून काढून घेण्यात यावा.

**(ब)** तत्कालीन मा.व्यवस्थापन समिती दि.०८/०२/२००९ चे सभेपुढे श्री.किशोर गवळी, ज्यु.ईडीपी मॅनेजर यांचा सिनियर ईडीपी मॅनेजर या पदावर नेमणूक होणेबाबतचा विषय सादर केला असता समितीने खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

सदरचा विषय तूर्त स्थगित ठेऊन सविस्तर माहिती सादर करावी असे ठरले, तसेच संस्थान व हॉस्पिटल या दोन्ही संगणक विभागाचे एकत्रित कार्यवाहीसाठी सविस्तर प्रस्ताव सादर करावा, असा निर्णय झालेला आहे.

उपरोक्त निर्णयास अनुसरून जा.नं.एसएसएस/वशी-०१/३०६९/२०१२ दि.२५/१०/२०१२ चे आदेशान्वये माहिती तंत्रज्ञान विभाग व साईबाबा हॉस्पिटलकडील ईडीपी विभाग एकत्रित करण्यात आलेला आहे.

त्यानुसार सध्या माहिती तंत्रज्ञान विभागाकडे प्र.विभाग प्रमुख -०१, ज्यु.ईडीपी मॅनेजर-०२, तांत्रिक सहाय्यक-०३, वरिष्ठ लिपीक-०१, लिपीक-टंकलेखक-०१, शिपाई-०१ असे एकूण ०९ स्थायी कर्मचारी काम करत आहेत. तसेच कुशल कंत्राटी - ०९ व अकुशल कंत्राटी-०४ असे एकूण १३ कंत्राटी कर्मचारी असे एकूण २२ कर्मचारी काम करत आहेत.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे वेगवेगळया विभागामार्फत साई भक्तांना आवश्यक सेवा-सुविधा पुरविण्याचे काम केले जाते. तत्कालिन मा.व्यवस्थापन समितीने संस्थानचे विविध विभागांचा विकास व्हावा, संस्थानचे सर्व विभाग एकमेकांना जोडले जावे, दैनंदिन होणाऱ्या आवक-जावक खर्चाची माहिती संस्थानचे लेखा विभागाकडे तात्काळ उपलब्ध व्हावी, यासाठी साईटेक प्रकल्पांतर्गत बहुउद्देशीय संगणक प्रणाली विकसीत करण्याचे काम कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना

देण्यात आलेले आहे. त्यानुसार साईभक्तांना ऑनलाईन दर्शन व आरतीचे पास, ऑनलाईन रुम बुकींग सुविधा, ऑनलाईन देणगी याप्रकारच्या सुविधा कार्यान्वीत करण्यात आलेल्या आहेत. तसेच इतर विभागासाठीही संगणक प्रणाली विकसीत करण्याचे काम सुरू आहे.

सदर प्रकल्पाची किंमत २१.८७ कोटी इतकी असून संगणक प्रणाली विकसीत झाल्यानंतर पुढील ५ वर्षाचे हार्डवेअर व सॉफ्टवेअर मेन्टेनन्सचे काम संबंधीत कंपनीस देण्यात आलेले आहे. सदर मेन्टेनन्सचे कामापोटी संस्थानकडून सुमारे मासिक २७.६४ लक्ष इतकी रक्कम कंपनीस अदा करण्यात येत आहे.

सध्यस्थितीत माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत श्री साईबाबा हॉस्पिटल करिता सुमारे ३.५ कोटी रक्कमेची बिलींग सिस्टीम खरेदी करणेबाबतची कार्यवाही चालू असून प्रस्तावास मान्यता मिळणेकामी विधी विभागामार्फत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात सिव्हील ॲप्लीकेशन सादर करण्यात आलेले आहे.

तसेच उपरोक्त मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार ईडीपी विभाग व माहिती तंत्रज्ञान विभाग हे दोन्ही विभाग एकत्र केल्यानंतर माहिती तंत्रज्ञान विभागाने दि.०७/०३/२०१३ रोजीचे टिपणीअन्वये खालीलप्रमाणे कळविलेले आहे.

श्री साईबाबा हॉस्पिटलकडील दोन्ही ज्यु.ईडीपी मॅनेजर यांना इकडील विभागाकडे हजर करुन घेण्यात आलेले आहे. संस्थानचे भविष्यातील दूर दृष्टी बघता सदरील ज्यु.ईडीपी पदनामात सॉफ्टवेअर इंजिनिअर व हार्डवेअर इंजिनिअर याप्रमाणे बदल करण्यात यावा, असे नम्र मत आहे. ईडीपी विभाग व माहिती तंत्रज्ञान विभागाचे एकत्रिकरण केल्याने मॅनेजर या पदाचे आवश्यकता वाटत नाही. त्याऐवजी तांत्रिक सहाय्यक सॉफ्टवेअर व तांत्रिक सहाय्यक हार्डवेअर अशी दोन पदे निर्माण करता येऊ शकतील. त्यामुळे कामाचे भविष्यात नियोजन करणे सोईचे होईल. सदर विषय हा प्रशासकीय पातळीवरील असल्याने त्याचा यथायोग्य निर्णय भविष्यात घेण्यात यावा.

**(क)** उपरोक्त '**अ**' मध्ये नमूद केल्याप्रमाणे अर्जदाराचे म्हणणे तसेच '**ब**' मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रत्यक्ष वस्तुस्थिती विचारात घेता खालीलप्रमाणे कार्यवाही करता येईल.

**(१)** तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचा निर्णय व प्र.माहिती तंत्रज्ञान विभागाकडील दि.०७/०३/२०१३ रोजीचे टिपणीवरील सूचना यांचा विचार करता माहिती तंत्रज्ञान व हॉस्पिटलकडील ईडीपी या दोन संगणक विभागाचे कायम स्वरुपी एकत्रीकरण करुन मंजुर आकृतीबंधातील अनावश्यक पदे कमी करुन तांत्रिक दृष्टया सहाय्यक अशा वाढीव पदांची निर्मीती करणेबाबत प्र.माहिती तंत्रज्ञान विभाग प्रमुख यांचेकडून प्रस्ताव मागविता येईल.

**(२)** सध्या 'साईटेक' या संगणकीय प्रणालीचे कामकाज विविध विभागाचे समन्वयाने बहुतांशी मध्यवर्ती टप्प्यात असून ते अंतिम करणेबाबत सर्वच प्रशासकीय पातळीवर पाठपुरावा करणेत येत आहे. अशा वेळेस पुनःश्च माहिती तंत्रज्ञान विभागाचे विकेंद्रीकरण करुन साईटेक या प्रोजेक्टचे कामकाजात विस्कळीतपणा येऊ शकतो. तसेच साईटेक प्रकल्पांतर्गत विकसीत केलेल्या संगणक प्रणालीचे सॉफ्टवेअर व हार्डवेअर मेन्टेनन्सचे काम पाच वर्षासाठी संबंधीत कंपनीस देण्यात आलेले असल्यामुळे सध्याचे उपलब्ध कर्मचाऱ्यांकडे फारसा वर्कलोड आहे असे निदर्शनास येत नाही. तसेच वर नमुद केलेप्रमाणे तांत्रिक/ अतांत्रिक कामे करणेसाठी सध्या माहिती तंत्रज्ञान विभागाकडे पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध असल्याचे दिसून येते.

**(३)** यापुर्वी माहिती तंत्रज्ञान विभाग व हॉस्पिटलकडील ईडीपी विभागाचे एकत्रिकरण तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार करणेत आलेले आहे.

**(ड)** उपरोक्त बाबी विचारात घेऊन, परिच्छेद '**क**' मध्ये नमुद केलेनुसार माहिती व तंत्रज्ञान विभागाचे विकेंद्रीकरण करणेत यावे किंवा कसे यावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रशासकीय कामकाजाचे सोयीचे दृष्टीने उपरोक्त प्रस्तावातील परिच्छेद 'क' मध्ये नमुद केलेनुसार माहिती व तंत्रज्ञान विभागाचे विकेंद्रीकरण करणेस व श्री साईबाबा हॉस्पिटलकडील ईडीपी विभाग पुर्वीप्रमाणेच स्वतंत्र करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.७७** **संस्थानमधील विविध तांत्रिक/ अतांत्रिक विभाग प्रमुखांची पदे सरळसेवेने भरणेकामी प्रस्ताव मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात मान्यतेसाठी सादर करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अ)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे वेगवेगळया विभागामार्फत साई भक्तांना आवश्यक सेवा-सुविधा पुरविण्याचे काम केले जाते. मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी शासन निर्णय क्रमांक सासंवि-०९/४३३/(३७/०९) का.सोळा, दिनांक ०७ ऑगष्ट, २००९ चे शासन निर्णयान्वये शासनाने भक्तांना आवश्यक मुलभूत सेवा सुविधा पुरविणेकामी संस्थानचे कर्मचारी आकृतीबंधास मान्यता दिलेली आहे. सदर आकृतीबंधात एकूण ३४ विभागांचा समावेश करण्यात आलेला असून

भविष्यातील कामाची गरज विचारात घेऊन प्रत्येक विभागांतर्गत कार्यालयीन तसेच तांत्रिक- अतांत्रिक स्वरुपाच्या पदांची निर्मिती केलेली आहे.

श्रींच्या दर्शनासाठी शिर्डी येथे येणाऱ्या साईभक्तांचे गर्दीत दिवसेंदिवस लक्षणीय वाढ होत आहे. त्यानुसार दैनंदिन कामकाजात गतीमानता येणेकामी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा, वेगवेगळया मशिनरींचा तसेच उर्जा बचतीसाठी अपारंपारीक उर्जा प्रकल्पाची उभारणी करणे व बदलत्या काळानुसार नवनविन तंत्रज्ञानाचा वापर करुन भक्तांना तात्काळ सेवा-सुविधा पुरविणेकामी विविध विभागांमार्फत कार्यवाही करणेत येत आहे.

यामध्ये प्रामुख्याने, साईभक्तांना प्रसाद भोजनाची व्यवस्था करणे, विविध बांधकामे करणे, विविध विभागात वापरात येणाऱ्या मशिनरींची देखभाल दुरुस्ती करणे, संस्थानचे कामकाज संगणकीयकृत करणेसाठी कार्यवाही करणे, भक्तांना विनामुल्य बससेवा उपलब्ध करुन देणे, संस्थान परिसरास पाणीपुरवठा करणे, मंदिरातील पूजा-अर्चा, उत्सव कार्यक्रमाचे दृकश्राव्य माध्यमाव्दारे प्रसारण करणे आदि कामांचे नियोजन, नियंत्रण करणेसाठी विविध विभागांची निर्मिती करणेत आलेली आहे. **त्यामध्ये प्रामुख्याने प्रसादालय, बांधकाम, विद्युत, पाणीपुरवठा, मेकॅनिकल, ध्वनीक्षेपण आदि विभागांचा समावेश आहे.**

**ब)** मा. त्रिसदस्यीय समितीचे दिनांक ०७ फेब्रुवारी, २०१३ रोजीचे सभेतील मा. विश्वस्तांनी खालीलप्रमाणे सुचना मांडल्या व त्या मान्य करण्यात आल्या या विषयांतर्गत निर्णय क्रमांक ११८ खालीलप्रमाणे पारित करणेत आलेला आहे :

" .. .. संस्थान कर्मचारी आकृतीबंधानुसार रिक्त असलेली पदे पदोन्नतीद्वारे/ एकत्रित मानधनावर/ ठेकेदारामार्फत कंत्राटी पध्दतीने भरणेकामीचा सविस्तर प्रस्ताव तयार करुन तो सभेसमोर सादर करावा व त्यास मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी. "

तद्नंतर, त्यानंतर मा. त्रिसदस्य समितीचे दिनांक २६ फेब्रैवारी, २०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १५४ अन्वये, ".. .. संस्थान आस्थापनेवरील सध्या रिक्त असलेल्या पदांपैकी आवश्यक असलेली पदे भरणेकामी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची एकत्रित मान्यता घेण्यात यावी." असा निर्णय पारित करणेत आलेला आहे.

**क)** सध्या संस्थान आस्थापनेच्या मंजूर आकृतीबंधातील काही महत्वाच्या तांत्रिक- अतांत्रिक विभागाच्या विभागप्रमुखांची पदे रिक्त असून, या पदांचे कामकाज प्रभारी अधिक्षक / विभागप्रमुख म्हणून अन्य अधिकारी / कर्मचारी पाहत आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे:

**तक्ता क्रमांक ०१**

| अ.नं. | विभागाचे नांव | पदनाम | मंजूर स्थायी पदसंख्या |
|---|---|---|---|
| ०१ | बांधकाम विभाग | कार्यकारी अभियंता | ०१ |
| ०२ | पाणीपुरवठा विभाग | उपकार्यकारी अभियंता | ०१ |
| ०३ | मेकॅनिकल विभाग | मेकॅनिकल अभियंता | ०१ |
| ०४ | माहिती तंत्रज्ञान विभाग | आय.टी.मॅनेजर | ०१ |
| ०५ | ध्वनीक्षेपण आणि दूरध्वनी विभाग | इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअर | ०१ |
| ०६ | प्रसादालय विभाग | मॅनेजर | ०१ |

उपरोक्त **तक्ता क्र.०१** मध्ये अ.नं. ०१ ते ०५ मध्ये नमुद केलेले विभाग हे पूर्णपणे तांत्रिक कामे असलेले विभाग असून, अ.नं.०६ प्रसादालय विभाग हा जरी अतांत्रिक म्हणून गृहीत मानण्यांत आला असलातरी, सध्याचे प्रसादालयात दैनंदिन कामकाजात वापरणेत येणारी तांत्रिक मशिनरी व त्यांच्या सेवा, व्यवस्थापन आदि पाहतां, सदरचा विभागाचा अर्धतांत्रिक विभागात समावेश होऊ शकतो.

उपरोक्त तक्ता क्र.०१ मध्ये नमुद केलेल्या संस्थान आस्थापनेच्या पदांवर सरळ सेवा भरतीने निवड करणेकामी प्रस्तावित करणेत आलेली शैक्षणिक पात्रता खालीलप्रमाणे:

**तक्ता क्र.०२**

| **Sr. No.** | **Designation (Department)/ (Post)** | **Sanctioned Payscale as per 5th Pay (as per 6th Pay)** | **Proposed Qualification (By Nomination)** |
|---|---|---|---|
| 01 | **Executive Engineer** (Construction Deptt.) (01) | 10650-15850 (Payband 15600-39100 + Grade Pay 6600) | On deputation from Govt. **OR**<br>1) Age not more than 35 yrs.<br>2) **B.E. Civil** from any recognized university<br>3) MS-CIT or Govt. Prescribed equivalant Computer operating Course.<br>4) **Experience of 5** years in Govt. Or Local Body or in a reputed Engineering concern in same capacity or equivalent. |

| | | | |
|---|---|---|---|
| 02 | **Dy. Executive Engineer** (Water Supply Deptt.) (01) | 8000-13500 (Payband 15600-39100 + Grade Pay 5400) | On deputation from Govt. **OR**<br>1) Age not more than 33 yrs.<br>2) **Degree in Mechanical Engineering** from Govt. recognized University with 2nd Class.<br>3) MS-CIT or Govt. Prescribed equivalant Computer operating Course.<br>4) Experience of 5 years in Water Supply Department of Govt./ Semi. Govt. / Local Body |
| 03 | **Mechnical Engineer** (Mechnical Deptt.) (01) | 8000-13500 (Payband 15600-39100 + Grade Pay 5400) | 1) Age not more than 33 years;<br>2) **B.E. Mechanical Degree** from recognized University and minimum 5 years experience in continuous process Plant and Maintenance. |
| 04 | **I.T. Manager** (Information Tech. Deptt.) (01) | 8000-13500 (Payband 15600-39100 + Grade Pay 5400) | 1) Age not more than 33 years.<br>2) **B.E. Computer/ Electronics/ IT**<br>3) Microsoft Certified Professional.<br>4) Experience of minimum 5 years. |
| 05 | **Electronics Engineer** (Sound &Tele. Deptt.) (01) | 6500-10500 (Payband 9300-34800 + Grade Pay 4400) | 1) Age not more than 33 years.<br>2) **Degree in Electronics OR Audio and Video Engineering** from Govt. Recognized University/ Institute.<br>3) Experience minimum 5 years in Tele Communication and Okstic Engineering. |
| 06 | **Manager** Prasadalaya Deptt.) (01) | 6500-10500 (Payband 9300-34800 + Grade Pay 4400) | 1) Age not more than 33 years.<br>2) **B.Sc. with MBA** from any recognized University OR **Degree in Hotel Managemen**t from Govt. recognized University.<br>3) MS-CIT or Govt. Prescribed equivalant computer operating course.<br>4) Experience minimum 5 years in similar capacity from reputed organization or Hotel. |

**(ड)** उपरोक्त परिच्छेद क मधील तक्ता क्र.०२ मध्ये नमुद केलेप्रमाणे, अ.नं. ०१ ते ०६ या पदांसाठी सरळ सेवा भरतीने नेमणूक करणेसाठी आवश्यक प्रस्तावित शैक्षणिक पात्रता नमुद केलेली आहे. तथापि, मा. शासनाने दिनांक ०७ ऑगष्ट, २००९ चे शासन निर्णयानुसार, संस्थानचे कर्मचारी आकृतीबंधातील फक्त विभागाचे नांव, पदनाम / पदांचे संवर्ग, वेतनश्रेणी व पदसंख्या या घटकांनाच काही अटी-शर्तीसह मान्यता दिलेली आहे. त्यामध्ये खालील प्रमुख अटींचा समावेश आहे :

०१. समितीने पदनिहाय सेवा प्रवेश नियम तयार करावेत व त्यास शासन मान्यता घ्यावी. तसेच सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना सेवा प्रवेश नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक राहील.

०२. सेवा प्रवेश नियमांमध्ये प्रत्येक पदांची शैक्षणिक पात्रता, जबाबदारी व कर्तव्ये ढोबळमानाने निश्चित करण्यात यावे. सेवा प्रवेश नियमांमध्ये पदोन्नतीची साखळी याबाबत स्पष्टपणे उल्लेख असावा.

०३. सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदांची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परिक्षा घेऊन नियुक्ती करावी.

०४. सेवा प्रवेश नियमांमध्ये वेतनश्रेणीचा उल्लेख असावा.

**उपरोक्त शासन निर्णयातील अटी-शर्ती नुसार, संस्थान प्रशासनाने पदनिहाय सेवाप्रवेश नियमांचा प्रारुप मसुदा तयार केलेला असून, तो अंतिम करणेची कार्यवाही सुरु आहे.**

त्याअनुषंगाने, उपरोक्त **परिच्छेद क** मधील **तक्ता क्र.०२** मधील अ.नं. ०१ ते ०६ पदांवर सरळ सेवा भरतीने नेमणूक करतांना, त्यांच्या प्रस्तावित शैक्षणिक पात्रतेमध्ये काही अंशी बदल करणे आवश्यक आहे, असे नम्र मत आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे :

**०१. कार्यकारी अभियंता (बांधकाम विभाग) :**

कार्यकारी अभियंता या पदाचे प्रस्तावित शैक्षणिक पात्रतेत B.E. Civil, अनुभव किमान ०५ वर्षाचा व वय ३५ वर्षाचे आत असावे, असे नमुद केले आहे.

कार्यकारी अभियंता हे पद जरी बांधकाम विभागाचे आस्थापनेवर दर्शविणेत आलेले असलेतरी, त्यांना देऊ करणेत आलेल्या उच्च वेतनश्रेणीचा (०६ व्या वेतनआयोगानुसार पे बँड रुपये १५६००-३९१०० + ग्रेड पे ६६००) विचार करतां, त्यांचे नियंत्रणाखाली/ अखत्यारीत संस्थानमधील तांत्रिक विभागांतील कामकाज (उदा. बांधकाम, विद्युत, पाणीपुरवठा इत्यादी) असावे, असे गृहीत धरणेत आलेले

आहे. संस्थान व्यवस्थापनामार्फत वेळोवेळी विविध बांधकाम प्रकल्प हाती घेतले जातात, त्यावेळेस त्याप्रकल्पाशी संबंधीत कामे ही विशेषतः बांधकाम, विद्युत, पाणीपुरवठा आदि बाबींशी निगडीत असतात. या बाबींचा विचार करतां, कार्यकारी अभियंता या पदाचे प्रस्तावित शैक्षणिक पात्रतेत B.E. Civil असे नमुद केले असले तरी, त्यामध्ये **अतिरिक्त तपशील** म्हणून उमेदवारास बांधकाम, विद्युत, पाणीपुरवठा या क्षेत्रातील अनुभव तसेच संबंधित कामाचा किमान १० वर्षाचाअनुभव असावा व अनुभवाचे कालावधीचा विचार करता उमेदवाराचे किमान वय ४० वर्षे असणे आवश्यक आहे, असे मत आहे.

**०२. आय.टी.मॅनेजर (माहिती तंत्रज्ञान विभाग):**

आय.टी.मॅनेजर या पदाचे प्रस्तावित शैक्षणिक पात्रतेत B.E. (Computer/Electronics/IT) असे नमुद केलेले आहे. यापैकी B.E. Electronics या शैक्षणिक पात्रतेत जरी संगणकासंबंधी शिक्षण अंर्तभूत असलेतरी, कोणत्याही संगणकीय प्रणालीची यशस्वीरित्या अंमलबजावणी करणेसाठी संगणक शिक्षणशास्त्रातील सॉफ्टवेअर, हार्डवेअर, नेटवर्कींग आदि बाबींचे मुलभूत शिक्षण व त्यातील अनुभव असणे आवश्यक आहे. त्यामुळे या पदावर नेमणूक करतांना, या पदाची शैक्षणिक पात्रता विशेष करुन B.E. (Computer/IT) अशीच असणे आवश्यक आहे. तसेच सध्या संस्थान व्यवस्थापनामार्फत कार्यान्वीत करणेत येत असलेल्या साईटेक् या संगणकीय कार्यप्रणाली मध्ये बहुतांशी आज्ञावली या Oracle या संगणकीय भाषेचा आधार घेऊन तयार करणेत आलेल्या आहेत. त्यामुळे प्रस्तावित शैक्षणिक पात्रतेत Microsoft Certified Professional या बरोबरच Oracle Database या संगणकीय भाषेचे शिक्षणाचा समावेश करणे आवश्यक आहे. तथापी, या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींकडून मार्गदर्शन घेणे उचित व योग्य राहील, असे मत आहे.

**०३. मॅनेजर (प्रसादालय) :**

सध्या भक्तांना प्रसाद भोजनाची व्यवस्था विनाविलंब व माफक दरात उपलब्ध व्हावी म्हणून संस्थान व्यवस्थापनामार्फत एकाच वेळेस अंदाजे ५००० भक्त प्रसाद भोजन घेऊ शकतील, अशा क्षमतेचे प्रसादालय उभारणेत आलेले आहे. या सन २००८-०९ मध्ये नव्या इमारतीत सुरु केलेल्या प्रसादालय या विभागात आज रोजी विविध प्रकारच्या देशी-विदेशी बनावटीच्या मशिनरीच्या सहाय्याने, मानवी श्रम व मनुष्यबळ वापरुन प्रसाद भोजन तयार करुन भक्तांना सलग १२ तास दोन पाळीत उपलब्ध करुन दिले जात आहे.

प्रसादालयातील कामांमध्ये भक्तांना प्रसाद भोजन विनाविलंब, सोयीस्करपण उपलब्ध व्हावे यासाठी प्रसादालयातील दैनंदिन कामकाजासाठी उपलब्ध मनुष्यबळाचे नियोजन व नियंत्रण, त्याची अंमलबजावणी करणे आदि बाबी या व्यवस्थापनाचे घटक असून, या प्रसादालयात तयार करणेत येणाऱ्या प्रसाद भोजनासाठी वापरणेत येणारा कच्चा माल, तेल, तूप आदि साहित्याची प्रतवारी कशी आहे, त्यापासून तयार होणारे खाद्यपदार्थाची प्रतवारी कशी आहे, त्यासाठी खाद्यपदार्थांचे Quality Control, Lab Testing करुन त्याचे पृथःक्करण करणे, मध्यवर्ती खरेदी विभागास कच्चा माल खरेदीसाठी सहाय्य करणे, मार्गदर्शन करणे आदि कामे केटरिंग या प्रकारात समाविष्ट होतात.

त्याअनुषंगाने, प्रसादालय विभागाचे आस्थापनेवरील मॅनेजर या पदासाठी B.Sc. with MBA from any recognized University OR Degree in Hotel Management from Government recognized University अशी शैक्षणिक पात्रता प्रस्तावीत केलेली आहे.

तथापि, मॅनेजर या पदाचे उपरोक्त कर्तव्ये व जबाबदाऱ्या यांचा विचार करतां, पुणे विद्यापिठामार्फत शिकविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमांची पडताळणी केली असता, Bachelor of Hotel Management & Catering Technology हा व्यवस्थापन व केटरींग या दोनही बाबींशी संलग्न असलेला अभ्यासक्रम उपलब्ध असल्याचे दिसून आले.

सोबत, उपरोक्त पुणे विद्यापीठाच्या BHMCT या शैक्षणिक अभ्यासक्रमाची त्रोटक व ढोबळ माहिती जोडलेली आहे. त्याचे अवलोकन केले असतां, या शिक्षणक्रमांतर्गत खाद्यपदार्थ संबंधीत केटरींग या प्रकाराबरोबरच व्यवस्थापन घटकाच्या अभ्यासक्रमाचा समावेश असल्याचे दिसून येते. सदरचा अभ्यासक्रम हा इयत्ता १२ वी नंतर ०४ वर्षाचा पूर्णवेळ कालावधीचा आहे.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करतां, मॅनेजर (प्रसादालय) या पदासाठी Bachelor of Hotel Management & Catering Technology अशी शैक्षणिक पात्रता असणे आवश्यक आहे. तसेच मंजूर आकृतीबंधामध्ये मॅनेजर (प्रसादालय) - मंजूर ०१ पद आणि अधिक्षक (प्रसादालय) - मंजूर ०२ पदे या दोनही पदांची वेतनश्रेणी ६५००-१०५०० (६व्या वेतनआयोगानुसार पेबँड ९३००-३४८०० + ग्रेड पे ४४००) अशी दर्शविणेत आलेली आहे, म्हणजेच ही दोनही पदे समकक्ष व एकाच संवर्गात गृहीत धरणेत आलेली आहेत.

वास्तविक, मॅनेजर या पदावरील अधिकारी हा प्रसादालय विभागप्रमुख म्हणून कार्यरत राहणार असून, या पदांचे कर्तव्ये व जबाबदारी पहातां, या पदाची प्रस्तावित शैक्षणिक पात्रता ही अधिक्षक या

पदापेक्षा उच्च दर्शविणेत आलेली आहे. त्यामुळेवर नमुद केलेप्रमाणे मॅनेजर पदासाठी व्यवस्थापन व केटरींग या दोनही क्षेत्रातील क्षमता असणाऱ्या उमेदवाराची निवड करावयाची ठरल्यास या पदाची वेतनश्रेणी ८०००-१३५०० (६ व्या वेतनआयोगानुसार पेबँड १५६००-३९१०० + ग्रेड पे ५४००) अशी असणे आवश्यक आहे, असे मत आहे.

**(इ)** उपरोक्त परिच्छेदात विवेचन केलेनुसार, मा. त्रिसदस्य समितीचे निर्णयानुसार, संस्थानचा दैनंदिन कामाचा वाढता व्याप व तांत्रिक विभागांकडील व्यापक कामकाज विचारात घेतां, संस्थानच्या मंजुर आकृतीबंध लक्षात घेऊन, परिच्छेद क मधील तक्ता क्रमांक ०१ व ०२ मध्ये नमुद केलेनुसार, अ.नं. ०१ ते ०६ या पदांपैकी मॅनेजर (प्रसादालय) या पदाचे वेतनश्रेणीमध्ये व इतर काही पदांचे प्रस्तावित शैक्षणिक पात्रतेत काही जुजबी व आवश्यक बदल करुन, या पदांवर नव्याने सरळसेवेने भरती करणेस तसेच मा. त्रिसदस्यीय समितीचे निर्णयानुसार, सदरचा प्रस्ताव मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे औरंगाबाद खंडपीठात मान्यतेसाठी सादर करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.७५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावातील तक्ता क्र.०२ मध्ये अ.नं.०४- आय.टी. मॅनेजर या पदासाठी असलेली शैक्षणिक पात्रता पुर्वीप्रमाणेच कायम ठेवणेत येऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**<u>यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे मान्यतेने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणेत आली.</u>**

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०१** **श्री साईप्रसादालयातील सोलर स्टीम कुकींग प्रकल्पाची फिड पाईप लाईन IBR नुसार बदल करणेचे काम मे. आदर्श इंजिनिअरींग वर्क्स, आंबेजोगाई यांचे कडून करुन घेणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं. १४ (भाग- ४)** मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तापित केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील १४(२-घ) नुसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते दुरुस्तीचे काम.

**प्रास्ताविकः-** श्री साईप्रसादालयातील सोलर स्टीम कुकींग प्रकल्पाचे इंडियन बॉयलर ॲक्टनुसार मॉडीफिकेशनचे काम मा. व्यवस्थापन समिती दिनांक २१.६.२०१३ रोजीचे सभेतीलन निर्णय क्रं.४४० नुसार IBR मान्यता प्राप्त एजन्सी मे. आदर्श इंजिनिअरींग वर्क्स, आंबेजोगाई यांना देणेत आलेले आहे. त्यानुसार मे.आदर्श इंजिनिअरींग वर्क्स यांनी IBR मॉडीफिकेशनचे काम ७० टक्के पुर्ण केलेले असून शासनाच्या बॉयलर इन्स्पेक्टर यांचे मार्फत हायड्रोलिक टेस्टींग घेऊन ना हरकत प्रमाणपत्र घेणे व पाईपलाईन इन्सुलेशन करणेचे काम बाकी आहे.

दिनांक २०.११.२०१३ रोजी श्री टि. एस. नारायणन, सेक्रेटरी केंद्रीय बॉयलर बोर्ड व श्री बधे, डायरेक्टर ऑफ स्टिम बॉयलर, महाराष्ट्र शासन यांनी शिर्डी येथे येऊन प्रकल्पाची संयुक्तीत पाहणी केली होती. त्यावेळेस श्री बधे सो. यांनी सोलर स्टीम प्रकल्पाची फिड वॉटर पाईप लाईनची सध्या जी. आय. ची असुन इंडियन बॉयलर ॲक्टनुसार जी. आय. (गॅल्वनाईज ऑयर्न) पाईप लाईन सोलर प्रकल्पास सुरक्षेच्या दृष्ट्रीकोनातुन वापरात येणार नसल्याचे सांगितले. त्याचप्रमाणे दिनांक ३०.१२.२०१३ रोजीचे पत्रानुसार त्यांचे अमहदनगर बॉयलर कार्यालयाने पाईप लाईन बदलने बाबत कळविलेले आहे.

त्याबाबत सध्या IBR मॉडीफिकेशनचे काम करणारी एजन्सी मे. आदर्श इजिनिअरींग वर्क्स, आंबेजोगाई चे प्रो. प्रा. श्री चौगुले यांना कळविले असता त्यांनी प्रस्तुत काम हे वाढीव असल्याने त्या कामाचे रक्कम रु. ४,०६,४००/- + टॅक्स वेगळे द्यावे लागतीत असे दिनांक ३१.१२.२०१३ रोजीचे दरपत्रकाने कळविलेले आहे.

**मागणी:-** प्रकल्पाचे IBR मॉडीफिकेशनचे उर्वरीत काम पुर्ण करणेसाठी फिड पाईप लाईनचे काम पुर्ण होणे आवश्यक आहे. तसेच साईभक्तांच्या व कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेची बाब म्हणून पुर्ण करणे आवश्यक आहे. डायरेक्टर ऑफ स्टिम बॉयरल यांनी सुचविलेप्रमाणे व सोलर स्टीम कुकींग प्रकल्पाचे IBR मॉडीफिशनचे काम करणारी IBR मान्यता प्राप्त एजन्सी मे. आदर्श इंजिनिअरींग वर्क्स, आंबेजोगाई यांचेकडून वॉटर फिड पाईप लाईनचे काम करुन घेता येईल. त्याकामी रक्कम रु. ४,०६,४००/- + टॅक्स खर्च येणार आहे. त्यामुळे सोलर स्टीम कुकींग प्रकल्पाचे वॉटर फिड पाईप लाईनचे काम मे. आदर्श इंनिअरींग वर्क्स यांचेकडून करुन घेणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु. ४,०६,४००/- + टॅक्सचे खर्चास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार नुसार अनुमान :-** तांत्रिक

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मतः-** सोलर स्टीम कुकींग प्रकल्प कार्यान्वित होणेस विलंब होऊ नय, याकरीता IBR चे मॉडीफिकेशनचे काम करीत असलेली अधिकृत एजन्सी मे. आदर्श इंजिनिअरींग वर्क्स, आंबेजोगाई यांचेकडून फिड वॉटर पाईप लाईनचे काम करुन घेणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम

रु. ४,०६,४००/-+ टॅक्स चे खर्चास मान्यता घेणेकामी सदरचा विषय मा. व्यवस्थापन समिती सभेमध्ये निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयामधील सोलर स्टीम कुकींग प्रकल्प कार्यान्वित होणेस विलंब होऊ नये, याकरीता IBR च्या मॉडीफिकेशनचे काम करत असलेली अधिकृत एजन्सी मे. आदर्श इंजिनिअरींग वर्क्स, आंबेजोगाई यांचेकडून फिड वॉटर पाईप लाईनचे काम करुन घेणेस व याकामी येणाऱ्या रक्कम रु.४,०६,४००/-+ टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली.** (कार्यवाही-अधिक्षक, श्री साईप्रसादालय)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०२** **मकर संक्राती-२०१४ निमित्ताने मंदिर व मंदिर परिसरात फुलांची सजावट करणेस परवानगी देणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री आनंद इंगवले, मुंबई यांनी आपले दिनांक ०८/०१/२०१४. रोजीचे पत्रान्वये कळविले की, दिनांक १४/०१/२०१४ रोजी मकरसंक्रांती निमित्ताने समाधी मंदिर, व्दारकामाई,चावडी, गुरुस्थान या ठिकाणी फुलांची सजावट देणगी दाखल करुन देण्यास तयार आहे. यासाठी त्यांनी संस्थान कडे परवानगी मागीतलेली आहे.

संस्थान, संस्थान मार्फत साजऱ्या करण्यात येणाऱ्या उत्सवासाठी समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी, गुरुस्थान या ठिकाणी फुलांची सजावट करण्यात येते सदरची सजावट ही संस्थान खर्चाने किंवा कोणी साईभक्त देणगी स्वरुपात सजावट करण्यास तयार असल्यास त्यांना सजावटीची परवानगी देण्यात येते.

श्री मुकेश गुप्ता यांना श्री पुण्यतिथी उत्सव-२०१३, श्री राजेंद्र तलवार, यांनी दिपावली निमित्ताने , श्री राजेंद्र डंग, दिल्ली यांना श्री दत्त जयंती निमित्ताने व श्री हर्षल भगत, सुरत यांना नववर्ष निमित्ताने फुलांची सजावाट करणेस परवानगी देण्यात आलेली आहे. तसेच संरक्षण विभागा मार्फत फुल सजावटीचे सामान तपासणी करण्यात येते, फुल सजवाटीचे काम करणारे कारागीर यांचे नाव, पत्ता, मोबाईल नंबर व फोटो इ. माहिती घेण्यात येते.

श्री आंनद इंगवले, मुंबई यांना दिनांक १४/०१/२०१४ रोजी मकरसंक्रांती निमित्ताने मंदीर व मंदीर परिसरात फुल सजावट करणेस परवानगी देणेस व मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २६/०७/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६०९ अन्वये देणगीदार यांना राहण्यासाठी ०१ AC रुम, दर्शन, भोजन पास व फुल सजावट करणारे कारागीर यांना सामान ठेवणेसाठी हॉल व जेवाणाची व्यवस्था संस्थान मार्फत मोफत करता येईल.

तरी फुल सजावट करणेस व देणगीदार, फुल सजावट करणारे कारागीर यांना राहण्याची, जेवणाची, दर्शनाची सोय करता येईल.

**निर्णय क्र.७७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०३** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या निधीतून शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्प- शिर्डी शहरातील व्दितीय प्राधान्य गटातील रस्ते विकसीत करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)अधिनियम २००४ चे कलम २१ (२) खालीलप्रमाणे तरतुद आहे.

पोट कलम (१) आणि (१ क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास, अशा शिल्लक रकमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यापेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईल :-

(दोन) स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयींमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगर पंचायतीला सहाय्य करण्यासाठी:

**मा.व्यवस्थापन समिती निर्णय :**

मा. व्यवस्थापन समिती निर्णय क्रमांक ५३८ दिनांक २४ जूलै, २०११

मा. व्यवस्थापन समिती निर्णय क्रमांक ७०६ दिनांक २४ सप्टेंबर, २०११

**प्रस्तावना**: शिर्डी शहरातील व्दितीय प्राधान्य गटातील २४ रस्ते विकसीत करणेकामी संस्थान व्यवस्थापन समितीचे दिनांक २४/०७/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ५३८ अन्वये शिर्डी नगरपंचायतीने दि.१६/०७/२०११ रोजीचे पत्रान्वये ढोबळ मानाने कळविलेनुसार ०६ रस्त्यांचा भूसंपादन खर्च रु.४३.७३ कोटी व २३ रस्त्याचे विकसनासाठी रु. ८२.८३ कोटी अशी एकूण रु. १२६.१०० कोटी

खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच नगर-मनमाड रस्त्याचे पश्चिम बाजूने जाणाऱ्या ४५ मीटर बायपास रस्त्याचा (४ कि.मी. लांबीचा) व पिंपळवाडी रस्ता ५६५ मी. ऐवजी १ कि.मी. पर्यंत समावेश करुन, प्रस्ताव शासन मान्यतेसाठी पाठविणेस मान्यता देणेत आली. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २४ सप्टेंबर, २०११ सभेतील निर्णय क्रमांक ७०६ नुसार व्दितीय प्राधान्य गटातील ज्या रस्त्यांना भूसंपादनाची आवश्यकता नाही व साईभक्त / नागरीकांचे दैनंदिन वापरात जे १७ रस्ते आहेत ते प्रथमतः विकसीत करणेबाबत कार्यवाही करणेस, भुसंपादनासाठी आवश्यक असलेल्या रस्त्यांचे मोजणीकामी मोजणी फी संस्थानतर्फे अदा करणे यावी तसेच याकामी अधिनियमातील तरतुदीनुसार शासनाचे विधी व न्याय विभागाची मान्यता घेणेत यावी असे ठरले आहे.

त्यानुसार इकडील जा.नं. एसएसएसटी-बांधकाम /३५५९/२०११ दि.०७ऑक्टोबर, २०११ रोजीचे प्रस्तावान्वये भूसंपादनाची आवश्यकता नसलेले १७ रस्त्याचे विकसनासाठी अंदाजे रु. ३५ कोटी निधी उपलब्ध करून देणेस व सदर रस्ते संस्थानच्या माध्यमातून थेट विकसित करणेस मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचेकडे सादर करणेत आला आहे.

तसेच सदरहू प्रकल्पातील भूसंपादनाची आवश्यकता असलेले उर्वरीत सात रस्त्यांपैकी ०६ रस्त्यांचे भूसंपादन व विकसनासाठी येणारे अंदाजे रुपये १०१.०१० कोटी खर्चास मान्यता मिळणेकामी इकडील जा. नं. १००/२०१२ दिनांक ०४ एप्रिल, २०१२ अन्वये मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे प्रस्ताव सादर करणेत आला आहे.

सदर प्रस्तावाचे अनुषंगाने शासनाचे विधी व न्याय विभागाकडील जा.क्र. सासंवि-२०११/ ५१४/ प्र.क्र.७४ का. सोळा दिनांक २१ ऑगस्ट, २०१३ रोजीचे पत्रान्वये सदर रस्त्याचा समावेश सन २०१८-श्रींचे समाधी शताब्धी महोत्सव -कृती आराखडयात समाविष्ट करणेबाबत कळविले होते. याबाबतची वस्तुस्थिती व सदर प्रकल्पास मान्यता देणेबाबत इकडील जा. नं.३९८६/२०१३ दिनांक ०४/१२/२०१३ रोजीचे पत्रान्वये सादर करणेत आली आहे.

प्रस्तुत प्रकरणांचा पाठपुरावा करणेकामी संस्थानचे उपकार्यकारी अभियंता (बांधकाम विभाग) व शाखा अभियंता हे दि.०६/०१/२०१४ ते ०८/०१/२०१४ या कालावधीत विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई येथे गेले होते. त्यावेळेस मा. कार्यासन अधिकारी यांनी सदरहू कामी येणारे सुधारीत खर्चाचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करावा असे निर्देश दिले होते. त्यानुसार जा. नं. ४६२०/२०१४ दि. ०७/०१/२०१४ व जा. नं. ४६६७/२०१४ दि. १०/०१/२०१४ रोजीचे पत्रान्वये सदरहू प्रकल्पासाठी येणारे खर्चाचा सुधारीत प्रस्ताव सादर करणेत आला आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. नं. | तपशिल | रक्कम रुपये |
|---|---|---|
| अ) | भूसंपादनाची कार्यवाही नसलेले व साईभक्तांचे व स्थानिक नागरिकांचे वापरातील १७ रस्ते संस्थानमार्फत विकसन करणेकामी (सल्लागार फीसह) सल्लागार युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा. लि., पुणे यांनी दिनांक ०७/०१/२०१४ रोजी सादर केलेले अंदाजपत्रक | ४७,०२,४४,९७८/- |
| **एकुण अपेक्षित खर्च रुपये (अ)** | | **४७,०२,४४,९७८/-** |
| **ब)** ०१. | भूसंपादन कार्यवाही आवश्यक असलेल्या सात रस्त्यांपैकी सहा रस्त्यांचे भूसंपादन करणेकामी मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांनी त्यांचेकडील दिनांक २१/०१/२०१२ रोजीचे पत्रान्वये कळविलेला खर्च | ५४.२६ कोटी |
| ०२. | उपरोक्त प्रमाणे सहा रस्ते विकसीत करणेकामी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी त्यांचेकडील दिनांक १६/०७/२०११ रोजीचे पत्रान्वये ढोबळ मानाने सादर केलेले अंदाजपत्रकानुसार येणारा खर्च | ५७.२८५ कोटी |
| **एकुण अपेक्षित खर्च रुपये (ब)..** | | **१११.५४५ कोटी** |

**विभागाचा अभिप्राय/ मत :**

**(अ)** उपरोक्त अ प्रमाणे व्दितीय प्राधान्य गटातील भूसंपादनाची आवश्यकता नसलेल्या १७ रस्त्यांचे विकसनासाठी मा. कार्यसन अधिकारी, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांना सदरहू प्रकल्पासाठी सन २०१३-१४ चे जिल्हा दरसूची (DSR) नुसारचे सुधारीत अंदाजपत्रकान्वये एकुण रुपये ४७,०२,४४,९७८/- मात्र इतका खर्च अपेक्षित असल्याचे कळविण्यात आलेले आहे. म्हणजेच यापूर्वी देणेत आलेले रुपये ३५ कोटी रकमेपेक्षा जादा येणारे रुपये १२,०२,४४,९७८/- मात्रचे खर्चास व केलेल्या कार्यवाहीस मान्यता असावी.

**(ब)** तसेच उपरोक्त ब प्रमाणे भूसंपादनाची आवश्यकता असलेल्या सहा रस्त्यांचे भूसंपादनासाठी रुपये ४३.७२५ कोटी रकमे ऐवजी रुपये ५४.२६ कोटी व सदरचे सहा रस्ते विकसनासाठी रुपये ५७.२८५ कोटी असा एकुण रुपये १११.५४५ कोटी खर्च अपेक्षित असल्याचे विधी व न्याय विभाग यांना

कळविण्यात आलेले आहे. करीता याकामी येणारे वाढीव रुपये १०.५३५ कोटी खर्चास व केलेल्या कार्यवाहीस मान्यता असावी.

**निर्णय क्र.७८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावात अ व ब मध्ये नमुद केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४** **शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजना- संस्थान निधीतुन प्रथम प्राधान्यगटातील ११ रस्ते विकसित करणेकामी अपेक्षित वाढीव खर्चास शासन मान्यता मिळणेकामी सादर केलेल्या प्रस्तावाबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)अधिनियम २००४ चे कलम २१ (२) खालीलप्रमाणे तरतुद आहे.

पोट कलम (१) आणि (१ क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास, अशा शिल्लक रकमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यापेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईल:-

(दोन) स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयींमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगर पंचायतीला सहाय्य करण्यासाठी:

**मा.व्यवस्थापन समिती निर्णय:** मा.व्यवस्थापन समिती ठराव क्र. २६३ दि.२४/०४/२००६ अन्वये शिर्डी नगरपंचायत हददीतील रस्त्यांची कामे संस्थान निधीतून महाराष्ट्र राज्य रस्तेविकास महामंडळामार्फत विकसीत करणेबाबत निर्णय पारीत झालेला आहे.

**प्रस्तावना:** शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्पांतर्गत प्रथम प्राधान्य गटातील अंदाजे रुपये ८८ कोटी मात्र इतक्या रकमेचे ११ रस्ते विकसीत करणेचे काम संस्थान व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित यांचेमार्फत सुरु आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधिल तरतुदीनुसार सदरचे रस्ते विकसित करणेस व त्यासाठी येणाऱ्या खर्चास विधी व न्याय विभागाची मान्यता मिळणेकामी इकडील जा. क्र. ८९१३/२००६ दि.०७/०७/२००६ अन्वये प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. दिनांक १९/०९/२००८रोजीचे शासन आदेशान्वये रुपये २८ कोटी मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहे. सदर प्रकल्पाचे वाढीव खर्चासह एकुण रुपये ८८ कोटी मात्र इतका खर्च अपेक्षित असल्याचे अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित यांनी दि.२९/०९/२००८ रोजीचे पत्रान्वये कळविले होते. सदरचे रुपये ८८ खर्चास मान्यता देणेकामी दि.२७/०१/२०१० रोजी मा.मंत्री, (विधी व न्याय) यांचे अध्यक्षतेखाली मुंबई येथे झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे बैठकीतील विषय क्रमाक ०१ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

सदर रस्त्यासाठी एकूण रुपये ८८ कोटी इतक्या खर्चापैकी रुपये २८ कोटी खर्चास मान्यता मिळालेली असून उर्वरित रुपये ६० कोटी इतक्या खर्चास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्तावास मान्यता देण्याचे प्रस्तावित आहे. तसेच एकूण ११ रस्त्यापैकी पाच रस्ते महाराष्ट्र राज्य विकास महामंडळाने करावेत व उर्वरित सहा रस्ते शिर्डी संस्थानने करावेत असे बैठकीत ठरले. तसेच डी.एस.आर प्रमाणे जो भाव असेल त्याप्रमाणे अंदाजपत्रके तयार करावीत असे सांगितले. उपाध्यक्ष श्री कोल्हे यांनी बैठकीत सांगितले. मात्र सदर प्रस्ताव हा दोन वर्षापासूनचा असून नगरपालिकेने याबाबत ठराव करुन दिलेला आहे, असे प्रधान सचिव व विधी परामर्शी यांनी सागितले.

चालू डी.एस.आर प्रमाणे अंदाजपत्रके तयार करावीत, तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला जर काही आक्षेप नसेल तर आर्बिटैटरची आवश्यकता नाही. तरी प्रथम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळासमवेत एक बैठक आयोजित करावी असे सचिव, विधी व न्याय विभाग यांनी बैठकीत सांगितले. तसेच आता संपूर्ण रुपये ८८ कोटीच्या प्रस्तावास मान्यता दिल्यास पून्हा सदर प्रस्तावास शासनाची आवश्यकता रहाणार नाही. सदर प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यानंतर मा.मंत्री (विधी व न्याय) व मा.मुख्यमंत्री यांची मान्यता घेण्यात येईल असे प्रधान सचिव व विधी परामर्शी यांनी सांगितले.

त्यानुसार अपेक्षित खर्चाचा सुधारीत प्रस्ताव इकडील पत्र क्र.७४९३/२०१० दि. २६/०५/२०१० अन्वये सादर करणेत आलेला असून मा. विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई याचे दि.२०/०८/२०१३ रोजीचे पत्राचे अनुषंगाने इकडील पत्र क्र. ४२३०/२०१३ दि.१९/१२/२०१३ अन्वये या प्रस्तावाबाबत खुलासेवजा सविस्तर तपशिल सादर करण्यात आला आहे. दरम्यान मा.व्यवस्थापन समिती ठराव क्र. ६४० दि. ०७/०८/२०१० अन्वये ठरल्यानुसार काम सुरु ठेवण्यात आले असून आजअखेर सदरहु प्रकल्पावर रु. ६२.३४ कोटी रक्कम खर्च करणेत आलेली आहे.

सदर प्रकल्पातील ११ रस्त्यांची कामे सुरु करणेस महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडुन उशीर होत असल्याने या प्रकल्पातील ११ रस्त्यांपैकी फक्त ०५ रस्ते विकसीत करणेचे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, पुणे यांचेमार्फतचे (२.५६ कि. मी. लांबीचे) रस्त्यांचे काम किरकोळ बाबी वगळता पूर्ण करण्यात आले आहे व मा. व्यवस्थापन समिती ठराव क्र. १६(ब) दि.१०/०१/२०१० अन्वये ठरल्यानुसार उर्वरीत ७.१७ कि.मी. लांबीचे ०६ रस्ते संस्थानमार्फत विकसित करणेत येत आहेत. सदर प्रकल्पाचे काम ठेकेदार मे. रोमन टारमॅट लि., नवि मुंबई यांना देणेत आलेले आहे.

शासनमान्यतेसाठी सादर केलेल्या सुधारीत प्रस्तावाचे अनुषंगाने शासनाचे विधी व न्याय विभागाकडील जा. क्र.सासंवि-२००६/८७६/१३१ का.सोळा दि.२० ऑगस्ट,२०१३ रोजीचे पत्रान्वये मागविलेली माहिती इकडील जा. नं. ४२३०/२०१३ दिनांक १९/१२/२०१३ रोजीचे पत्रान्वये सादर करणेत आली आहे.

प्रस्तुत प्रकरणांचा पाठपुरावा करणेकामी संस्थानचे उपकार्यकारी अभियंता (बांधकाम विभाग) व शाखा अभियंता हे दि.०६/०१/२०१४ ते ०८/०१/२०१४ या कालावधीत विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई येथे गेले होते. त्यावेळेस मा. कार्यासन अधिकारी यांनी सदरहू कामी येणारे सुधारीत खर्चाचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करावा असे निर्देश दिले होते. त्यानुसार जा. नं. ४६१९/२०१४ दि. ०७/०१/२०१४ रोजीचे पत्रान्वये सदरहू प्रकल्पासाठी येणारे खर्चाचा सुधारीत प्रस्ताव सादर करणेत आला आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. नं. | संस्थेचे नांव | तपशिल | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १. | महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, पुणे | ठेकेदार यांना द्यावयाची एकूण रक्कम (भावफरक बिलासह)<br>सल्लागार फी<br>महामंडळ सेंटेज चार्जेस | ९,३७,००,०००/-<br>२९,००,०००/-<br>४८,००,०००/-<br>१०,१४,००,०००/- |
| २. | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी | संयुक्त मोजणी शुल्क व इतर अनुषंगीक कामकाजा पोटी<br>रोहित्रे व विद्यूतवाहिन्या स्थलांतरीत करणे | ४,७३,७१६/-<br>४३,७०,९९२/-<br>४८,४४,७०८/- |
| ३ | उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी | एकुण ०९ रस्त्यांचे भूसंपादना पोटी खर्चाची रक्कम | ३९,४५,९२,५१३- |
| ४. | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी | ठेकेदार यांना द्यावयाची एकूण रक्कम (भावफरक बिलासह)<br>सल्लागार फी | ३७,३३,२६,१९९/-<br>१,२५,००,०००/-<br>३८,५८,२६,१९९/- |
| | | **एकुण खर्च रुपये.-** | **८८,६६,६३,४२०/-** |

**विभागाचा अभिप्राय/ मत:** शासनाचे विधी व न्याय विभागाकडे सादर केलल्या प्रस्तावात वरील प्रमाणे रुपये ८८,६६,६३,४२०/- ऐवजी पुर्णांकीत रुपये ८८ कोटी रकमेस मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव सादर करणेत आला होता. याबाबत कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे निर्देशानुसार सदरहू कामी येणारा खर्च पुर्णांकीत न करता रुपये ८८.६७ कोटी रकमेचा सादर करणे बाबत चर्चा झाली. त्यानुसार याकामी येणारा रुपये ८८.६७ मात्र खर्च अपेक्षित असल्याचे कळविणेत आले आहे. त्यानुसार शासन मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५** **विश्वस्तांच्या सुचनांबाबत.**

**निर्णय क्र.८०** **मा.विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या-**

**(१)** दि.२६.०९.२०१३ पासून संस्थान आस्थापनेवरील उपकार्यकारी अधिकारी या रिक्त पदावर तहसिलदार, राहाता यांना शासन निर्णय, विधी व न्याय विभाग, क्र.- सासंवि-२०१३/ ६/ प्र.क्र.३/ २०१३/ का.सोळा, दिनांक ०५ मार्च २०१३ अन्वये अतिरिक्त कार्यभार दिलेला आहे व आजतागायत ते उपकार्यकारी अधिकारी या पदाचा कार्यभार चांगल्या प्रकारे व विनातक्रार सांभाळत आहेत.

दि.०७.०९.२०१४ रोजी श्री.आप्पासाहेब शिंदे, तहसिलदार, राहाता यांचा तहसिलदार, राहाता या पदाचा कार्यकाळ पुर्ण होत असून आगामी लोकसभा निवडणूक-२०१४ साठी होणाऱ्या अधिकाऱ्यांच्या बदल्यांमध्ये त्यांचा समावेश आहे.

म्हणून श्री.आप्पासाहेब शिंदे, तहसिलदार, राहाता यांना संस्थानचे आस्थापनेवरील रिक्त असलेल्या उपकार्यकारी अधिकारी या पदावर शासनाकडून प्रतिनियुक्तीने नेमणूक करणेकामी, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांना पत्रव्यवहार करणेत यावा. (कार्यवाही- अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**(२)** माथुर ॲण्ड कापरे असो. प्रा.लि., नवी दिल्ली हे यापुर्वी सन- १९९९ चे सुमारास संस्थानतर्फे उभारणेत आलेल्या मंदिर परिसर पुर्नविकास प्रकल्पाचे आर्किटेक्ट होते. तसेच, त्यांनी सध्याचे नियोजित दर्शन रांग प्रकल्पासाठीही संकल्पनात्मक आराखडा तयार केलेला असून तो पुर्वीचे व्यवस्थापन समितीच्या दि.०१.०६.२०१० रोजीचे सभेपुढे सादर केलेला होता. तरी आर्किटेक्ट माथुर ॲण्ड काप्रे, नवी दिल्ली यांना त्यांनी तयार केलेला संकल्पनात्मक आराखडा त्रिसदस्य समिती सभेपुढे सादर करणेसाठी पाचारण करणेत यावे. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**(३)** शासन नियमानुसार संस्थान सेवेत असताना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे एका पात्र नातेवाईकास मानवतेच्या दृष्टीकोणातून अनुकंपाकारणास्तव संस्थान सेवेत घेतले जाते. सध्या संस्थान आस्थापनेवर वर्ग-०४ ची पदे रिक्त नाहीत, त्यामुळे संस्थान सेवेत मयत झालेल्या कर्मचाऱ्याचे नातेवाईकास तुर्त लेबर कॉन्ट्रॅक्टरमार्फत किमान वेतनावर संस्थानमध्ये कामास घेतले जाते. परंतु असे निदर्शनास आले आहे की, मयत कर्मचाऱ्याने संस्थानची खोली घेतलेली असल्यास त्याचा नातेवाईक कॉन्ट्रॅक्टरमार्फत कामावर घेतल्यास सदर खोली खाली करुन संस्थानच्या ताब्यात देत नाही व त्यामुळे गरजवंत कर्मचाऱ्यास संस्थानची खोली मिळत नाही.

यापुढे संस्थानची खोली खाली करुन दिल्यानंतरच मयत कर्मचाऱ्याच्या नातेवाईकास अनुकंपा तत्वावर कॉन्ट्रॅक्टरमार्फत कामावर घेण्यात यावे.

(कार्यवाही- अधिक्षक, सामान्य प्रशासन/ कामगार अधिकारी/ वैद्यकिय संचालक)

---

**(४)** मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने अपिल क्र.१८/ २०११, सिव्हील ॲप्लीकेशन नं. ९४१९/ २०१३ मध्ये संस्थान रुग्णालयांकडील वैद्यकिय अधिकारी व कर्मचारी भरतीबाबत घेण्यात येणाऱ्या मुलाखती घेण्यासाठी दोन शासकीय अधिकारी व एक व्यवस्थापन समिती सदस्य यांची समिती गठीत करणेबाबत दि.१३.०८.२०१३ रोजी आदेश केलेला आहे.

त्यानुसार मा.संचालक- आरोग्य सेवा- महाराष्ट्र शासन, मा.संचालक- वैद्यकिय शिक्षण व संशोधन- महाराष्ट्र शासन तसेच मा.कार्यकारी अधिकारी- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या तीन सदस्यांची समिती तयार करणेत येऊन, संस्थान रुग्णालयांकडे नेमणूक करावयाच्या वैद्यकिय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मुलाखती घेण्यात याव्यात. तसेच या समितीचा अहवाल सिलबंद करणेत येऊन, त्रिसदस्य समिती सभेपुढे सादर करणेत यावा. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**(५)** साईभक्त व ग्रामस्थांचे सोयीसाठी भारतीय रेल्वे विभागास रेल्वे तिकिट आरक्षण काऊंटर चालविणेसाठी मंदिर परिसरामध्ये जागा देण्यात आलेली होती. परंतु मंदिर परिसर सुरक्षिततेच्या दृष्टीकोणातून दि.१०.०१.२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्र.१९२ अन्वये सदर रेल्वे तिकिट आरक्षण काऊंटर मंदिर परिसरातून खाली करुन घेण्यात आलेले आहे.

सध्या रेल्वे तिकिट आरक्षण काऊंटर मंदिर परिसरापासून ०३ कि.मी. अंतरावर असलेल्या साईनगर रेल्वे स्टेशन येथे असल्यामुळे अंध-अपंग, वृध्द व इतर साईभक्तांची गैरसोय होत आहे व ते नाराजी दर्शवितात. त्यामुळे साईभक्तांची रेल्वे तिकिट आरक्षणाची गैरसोय लक्षात घेता, साईप्रसाद नं.०२ इमारतीमधील तळमाळयावर भारतीय रेल्वे विभागास, रेल्वे तिकिट आरक्षण काऊंटर चालविणेसाठी लायसन्स फी न आकारता, ०१ वर्षाचे कालावधीसाठी लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर मीटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार आकारणेत येऊन, एक खोली (जागा) उपलब्ध करुन देण्यात यावी.

(कार्यवाही- विधी अधिकारी)

---

वरील निर्णय क्र. ०१ ते ८० सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर सायंकाळी ०६.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| (अजय मोरे) | (डॉ.संजीवकुमार) |
| कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी |
| सदस्य | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी कक

**निर्णय क्र.४६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या ब प्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली. तसेच, ब प्रमाणे कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर प्रस्तावित अ चा विचार करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---